म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ~~लग्न पत्रिका~~
दा. क्र. ४६२७

IREK-0105627

IRBK-0105627

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

एक पंचवीस सव्वीस वर्षांचा तरुण हातीं निशाण घेऊन सर्वांच्या पुढें चालत होता. तो मागें वळून थांबला आणि म्हणाला, " हो, तो माझा वडील भाऊ. "

आणि याच तरुणाच्या उत्साहानें, खटपटीनें आणि पैशानें आजचा हा समारंभ साजरा झाला होता.

" अंः ! आपले बंधु का ? आपण इथले जमीनदार आहांत वाटतं ? "

त्या तरुणानें लाजेनें मान खालीं घातली. तो कांहींच बोलला नाहीं.

अध्याय २

विप्रदास आपल्या बैठकीच्या खोलींत बसला होता. धाकट्या भावाला तिं बोलावून घेऊन तो म्हणाला, " कालच्या समारंभ कांहीं एकंदरींत वाईट झाः नाहीं. तसा गाजला म्हणायला कांहीं हरकत नाहीं. तुमचे ' वॉरक्राय ' सुद्धां चांगले निवडक होते हें कांहीं नाकबूल करतां यायचं नाहीं. "

द्विजदास मुकाट्यानें उभा राहिला होता.

विप्रदासनें पुनः विचारलें, " ही मिरवणूक अगदीं माझ्या नाकावर टिचून काढली होती वाटतं ? म्हणूनच वाटतं अगदीं इथनं माझ्या समोरून नेली ? मी घाबरेन असं वाटलं ? "

द्विजदासनें शांतपणानें उत्तर दिलें, " नुसतं आपल्यासाठींच कां, ज्या रस्त्यानं मिरवणूक गेली त्या रस्त्यावर जे जे कोणी घाबरण्याजोगे होते त्यांना घाबरवण्यासाठीं. "

विप्रदास गालांतल्या गालांत हंसला. त्या हंसण्यांत बेपर्वाईची वृत्ति होती. तो म्हणाला, " तुझा दादा तसल्या जातीचा माणूस नव्हे, हें तुझ्या मिरवणुकवाल्यांतल्या बऱ्याच माणसांना तरी माहीत असावं, नाहींतर त्यांच्या ललकाऱ्या ऐकण्यासाठीं आंतून उठून बाहेर गच्चींत येऊन मला कान द्यावा लागला नसता. घरच्या घरांतच ऐकू आलं असतं. तुमच्या या बावटे निशाणांची आणि लंब्याचौड्या व्याख्यानांची मुळींच भीति वाटत नाहीं. दांताची नकली कवळी झगझगीत दिसली तेनं कांहीं कोणाचा चावा घेतां येत नाहीं एवढं मी जाणतों ! "

काल लोकांचा डाओरडा जो एकदम थांबला त्याचें कारण सर्वांना

एकदम कळून चुकलें होतें. त्यामुळेंच द्विजदास मनांतल्या मनांत अगदीं शरमिंदा झाला होता. एकंदरींत तो शांत प्रकृतीचा माणूस होता. दादाबद्दल त्याला अत्यंत आदर होता. म्हणून इतर प्रसंगीं तो कदाचित् उगीच राहिला असता पण यावेळीं लागलेला चिमटा सहन करणें त्याला कठीण गेलें. मोठ्या अदबीनें तो म्हणाला, " दादा, नकली दांतांनीं जेवढं व्हायचं तेवढंच होतं, तें मला माहीत आहे. पण अस्सल दांतवाले लोक जगांत आहेत अन् प्रसंग आला ते चावा घेतल्यावांचून रहायचे नाहींत हें मात्र अजून आपल्या सारख्यांना माहीत नाहीं म्हणायचं ! "

हें उत्तर अनपेक्षित होतें. आश्चर्यचकित मुद्रेनें त्यांच्याकडे पहात विप्रदास म्हणाला, " असं का ? "

द्विजदास कांहींतरी उत्तर देणार होता पण वचक वाटून उगीच राहिला. त्याला वचक वाटला तो विप्रदासचा नव्हता; दाराच्या बाहेरून अचानक आईचा आवाज ऐकूं आला, " दरवाजाचे हे पडदे सोडून कशाला रे ठेवतां ? शिवाशिव झाल्याशिवाय घरांत इकडून तिकडे फिरणं कठीण होऊन बसलंय्. विलायती फॅशनचा झाला आहे सारा घरसंसार ! "

द्विजदासनें घाईघाईनें पडदा दूर केला. आसन सोडून विप्रदास उभा राहिला. एक प्रौढ विधवा स्त्री आंत आली. तिची चाळिशी उलटलेली असावी पण अजूनही तिचें तारुण्य आणि सौंदर्य असामान्य होतें. साधारणपणें तिची देहयष्टि कृश झालेली दिसत होती. चेहऱ्यावरची वैधव्याची कठोर छाया पहातांच नजरेंत भरण्याइतकी उठावून दिसत होती.

धाकट्या मुलाकडे पूर्णपणें पाठ करून मोठ्या मुलाला उद्देशून ती म्हणाली, " काय रे विपिन, या महिन्यांत म्हणे एकादशीच्या तिथीचा पंचांगांत घोटाळा झालाय ? असं तर कधीं होत नाहीं ! "

विप्रदास म्हणाला, " तसं व्हायला नको होतं आई. "

" त्या स्मृतिरत्न महाशयांना एकदां बोलावून घे पाहूं. ते काय म्हणतात तें तरी ऐकूं ! "

विप्रदास थोडेंसें हंसून म्हणाला, " त्यांना [illegible] लावतों, पण त्यांच्या सांगण्याचा काय परिणाम होणार आहे आई ? अ[illegible]ला जें कळलं आहे त्यामुळं त्या दोन्ही दिवशीं तूं पाण्याला शिवायच्[illegible]ं नाहींस हें तर ठरलेलंच आहे. "

आई हंसली आणि म्हणाली, " उगीच उपास करून मरायची हौस असते का कुणाला ? केलं तर पुण्य नाहीं, न केलं तर मात्र नरक मिळायचा ! आणखी असं पहा, सूनबाई म्हणत होती कलकत्त्याला कुणी एक भागवत सांगणारा बडा पंडित आला आहे असं वर्तमानपत्रांत लिहिलं आहे म्हणे. एकदां तपास कर पाहूं. त्याची पायधूळ एकदां या घरीं कशी झडेल तो पण तपास करूं. "

" तुझा हुकूम झाला कीं सारं कांहीं होईल आई. "

" कां माझाच हुकूम कशाला हवा ? तुला नाहीं का ऐकावंसं वाटत ? मागं कीर्तन झालं त्याला इतके दिवस झाले—"

विप्रदास हंसला आणि मधेंच म्हणाला, " त्याला अजून तीन महिने सुद्धां झाले नाहींत – नाहीं का आई ? "

आई आश्चर्यचकित होऊन म्हणाली, " सारे तीनच महिने का ? पण तीन महिने म्हणजे काय थोडे दिवस झाले ? तें कांहीं का असेना, यावेळीं नाहीं म्हणून चालायचं नाहीं बाबा. माझ्या दोन्ही मामींचीं पत्रं आलीं आहेत. कैलासनाथ मानससरोवराच्या दर्शनासाठीं यावेळीं मी जाणारच जाणार ! "

विप्रदास हात जोडून म्हणाला, " तुला शपथ आहे आई, एवढं मात्र सांगूं नकोस मला. तुझ्या दोन मुलांपैकीं एक मुलगा तरी बरोबर हवा. नाहीं तर नुसत्या मामींच्या जिम्मेदारीवर तुला तिबेटांत पाठवतां यायचं नाहीं. मी हवं तें नुकसान सोशीन पण अजून माझी आई हवी आहे मला. "

आईच्या दोन्ही डोळ्यांना पाणी आलें. ती म्हणाली, " भिऊं नकोस रे ! कैलासच्या रस्त्यावर मरण येण्याइतका पुण्याचा सांठा तुझ्या आईच्या पदरीं नाहीं. गेलें तरी मी निश्चित परत येईन. मुलांतला कुणी बरोबर यायचा म्हटलं तर तुला कांहीं येणं शक्य नाहीं विपिन—शिवाय हा एवढ्या मोठ्या संसाराचा सारा भार तुझ्यावर आहे. अन् माझ्या मागं जो मुलगा उभा राहिलाय् त्याला बरोबर घेऊन वैकुंठाला सुद्धां जायला मी कांहीं तयार व्हायची नाहीं. ब्राह्मणाचा मुलगा—संध्याबिंध्या केव्हांच सोडून दिली आहे अन् तिथं कलकत्त्याला काय मातीमसण खातो कोण जाणे—अन् काल यानं काय केलं तें कळलं का तुला ? "

अगदीं सभ्यपणाचा आव आणून विप्रदास म्हणाला, " आणखी काय केलं तें मला कळलं नाहीं कांहीं. "

आई म्हणाली, " निश्चित कळलं आहे. तुझ्या डोळ्यांत धूळ टाकण्याइतकी अक्कल कांहीं या पोराच्या अंगीं नाहीं. या प्रकरणीं कांहीं तरी केलं पाहिजे. अन्नवस्त्र या आमच्या घरचं घ्यायचं आणि आमच्याच पैशानं कलकत्त्याचीं माणसं आणून आमची रयत बिघडवायचा घाट घालायचा ! याची कलकत्त्याची खर्ची बंद कर पाहूं. "

विप्रदास म्हणाला, " तसं कसं होईल आई ? शिक्षणाचा खर्च का बंद करायचा ? त्यानं शिकायचंच नाहीं का ? "

आई म्हणाली, " कशाला ? माझ्या मामंजींच्या शाळेंतलीं मुलं इथं गोळा होऊन आलीं अन् म्हणालीं परदेशी शिक्षणानं देशाचा नाश होतो, तेव्हां तूंच त्यांना विरोध करायला निघालास ? आणि आतां तुझाच धाकटा भाऊ आतां तसंच म्हणत फिरतोय त्याला नाहीं का खोडून काढायचं ? हा कसला तुझा पक्षपात ? "

विप्रदास हंसून म्हणाला, " त्याला तसंच कारण आहे आई. शाळेंतल्या वर्गांत वर घेतलं नाहीं म्हणून कुणी तक्रार केलेली मला पटत नाहीं. पण द्विजू-सारखा एम. ए. झालेला माणूस जर विलायती शिक्षणाला नांवं ठेवायला लागला तर त्याचं कांहीं वाटत नाहीं मला. "

आई म्हणाली, " पण हें आतांचं ? आमच्याच पैशानं आमच्याच रयतेला चिथवायचं ? "

हा वेळपर्यंत द्विजदास उगाच राहिला होता. त्यांच्या भाषणांत त्यानें तोंड घातलें नव्हतें. आतां मात्र तो उत्तर द्यायला सरसावला आणि म्हणाला, " कालच्या सभा मिरवणुकीसाठीं तुमच्या इस्टेटींतला एक पैसासुद्धां मी खर्ची घातला नाहीं. "

आंत आल्यापासून आईनें एकदांही मागें वळून पाहिलें नव्हतें—या वेळींही पाहिलें नाहीं. तिनें विप्रदासाला विचारलें, " तर मग त्या पोरट्याला विचार—म्हणावं हे पैसे आणलेस कुठून ? नोकरी का करतो आहेस ? "

अगदीं याच वेळीं पडद्याबाहेर बांगड्या खळखळल्याचा आवाज झाला. तिकडे कान देऊन विप्रदास म्हणाला, " हें घे तुझं उत्तर ! तुझीच सून जर पैसा पुरवूं लागली तर तिला नको कोण म्हणणार ? "

आतां कुठें तिला आठवलें. ती म्हणाली, " हो, असं आहे खरं. हें सतीचंच काम ! श्रीमंताची मुलगी—बापाच्या जमीदारीकडून दरवर्षी सहा

हजार येतात तिला तें ध्यानांत नव्हतं माझ्या. तीच पैसे पुरवते आहे आपल्या या बहुगुणी दीराला !—" जरा थांबून ती म्हणाली, " हें लग्न ठरवायला व्याहीबुवा आले होते त्यावेळीं मीच आमच्या यांना म्हटलं होतं—कीं रायमहाशयांच्या घरची मुलगी कांहीं आमच्या घरीं नको. त्यांच्या कुळांतला तो अनाथ राय विलायतला जाऊन मडमेशीं लग्न करून आला होता. काय करायचं ठेवलं होतं त्यांनीं ? वाटेल तो धूडगूस घातला होता त्यानीं !—"

विप्रदास तसाच हंसत होता पण कांहींच बोलला नाहीं. सतीच्या कपाळावर बसलेला हा छाप केव्हांही पुसून जायचा नाहीं हें त्याला माहीत होतें. तिच्या सासरच्या कुळांतला कुणीतरी एक दूरचा अनाथ राय नांवाचा नातलग बंगाली मडमेशीं लग्न लावून आला होता, ही गोष्ट आईनें अगदी पक्की ध्यानांत धरून ठेवली होती.

सारेच बोलायचे थांबले असें पाहून ती पुन्हा म्हणाली, " बरं, जाऊं दे तें. कैलासनाथाची हांक आली आहे. एकदां त्याचं दर्शन करून येतें. मग काय करायचं तें करूं ! " असें म्हणून ती बाहेर निघून गेली.

विप्रदास म्हणाला, " काय रे द्विजू आईला घेऊन जाशील ? आतां एकदां तिनं जायचं ठरवलंय—तिथं नको म्हणून चालेलसं वाटत नाहीं. "

एकदम नकार देऊन द्विजदास म्हणाला, " मी देवदेवता मानीत नाहीं तें माहीत आहे ना तुम्हाला ? शिवाय मला घेऊन वैकुंठाला जायलासुद्धां ती नाराज आहे. तिनंच आतां सांगितलं तें ऐकलंत ना ? "

विप्रदास चिडून म्हणाला, " होय हो पंडितजी ऐकलं. तुला जायचं आहे कीं नाहीं सांग—"

" यावेळीं मला मरायलासुद्धां फुरसत नाहीं ! असें म्हणून पुढल्या प्रश्नाची अपेक्षां न करतां द्विजदास निघून गेला.

एक सुस्कारा सोडून विप्रदास उद्गारला, " असं आहे ! देशकायापुढ आईचीसुद्धां पर्वा करायची नाहीं ! "

या जागीं आईचा थोडासा परिचय देणें अवश्य आहे. ही विप्रदासची सावत्र आई. विप्रदासच्या आईच्या मृत्यूनंतर एक वर्षानें यज्ञेश्वराचें दयामयीबरोबर लग्न झालें. ती घरीं आल्यापासून तिच्याच हातीं तो लहानाचा मोठा झाला. ही आपली औरस आई नव्हे हें विप्रदासला बराच मोठा होईपर्यंत कळलें नव्हतें.

२

या घरांत द्विजदास सर्वांपेक्षां जास्त कौतुक करीत असे वहिनीचें. सर्व प्रकारच्या निष्कारण खर्चाची रक्कम वहिनीच्या पेटींतूनच त्याच्या हातीं येत असे. नुसती वडील भावाची बायको म्हणूनच सती वडील होती असें नव्हे; तर वयानेंही ती त्याच्यापेक्षां कांहीं महिन्यांनीं वडील होती. म्हणूनच ती बहुधा त्याला त्याच्या नांवानें हांक मारीत असे. ती अशी नांवानें हांक मारते म्हणून लहानपणीं द्विजू आपल्या आईजवळ वारंवार तक्रार करीत असे.

अकराव्या वर्षींच सती या घरीं सून म्हणून आली त्यामुळें तिच्या कौतुकाला सीमा नव्हती. सासू हंसून म्हणे, " खरंच तर, दीराला नांवानं हांक मारतेस हें कांहीं बरं नव्हे सूनबाई—"

सती म्हणे, " बरं नव्हे कसं ? मी वयानं बरीच मोठी आहें ना त्याच्यापेक्षां ? "

" बरीच मोठी ? किती मोठी ? "

" माझा जन्म झाला वैशाखांत आणि याचा भाद्रपदांत. "

सासू हंसून म्हणे, " हो खरंच, भाद्रपदांत. माझ्या ध्यानांत नव्हतं. आतां पुन्हा तो तक्रार करूं लागला तर चांगले कान पिरगळीन त्याचे. "

अशाप्रकारें वरिष्ठ कोर्टांत हार मिळाल्यामुळें द्विजू रागावून निघून जाई. तो गेल्यावर सुनेला जवळ घेऊन सासू मोठ्या प्रेमानें म्हणे, " अगदीं पोर आहे तो. त्याला कांहीं कळत नाहीं. भावजी म्हटलंस तर त्याला बरं वाटेल. खूष होईल तो. मधून मधून म्हणत जा तसं ! कसं ? "

होकार देऊन सती म्हणे, " ठीक मधून मधून तसं म्हणत जाईन. "

त्यावेळीं ती एक मुलगी होती—आतां ती या मोठ्या संसारांतली गृहिणी झाली होती. वैधव्य आल्यापासून तिची सासू आपल्या जपसपांत आणि धर्म-कर्मांत गुंतून पडलेली असे.

सासूचा तो पूर्वीचा उपदेश पुढल्या आयुष्यांत सतीला फार उपयोगी पडला होता—जसा आज.

गेल्या प्रकरणांत वर्णन केलेल्या घटनेनंतर पंधरा सोळा दिवस निघून गेले. सकाळींच सती दीराच्या अभ्यासाच्या खोलींत येऊन म्हणाली, " अहो, भाऊजी. —"

हात वर करून तिला थांबवीत द्विजदास म्हणाला, "पुरे, वैनी, पुरे. खुशामतीचं काम नाहीं. मी कबूल आहें."

"काय कबूल ? सांगा ना !"

"तुझा हुकूम होईल तो. पण दादाची ही जबरदस्ती आहे."

"जबरदस्ती कशी ? सांगा ना ?"

तसाच रागारागानें द्विजदास म्हणाला, "सारं कांहीं मला कळलं आहे. आतांच मी हा दादाच्या तिकडून आलों. दादा, आई आणि तूं आंत जें कारस्थान करीत होतां तें सारं माझ्या कानीं आलं आहे. मला समोरासमोर बोलायची छाती होत नाहीं म्हणून मिटवामिटव करायला पहात आहेत ! ही जबरदस्ती नव्हे का ?"

सती हंसत म्हणाली, "मुळींच नव्हे भाऊजी यांत कसली जबरदस्ती ? त्यांनीं कांहीं विचारलं तर, 'मला मरायला सुद्धां फुरसत नाहीं' असा तुमचा जबाब येतो तें माहीत आहे त्यांना. पण वहिनीनं शब्द टाकला तर नाहीं म्हणायची द्विजूची छाती नाहीं."

द्विजदास होकार देत म्हणाला, "इथंच तर सारी मुष्कील आहे ना ! अशी कळ पकडून ठेवली आहे त्यांनीं. तोच आहे त्यांचा जोर. बरं, आतां काय करूं मी ?

सती म्हणाली, "सासूबाई कैलास दर्शनाला जात आहेत. तुम्ही बरोबर गेलं पाहिजे त्यांच्या."

कांहीं वेळ थांबून विचार करीत द्विजदास म्हणाला, "सहज दोनतीन महिने जातील. इथं कामाचा कसा घोटाळा होईल याची तुला कल्पना आहे ना वहिनी ?"

कबुली देऊन सती म्हणाली, "घोटाळा होईल हें मला कबूल आहे. तशी थोडीशी अडचण होणारच. पण एक नवा देश तर पहायला मिळेल ? हें जाणं कांहीं अगदींच खर्चखातीं पडायचं नाहीं. माझी शपथ आहे—आतां विचारलं तर नाहीं म्हणायचं नाहीं."

द्विजदास म्हणाला, "आतां तुझा हुकूमच झाला आहे तेव्हां नाहीं म्हणायची सोयच नाहीं. जातों बरोबर. पण त्या दिवशीं आई दादाला काय सांगत होती तें कळलं ना ? कलकत्त्याला रहायचा माझा खर्च बंद करणार आहेत म्हणे !"

सती हंसून म्हणाली, "तें झालं नुसतं रागाचं बोलणं. पण हुकूम झाला तो सासूबाईंचा— तुमच्या आईंचा. दुसऱ्या कुणाचा तर नव्हे ? तें विसरून चालायचं नाहीं भाऊजी."

द्विजदासनें उत्तर दिलें, "विसरलों नाहीं वहिनी. पण तेव्हांपासून मी सुद्धां काय ठरवलं आहे माहीत आहे ? हा माझा एकटा जीव, लग्न करायची मला सवड नाहीं – तसं पाहिलं तर तो योग सुद्धां यायचा नाहीं—अर्थात माझा खर्च फारच थोडा. जरूर पडली तर शिकवण्या पत्करीन—पण या लोकांच्या इस्टेटींतला एक पैसा सुद्धां मागणार नाहीं."

पुनः हंसून सती म्हणाली, "मागायची गरजच पडायची नाहीं भाऊजी ! हवा म्हणतांच आपसूक येईल. अन् नाहींच आला तरी देखील कांहीं शिकवण्या धराव्या लागायच्या नाहींत— ही मी अशी उभी आहें तोंवर तरी ती काळजी नको. तो भार आहे माझ्यावर."

द्विजूला देखील त्या गोष्टीची खात्री होती. तें अगदीं ठरल्यासारखेंच होतें. एक क्षणभरच त्याच्या डोळ्याचीं पातीं भारावलीं. पण लगेच ती वृत्ति झटकून टाकून त्यानें विचारलें, "केव्हां यात्रेला जायचं ठरवलंय यांनीं ? केव्हांही जावोत— शेवटीं मलाच जावं लागणार त्यांच्याबरोबर. तरी देखील परवां आई अगदीं उघड उघड म्हणत होती कीं माझ्यासारख्या म्लेंच्छचारी माणसाला सांगातीं घेऊन आपण वैकुंठाला सुद्धां जाणार नाहीं. अदृष्टाची थट्टा म्हणतात ना ती हीच ! नाहीं वहिनी ?"

यावर सतीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती उगीच राहिली.

द्विजू म्हणाला, "तें कांहीं असो. तुझ्या शब्दाबाहेर मी केव्हांच जाणार नाहीं वहिनी. त्यांना म्हणावं निश्चिन्त रहा."

सती हंसली आणि म्हणाली, "मला पाठवलं तेव्हांच तीं निश्चिन्त झालीं. तिथनं मी बाहेर पडलें तेव्हांच तुझ्या दादाचे शब्द माझ्या कानीं आले. ते अगदीं ठांसून आईला सांगत होते, 'आतां यात्रेची तयारी केव्हांही कर आई. दूताचं काम हिच्यावर सोंपवल्यावर नाहीं म्हणायची आमच्या भाईची छाती नाहीं. खालच्या मानेनं आतां कसा होकार देतो तें पाहशील तूं'"

तें ऐकून द्विजदास चिडला, क्षणभर स्तब्ध राहिला आणि म्हणाला, "मी नाकबूल करणार नाहीं असा समज करून घेऊन जर त्यांनीं असा डाव टाकला असेल – बायकांच्या निरर्थक कारवाईला बळी पडून मी हा बोजा

उचलायचा असेल—तर माझ्या वतीनं वहिनी, तूं दादांना सांग, कीं असं करायला शरम वाटली पाहिजे तुम्हाला. ”

सती म्हणाली, “ तसं बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं भाऊजी. जमीनदार होऊन प्रजेचं रक्त पिळून खाणाऱ्यांची नीति आहे ती. स्वतःचा कार्यभाग होत असला कीं त्यांना कसलीच लाजशरम वाटत नाहीं. इस्टेटीचे अर्धे मालक तुम्ही—त्या इस्टेटींतून एक पैसा सुद्धां घ्यायला तुम्हाला संकोच वाटतो—तें पाहून एका दृष्टीनं मला दुःख वाटतं. तसंच दुसऱ्या बाजूनं पाहिलं तर तितकाच अभिमान वाटतो. मी सासूबाईंना तुमचं नांव सांगून आश्वासन दिलंय, त्यांच्या यात्रेला अडथळा व्हायचा नाहीं. तुम्ही बरोबर याल, असं वचन दिलंय. त्यांच्याबरोबर जा, तीर्थयात्रा करा—ख्यालीखुशालीनं परत या—त्यामुळं तुमचं जें नुकसान होईल त्याची भरपाई मी करून देईन भाऊजी. ”

द्विजदास मुकाट्यानें उठला आणि वहिन्याच्या पायाला हात लावून नमस्कार करून पुनः आपल्या जागीं बसला.

सती म्हणाली, “ आतांपर्यंत दुसऱ्याची वकिली करण्यांत वेळ गेला—आतां माझं एक काम सांगायचं आहे. ”

द्विजदास हंसून म्हणाला, “ तुझं स्वतःचं ? तें होणं शक्य नाहीं वहिनी—”

सतीही हंसली आणि म्हणाली, “ त्यांत कांही आश्चर्य नाहीं भाऊजी. मागनं सांगितलं नाहीं असं तुम्ही म्हणूं नये एवढीच भीति आहे मला. ”

“ ठीक आहे. बोलून टाक तर मग. ”

सती म्हणाली, “ माझा एक म्लेंच्छ काका आहे—बाबांचा तो चुलत चुलत भाऊ. विलायतेला गेला होता. पूर्वीच जर हें कुणाला कळलं असतं तर या घराला माझा पाय लागणं शक्यच झालं नसतं. माझ्या आईच्या तोंडून मी ऐकलं होतं वाटतं. ”

“ हो पुष्कळ वेळ. तसा हिशेबच करून पाहिलं तर गेल्या पंधरा सोळा वर्षांत निदान पांच सहा हजार वेळ तरी हें ऐकलं असेन तुझ्या तोंडून. ”

सती हंसून म्हणाली, “ तेवढाच आहे माझा अंदाज. काका मुंबईला असतात. त्यांची एक मुलगी आहे. तिथंच चाललंय तिचं शिक्षण, येत्या वर्षीं पुढल्या शिक्षणासाठीं ती विलायतेला जाणार आहे. तुम्ही जाऊन तिला आणलं पाहिजे तिकडून. ”

“ कुठून ? मुंबईहून ? ”

"हो. मी एकटीच येईन म्हणून तिनं लिहिलंय. पण एवढ्या दुरून तिनं एकटं यावं हें कांहीं मला पटत नाहीं."

"तिला पोंचवायला नाहीं का कुणी तिथं ?"

"नाहीं. काकांना रजा मिळत नाहीं."

चट्कन होय म्हणणें द्विजदासाला कठीण गेलें. तो विचार करूं लागला.

सती बोलत होती "—माझं लग्न झालं तेव्हां ती सात आठ वर्षांची होती. त्यानंतर एकदां तिला कलकत्त्याला पाहिली होती. तेव्हां ती नुकतीच मॅट्रिक होऊन आय्. ए. त गेली होती—त्याला कितीतरी वर्षं झालीं. मला ती भारी आवडते भाऊजी. तिला इथं आणायची जरा तसदी घ्याल माझ्यासाठीं—! आपल्याला घेऊन जा, म्हणून ती मधून मधून मला पत्रं लिहिते. पण हा वेळपर्यंत तें कांहीं जमलं नाहीं !"

द्विजदासनें विचारलें, "पण आतां हें कसं काय जमलं ? आईनं दिली का कबूली ?

या प्रश्नाचें उत्तर सतीला चट्कन देतां आलें नाहीं. आणि उत्तर देतां आलें नाहीं म्हणूनच तिचा चेहरा अगदीं केविलवाणा झालेला दिसला. जरा थांबून ती म्हणाली, "सासूबाईकडे बोललें आहें मी—अजून निश्चित असं कांहीं त्यांनीं सांगितलं नाहीं खरं—पण या तीर्थयात्रेच्या बाबतींत त्या इतक्या रंगून गेल्या आहेत कीं मला वाटतं आतां नाहीं म्हणायच्या नाहींत. शिवाय त्या आतां स्वतः जाणार आहेत, तेव्हां दोन तीन महिने अनायासें ती येऊन राहील इथं आमच्याकडे !"

सासूबाईंचा हुकूम न मिळाला तरीही संधि साधून परप्रांतीं असलेल्या आपल्या बहिणीला एकदां आणायचें तिनें ठरवलें आहे असें द्विजदासला मनोमन कळून चुकलें.

त्यानें विचारलें, "ब्राह्मसमाजी आहे का तुझा काका !"

सती म्हणाली, "नाहीं ! पण हिंदुसमाज सुद्धां त्यांना आपल्यांत घेत नाहीं. आपण कुठं आहोंत याचा त्यांनाच पत्ता नाहीं. हें आहे असंच चाललंय त्यांचं !"

पुष्कळांचीच अशी स्थिति होती.

द्विजूला तो प्रस्ताव पटला: नाहीं. तो म्हणाला, "जायला माझी हरकत नाहीं वहिनी—पण मी म्हणतों आई आहे तोंवर तिला इथं

नकोस. आईची रीत तुला माहीत आहे ना ?—जेवणाखाण्यापासून शिव-ण्यापर्यंत असं कांहीं बंड माजवील, कीं त्या तुझ्या बहिणीला जीव नकोसा होईल. त्यापेक्षां आम्ही निघून गेलों, कीं नंतर तिला आणायची व्यावस्था कर. मग मात्र सारं ठाकठीक होईल. ”

हा सल्ला योग्य होता हें सतीलाही पटत होतें; पण तिनें स्वतः पत्र लिहून ज्याअर्थीं तिला बोलवलें होतें त्याअर्थीं पुढल्या अनिश्चित परिस्थितीवर विसंबून ‘ एव्हां येऊं नको ’ असें पत्र लिहिण्याची कल्पना तिला पटली नाहीं. केवढा संकोच वाटला असता ! केवढं दुःख झालं असतं !

ती म्हणाली, “ माझी बहीण म्हणून नाहीं भाऊजी—पण तेव्हां सारा महिनाभरच ती कलकत्त्याला होती, अगदी निकटचा परिचय झाला होता मी सांगतें, रूपागुणानं अशी मुलगी जगांत मिळणं दुर्लभ. बाहेरचे आचा-रव्यवहार कसेही असोत—नुसते दोन 'दिवस जरी सासूबाईंचा अन् तिचा परिचय होईल तर म्लेंच्छ मुलीसंबंधींची त्यांची कल्पना पार बदलून जाईल. मुळींसुद्धां दूर करायच्या नाहींत तिला त्या. ”

द्विजदास म्हणाला, “ पण हे दोन दिवस आईची अन् तिची गांठ घालून देणंच मोठं कठीण आहे वहिनी. ती ढुंकून सुद्धां पहायची नाहीं तिच्याकडे. ”

सती म्हणाली, “ पण रूप तर पाहतील तिचं उघड्या डोळ्यांनीं. सासूबाईंना तेवढं तरी नाकारतां यायचं नाहीं ? तो एक परिचयच होईल म्हणायचा. ” द्विजदास उगीच राहिला.

सती म्हणाली, “ माझी अगदी खात्री आहे—वंदनेला दूर लोटील असं एक सुद्धां माणूस या जगांत सांपडायचं नाहीं. सासूबाई सुद्धां नाहीं. ”

आश्चर्यचकित होऊन द्विजदासनें विचारलें, “ वंदना ? नांव कुंठ तरी ऐकलंय वाटतं वहिनी. कुठं पाहिलं आहे वाटतं—थांब, वर्तमानपत्रांत—किंवा कुंठ तरी तिचा फोटो—किंवा बातमी—”

त्याचें भाषण पुरें झालें नाहीं.

घाईघाईनें घराची मोलकरीण आंत येऊन म्हणाली, “ इथं आहेस का सूनबाई ? तुझे कुणी काका आपल्या मुलीला घेऊन मुंबईहून आले आहेत. बाहेर कुणीच नाहीं. बडेबाबू सुद्धां नाहीत. दिवाणजींनीं त्यांना खालीं बसवून घेतल आहे. ”

अगदीं अनपेक्षित प्रसंग !

ती म्हणाली, " म्हणतेस काय ? खरंच ?—" तशीच बोलत बोलत सती वावटळीसारखी बाहेर निघून गेली. तिच्या मागोमाग गेला द्विजदास.

४

नखशिखान्त साहेबी पोषाख केलेले एक प्रौढ गृहस्थ खुर्चीवर बसले होते. वीस एकवीस वर्षांची एक मुलगी त्यांच्याच शेजारीं उभी होती. शेजारच्या भिंतीला टांगलेली जगद्धात्रीदेवीची तसबीर ती मन लावून निरखून पहात होती. तिचा पोषाख जरी अगदींच मडमेसारखा नव्हता तरीही सहसा पाहिलें असतां ती बंगाली मुलगी असेल असें दिसून येत नव्हतें. तिच्या देहाचा वर्ण अगदींच गौर नसला तरी चांगलाच उजळ दिसत होता. देहाची ठेवण आणि चेहऱ्याचें वळण अगदीं सुंदर होतें. तिचें सौंदर्य एकदां सासूच्या नजरेला पडावें असें आतांच सती आपल्या दीराला म्हणाली होती. अगदीं डोळे मिटूनसुद्धां हें तिचें म्हणणें खरें असल्याचें त्यानें कबूल केलें असतें. बहिणीच्या सौंदर्याचा बहिणीला अभिमान कां वाटूं नये ?

खोलींत येतांच सतीनें खालीं वांकून चुलत्याला नमस्कार केला. ती म्हणाली, " एवढ्या दिवसांनीं मुलीच्या घरीं तुमची पायधूळ झडली म्हणायची काका ? "

गृहस्थ उठून उभा राहिला आणि सतीच्या मस्तकावर हात ठेवून हंसत हंसत म्हणाला, " होय ग म्हातारे, पायधूळ झडली ! केव्हां कधीं काकाला निमंत्रण धाडलं होतंस ? अन् त्यानं तें नाकारलं होतं ? कधीं ये तरी म्हटलं होतंस कां ? स्वतः होऊन आलों तेव्हां आतां नसता आव आणून पायधूळ झडली म्हणते आहेस ? "

द्विजदासकडे नजर जातांच त्यानें विचारलें, " हा कोण ? "

मागें वळून पाहून सती म्हणाली, " माझा दीर तो—द्विज. "

द्विजदासनें दुरूनच नमस्कार केला.

बहिणीला नमस्कार केल्यावर वंदना हंसून म्हणाली, अस्सं ! हेच का ते ? जमीदारीवर संकट आलं असतं तें यांच्याचमुळं होय ? माझ्या पत्रांत लिहिलं होतंस ना—वंशद्रोही —स्वजनद्रोही—भयंकर स्वदेशी ? "

" केव्हां असं मी लिहिलं होतं तुला. "

" तें परवांच ! इतक्यांत विसरलीस वाटतं ? "

मान हालवून सती म्हणाली, " केव्हांच लिहिलं नव्हतं तसं. कांहींतरी सांगते आहेस. "

हा वेळपर्यंत द्विजदास एकप्रकारच्या संकोचानें स्तब्ध होऊन राहिला होता. आपल्या नात्याची नव्हे अशा एकाद्या अपरिचित तरुणीसमोर कसें वागायचें, कशाप्रकारें बोलायचें, हें त्याला निश्चित ठरवतां येत नव्हतें. यापूर्वी असा योगायोग आला नव्हता. जरुरीही पडली नव्हती. पण या आलेल्या नव्या पाहुणीच्या विलक्षण मोकळे गांमुळें त्याच्या नजरेंत एक नवाच बदल झाला होता. सहज उत्पन्न झालेला अहेतुक संकोच एका क्षणांत नाहींसा झाल्यामुळें त्याला एकप्रकारें आनंद वाटला होता. स्त्रियांना शिक्षण दिलें पाहिजे, स्वातंत्र्य दिलें पाहिजे, असें जें म्हटलें जात होतें तें पहिल्यापासूनच त्याच्या बुद्धिला पटत होतें. आई आणि दादा यांच्याबरोबर वाद करतांना तो म्हणत असे, कीं स्त्रीजात झाली तरी माणसाचीच जात---शिक्षण आणि स्वातंत्र्य यांच्या बाबतींत त्यांना कुणाही इतकाच अधिकार आहे—घरांत कोंडून ठेवून त्यांना मूर्ख बनवणें हा अन्याय आहे. स्त्रीजातीच्या अधिकाराच्या या मामुली चर्चेपेक्षांही स्त्रियांना शिक्षण आणि स्वातंत्र्य देण्याची जरुरी पुरुषांच्या दृष्टीनें किती महत्त्वाची आहे याचा प्रत्यय या पाहुण्या मुलीच्या आकस्मिक परिचयामुळें त्याला एका क्षणांत कळून आला. स्वातंत्र्याच्या या अधिकारापासून स्त्रीजात दुरावल्यामुळें पुरुष जातीनें आपलें किती नुकसान करून घेतलें आहे याची स्पष्ट कल्पना यापूर्वी आपल्याला आली नव्हती असें त्याला वाटलें.

त्या तरुणीला उद्देशून तो हंसत हंसत म्हणाला, " आपलंच म्हणणं बरोबर आहे. वहिनी विसरून गेली वाटतं. पण या बाबतींत वितंडवाद घालण्यांत अर्थ नाहीं—" असें म्हणून गंभीरपणाचा खोटाच आव आणून तो म्हणाला, " वहिनी, तुझ्या आधारावर तर माझा सारा भरीभार—अन् तुझ्याच पत्रांत या असल्या गोष्टी ! ठीक आहे. आतां तुम्ही लोक माझ्याशीं फारखत करा अन् मीही माझा सारा हक्क सोडून देतों. तुमची जमीदारी तुम्हांलाच लखलाभ होवो. नुसतं तोंड उघडून मला हुकूम करा, कीं आतांच वकीलाला बोलावून आणून सारं कांहीं लेखी करून देतों कीं नाहीं याला हेच साक्ष ! "

वर पाहून साहेब म्हणाले, " तुझा दीर मोठा भयंकर स्वदेशी दिसतो सती. "

" हो तर ! " सती म्हणाली, " फार भयंकर. "

" नुसती तूं बोललीस एवढ्यावरूनच जमीदारीच्या हक्काचं फारखत करून द्यायला निघाला ! "

सती म्हणाली, अगदीं सहज देईल. त्याच्या कोशांत अशक्य हा शब्द नाहीं.

वंदनेची चौकस बुद्धि जागी झाली. तिनें विचारलें, " खरं म्हणतेस ? अगदीं एकदम सारं कांहीं कायमचं सोडून देतील ? "

क्षणभर तिच्या चेहऱ्याकडे पाहून द्विजदास म्हणाला, " खरोखर देईन. निळाएवढा सुद्धां लोभ नाहीं मला या दौलतीचा. देशांतल्या पंधरा आणे लोकांना एका वेळेला सुद्धां पोटभर अन्न मिळत नाहीं—सारा दिवस आंग मोडूनसुद्धां मिळत नाहीं—आणि कांहींसुद्धां हातपाय न हालवतां आम्हीं पंचपक्वानं झोडीत असतों !—हें पापाचं अन्न माझ्या तोंडीं ठरत नाहीं—शांत अडकून रहातं—असली ही दौलत गेलेलीच बरी. देशांतल्या चार लाकांसारखं निढळचा घाम काढून खाणंच बरं. मिळालं तर ठीक, न मिळालं तर त्यांच्याच शेजारीं उपाशी मेलों तर एक दिवस स्वर्ग मिळेल !—पण या असल्या परिस्थितींत तसली कांहीं आशा करायला नको. "

सारखी टक लावून त्याच्याकडे पहात वंदना ऐकत होती. त्याचें भाषण संपलें तरी ती कांहीं बोलली नाहीं. अगदीं नकळत तिच्या तोंडून एक मोठा सुस्कारा बाहेर पडला.

एकाएकीं सती भानावर आली. तिचा दीर रोजरोज याखेरीज दुसरें कांहींच बोलत नसे. त्याचीं हीं भाषणें तिला अगदीं पाठ होऊन गेलीं होतीं. ती म्हणाली, " हीं जुनीं व्याख्यानं केव्हांतरी सावकाश द्या भाऊजी. खूप वेळ आहे अजून. काकांनीं अजून हातपायसुद्धां धुतले नाहींत. चल वंदना, वर जाऊन कपडेबिपडे बदलून घे. "

साहेबानीं विचारलें, " जांवईबाबू कुठं दिसत नाहींत ते ? "

सती म्हणाली, " कसल्या जरुरीच्या कामासाठीं सकाळींच बाहेर जाणं झाल आहे. यायला उशीर होईल बहुधा.

वंदनेनें विचारलें, " तुझी सासू कुठं दिसत नाहीं ती ताई. इथंच आहे ना ? "

सती म्हणाली, " अजून आहेत खऱ्या—पण लौकरच कैलासमानससरोवरकडे तीर्थयात्रेला जाणार आहेत. सकाळभर त्यांचं पूजा आन्हिक सुरू असतं. थोड्या वेळानं येतील बाहेर. "

वंदनेनें विचारलें, " फार कर्मठ आहेत नाहींत त्या ? "
सती म्हणाली, " हो. "
" विधवा झाल्यापासून घरसंसार कांहींच पहात नाहींत—खरं का ? "
" खरं तर ! सारं कांहीं मलाच पहावं लागतं. "
उत्सुक होऊन वंदनेनें विचारलें, " ती तुझी सावत्र सासू ना ताई ? "
सती हंसून म्हणाली, " डोळ्यांना कांहीं तसं दिसत नाहीं. लोक कदाचित खोटंच सांगत असतील. "

उत्तरादाखल द्विजदास म्हणाला, " खोटंच सांगताहेत. हिची सावत्र सासू म्हणजे दादाची सावत्र आई ना ? निखालस खोटं ! सावत्र आई खरी, पण ती दादाची नव्हे—माझी ! जाऊं द्या. आधीं स्नान भोजन उरकूं दे म्हणजे सावकाश ती चर्चा करूं. आतां वर चलावं. मी सारी कांहीं व्यवस्था करतों. आतां उशीर करूं नको वहिनी. यांना घेऊन ये. " असें म्हणून तो जायला निघत होता तोंच आई आल्याचें पाहून थबकून उभा राहिला.

पाहुणे आल्याचें कळल्यामुळें पूजा अर्ध्यावर टाकून दयामयी बाहेर आली असावी. ती वयानें फारशी प्रौढ नसल्यामुळें वैधव्य आल्यापासून परक्या माणसासमोर सहसा बाहेर येत नसे. दाराआडूनच बोलत असे. पण आज ती एकदम बाहेर येऊन सर्वांसमोर उभी राहिली. माथ्यावरचा पदर तिनें कपाळापर्यंत ओढला होता तरीही तिचा चेहरा स्पष्ट दिसून येत होता.

" हे माझे थोरले काका—अन् ही माझी बहीण वंदना. " असें म्हणून सतीनें जवळ जाऊन सासूला प्रणाम केला. अशा रीतीनें निष्कारण प्रणाम करण्याची प्रथा नव्हती—उगीच कधीं कुणीं कुणाला प्रणाम करीतही नाहींत. दयामयीला मनांतल्यामनांत आश्चर्य वाटलें पण तें तिनें बाहेर दिसू दिलें नाहीं. ती उठून उभी राहातांच मोठ्या प्रेमानें तिच्या हनवटीला हात लावून मुका घेऊन तिनें आशिर्वाद दिला. पण वंदनेकडे नजर जातांच मात्र तिची दृष्टी एकदम करडी झाली. बहिणीच्या अनुकरणानें वंदनेनें जवळ जाऊन प्रणाम केला पण पायाला हात लावला नाहीं. तिचा स्पर्श होऊं नये म्हणून एक पाऊल मागें हटून दयामयी तोंडांतल्या तोंडांत म्हणाली, " आयुष्मती हो. "

" व्याहीमहाशय नमस्कार—" दयामयी म्हणाली, " मुलांबाळांच्या भाग्यानं तरी आपली पायधूळ इकडे झडली म्हणायची. "

प्रतिनमस्कार करून साहेब म्हणाले, " फार कामं होतीं—वेळ झाला

नाहीं विहीणबाई. पण आधीं न कळवतां एकदम आलों त्याची क्षमा असावी. यापुढं यायचं असलं तर आधीं खबर देऊनच येईन. ”

यावर दयामयीनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. ती नुसती म्हणाली, “ पूजा आन्हिक अजून संपलं नाहीं व्याहीमहाशय—संपल्यावर भेटेन ! यांना वर घेऊन जा सूनबाई—खाण्याजेवण्याची नीट व्यवस्था ठेव. विपिन आला कीं त्याला माझ्याकडे पाठवून दे. ” असें म्हणून इकडे तिकडे न पहातां ती तिथून बाहेर निघून गेली.

तसें पाहिलें तर गृहस्थपणाच्या बाबतींत कुठें कांहीं उणीव पडल्याचें दिसून आलें नाहीं. पूर्णिमेच्या चादण्यांत मधूनच कुठला तरी एकदा काळा ढग निर्मळ आकाशांतून एका दिशेकडून दुसऱ्या दिशेपर्यंत तरळून गेला असावा असें बारकाईनें पहाणाऱ्या सर्वांनाच वाटलें असावें.

५

स्नान वगैरे उरकून वंदना बैठकघरांत आली त्यावेळीं तिचा बाप आधींच तिथें येऊन बसला असल्याचें तिला दिसून आलें. एका गुबगुबीत आराम खुर्चींत बसून डोळ्यांना चष्मा लावून ते वर्तमानपत्र वाचीत बसले होते. जवळच्या छोट्या टेबलावर बरीचशीं वर्तमानपत्रें पडलीं होतीं, तीं तारीखवार लावून देत द्विजदास शेजारीं उभा राहिला होता. आगगाडीच्या प्रवासांत आणि कामाच्या गडबडीमुळें बऱ्याच दिवसांचीं वर्तमानपत्रें त्यांच्या नजरेखालून गेलीं नव्हतीं.

मुलगी आंत आलेली पहातांच ते वर पाहून म्हणाले, “ ऐकलंस पोरी, दोन वाजतांच्या गाडीनं मी कलकत्त्याला जायचं ठरवलंय. इथं तुझ्या ताईजवळ चार दिवस तुला रहायचं असेल तर येतांना तुला इथं सोडून मी सरळ मुंबईला जाईन. कसं ? ”

“ किती दिवस तुम्हांला कलकत्त्याला रहावं लागेल बाबा ? ”

“ पांचसात दिवस—फार तर आंठ. त्यापेक्षां जास्त नाहीं. ”

“ पण मग मला मुंबईला घेऊन कोण जाईल ? ”

“ ती व्यवस्था करतां येईल सावकाश—” असें म्हणून कांहीं वेळ विचार

करून ते म्हणाले, " बरं, बरं, तुला वाटत असेल तर आतांच इथं रहा सतीकडे. परत जातांना मी तुला बरोबर घेऊन जाईन. आतां कसं ? "

क्षणभर स्वस्थ राहून वंदना म्हणाली, " बरं, ताईला एकदां विचारून पहातें."

" आतां स्वयंपाक घरांत गेली आहे वहिनी, " द्विजदास म्हणाला, " बाहेर यायला वेळ होईल. " हातांतलें बंडल दाखवून तो वंदनेला म्हणाला, " यांतलं काय देऊं आपल्याला ? "

" वर्तमानपत्रं वाटतं ? मी नाहीं तीं वाचीत. "

" वर्तमानपत्रं वाचीत नाहीं ? "

" नाहीं. तेवढा धीर नाहीं बुवा आपल्याला. संध्याकाळीं बाबांच्या तोंडून ऐकलं कीं तेवढ्यानंच माझं पोट भरतं. "

" आश्चर्य आहे ! आपण खूप खूप वाचतां असा माझा समज होता. "

वंदना म्हणाली, " माझ्याबद्दल कांहींच माहिती नसतांना कां असा समज करून घेतला आपण ? नसता आरोप आहे हा. "

द्विजू अस्वस्थ झाला. वंदना हंसून म्हणाली, " आपण कितीसा देशोद्धार केला आणि इंग्रज लोक त्यामुळं चिडून जाऊन आपल्यावर कसे डोळे वटारूं लागले, वगैरेबद्दलची उठाठेव मला नको आहे. ती उठाठेव हवीय बाबांना. पहा ना, कसे वर्तमानपत्रांत रंगून गेले आहेत ! कांहींसुद्धां ऐकूं येत नाहीं कुणाचं. "

मुलीच्या तोंडचा नुसता ' बाबा ' एवढा शब्द साहेबांच्या कानीं गेला. पण डोळे वर करून पहायला त्यांना सवड नव्हती. ते म्हणाले, " जरा थांब म्हणतों ना ! मी हेंच शोधतोंय मघांपासून. "

गालांतल्या गालांत हंसून मान वेळावीत वंदना म्हणाली, " तुम्हीं शोध शोध शोधीत बसा वाचीत. मला एवढीसुद्धां घाई नाहीं. " द्विजदासला उद्देशून ती म्हणाली, " ताई सांगत असे कीं तुमची लायब्ररी फार मोठी आहे. तिकडेच जाऊं आपण. कसलीं कसलीं पुस्तकं जमवलीं आहेत तीं तरी पाहूं. "

" चलावं. "

लायब्ररी तिसऱ्या मजल्यावर होती. सारे जिने चढून जात असतांना द्विजदास म्हणाला, " खरोखरच लायब्ररी चांगली मोठी आहे. पण ती माझी नव्हे.

दादाची. कुठं कोणतीं पुस्तकं प्रसिद्ध झालीं आहेत तेवढी चौकशी मी करतों अन् हुकूम झाला कीं विकत आणून देतों. ”

“ पण वाचतां आपणच ना ? ”

“ असंच कांहीं नाहीं. त्यांची लायब्ररी—तेच वाचतात स्वतः. वाचनाच्या बाबतींत मोठी विलक्षण धारणाशक्ति आहे त्यांची. ”

“ कुणाची ? दादांची ? ”

“ हो. युनिवर्सिटीचीं शिक्कामोर्तब कांहीं विशेषशीं मिळालीं नाहींत त्यांना. पण मला वाटतं एवढा मोठा अभ्यासू पंडित आमच्या इकडे क्वचितच आढळेल. कदाचित नाहींच आढळायचा. आपले मेहुणे ते—त्यांना कधीं पाहिलं नाहीं वाटतं ? ”

“ नाहीं. कसे काय आहेत ते ? ”

“ अगदीं माझ्या उलट. अगदीं दिवस आणि रात्रीसारखे. मी काळा आहें तर त्यांचा रंग उजाळा दिलेल्या सोन्यासारखा आहे. देहांतल्या ताकदीच्या बाबतींत या भागांत त्यांची फार प्रख्याती आहे. लाठी, तरवार, बंदूक चालवण्यांत त्यांच्या तोडीचा इकडे तरी कुणी नाहीं. एक आई खेरीज करून असा कुणी नाहीं सांपडायचा कीं त्यांच्या डोळ्याला डोळा देईल. ”

वंदनेनें हंसून विचारलें, “ माझी ताईसुद्धां नाहीं का ? ”

द्विजदास म्हणाला, “ नाहीं. आपली ताईसुद्धां नाहीं. ”

“ अगदीं जमदग्नी आहेत वाटतं ? ”

“ नाहीं. तसेही नाहींत. इंग्रजींत ज्याला ‘ ॲरीस्टोक्रॅट ’ म्हणतात तसल्या लोकांचे, आमचे दादा कुठल्या तरी जन्मीं राजे असावेत ! निदान मला तरी तसं वाटतं. संतापी आहेत कीं काय असं विचारलं नव्हे तुम्हीं ? कुणावर केव्हां संतापायला त्यांना फुरसत आहे कुठं ? ”

वंदना म्हणाली, “ दादावर आपली भारीच भक्ति दिसते—नाहीं ? ”

द्विजदास उगीच राहिला. थोड्या वेळानें तो म्हणाला, “ केव्हां संधी आली तर या प्रश्नाचं उत्तर मी देईन आपल्याला. ”

वंदना आश्चर्यचकीत होऊन म्हणाली, “ म्हणजे काय ? ”

उगीच थोडेंसें हंसून द्विजदास म्हणाला, “ म्हणजे काय तें आतांच सांगून टाकलं कीं पुढं केव्हांतरी उत्तर द्यायचं कारणच उरायचं नाहीं. आज राहूं दे. ”

लायब्ररी खरोखरच फार मोठी होती. कपाटें, टेबलें, खुर्च्या वगैरे फर्नीचर जसें किंमतवान होतें तशीच त्यांची मांडणीही मोठ्या सुव्यवस्थित आणि सुंदर तऱ्हेनें केलेली होती. एका खेडेगांवांत एवढें मोठें सुव्यवस्थित पुस्तकालय पाहून वंदनेला फार आश्चर्य वाटलें. मुंबईत मोठमोठ्या लायब्ऱ्या होत्या, त्यांच्याशीं या लायब्ररीची तशी तुलना करतां आली नसती, पण खेडेगांवांत रहाणाऱ्या एका व्यक्तिनें केवळ एकट्या आपल्यासाठीं एवढा मोठा पुस्तकसंग्रह करून ठेवणें आश्चर्यजनक होतें.

तिनें विचारलें, "खरोखरच हीं सारीं पुस्तकं दादा वाचतात का ?"

"वाचतात अन् वाचताहेत." द्विजदास म्हणाला, "कपाटं उघडीं आहेत. पहाना जरा चाळून. त्यांनीं वाचल्याच्या खुणा प्रत्येक पुस्तकांत दिसून येतील तुम्हाला."

"एवढी सवड केव्हां मिळते त्यांना ? कीं रात्रंदिवस हेंच काम करीत असतात ?"

द्विजू नकारार्थी मान हलवीत म्हणाला, "नाहीं. निदान मला तरी तसं वाटत नाहीं. शिवाय आमची ही इस्टेट तशी अगदींच प्रचंड नसली तरी तिची व्यवस्था पहाणं कांहीं अगदींच सोपं नाहीं. कुठं काय आहे अन् कसं आहे हें सारं कांहीं दादांच्या डोळ्यांसमोर आहे. केवळ आजच नव्हे, बाबा हयात होते तेव्हांपासून असंच चाललंय. त्यांना सवड कशी अन् केव्हां मिळते याचं तुमच्यासारखंच मला सुद्धां केव्हां केव्हां मोठं आश्चर्य वाटतं. तरीपण हें असं आहे. या जगांत अशीं एकदोन माणसं जन्माला येतात, कीं त्यांची तुलना सर्वसाधारण माणसाशीं करतां यायची नाहीं. असल्यांतलेच आहेत एक आमचे दादा. मला तर असं वाटतं कीं वाचायला त्यांना श्रमच करावे लागत नाहींत. छापलेलीं अक्षरें डोळ्यावाटे शिरून आपोआप त्यांच्या मेंदूत घुसून बसतात. आतां दादाची गोष्ट सध्यां राहूं दे. अजून त्यांना आपण कांहीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलं नाहीं. माझ्या तोंडचं एकतर्फी वर्णन अतिशयोक्तिसारखं वाटायचं तुम्हाला."

"पण तें ऐकून मला तरी मोठं समाधान वाटलं."

"नुसतं समाधान वाटण्यांत कांहीं विशेष नाहीं. या जगांत तुमच्या आमच्या-सारखे अगदीं साधारण असे आणखीही दहाजण आहेतच ना ? एकुलती एक असाधारण व्यक्ति जर सारींच ठिकाणं काबीच करून बसली तर मग आम्हीं

लोकांनीं जायच कुठं ? देवानं जें हें तोंड दिलं आहे तें काय केवळ दुसऱ्याचीं स्तुतिस्तोत्रं गाण्यासाठींच तर नव्हे ?"

वंदना हंसून म्हणाली, "असं का ? अर्थात दादांना बाजूला ठेवून आतां छोट्या भावाचं स्तुतिस्तोत्र गायचं आहे— असंच ना ?"

द्विजूदेखील हंसला आणि म्हणाला, "इच्छा आहे खरी पण संधी मिळतेय कुठं ? परिचित आहेत ते ऐकत नाहींत. तेव्हां अपरिचितासमोर थोडी गुणगुण करून पहायचं. पण छाती होत नाहीं. संवय नाहीं ना ? तेव्हां स्वतःची स्तुती स्वतः करतांना भलतंच कांहींतरी होईल अशी भीति वाटतेय मला."

वंदना म्हणाली, "होईल भलतंच ! एकदां पहा ना प्रयत्न करून. या बाबतींत मला वाटतं पुरुषांची जात जन्मतःच सिद्धहस्त आहे. आतां वेळ लावूं नका. सुरवात करा पाहूं."

"नाहीं, शक्य नाहीं," द्विजू मान हलवीत म्हणाला, "त्यापेक्षां इथं स्वस्थपणें बसून इथलीं चार पुस्तकं चाळा. मी वहिनीला पाठवून देतों.'. असे म्हणून तो जायला *निघाला असें पाहून वंदना पोक्यासा चोरानें म्हणाली,*

"बरेच्च आहांत कीं आपण. नाहीं—मला इथं एकटं टाकून जायचं नाहीं. पुष्कळ पुस्तकं वाचलीं आहेत मी. आतां नको आहेत. आपण गोष्टी बोला. मी ऐकतें."

"कसल्या गोष्टी ?"

"आपल्या स्वतःच्या."

"तर मग जरा थांबा. मी आतांच खालीं जातों आणि एक खूप चांगली बोलकी व्यक्ति पाठवून देतों."

"ताईलाच ना पाठवणार ?" वंदना म्हखाली, "ती नको आहे आतां. तिला जेवढं कांहीं सांगायचं होतं तेवढं तिनं आपल्या पत्रांतून एकदांच लिहून टाकलं आहे. जें जें लिहिलं होतं तें खरं आहे कीं नाहीं तेंच ऐकायचंय मला."

"नाहीं—खरं नाहीं." द्विजदास म्हणाला, "निदान बारां आणे खोटं. चरं—आपण लौकरच विलायतेला जाणार आहांत ना ?"

स्वतःबद्दल कांहींच बोलायची त्याची तयारी नाहीं हें वंदनेला कळून चुकलें. उगीच आग्रह करण्याइतकी फाजील आपुलकी दाखवणें तिला योग्य वाटलें नाहीं. ती म्हणाली, "बाबांची तशी इच्छा आहे खरी. शाळेचा अभ्याससुद्धां तिकडेच पुरा करावा असं ते म्हणताहेत. आपणसुद्धां कां येत नाहीं.

"माझी कांहीं हरकत नाहीं." द्विजदास म्हणाला, "पण पैसे कुठले आणूं ? तिकडे शिकवण्या मिळायचीही कांहीं सोय नाहीं. अन् एवढा बोजा वहिनीवर टाकणंही मला योग्य वाटत नाहीं. आतां ती आशाच नाहीं."

त्याचें भाषण ऐकून वंदना हंसली आणि म्हणाली, "आपण हें रागारागानं बोलताहांत द्विजूबाबू. नुसतं स्वतःच कां – मनांत आणलं तर या गांवांतल्या अर्ध्या माणसांना बरोबर घेऊन तुम्हांला जातां येईल एवढी तुमची सांपत्तिक स्थिति संपन्न आहे. ठीक ती व्यवस्था मी करतें—आपण जायलाच तयार व्हा म्हणजे झालं."

"ती व्यवस्था होणं नाहीं." द्विजदास म्हणाला, "पैसा भरपूर आहे खरा. पण तो सारा दादाचा—माझा नव्हे. त्यांच्याच कृपा छत्राखालीं मी आहें म्हटलं, तर ती अतिशयोक्ति व्हायची नाहीं."

पुनः एकदां हंसायचा प्रयत्न करीत वंदना म्हणाली, "अतिशयोक्ति कोणती आणि कसली त्याची मला जाणीव आहे. हें नुसतं रागाचं बोलणं आहे. आपण स्वतः जें मिळवलं नाहीं तें आपलं म्हणायची आपली तयारी नाहीं, असं ताईनं एकदां आपल्या पत्रांत लिहिलं होतं. खरं होतं ना तें ?"

द्विजदास म्हणाला, "कदाचित् खरं आहे असेंही म्हणतां येईल. पण तो माणसाच्या धर्मबुद्धीचा प्रश्न आहे. रागाचं बोलणं नव्हे. हें पण एवढंच कारण नव्हे कांहीं."

"मग आणखी कोणतीं कारणं आहेत तें कळेल का मला ?"

द्विजदास उगीच राहिला. क्षणभर त्याच्या चेहऱ्याकडे पाहून घेतल्यावर वंदना जपून जपून बोलूं लागली. ती म्हणाली, "उगीच चौकशी करायचा माझा स्वभाव नाहीं. हा भलताच फाजील आग्रह मी धरतें आहें असं वाटेल हें मला कळतं. पण कळलं तरी या जगांत सारीच भरपाई कांहीं एकदम होत नाहीं—उणीव कुठून तरी डोकावतेच. आपल्याबद्दलची मला इतकी माहिती मिळाली आहे, कीं आपण पहिल्यानं आंत पाऊल टाकलंत तेव्हां आपल्याबद्दल मला मुळींच परकेपणा वाटला नाहीं. किती दिवसांची ओळख असावी तसं मी सहज आपल्याला ओळखलं. वहिनीजवळ आपण एवढ्या गोष्टी बोलतां अन् माझ्याकडेच कां संकोच धरतां ? बाकी कांहीं नसलं तरी मी वहिनीची बहीणच आहें ना ?"

तिचें तें भाषण ऐकून द्विजू चकीत झाला. मागलें पुढलें अनुसंधान मनांत

येतांच त्याला जितका संकोच वाटला तितकेंच आश्चर्यही वाटलें. अगदींच अपरिचित असलेल्या कुठल्याही प्रौढ कुमारिकेबरोबर एकांतांत बोलत राहायचा हा त्याचा पहिलाच प्रसंग होता. त्यानें घड्याळाकडे पाहिलें तों आपण चांगले तासभर बोलत असल्याचें त्याला कळून आलें. इतक्यांत खालीं कुणी चौकशी केली तर त्याला उत्तर काय द्यायचें याचाच त्याला विचार पडला. कदाचित् दादा आले असतील—कदाचित् आईची पूजा आटोपली असेल—एकदम तो अगदीं कावराबावरा झाला. त्याचे पाय एकाएकीं जिन्याकडे वळूं लागले पण मनांत आलें तरी पाऊल हालेना असें पाहून तो तसाच स्तब्धपणें उभा राहिला.

"कां ? बोलत कां नाहीं ? बोला ना !" एकदम दचकून भानावर येऊन तो म्हणाला, "बोलायचं असलं तर पहिल्यानं आपल्याकडेसच्च बोलेन. वहिनी-कडेसुद्धां अजून बोललों नाहीं तें बोलेन."

"तें तिचं ती पाहून घेईल. मी मात्र आतां ऐकल्याशिवाय—"

जें कांहीं बोलायचें तें यावेळीं बोलणें योग्य नव्हतें हें द्विजू जाणत होता. पण तिच्या आग्रहाकडे पाहून उत्तर न देणें त्याला अशक्य वाटलें. एक क्षणभर हतबुद्ध झाल्याप्रमाणें पहात रहात तो म्हणाला, "खरं पाहिलं तर बाबांनीं मला कांहींच दिलेलं नाहीं !"

वंदना दचकली आणि म्हणाली, "छेः ! भलतंच कांहीं तरी. असं व्हायचंच नाहीं मुळीं."

नुसत्या मानेच्या खुणेनें द्विजूनें सुचवलें कीं असें होणें शक्य आहे.

"असं व्हायचं कारण ?"

"मला इष्टेट दिली तर ती मी उधळून टाकीन असा बाबांचा समज झाला असावा."

"त्यांना असं वाटायला खरंच कांहीं कारण झालं होतं का ?"

"झालं होतं. माझा बचाव करण्यासाठीं एकदम त्यांना बराचसा पैसा खर्ची घालावा लागला होता."

असेंच कांहींतरी सतीनें आपल्या पत्रांत लिहिल्याचें वंदनेला आठवलें.

तिनें विचारलें, "मृत्युपत्र केलं होतं का बाबांनीं ?"

"तें एक दादाच जाणे." द्विजदास म्हणाला, "ते म्हणतात नाहीं म्हणून."

एक सुस्कारा सोडून वंदना म्हणाली, 'मग ठीक ! मला वाटलं, कीं मृत्यु-पत्र करून त्यांनीं आपल्याला कांहीं ठेवलं नाहीं कीं काय !"

द्विजदास म्हणाला, "त्यांची स्वतःची तशी इच्छा होती. पण मला वाटतं दादानं तसं कांहीं करूं दिलं नाहीं."

"दादांनीं करूं दिलं नाहीं? आश्चर्य आहे!"

द्विजू हंसून म्हणाला, "दादांची ओळख पटली कीं मग कसलंच आश्चर्य वाटायचं नाहीं!—संध्याकाळ होत आली होती, खोलींत कुणी दिवा लावला नव्हता. शेजारच्या खोलींत मी कसलं तरी पुस्तक धुंडीत होतों. चटकन बाबांचा आवाज कानीं आला. दादा म्हणाले, 'नाहीं.' जिद्द करून बाबा म्हणाले, 'नाहीं कसं विप्रदास' वाडवडलांपासून चालत आलेल्या या इस्टेटीची धुळधाण व्हायला नको आहे मला! तसं झालं तर स्वर्गांतसुद्धां मला शांति मिळायची नाहीं.' तरीही दादा निश्चयपूर्वक म्हणाले, 'नाहीं—असं होतांच कामा नये.' बाबा म्हणाले, 'तर मग मी हें माझं सर्वस्व तुझ्या हातीं सोंपवून देतों. तुला वाटलं तर दे—देऊं नयेसं वाटलं तर देऊं नकोस.' यानंतर बाबा दोन तीन वर्षं हयात होते. पण मला निश्चित माहीत आहे, कीं त्यांचं तें मत केव्हांच बदललं नाहीं."

वंदना अगदीं हळूच म्हणाली, "ही हकीकत माहीत आहे का कुणाला?"

"कुणालाच नाहीं. आडून ऐकली म्हणून तर मला कळली."

बराच वेळपर्यंत वंदना उगीच राहिली होती. नंतर ती हळूच म्हणाली, "खरोखरच आपले दादा म्हणजे एक अद्वितीय माणूस आहेत."

द्विजदास अगदीं शांतपणें म्हणाला, "हो. पण मी आतां खालीं जातों. कितीतरी वेळ इथं बोलत बसलों. आतां बोलावणं येईपर्यंत आपण बसल्या बसल्या एकादं पुस्तक वाचा."

वंदना हंसून म्हणाली, "आतां नाहीं वाचावंसं वाटत. चला, मीही आलें. आतां इथच आहें आठदहा दिवस. वाचायचं म्हटलं तर खूप वेळ आहे तेव्हां."

द्विजदास जायला निघाला पण तितक्यांत थांबून उभा राहून म्हणाला, "आज आपण आपल्या बाबांबरोबर कलकत्त्याला जाणार नाहीं वाटतं?"

"नाहीं. ते परत येतांना त्यांच्याबरोबर जाईन मुंबईला."

द्विजदास म्हणाला, "असं का? मला वाटलं होतं कीं परत येतांना आपण इथं येऊन रहाणार आहांत!"

वंदना म्हणाली, "पहिल्यानं तसं ठरवलं होतं. पण आतां वाटतं कीं तें

फार गैरसोईचं आहे. मला परत मुंबईला पोंचवायला कोण आहे ? पण आपण जर कबूल असाल तर मग आपल्या विचारानं काय तें ठरवतां येईल. ”

“ पण तोंपर्यंत मी कांहीं इथं नाहीं. येत्या सोमवारीं आईबरोबर मीं कैलास-मानससरोवरच्या यात्रेला जाणार आहें. ”

वंदनेचे डोळे उत्साहानें उजळून उठले. ती म्हणाली, “ कैलास ? कैलासला जाणार ? मोठा विलक्षण प्रदेश आहे तो म्हणतात. आपल्याबरोबर आणखी कोण कोण जाणार ? ”

“ तें नीटसं माहीत नाहीं मला. मला वाटतं आणखीही कुणीकुणी येणार आहेत. ”

द्विजदास उगीच राहिला.

आलेला रुसवा दाबून हंसण्याचा प्रयत्न करीत वंदना म्हणाली, “ अन् याचवेळीं मला इथं राह्यची सल्ला एवढ्याचसाठीं देत होतां वाटतं ? ”

तिच्या चेहऱ्याकडे शांतपणें पहात द्विजदास म्हणाला, “ खरोखर एवढ्याच-साठीं सांगत होतों. एवढीं पत्रं लिहीते वहिनी पण हें कसं तिनं लिहिलं नाहीं—कीं हें आमचं घर म्हणजे कट्टया सनातनी हिंदूंचं घर. आमच्या या घरच्या कठोर आचारविचारांचो कल्पना तिनं दिली नाहीं का आपल्याला ? ”

वंदना ‘ नाहीं ’ म्हणाली.

“ नाहीं ? आश्चर्य आहे ! ” क्षणभर थांबून द्विजदास म्हणाला, “ माझ्या खेरीज या घरचा कुणीही माणूस आपल्या शिवतीचं पाणीसुद्धां घेणार नाहीं. ”

“ आणि दादा ? ”

“ नाहीं. ”

“ ताई ? ”

“ नाहीं—तीही नाहीं. आम्ही इथनं गेलों तर कदाचित् एकाददुसरा दिवस तुम्हाला इथं रहातां येईल. पण आई इथं आहे तोंवर एक दिवससुद्धां इथं रहाणं तुम्हांला कठीण जाईल. ”

वंदनेचा चेहरा एकदम उतरला. ती म्हणाली, “ खरं सांगतां ? ”

“ अगदीं खरं सांगतों. ”

अगदीं याच वेळीं जिन्याखालीं सतीचा साद ऐकूं आला, “ माऊजी ! वंदना ! तुम्हीं दोघं करतां अहां तरी काय ? ”

“ आलों वहिनी. ”

असें म्हणून द्विजदास घाईघाईनें जायला निघाला असें पाहून उतरलेल्या मुद्रेनें अगदीं हळूच वंदना म्हणाली, " हें कांहींच मला माहीत नव्हतं. आमारी आहें आपली.

६

वंदना खालीं आली तेव्हां तिचा बाप मोठ्या आनंदानें जेवायला बसला असल्याचें तिला दिसून आलें. त्याच बैठकखान्यांत एका लहानशा टेबलावर चांदीच्या थाळींत त्याचें जेवण वाढलें होतें. एक लंब्याचौड्या देहयष्टीचा देखणा पुरुष त्यांच्याजवळच उभा होता. त्याच्या शरीराचा बांधा आणि देहाची कांती पहातांच, हाच विप्रदास असावा असें वंदनेला वाटलें. सती तिच्या-बरोबरच येत होती. पण ती आंत आली नाहीं. दाराआड राहूनच तिनें वंदनेला खुणेनें नमस्कार करायला सुचवलें, तेव्हां तिला पूर्ण ओळख पटली.

नमस्कार कसा करावा हें बंगाली मुलीला शिकवावें लागत नाहीं. जमिनीवर डोकें टेकून आईला जसा तिनें नमस्कार केला होता तसाच नमस्कार विप्रदासलाही ती करणार होती. पण एकदम तिच्या मनांत विरोधाची उकळी उसळून उभी राहिली. द्विजदासकडून त्याच्या या दादाची विद्या आणि बुद्धिबळाची भरपूर स्तुति जर तिनें आधींच ऐकली नसती तर या प्रचलित शिष्टाचाराचें उल्लंघन करण्याचें कदाचित् तिच्या मनांत आलें नसतें. पण या परिचयामुळेंच तिची वृत्ति कठोर झाली. बहिणीचा शब्द राखण्यासाठीं तिनें नुसता हात जोडून नमस्कार केला. पण तसा नमस्कार करण्यांत तिची उपेक्षेची मनोवृत्ति उघडकीस आल्यावांचून राहिली नाहीं.

ती बोलली तीसुद्धां आपल्या बापाबरोबर. ती म्हणाली एकटेच जेवायला बसलांत—मला कां नाहीं हांक मारलीत ? "

वर पाहून साहेब म्हणाले, " माझी गाडीची वेळ झाली पोरी—तुला कांहीं तशी घाई नाहीं. मी गेलों म्हणजे सुखासमाधानानं होईल तुझं जेवण. "

दाराआड उभी राहिलेल्या सतीनें मान हलवून अनुमोदन दिलें तें पाहून वंदना म्हणाली, " हें काय ताई ? एवढीं मोलाचीं चांदीचीं भांडीं कां बाटवून टाकलींस ? एनॅमलच्या किंवा चिनी मातीच्या बशींत बाबांना वाढलं असतंस तर नसतं का चाललं ?

साहेबांचा घांस तोंडांतल्या तोंडांत राहिला. तो बिचारा साधासीधा माणूस. मुलीच्या बोलण्यांतली खोंच त्याच्या मुळींच लक्षांत आली नाहीं. जशी कांहीं आपल्याच हातून कांहीं चूक झाली आहे अशा वृत्तीनें अस्वस्थपणानें तो म्हणाला, " खरंच तर ! खरंच तर ! माझ्या ध्यानांतच आलं नाहीं. सती कुठं गेली. डिशमध्यें मला वाढलं असतं तर चाललं असतं कीं ! हें काय—"

विप्रदासची मुद्रा एकदम गंभीर झाली. तो रागावला असावा. त्याच्या तोंडासमोर आजवर त्याचा असा अपमान करण्याचें धैर्य कुणालाच झालें नव्हतें. नुकत्याच आलेल्या या पाहुणीनं तें धैर्य दाखवलें. थाळी बाटायचा उल्लेख नुसता व्यंगात्मक होता. खरा उद्देश होता तो त्या आचारनिष्ठ कुटुंबाची टिंगल उडवण्याचा—विशेषतः त्याला स्वतःलाच उद्देशून तिनें हा कोरडा ओढला होता. असली ही क्लृप्त कल्पना तिच्या डोक्यांत कुणी भरवून दिली याचा अंदाज विप्रदासला करतां येईना. कुणीही असो, पण त्या साध्यासिध्या वृद्ध व्यक्तीला जाणवेल अशा प्रकारें हा उद्गार निघाल्याचें पाहून त्याला अतिशय वाईट वाटलें. मनांत आलेली शंका बाजूला सारून उगीच थोडेसें हंसून तो म्हणाला, " हें घर कर्मठांचं आहे हें तुझ्या ताईनं सांगितलं नाहीं वाटतं ? एनॅमलचीं म्हण कीं चिनी मातीचीं म्हण, भांडीं या घरांत मिळायचीं नाहींत हें नव्हतं का तुला माहीत ? "

वंदना म्हणाली, " बहुमोल भांडीं उगीच फुकट गेलीं मात्र !

अस्वस्थ होऊन साहेबांनीं उद्गार काढला, " पण मला वाटतं तूप लावून जरा आगींत तापवलीं कीं—"

त्याच्या उद्गाराकडे विप्रदासनें लक्ष दिलें नाहीं. पूर्वीच्या भाषणाच्या अनुरोधानें वंदनेला उद्देशून तो म्हणाला, " चांदीच्या भांड्याचा या घरांत दुकाळ नाहीं. फारशीं कुणी वापरीत नाहींत तीं. तुझे बाबा म्हणजे माझ्या वडलांसारखे—या घरांत आलेले अत्यंत सन्मान्य पाहुणे—कितीही का किंमतवान असेना, त्यांच्यापुढं असल्या चांदीच्या भांड्यांची काय किंमत ! असल्या वडील माणसांच्या पायीं गेलीं फुकट भांडीं तर जाईनात का ! " असें म्हणून गालांतल्या गालांत हसून तो पुढं म्हणाला, " तुझ्या ताईसारखाच तुलाही कुणा कर्मठाच्या घरीं पडायचा प्रसंग आला नि तुझे वडील घरीं आले तर त्यांना मातीच्या थाळींत जेवायला घाल ! भांडं फेकून दिलं कीं नुकसान व्हायचं नाहीं. असंच ना वंदना ? "

"वा ! असं कधीं झालंय ? बाबांच्यासाठीं मी सोन्याची थाळी बनवून आणून ठेवीन."

विप्रदास हंसत हंसत म्हणाला, "तें व्हायचं नाहीं तुझ्याकडून. तसं करणाऱ्या माणसाच्या तोंडून आपल्या बापाबद्दल असले उद्गार कधीं नाहींच निघायचे—दुसऱ्याचा अपमान करण्यासाठींसुद्धां नाहीं निघायचे. तुझ्या बापाबद्दल तुला जेवढा आदर आहे त्याहीपेक्षां या आपल्या काकाबद्दल एका माणसाला जास्त आदर आहे."

त्याचें तें भाषण ऐकून साहेबांच्या मनावरचा भार उतरला, इतकेंच नव्हे, तर ते अत्यंत खुषींत आले. ते म्हणाले, "हें मात्र अगदीं खरं बोललास बाबा. दादा जेव्हां वारले तेव्हां सती अगदींच लहान होती. मला नोकरी होती परप्रांतांत. जेव्हां तेव्हां घरीं यायची सवड नसे. आलों तरी जातजमातीकडे लक्ष देऊन वेगळं रहावं लागे—पण एवढीशी सवड मिळाली कीं सती जी उठे ती माझ्याकडे येई—"

वंदना मधेंच म्हणाली, "राहुं दे त्या गोष्टी बाबा."

"नाहीं नाहीं. अगदीं पक्की आठवण आहे मला. एवढंसुद्धां खोटं नाहीं त्यांत. एक दिवशीं सती माझ्या ताटांतच जेवायचं म्हणूं लागली—तिच्या आईनं पाहिलं तेव्हां—"

"वा ! वा ! वा ! तुमच्या बोलण्याला कांहीं धरबंदच नाहीं. म्हणे ताई तुमच्या ताटांत—कांहीं तरी बोलताहांत झालं. एवढी जुनी आठवण कुठली असणार ?"

वर्दळीला येऊन साहेब म्हणाले, "वा ! वा ! आठवण आहे तर ! केवढं वादळ उठलं होतं त्या प्रकरणीं ! त्या दिवशीं तुझी आई अशी कांहीं घाबरली—"

"आज तुम्हीं गाडी चुकवणार खचित बाबा !" वंदना म्हणाली, "किती वाजले माहीत आहे ?"

साहेबांनीं अस्वस्थपणें खिशांतील घड्याळ काढून पाहिलें. पहातांच निश्चिंतपणाचं एक सुस्कारा सोडून ते म्हणाले, "तूं उगीचच घाबरवून मला उठायची घाई करते आहेस. कितीतरी वेळ आहे अजून. अगदीं सहज मिळेल गाडी."

हंसतमुखानें होकार देत विप्रदास म्हणाला, "अगदीं बरोबर. गाडीला अजून कितीतरी वेळ आहे. स्वस्थपणें चालूं द्या आपलं भोजन. मी स्वत:

तुमच्याबरोबर येतों अन् तुम्हाला गाडीवर चढवून देतों." असें म्हणून तो एकदम तिथून बाहेर निघून गेला.

तो जातांच सती दाराआडून पुढें येऊन उभी राहिली तेव्हां वन्दना तिला हळूच म्हणाली, "बाबांनीं काय घोंटाळा केला तो ऐकलासं ना ताई ?"

सती म्हणाली, "हो."

वंदना म्हणाली, "तुझ्या सासूच्या कानीं गेलं तर तुला उगीच त्रास होईल नाहीं ताई ?"

"होईना का ?" सती म्हणाली, "जाऊं दे तें. काका ऐकतील."

"पण तुझा नवरा ? त्यानं तर आतांच स्वतःच्या कानांनीं सारं ऐकलं ना ? त्यांच्या हिशेबीं सुद्धां हा दोष चालवून घेण्याजोगा नाहीं ना ?"

सती हंसली आणि म्हणाली, "खरोखरच जर हा दोष असेल तर मी तरी चालवून घ्या असं कां म्हणेन ? त्यांना जें योग्य वाटेल तें ते करतील. मी निश्चिंत आहें त्या बाबतींत. इथं राहिलीस तर स्वतःच्याच डोळ्यांनीं पहाशील सारं कांहीं—तुम्हांला आतां काय हवंय काका ?"

तिच्याकडे पहात साहेब म्हणाले, "यथेष्ठ ! यथेष्ट ! माझं जेवण झालं बरं पोरी. आतां कांहीं नको मला." असें म्हणून ते उठून उभे राहिले.

स्टेशनवर जाण्याची वेळ होत आली. खालीं दारांत मोटार येऊन उभी होती. बॅग, विछाना वगैरे दुसऱ्या गाडींत टाकलीं होतीं. गाडीजवळ साहेब विप्रदासबरोबर कांहीं बोलत होते तोंच निघायच्या तयारीनें कपडे करून वंदना येऊन हजर झाली आणि म्हणाली, "बाबा, मी तुमच्याबरोबर येणार."

आश्चर्यचकित होऊन साहेब म्हणाले, "या उन्हांतून कशाला येतेस स्टेशनवर ?"

"नुसतं स्टेशनवर नव्हे," वंदना म्हणाली, "कलकत्त्याला येणार मी. तुम्हीं मुंबईला जाल तेव्हां तुमच्याबरोबरच मी मुंबईला येईन."

अत्यंत आश्चर्यचकित होऊन विप्रदास म्हणाला, "हें काय बोलणं ! तूं इथं रहाणार आहेस ना कांहीं दिवस ?"

वंदना नुसतें म्हणाली, "नाहीं."

"पण अजून तुझं जेवणसुद्धां झालं नाहीं ?"

"आतां नको आहे कांहीं. कलकत्त्याला गेल्यावर जेवीन."

"तूं जायला निघाली आहेस तें तुझ्या ताईला आहे का माहीत ?"

वंदना म्हणाली, "नसेल कदाचित्. मी गेलें कीं कळेल आपोआप."

विप्रदास म्हणाला, "न जेवतां तूं अशी निघून गेलीस तर तिला भारी दुःख होईल."

वर नजर करून वंदना म्दणाली, "दुःख कसलं ? मला कांहीं तिनं आमंत्रण देऊन आणलं नव्हतं कीं गेलें तर केलेली तयारी फुकट जाईल ? ती कांहीं खुळी नाहीं. तिला कळेल आपोआप." असें म्हणून ती आणखी एक शब्दसुद्धां न बोलतां घाईघाईनें जाऊन गाडींत बसली. साहेबांना वाटलें कीं कांहींतरी भानगड झाली आहे. तसेंच कांहीं झाल्याशिवाय एकदम अशा विलक्षण प्रकारें वागणारी ती मुलगी नाहीं हें ते जाणत होते. ते नुसते म्हणाले, "मलासुद्धां वाटलं होतं कीं ही चार दिवस इथं सतीकडे रहाणार म्हणून. पण एकदां गाडींत बसली आहे ती कांहीं आतां खालीं उतरायची नाहीं."

विप्रदासनें उत्तर दिलें नाहीं. त्यांच्या मागोमाग मुकाट्यानें तो गाडींत बसला. गाडी चालू झाली. वंदनेनें साहजिकपणें मागें वळून पाहिलें, तों तिसऱ्या मजल्यावरच्या लायब्ररीच्या खोलींतल्या खिडकींत गरादीला हात धरून द्विजदास मुकाट्यानें उभा होता. त्याची नजरानजर होतांच तिनें हात जोडून त्याला नमस्कार केला.

मंडळी स्टेशनवर पोहोंचली तेव्हां त्यांना कळून आलें कीं कांहीं तरी आकस्मिक कारणामुळें गाडी यायला बराच उशीर होणार होता—क्वचित् गाडी एक तासापेक्षां जास्त लेट होती. रोजचा परिचयाचा स्टेशनमास्तर आजारी झाल्यामुळें त्या दिवशीं कुणी मद्रासी रिलीव्हिंग हँड कामावर आला होता. त्याला निश्चितपणें कांहीं सांगतां येईना. कदाचित एक तास तर कदाचित दोन तास देखील गाडी लेट होईल असें तो अंदाजानें म्हणाला.

साहेबांना उद्देशून विप्रदास म्हणाला, "कलकत्त्याला पोहोंचायला बरीच रात्र होईल. आज नाहीं गेलां तर नाहीं का चालायचं ?"

"कां चालायचं नाहीं ? मला तर—"

वंदना मधेंच म्हणाली, "नाहीं बाबा, तें कांहीं नाहीं. आतां जीं एकदां निघालों आहों तीं कांहीं परत जाणार नाहीं तिकडे."

आग्रह करीत विप्रदास म्हणाला, "कां जाणार नाहीं वन्दना ? त्यांतून तूं जेवल्याशिवाय आली आहेस. सारा दिवस उपास का करणार आहेस ?"

वंदना म्हणाली, "मला भूक नाहीं. परत गेलों आपण तरी सुद्धां मला जेवण जायचं नाहीं."

साहेब मनांतल्या मनांत विरसले ते म्हणाले, "तिची लहरच जगावेगळी. एकदां दातीं धरलं तें सोडायची नाहीं."

विप्रदास उगीच राहिला. त्यानें पुनः त्यांना आग्रह केला नाहीं.

* * * *

तें स्टेशन तसें फारसें मोठें नव्हतें. एक छोटीशी वेटिंगरूम होती. मंडळी तिकडे गेली तेव्हां आधींच तिथें एक तरुण बंगाली साहेब आणि त्याची पत्नी जागा काबीज करून बसल्याचें त्यांना दिसून आलें. हा साहेब बहुधा कुणी बॅरिस्टर, डॉक्टर किंवा विलायती डिग्री घेतलेला प्रोफेसर असावा. या बाजूला कां आला होता हेंच कळणें मुष्किल होतें. आरामखुर्चीच्या दोन्हीं हातावर पाय पसरून अर्धवट डोळे मिटून तो पडला होता. एकाएकीं माणसें आल्यामुळें त्यानें डोळे उघडून पाहिलें. पण यापेक्षां जास्त सभ्यपणा दाखवायची बुद्धी कांहीं त्याला झाली नाहीं.

पण ती बाई मात्र घाईघाईनें खुर्चीवरून उठून उभी राहिली. अजून मेमसाहेबी तिच्या हाडीमाशीं मुरलेली नसावी. पण पायांतले बूट स्टाकींग आणि पोषाखाची पद्धत पाहिली तर मेमसाहेबीचा सारा आव आणण्यांत तिनें मुळींच कमतरता दाखवली नव्हती.

त्या जागीं आणखी एक आरामखुर्ची होती, तिथें बापाला बसवून वंदना शेजारच्या एका बाकावर बसली. मोठ्या विनयानें विप्रदासाला हांक मारून ती म्हणाली, "या ना जांवईबुवा, उगीच उभे कां राहिलां आहांत ? इथं बसा ना माझ्याजवळ. लाकडाला कांहीं दोष्र नाहीं. बसलां इथं तर बाटणार नाहीं आपण."

तें भाषण ऐकून वंदनेचा बाप थोडेसें हंसून म्हणाला, "शिवाशिवीचं बरंच प्रस्थ आहे वाटतं विप्रदासजवळ ?"

स्वतः विप्रदासही हंसला आणि म्हणाला, "प्रस्थ आहे—पण बरंच म्हणजे काय ते कळल्याशिवाय या प्रश्नाचं उत्तर कसं देऊं ?"

म्हातारा म्हणाला, " ही आतां वंदना म्हणाली तें ? "

विप्रदास म्हणाला, " ती जेवलेली नाहीं कीं नाहीं, तेव्हां खूप रागावली आहे. रागाच्या भरांत बायकांची जात जें कांहीं बोलते तें फारसं हिशेबांत घेऊं नये. "

वंदना म्हणाली, " मी रागावलें नाहीं बरं—मुळींसुद्धां राग आलेला नाहीं मला. "

विप्रदास म्हणाला, " रागावली आहेस ! तुझ्या रागाची कमान भारीच चढली आहे, नाहीं तर यावेळीं कलकत्त्याला जायचं रद्द करून तूं घरीं परतली असतीस. आणखी असं पहा, आपण आलों तीं एकाच गाडींत बसून आलों. बाटच लागायचा तर यापूर्वीच शिवाशीव होऊन गेली आहे. ढाकावर बसायला सांगायचं हें नुसतं ढोंग ! "

वंदना म्हणाली, " बरं ढोंग. पण आतां खरं सांगा मुखर्जीमहाशय, आतां ही जी शिवाशीव झाली आहे तिच्या पायीं घरीं गेल्यावर आंघोळ करावी लागेल कीं नाहीं तुम्हांला ? "

" चल ना घरीं अन् स्वतःच पाहून घे खात्री करून. "

" नाहीं. तुमच्या आईला मी नमस्कार करायला गेलें तेव्हां माझी शिवाशीव होईल म्हणून घाबरून त्या मागें हटल्या—तें आहे का तुम्हांला माहीत ? " बोलत असतांना तिचा चेहरा रागानें आणि शरमेनें लाल होऊन उठला होता.

विप्रदासच्या तें ध्यानीं आलें. उत्तरार्थीं तो शांतपणें म्हणाला, " गोष्ट खोटी नव्हे अन् खरीही नव्हे. याचं अस्सल कारण तिच्या सहवासांत राहिल्याशिवाय तुला कळायचं नाहीं —अन् तें तर शक्य नाहीं. "

" नाहीं. अर्थातच. "

परत घरीं यायला ती कां तयार नव्हती याचें कारण एवढ्या वेळानें आतां विप्रदासला कळून चुकलें. मनांतल्या मनांत त्याला फार राग आला. या रागाचीं कारणें अनेक होतीं. त्याच्या सावत्रआईच्या बाबतींतली ही गोष्ट थोडीशी खरीही होती — तसाच या प्रकरणीं त्याचाही तितकाच संबंध होता. तिची समजूत घालीन म्हटलें तर तशी संधीही नव्हती—अवकाशही नव्हता. उलटपक्षीं स्वस्थ चित्तानें या प्रकरणाची छाननी करण्याची वंदनेची मुळींच तयारी नव्हती. अर्थात स्वस्थ रहाण्यापलीकडे दुसरा कांहीं उपाय नव्हता—

विप्रदास एकदम स्तब्ध होऊन बसला. छोट्या साहेबानें खुर्चीच्या हातावरचे

पाय खालीं सोडले आणि जांभई दिली. त्यानें विचारलें, " जमीदार विप्रदासबाबू ते आपणच का ? आपलं नांव ऐकलं होतं. शेजारच्या गांवी माझ्या पत्नीचे मामा रहातात. बंगल्यांत आलों, हिची इच्छा होती. तेव्हां म्हटलं, एकदां भेटून जावं त्यांना. म्हणून आलों इकडे. मी पंजाबांत प्रॅक्टीस करतों. "

तो तरुण आपल्याच वयाचा असावा असें विप्रदासला वाटलें. कदाचित् एकादें वर्ष मागेंपुढें—त्यापेक्षां जास्त नाहीं.

साहेब बोलत होता, "—कालच आपली गोष्ट निघाली होती. आपण मोठे भयंकर माणूस आहांत असं लोक म्हणतात—अर्थात आपण एक करडे जमीदार आहांत म्हणतात. आपण मोठे कर्मठ आहांत अशीही आपली तारीफ चारदोन ब्राह्मण पडित करतात. आतां पटलं, कीं त्यांचं म्हणणं कांहीं अगदींच खोटं नाहीं. "

अपरिचित माणसाच्या तोंडचे ते अयाचित उद्गार ऐकून वंदनेप्रमाणेंच तिच्या बापालाही मोठें आश्चर्य वाटलें पण विप्रदासनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. चित्त ठिकाणावर नसल्यामुळें त्याचें सारें भाषण कदाचित् त्याच्या कानीं गेलें नसावें. तो साहेब सारखा बोलतच होता, "—माझ्या लेक्चरमधें मी सदोदित सांगत असतों, कीं पाहिजे आहे तें रिअल सॉलीड शिक्षण. ढोंग धत्तुरा नको आहे. आपण अवश्य एकदां युरोपचा प्रवास केला पाहिजे होता. तिथलं वातावरण, तिथली फ्री एअर हजम करून आल्याशिवाय मनांत फ्रीडम उत्पन्न व्हायची नाहीं—रुढाचाराच्या पकडींतून मनाची मोकळीक व्हायची नाहीं. मी सारखा पांच वर्षं त्या देशांत होतों—"

त्याच्या शेवटच्या भाषणावर खूष होऊन वंदनेचा बाप उद्गारला, " खरं का ? "

त्याच्या उद्गारामुळें त्या गृहस्थाला मोठा उत्साह आला. आवेशांत येऊन तो म्हणाला, " तसं पाहिल तर डिमॉक्रासीच्या या युगांत सारेच सारखे आहेत. कुणीही कुणापेक्षां हलका नाहीं. आज केलं पाहिजे हें कीं प्रत्येकानें जोर करून आपला अधिकार ॲसर्ट केला पाहिजें. मग त्याचा कॉन्सीक्वन्स कांहीं का होईना ! माझ्याकडे पैसे असते तर जमीदारींतल्या प्रत्येक माणसाला माझ्या खर्चानं मी युरोपांतून फिरवून आणलं असतं. स्वतःचा राईट म्हणजे काय याची कल्पना मग त्यांना आपोआप आली असती. "

त्याचें भाषण वंदनेला रुचलें नसावें. ती म्हणाली, " आमचे जांवईबाबू आपल्या प्रजेवर अत्याचार करतात असं कुणी सांगितलं आपल्याला ? आपल्या नात्याच्या माणसांवर तर कांहीं जुल्म जबरदस्ती झाली नाहीं ना ? "

" अस्सं ? हे आपले मेहुणे वाटतं ? थँक्स—नाहीं. त्यांनीं कांहींच तक्रार केली नाहीं—" आपल्या पत्नीला उद्देशून तो हंसत हंसत म्हणाला, " तुझ्या बहिणी जर अशा असत्या !—आपण विलायतेला जाऊन आलं आहांत वाटतं ! नाहीं ? जा—जा—अवश्य जा. त्या देशांतल्या बायका फ्रीडम, साहस, शक्ति कशाला म्हणतात, ते एकदां स्वतः डोळ्यानं पाहून या. नेक्स्ट टाईम जायच्या वेळेला मी हिला बरोबर घेऊन जायचं ठरवलं आहे—"

यापुढें कुणा कांहीं बोलायच्या पूर्वीच स्टेशनवरचा तो रिलीव्हिंग हँड आंत डोकावून म्हणाला, " ट्रेन डिस्टण्ट सिग्नल पास झाली आहे. आतां येईल इतक्यांत. "

घाईघाईनें सारी मंडळी प्लॅटफार्मवर येऊन उभी राहिली. गाडी थांबली त्यावेळीं दिसून आलें कीं सुटी पडल्यामुळें उतारूची गर्दी फारच झाली होती. एक तिळ ठेवण्याइतकीसुद्धां कुठें जागा नव्हती. गाडीला एकच फर्स्ट क्लास आणि एकच सेकंड क्लासचा डबा होता. कुठल्या तरी मॅचसाठीं कलकत्त्याला जाणारे फिरंगी रेल्वे नोकर सेकंड क्लासचा डबा काबीज करून बसले होते. बेसुमार दारू आणि बिअर प्यायल्यामुळें एकेकाचे चेहरे जितके भयंकर झाले होते, तितकीच त्यांची वागणूकही बेपर्वाईची झाली होती. गाडीचा दरवाजा आडवून ते ओरडत होते, " गो. जाव. जाव. "

स्टेशनमास्तर आले, गार्डसाहेब आले—ते कुणाचेंच ऐकेनात.

छोटासाहेब म्हणाला, " आतां काय करायचं ? "

वंदना घाबरून म्हणाली, " चला आतां घरींच जाऊं ? "

" नाहीं. " विप्रदास म्हणाला.

" नाहीं तर काय ? नाहीं तर रात्रीच्या गाडीनं—"

" त्याखेरीज आतां काय उपाय आहे ? " छोटासाहेब म्हणाला, " त्रास होईल. होईना का ? "

जोरानें मान हालवीत विप्रदास म्हणाला, " नाहीं. डब्यांत चारपांचच माणसं आहेत. आणखी चारपांच जणांना जागा झालीच पाहिजे. "

वंदनेचा बाप अस्वस्थ होऊन म्हणाला, " झाली पाहिजे खरी. पण हे स झिंगले आहेत ना ? "

विप्रदासचा सारा देह लोखंडाच्या कांबीसारखा कठीण होऊन उठला. तो म्हणाला, " ती त्यांची हौस—तो कांहीं आमचा दोष नव्हे. चला. चढा आंत—मी येतों बरोबर—" असें म्हणून त्याचक्षणीं गाडीचा हँडल धरून जोरानें धक्का देऊन त्यानें दरवाजा उघडला.

वंदनेचा हात धरून ओढीत तो म्हणाला, " चल ये. " छोट्या साहेबाला हाक मारून तो म्हणाला, " राईट ॲसर्ट करायचा असला तर घे आपल्या बायकोला आणि चढ वर. हा जुलमी जमीदार बरोबर असतांना भ्यायला नको कुणाला. "

त्याच्या मुद्रेकडे पहातांच दारुडे साहेब एकदम घाबरून मुकाट्यानें जाऊन पलीकडच्या बाकावर बसले.

८

गडबड कानीं पडतांच शेजारच्या डब्यांतले साहेब प्लॅटफार्मवर उतरले आणि सारेच एकाच आवाजांत दरडावून विचारूं लागले, " वॉट्स् अप ? " उद्देश हा कीं आपल्या जोडीदारांच्या बाजूनें आपणही आपला पराक्रम दाखवायला सज्ज आहोंत हें इतरांना कळावें.

जवळच असलेल्या गार्डला विप्रदासनें बोलावून सांगितलें, " हे लोक बहुधा फर्स्टक्लासचे पॅसेंजर नाहींत. यांना डबा खालीं करायला लावा. हें तुमचं काम आहे. "

तो बिचाराही साहेबच—पण अगदींच काळा साहेब ! त्याचें काम कांहीं असो पण त्याला छाती होईना. बरेच लोक गंमत पहात उभे होते. तो मद्रासी रिलीव्हिंग हँडही उभा होता. त्याला बोलावून विप्रदासनें त्याच्या हातीं एक पांच रुपयांची नोट दिली आणि सांगितलें, " माझं नांव माझे तिथले नोकर सांगतील. तुमच्या वरिष्ठांना तार करा आणि कळवा कीं कांहीं फिरंगी दारुडे जबरदस्ती करून फर्स्ट क्लासांत घुसले आहेत. खालीं उतरत नाहींत. तसंच गाडीचा गार्ड उभा राहून नुसता गंमत पहातो आहे. कोणत्याही प्रकारची मदत करीत नाहीं असंही कळवा. "

गार्डने डोळे उघडले. मनाचा घडा करून तो त्या लोकांजवळ आला आणि म्हणाला, " Don't you see they are big people ? तुम्हीं रेल्वेसर्व्हेंट— रेल्वेच्या पासावर प्रवास करतां आहां — Be careful. "

गार्डच्या त्या बजावणीमुळें ते दारुडेही वळणावर आले आणि उतरून शेजारच्या डब्यांत गेले. गेले ते कांहीं मोठ्या सुखासमाधानानें खास नव्हे. आपल्या आपसांत हळूच त्यांनीं जे उद्गार काढले ते बाकीच्यांना निश्चितपणा वाटण्याजोगे नव्हते. तें कांहीं असो, पंजाबच्या बॅरिस्टरसाहेबानें गार्डचे आभार मानून म्हटलें, " आपण होतां म्हणूनच आज आम्हांला जायला मिळतंय—"

" Oh ! No. ती डयूटीच आहे माझी. "

गाडी सुटायची घंटा वाजली. विप्रदास खालीं उतरायची तयारी करीत म्हणाला, " मला वाटतं आतां मी बरोबर यायची कांहीं जरूरी नाहीं. आतां ते कांहीं त्रास द्यायचे नाहींत. "

बॅरिस्टर म्हणाला, " छातीच नाहीं व्हायची. नोकरी जायची भीति आहे कीं नाहीं ? "

दरवाजाजवळ येऊन वंदना उभी राहिली आणि म्हणाली, " चाकरी जायची भीति म्हणजे मोटीशी गॅरण्टी नव्हे. आपण आलंच पाहिजे बरोबर. "

विप्रदास हंसून म्हणाला, " चाकरी जायच्या भीतिपेक्षां या जगांत दुसरी मोठी गॅरण्टी नाहीं. पुरुष असतीस तर तुला कळलं असतें. पण मी अजून जेवलोंसुद्धां नाहीं—"

" मी तरी कुठें जेवलेंय ? "

" तें तुझ्या लहरीसाठीं ! आतां थोड्या वेळांत मोठं स्टेशन आलं कीं हॉटेलवाला येईल अन् मग हवं तें खाणं मिळेल कीं तुला. "

" पण आतां मला नकोच आहे कांहीं. " वंदना म्हणाली, " मलासुद्धां उपास करतां येतो. "

" कुणाच्याच बाबतींत तें कांहीं बरं नव्हे. " विप्रदास म्हणाला, " मी आतां उतरतों. " बॅरिस्टरसाहेबाला उद्देशून तो म्हणाला, " आपण आहांतच बरोबर. जरा नजर ठेवा. जरूर पडलीच तर—"

" सांखळी ओढून गाडी थांबवायची ना ? " वंदना म्हणाली, " तें मीसुद्धां करीन की. " असें म्हणून खिडकींतून बाहेर तोंड काढून तिनें बरोबर

आलेल्या घरच्या नोकरांना म्हटलें, " तुम्ही घरीं आईना सांगा, कीं हे आमच्या-बरोबर गेले आहेत. उद्यां किंवा परवां येतील. "

गाडी चालू झाली.

वंदना जवळ येऊन बसून म्हणाली, " वाः मुखर्जीमहाशय ! आपण कांहीं कमी हट्टी नाहीं म्हणायचे. "

" कां बरं ? "

" आपण जबरदस्तीनं आम्हांला गाडींत चढवलें—ते होते सारे दारुडे—खालीं न उतरतां त्यानीं मारामारी केली असती तर मग ? "

" तर त्यांची नोकरी गेली असती ! " विप्रदास म्हणाला.

" पण आमचं काय झालं असतं ? " वंदना म्हणाली, " हाडं खिळखिळीं झालीं असतीं ना ? नोकरी जाण्यापेक्षां तें दिखिल कांहीं अगदींच क्षुल्लक नाहीं ! "

विप्रदास आणि वंदना दोघेंही हसूं लागलीं. ती दुसरी बाईसुद्धां थोडेंसें हंसून पुनः मान वळवून बसली. तिचा नवरा तो पंजाबचा बॅरिस्टर मात्र गंभीर मुद्रा धारण करून स्तब्ध बसला होता.

हा वेळपर्यंत वंदनेच्या बापानें तिकडे फारसें लक्ष दिलें नव्हतें. चर्चा थांबली असें पाहून तो जरा उठून बसला आणि म्हणाला, " नाहीं नाहीं, थट्टेची गोष्ट नव्हे. गाडींत वारंवार असे हे प्रकार होतात. वारंवार वर्तमानपत्रांत असल्या बातम्या येताहेत. तरीपण मला स्वतःला असली ही जुलूम-जबरदस्ती करणं नको आहे ! रात्रीच्या गाडीनं गेलों असतों तर सर्वच दृष्टीनं ठीक झालं असतं. "

" आणि रात्रीच्या गाडींत सुद्धां जर दारुडे साहेब आले असते तर बाबा ? " वंदना म्हणाली.

" असं काय खरोखरच होतंय ? " तिचा बाप म्हणाला, " मग सभ्य माणसाला प्रवासच करायला नको म्हणायचा ? " असें म्हणून त्यांनी एक भला मोठा चिरूट काढून शिलगावायला सुरवात केली.

वंदना हळूच म्हणाली, " मुखर्जीमहाशय ? ' सभ्य माणूस ' हा शब्द घेऊन बाबांबरोबर उगाच वितंडवाद घालूं नका हो ! "

" छे छे ! " विप्रदास हंसत म्हणाला, " तें मला माहीत आहे. "

" बरं मुखर्जीमहाशय, लहानपणीं आपण कधीं कुठं मैदानांत साहेबलोकां-बरोबर मारामारी केली हीती का ? "

" नाहीं. तें भाग्य लाभलं नाहीं मला. "

वंदना म्हणाली, " तुम्ही या भागांतले मोठे ' टेरर ' आहांत असं लोक म्हणतात. घरचीं सारीं माणसंसुद्धां वाघासारखीं भीतात आपल्याला असं ऐकलंय, तें खरं आहे का ? "

" कुणी सांगीतलं हें असं ? "

" ताईनं ! " वंदना हळूच आवाज खालीं आणून म्हणाली.

" काय सांगितलं तिनं ? "

" म्हणे तुमच्या भीतीनं रक्ताचं पाणी होऊन जातं. "

" कशा प्रकारचं पाणी ? दारुडे साहेब पाहिले म्हणजे आम्हां लोकांच्या रक्ताचं जसं पाणी होतं तसंच का ? "

" हो जवळ जवळ तसंच ! " हंसत मान हलवीत वंदना म्हणाली.

" तसं कांहींतरी हवंच ! " विप्रदास म्हणाला, " नाहींतर बायकाची जात काबूत रहात नहीं. तुझं लग्न झालं कीं तो कोण असेल त्याला ही विद्या मी शिकवीन. "

" शिकवाल ! " वंदना म्हणली, " पण साऱ्या विद्या साऱ्यांनाच कांहीं पचवतां येत नाहींत हें ध्यानांत ठेवा. ताई बिचारी साधीभोळी. मी असतें तर उलट साऱ्यांनाच माझ्या जरबेंत ठेवलं असतं "

" अर्थात् ! " विप्रदास म्हणाला, " तुझ्या भीतीनं घरांतल्या साऱ्या माणसांच्या रक्ताचं पाणी झालं असतं – नाहीं ? मोठंसं आश्चर्य नाहीं त्यांत. एवढ्या थोड्याच वेळांत जो नमुना पहायला मिळाला त्यावरूनच हें तुझं म्हणणं मला पटलं ! निदान आई तरी विसरायची नाहीं कधीं ! "

मनांतल्या मनांत चीड आल्यामुळें वंदना जरा सळसळून उठून म्हणाली, " आपल्या आईनं काय केलं माहीत आहे ? —मी नमस्कार करायला गेलें तर ती एकदम मागें हटली. "

कोणत्याही प्रकारचें आश्चर्य प्रदर्शित न करतां विप्रदास म्हणाला, " तूं नुसतं एवढच पाहून आलीस—माझ्या आईच्या साऱ्याच रीतीभाती कांहीं तुला पहायला मिळाल्या नाहींत. त्या पहायला मिळाल्या असत्या कीं तुझं तुलाच वाटलं असतं, कीं रागारागानं असं उपासपोटीं येण्यांत आपलीच चूक झाली. "

वंदना म्हणाली, " माणसाला स्वाभिमान म्हणून कांहीं आहे कीं नाहीं ? "

उगीच थोडेसें हंसून विप्रदास म्हणाला, " ही स्वाभिमानाची भावना आली कुठून ? शाळाकॉलेजांतलीं मोठमोठीं पुस्तकें वाचूनच ना ? माझ्या आईला इंग्रजी येत नाहीं, तिनं पुस्तकंहीं वाचलेलीं नाहींत, तिच्या समाजाची आणि तुझ्या भावनेची जुळणी व्हावी कशी ? "

" पण मी केवळ माझीच भावना हिशेबी धरून चालतेंय." वंदना म्हणाली.

" असं केलं तर कांहीं बाबतींत मोठा अन्याय होतो. " विप्रदास म्हणाला, " जशी आज तुझ्याकडून ही चूक झाली तशी ! परदेशी पुस्तकांतून जें कांहीं शिक्षण मिळतं तेवढंच खरं, असं समजून चालतां तुम्हीं लोक, म्हणूनच या अशा प्रकारच्या चुका होतात. नाहीं तर झाल्या नसत्या. आपल्याकरवीं वडील माणसांचा अपमान घडला, असं वाटून मनाला लागलं असतं ! स्वाभिमान आणि स्वकर्तव्य यांतला भेद कळला असता ! "

हा भेद वंदनेला कळो, वा न कळो, एवढें मात्र तिला खात्रीपूर्वक कळून चुकलें, कीं आजची आपली वागणूक विप्रदासच्या मनाला फारच लागून राहिली असावी. स्वतःसाठीं नव्हे — आपल्या आईचा अपमान झाला म्हणून.

दोनतीन मिनिटें वंदना स्वस्थ बसली होती. एकदम तिनें प्रश्न केला, " आपल्या आईप्रमाणेंच आपणसुद्धां मोठे कर्मठ हिंदू आहांत ना ? "

" हो " विप्रदास म्हणाला.

" शिवाशिवीचा आचारविचार आपण पाळतां ? "

" पाळतों. "

" नमस्कार करायला कुणी गेलं तर असेच मागं हटतां ? "

" हटतों. वेळ काळ हिशेबांत घेऊनच वागावं लागतं आम्हांला. "

" आमच्या ताईलासुद्धां तुम्हीं अशीच आंधळी करून ठेवली आहे ? "

" तें तुझ्या ताईलाच विचारून पहा ना ? तरीपण तिलासुद्धां कौटुंबिक नियम पाळूनच वागावं लागतं. "

वंदना हंसून म्हणाली, " अर्थात् वाघाला भ्यायल्याशिवाय रहाणं कांहीं कुणाला शक्य नाहीं. "

" नाहीं — शक्य नाहीं. " विप्रदास हंसून म्हणाला, " दिवसाच्या गाडींत वाघाची भीति असली म्हणजे रात्रीच्या गाडीनं जावंसं वाटतं ना ? तसंच हें. हा माणुसकीचा स्वाभाविक नियम आहे. "

वंदना म्हणाली, " ताई बिचारी बायकांची जात. स्वभावतःच दुबळी.

तिच्यावर सारे नियम लादंतां येतात—पण मी ऐकलं आहे, कीं हे कौटुंबिक नियम पाळायला द्विजूबाबू तयार नसतात. या बाबतींत वाघमहाशयाचं काय म्हणणं आहे ?"

चिमटा घेण्यासाठींच वंदनेनें हा प्रश्न केला होता—आणि तो चिमटा चांगलाच लागेल अशी तिला आशा होती—पण विप्रदासच्या मुद्रेवरून तसें कांहीं झाल्याचें दिसलें नाहीं. पूर्वींप्रमाणेंच हंसून तो म्हणाला, "आमची ही सारी गुप्त नियमावली अनधिकारी व्यक्तीला सांगायचा निषेध आहे."

"स्वतः द्विजबाबूला तरी माहीत आहे का ?"

"वेळ येईल तेव्हां होईल माहीत." विप्रदास म्हणाला, "रक्तामासाच्या बाबतींत वाघ पक्षपात करीत नाहीं तें माहीत आहे त्याला."

तें उत्तर ऐकून वंदनेचा चेहरा खार्रकन् उतरला. यानंतर कोणता प्रश्न करावा हेंच तिला सुचेना. तिची ती मनःस्थिति विप्रदासच्या तीक्ष्ण दृष्टीला दिसून आल्यावांचून राहिली नाहीं.

तिच्या बापानें हाक मारून तिला म्हटलें, "अग ये म्हातारे, मला थोडं पाणी दे ना !"

खुजांतलें पाणी ग्लासांत ओतून बापाच्या हातीं देऊन वंदना पुनः आपल्या जागीं बसली. विप्रदासची खोड काढायचें तिला धैर्य झालें नाहीं. विषयांतर करून ती म्हणाली, "ताईच्या सासूसाठीं नव्हे—पण मी उपासपोटीं आलें म्हणून ताईला वाईट वाटेल, याचंच मला वाईट वाटतंय. त्याचाच विचार करतेंय मी एवढा वेळ."

विप्रदास म्हणाला, "तुझ्या ताईला वाईट वाटेल ही झाली महत्त्वाची गोष्ट ! अन् माझ्या आइला वाईट वाटेल—तिच्या मनाला डांचेल—ही झाली क्षुल्लक गोष्ट ! विशेष महत्त्व कोणत्या गोष्टीला द्यायचं हें कळलं नाहीं कीं माणूस अशा या उलट्या विचारसरणीनं पाहूं लागतो."

"ही विचारसरणी उलटी कशी ?" वंदना म्हणाली, "असं वाटणं अगदीं स्वाभाविक नाहीं का ?"

विप्रदास कांहींच न बोलता स्वस्थ राहिला. त्याच्या मुद्रेवरची खिन्नता वंदनेला दिसून आली.

बाहेर काळोख पडत आला होता. बाहेर चांगलेंसें दिसत नव्हतें, तरीही खिडकीबाहेर तोंड काढून पहात कितीतरी वेळ वंदना उगीच बसून राहिली=

होती. रोज या वेळीं गाडी हावरा स्टेशनवर पोंचत असे. पण आज अजून दोनतीन तास अधिक लागणार होते.

मान वळवून तिनें पाहिलें. खिशांतलें नोटबूक काढून विप्रदास बरेंच कांहींतरी लिहीत होता. तिनें विचारलें, "बरं मुखर्जीमहाशय, एक प्रश्न विचारूं का?"

"काय तें?"

"आपण म्हटलं, कीं स्वाभिमानाबद्दलची माझी कल्पना केवळ शाळा-कॉलेजांतल्या पुस्तकांवर आधारलेली आहे, आपली आई कांहीं शाळा कॉलेजांत जाऊन शिकलेली नाहीं, तिच्या भावना कोणत्या शिक्षणावर आधारल्या आहेत?"

विप्रदासला आश्चर्य वाटलें पण तो कांहीं बोलला नाहीं.

वंदना म्हणाली, "माझा चौकसपणा जागा झालाय त्यांच्या बाबतींत. ती एक वडील माणूस आहे हें कांहीं मी नाकबूल करीत नाहीं. पण या जगाच्या व्यवहारांत ही वडीलकी म्हणजेच सारं कांहीं, असं समजायचं का?"

विप्रदास तसाच स्तब्ध बसून राहिला होता.

वंदना बोलत होती, "आज तुमच्या घरीं आलों होतों अनाहुत पाहुणे म्हणून. हें कांहीं आमच पुस्तकांतलं विदेशी शिक्षण तर नव्हे, तरीही तेवढंच कांहीं कारण नव्हे—मी वयानं लहान म्हणून माझा अपमान तुम्हीं हिशेबीं घेत नाहीं.--" तरीही विप्रदास कांहीं बोलला नाहीं.

"तरीही मी तिची क्षमा मागेन." वंदना म्हणाली, "माझ्या वागणुकीमुळं निदान ताईला तरी त्रास होऊं नये."

थोडा वेळ थांबून ती म्हणाली, "माझे आईबाप विलायतेला गेले होते म्हणून त्यांना आम्ही सारीं मेमसाहेब वाटतों आहोंत. आमच्या ताईला एवढ्याच साठीं अजूनही जाच सहन करावा लागतो असं मी ऐकलं होतं. त्यांच्या मताशीं आमचीं मतं जुळत नाहींत हें खरं, तरीहीं मी म्हणेन, कीं आम्ही कुणीही असलों तरी अपमान म्हणजे अपमानच!—ताईच्या सासूनं केला तरीही तो अपमानच!" बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांत आसवें चमकूं लागलीं.

विप्रदास शांतपणें म्हणाला, "पण तिनं कांहीं तुझा अपमान केला नाहीं."

"अवश्य केला!" वंदना ठांसून म्हणाली.

विप्रदासनें चटकन् उत्तर दिलें, "नाहीं." कांहीं वेळ थांबून तो म्हणाला,

" नाहीं—तुझा अपमान केला तो माझ्या आईनं नव्हे—पण या बाबतींत कुणी तुझी समजूत घालील तर तिची तीच. वादविवाद करून नव्हे. तीच तुला बरोबर समजावून देईल अगदीं सहजासहज. "

वंदना खिडकीबाहेर पहात राहिली.

विप्रदास बोलत होता, "—एके दिवशीं बाबांच्या बरोबर आईचा झगडा सुरू झाला. कारण होतं क्षुल्लक पण काट्याचा नायटा झाला. तें सारंच कांहीं तुला सांगतां येत नाहीं खरं, पण त्याच दिवशीं मला नवी दृष्टी आली. माझ्या या अशिक्षित आईची स्वाभिमानाची कल्पना मोठी विलक्षण आहे असं मला वाटलं."

वंदनेनें सहज वळून पाहिलें—आईबद्दलच्या विलक्षण अभिमानानें त्याची मुद्रा जरी कांहीं फुलून उठली होती—तरीही कांहींसुद्धां न बोलतां ती पुनः खिडकीबाहेर पहात राहिली.

विप्रदास बोलत होता, "—कांहीं दिवसांनीं अशीच एक दिवस गोष्ट निघाली त्यावेळीं मी आईला विचारलं, ' आई, स्वाभिमानाची एवढी मोठी कल्पना तुला आली कुठून ? "

" मग ती काय म्हणाली ? " खिडकींतून तोंड न वळवतां वंदना म्हणाली.

विप्रदास म्हणाला, " मी तिचा सख्खा मुलगा नव्हे हें तुला माहीत आहे ना ? तिचीं दोन मुलं—द्विजू आणि एक कल्याणी. आई म्हणाली, ' तुम्हां तिघांना एका जागीं एका बिछान्यांत लहानाची मोठी करून माणसांत आणायची जबाबदारी ज्या कुणी माझ्यावर टाकली त्यानंच मला ही विद्या दिली बाबा. दुसऱ्या कुणीं नव्हे. स्वाभिमानाच्या या साधारण कल्पनेमुळें तिनं केव्हांही आपण माझी सख्खी आई नव्हे, सावत्र आई आहें, हें एकदांसुद्धां मला जाणवूं दिलं नाहीं कसं, तें मला त्या दिवशीं कळलं. आतां कळला अर्थ ? "

कांहीं वेळ उगीच राहून नंतर तो पुनः बोलूं लागला, " नमस्कार करण्यासाठीं कुणी किती हात उचलला, कोण किती मागं सरकला, नमस्काराला प्रतिनमस्कार करतांना कुणी किती मान वाकवली वगैरे बाबतींना मर्यादा घालायची लढाई साऱ्याच देशांत चालत असते. तुमच्या प्रत्येक पाठ्यपुस्तकांत पानापानांतून अहंकाराच्या कैफाला खुराक मिळत असतो. पण स्वतः आई नसतांना परक्याच्या लेंकराची आई होऊन ज्या दिवशीं आई आमच्या या मोठ्या कुटुंबांत येऊन मिळाली त्या दिवशीं नात्यागोत्याचे घरादारांतले सारे

माणूस गळ्यांत विषाची पिशवी बांधून उसळून उठले; पण ज्या वागणुकीच्या जोरावर तिनं साऱ्या विषाचं अमृत करून सोडलं, तो गृहिणीचा अभिमान नव्हता—गृहिणीपणाची जबरदस्तीही नव्हती – ती आईपणाची स्वाभाविक जाणीव होती. स्वाभाविक मर्यादा होती. ही मर्यादा एवढी उंच आहे, कीं ती ओलांडून जाणं कुणालाच शक्य नसतं. हें तत्त्वज्ञान या आमच्याच देशांतलं परदेशी माणसांना याचा अजून पत्ता नाहीं. वर्तमानपत्रांतले चारदोन लेख वाचून ते म्हणतात, कीं हिंदी स्त्रिया म्हणजे गुलाम – अंतःपुरांत सांखळी बांधलेल्या दासी. बाहेरून पहाणाराला तसं दिसतही असेल—मी त्यांना दोष देत नाहीं. पण घरच्या चाकरनोकरांच्या सुद्धां सेवेला वाहिलेली अन्नपूर्णेची राजेश्वरी मूर्ति त्या परक्यांना दिसत नसली तरी तुम्हां लोकांना सुद्धां कशी दिसत नाहीं ? ”

थक्क होऊन वंदना विप्रदासच्या चेहऱ्याकडे पहात राहिली.

एकाएकीं बॅरीस्टरसाहेब मोठमोठ्यानें ओरडले, “ इतक्यांत गाडी हावराच्या प्लॉटफॉर्मवर ‘ इन ’ झाली वाटतं ? ”

वंदनेचा बाप इतका वेळ पेंगत होता तो दचकून उठून पाहून म्हणाला “ सुटलों एकदाचे. ”

वंदना हळूच विप्रदासला उद्देशून म्हणाली, “ कलकत्त्याला जायचं कसं जिवावर आलंय माझ्या मुखर्जीमहाशय ! असं वाटतंय, कीं असंच परत फिरावं, आपल्या आईपाशीं जावं आणि म्हणावं, ‘ आई माझी चूक झाली. मला क्षमा कर. ”

विप्रदास नुसता हंसला. कांहीं बोलला नाहीं.

स्टेशनवर उतरल्यावर त्यानें विचारलें. “ आपण कुठं उतरणार ? ”

“ ग्रँड हॉटेलांत उतरत असतों मी, ” रायसाहेब म्हणाले, “ त्यांना तार केली आहे. तिकडेच जायचं. ”

विप्रदासच्या समोर ग्रँड हॉटेलमधें उतरण्याची कल्पना वंदनेला कशीशीच वाटली. ती शरमली.

गाडी फार लेट झाल्यामुळें पंजाबचे बॅरीस्टरसाहेब अगदीं खचवळून गेले होते. ते पुनः पुनः म्हणत होते, “ बी. एन्. लायनीनं जायचं होतं मला. गाडी तर लेट झाली. आतां वेटिंग रूममधें राहिल्याखेरीज गत्यंतर नाहीं. ”

विप्रदास मुकाट्यानें उभा राहिला होता. रायसाहेबसुद्धां स्वतः जरा

शरमल्यासारखे होऊन म्हणाले, " पण विप्रदास, मला वाटतं तूं सुद्धां आमच्याबरोबर—"

" ग्रँड हॉटेलांत ? " असें म्हणून विप्रदास हंसू लागला. तो म्हणाला, " माझी काळजी करूं नका. बहुबाजारांत द्विजूचं एक घर आहे, वारंवार इथं यावं लागतं कीं नाहीं—तिथं नोकरचाकर सारीं माणसं आहेत. मी असं म्हणतों, सारी मंडळी तिकडेच चला ना ? "

वंदना शहारून उठलीं, म्हणालीं, " चला आपण सारींच तिकडे जाऊं ! "

माथ्यावरचा एक मोठा बोजा उतरल्यासारखें तिला वाटलें. तिला फार आनंद झाला होता. जोडीच्या दंपत्त्याला आपलेपणानें आमंत्रण देत देत तिनें सर्वांना नेऊन मोटारींत बसवलें.

वंदना सकाळीं उठली तेव्हां तिला दिसून आलें, कीं या घरासंबंधीं आपण रात्रीं जी कल्पना केली होती ती चुकीची होती. तिला वाटलें होतें, कीं पुरुष माणसांची राहायची जागा, खोलींतल्या कोनाकोपऱ्यांतून कचरा सांचलेला असायचा, जिन्यावरून पानाच्या पिचकाऱ्या मारून उडवलेले डाग असायचे, मोडकें तोडकें सामान, मळका बिछाना, कडीबरग्याला कोळीष्टकें सांचलेलीं—असा सारा सांवळ्या गोंधळाचा प्रकार असेल तशी तिची कल्पना होती. काल रात्रींच्या वेळीं थोड्या अवधींत फारसें कांहीं पहतां आलें नव्हतें—पण आतां तेथील एकंदर टापटिपीची व्यवस्था पाहून तिला आश्चर्य वाटलें.

घर फार मोठें होतें. खोल्याही बऱ्याच होत्या. गच्च्या कितीतरी होत्या—जिकडे तिकडे घांसूनपुसून झकपक केलेलें दिसत होतें.

दाराच्या बाहेर एक मध्यम वयाची विधवा बाई उभी होती, ती दिसायला गृहस्थाघरच्या बायकोसारखी दिसत होती. तिनें गळीं पदर घेऊन जेव्हां प्रणाम केला तेव्हां वंदना संकोचानें घाबरीघुबरी झाली.

ती बाई म्हणाली, " आपलीच वाट पहातेंय मी ताई. स्नानाची जागा दाखवतें चला. मी या घरची दासी. "

" बाबा उठले ? " वंदनेनें विचारलें.

" नाहीं. काल झोंपायला उशीर झाला तेव्हां अर्थातच उठवायलाही उशीर होईल ! "

" आमच्याबरोबर तीं दोघं आलीं होतीं तीं उठलीं कां ? "

" नाहीं. तींही नाहीं उठलीं. "

" अन् तुमचे बडेबाबू ? तेही झोपले आहेत वाटतं ? "

" नाहीं. " ती हंसून म्हणाली, " गंगास्नान करून पूजाबिजा आटोपून ते कचेरींत जाऊन बसले आहेत. सांगून पाठवूं का त्यांना ? "

" नको नको. " वंदना म्हणाली, " त्यांना नको त्रास उगीच. "

स्नानघर बऱ्याचशा अंतरावर होतें. एका छोट्या गच्चीवरून पलीकडे जावें लागत होतें. जातां जातां वंदना म्हणाली, " तुमच्या या इथं झोंपायच्या खोलीजवळ बाथरूम असणं शक्यच नाहीं—नव्हे ? "

" नाहीं. " दासी म्हणाली, " मधून मधून आईसाहेब कालीमातेच्या दर्शनासाठीं कलकत्त्याला येतात तेव्हां इथंच उतरतात कीं नाहीं, त्यामुळं इथं तें तसलं कांहीं होणं शक्यच नाहीं. "

वंदना मनांतल्या मनांत म्हणाली—इथंसुद्धां ती प्रबलप्रतापी आईसाहेब आहेच ना ! – आचारविचाराचे तेच कठोर नियम !—

परत जाऊन कपडे टुवाल वगैरे घेऊन ती आली तेव्हां त्या दासीला म्हणाली, " इथं आतां चारदोन दिवस राहाणार आहों आम्हीं. तुला कोणत्या नांवानं हांक मारायची ? तुझ्याखेरीज दुसरी कुणी बाई इथं नाहीं वाटतं ? "

" आहेत तर, " ती म्हणाली, " त्या तिकडे कामांत गुंतल्याहेत. त्यांना इकडे वर यायला सवड नाहीं व्हायची. कांहीं हवं नको असलं तर मला सांगायचं बरं का ताईसाहेब. माझं नांव अन्नदा. आपली खेड्यांतली माणूस आहें मी. जरा संभाळून घ्या म्हणजे झालं. "

तिचें तें सौजन्ययुक्त भाषण ऐकून वंदना खूष झाली.

" तुझं घर कुठं अन्नदा ? " तिनें विचारलें, " कोण कोण आहे तुझीं ? "

" यांच्याच गांवीं माझं घर. " अन्नदा म्हणाली, " बलरामपुरांत. एक मुलगा आहे मला. यांनींच त्याला शिकवलं सवरलं अन् नोकरी लावून दिली आहे. तो न् त्याची बायको तिकडे गांवींच असतात. बरं चाललंय साऱ्यांचं तुमच्या आशीर्वादानं. "

वंदनेची चौकसबुद्धी जागी झाली. तिनें विचारलें, " मग मुलगा सून तिकडे घरीं असतांना तूं इकडे येऊन नोकरी करतेस काय म्हणून ? तिकडे रहावत नाहीं वाटतं तुला ? "

" वाटतं तर ताईसाहेब. " अन्नदा म्हणाली, " पण तें कांहीं शक्य नाहीं. प्रसंगांत पडलें तेव्हां बाबूजींना शब्द देऊन चुकलें आहे, कीं माझा मुलगा

कर्तासवरता झालाय तर दुसऱ्यांच्या मुलांचा भार मी घेईन म्हणून. तो माथीं घेतलेला भार आतां कांहीं उतरतां येत नाहीं. आमच्या गांवचीं बरींच मुलं इथं परमुलुखांत येऊन शिकायला राहिलीं आहेत. मी इथं नसलें तर त्यांची काळजी घेणारं कुणी नाहीं. "

" ते याच घरांत रहातात वाटतं ? "

" हो. इथंच रहातात नि कॉलेजांत जातात. पण आतां उशीर होतोय आपल्याला. मी इथंच बाहेर आहें. हांक मारली कीं ऐकूं येईल मला. "

बाथरूममधें वेगवेगळ्या प्रकारच्या सोई केल्या असल्याचें वंदनेला दिसून आलें. एकाला एक जोडून तीन खोल्या होत्या. शिवाशिवीचे दोष टळावे म्हणून ज्या ज्या प्रकारच्या युक्त्या माणसाच्या बुद्धीला सुचण्यासारख्या होत्या त्या सर्वांचा अवलंब करण्यांत कसूर केलेली नव्हती. ही सारी व्यवस्था आईसाठीं केलेली असावी. दगडी फरशी, दगडी टाकी, एका बाजूला तीन मोठे तांब्यांचे हांडे—गंगेच्या पाण्यासाठीं असावेत—रोज घासून चकचकित करून ठेवलेले—ती केव्हां आली असेल, केव्हां येईल तें निश्चितपणें कुणालाच माहीत नसे—तरीही या बाबतींत हेळसांड करणें मुळींच अशक्य होतें.

जशी कांहीं ती याच घरांत वस्ती करून राहिली आहे असें धरून चालून सारी व्यवस्था चोख ठेवण्यांत आली होती. नुसते हुकूम सोडून किंवा जरब दाखवून अशी व्यवस्था रहाणें शक्य नसतें. त्यापेक्षांही कांहीं तरी एका विलक्षण शक्तिच्या जोरावर ही सारी व्यवस्था झाली आहे असें नुसती नजर टाकतांच वंदनेला दिसून आलें.

आणि ही आई ! या कुटुंबांत ही बाई किती उच्च अधिकारावर होती याची यथार्थ कल्पना करीत ती किती वेळ तरी स्तब्धपणें उभी राहिली होती. गोष्टींतून, निबंधांतून, पुस्तकांतून भारतीय स्त्रीजातीच्या दुःखाची वर्णिलेली कहाणी तिनें वाचली होती. गुलामीच्या या लज्जास्पद वर्णनामुळें स्वतः स्त्री असल्यामुळें तिला मर्मांतिक दुःख होत असे—आणि तें कांहीं खोटेंही नव्हतें—पण या जागीं आज एकटीच उभी राहिलेली असतांना तिला वाटलें, कीं हे आरोप साऱ्याच ठिकाणीं कांहीं खरे नसावेत.

ती बाहेर येतांच अन्नदा हंसत हंसत म्हणाली, " फार उशीर झाला बरं ताईसाहेब—जवळजवळ दोन तास झाले. बाकीची मंडळी खालीं केव्हांची वाट पहात आहेत. चलावं. "

" तुमचे बडेबाबू कचेरींतून आले का ! "

" हो. तेही खालीं आहेत. "

" मला वाटतं ते आमच्याबरोबर खायला बसणार नाहींत. "

अन्नदा तशीच हंसून म्हणाली, " कांहीं खायचंच असलं तर तें दुपारनंतर. आज तेंसुद्धां नाहीं. आज एकादशी. रात्रीं केव्हांतरी थोडाबहुत फराळ करतील. "

या घरांत ही बाई अगदींच कांहीं मोलकरणीच्या दर्जाची नव्हती याची कल्पना वंदनेला आली. ती म्हणाली, " बडे बाबू म्हणजे काय ब्राह्मणाघरची विधवा नव्हेत. अशा कोणत्या संकटासाठीं एकादशीचा उपास करतात ? काल गाडींत एकादशी नसली तरी दशमीचा उपास झालाच आहे म्हणायचा. "

" झाला असेल. " अन्नदा म्हणाली, " उपास त्यांच्या पचनीं पडला आहे. कुठल्या जन्मीं कसली तरी तपश्चर्या केली होती त्यामुळं आमच्या विपिननं उपासंसिद्धी मिळवली आहे, असं आई म्हणतात. त्याचं जेवण पहाल तर आपण थक्क व्हाल. "

वंदना खालीं आली तेव्हां तिला दिसून आलें, कीं तिच्या सरावांतल्या चहा, रोटी, अंडीं वगैरे जिनसा टेबलावर मांडून ठेवल्या होत्या. तिचा बाप आणि पंजाबी बॅरिस्टर आणि त्याची बायको खाण्यासाठीं उतावीळ झालीं होतीं. हातांतलें वर्तमानपत्र फेंकून देऊन साहेब जरा रागारागानेंच म्हणाले, " काय हें ! किती उशीर हा पोरी ? आज सकाळीं आतां कांहीं काम होणार नाहींसं दिसतं. "

जवळच विप्रदास बसला होता. वंदनेनें त्याला विचारलें, " आपण नाहीं का चेत मुखर्जीमहाशय ? "

तिचा उद्देश विप्रदासाला कळला. हंसत हंसत तो म्हणाला, " मी चहा चेत नाहीं. खातों नुसता डाळभात, त्याचीही वेळ ही नव्हे. माझी काळजी नको. तुमची सुरवात होऊं द्या. "

वंदनेनें उत्तर दिलें नाहीं. बापाला आणि पाहुण्यांना उद्देशून ती म्हणाली, " माझी चूक झाली. मी सांगून पाठवायला हवं होतं--पण राहून गेलं. खाण्यावर इच्छा नाहीं माझी. उगीच माझ्यासाठीं खोटी झाली. माझ्यासाठीं उगीच तुम्ही खोळंबून राहिलां. आतां करा सुरवात. मी चहा बनवून देतें आपल्याला ! " असें म्हणून लगेच ती कामाला लागली.

सारेच अस्वस्थ झाले. एका बाजूला उभे असलेले नोकरसुद्धां संकोचानें

पाहूं लागले. अस्वस्थ होऊन तिचा बाप म्हणाला, "प्रकृति तर बिघडली नाहीं ना पोरी ?" बॅरिस्टरसाहेब सुद्धां कांहींतरी बोलूं पहात होते. पण काय बोलावें हें त्यांना सुचेना.

चहा ओतीत असतां वंदना म्हणाली, "नाहीं बाबा, प्रकृति कांहीं बिघडली नाहीं. नुसती खाण्यावर वासना नाहीं."

"मग कांहीं हरकत नाहीं. काल रात्रीं फार उशीरां जेवलों तें हजम झालं नसेल. दिवसासुद्धां पित्त चढलंच होतं कीं नाहीं ?"

"तसंच असेल. दुपारीं मुखर्जीमहाशयांच्या पंक्तीला डाळभात खाईन. या घरीं तरी डाळभातच सहज पचेल कदाचित."

तिच्या उद्‌गारांचा उद्देश इतर कुणाच्या फारसा ध्यानीं आला नाहीं. पण विप्रदासच्या मुद्रेवर मात्र एक क्षणभरच काळी छाया ओसंडून गेली.

नोकर एकाएकीं चुकून कांहीं तरी बोलून गेला, "आज एकादशी. आज कांहीं तरी फळमुळांशिवाय हे कांहीं खायचे नाहींत ना ?"

वंदनेला ही गोष्ट आधींच कळली होती. तरीही आश्चर्य वाटल्याचा आव आणून ती म्हणाली, "नुसतं फळमुळ ! हो, हें असलं हलक खाणं चांगलं— असंच नाहीं का मुखर्जीमहाशय ?"

विप्रदासनें नुसती होकारार्थी मान हालवली. अशा प्रकारें सहजासहजीं कुणी आपला उपहास करण्याचें धैर्य दाखवील असें त्याला वाटलें नव्हतें. हा पहिलाच अनुभव आल्यामुळें तो स्वस्थ बसला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर वंदनेलाही हें. चूणगांठ पटली असावी.

गांवांतलीं कामें करून वंदना आपल्या बापासह ज्यावेळीं घरीं परत आली त्यावेळीं तिसरा प्रहर उलटून गेला होता. जादूघर, चिडियाखाना, व्हिक्टोरिया स्मारक वगरे वगैरे कलकत्त्यांतील प्रेक्षणीय स्थळें पाहून बॅरिस्टरसाहेब अजून आपल्या पत्नीसह घरीं परत फिरले नव्हते. रात्रींच्या गाडीनें ते जाणार असें ठरलें होतें खरें. पण कार्यक्रम बदलून त्यांनीं जाण्याचें अजिबात रद्द केलें होतें.

कपडे बदलण्यासाठीं रायसाहेब आपल्या खोलींत गेले. वंदना आपल्या खोलीकडे आली त्यावेळीं तिला अन्नदा समोरच दिसली. हंसतमुखानें ती तिला आळवून म्हणाली, "हें काय ताईसाहेब, सारा दिवस उपासपोटीं काढलात ! आपल्यासाठीं फराळाचं सारं आणून ठेवलं आहे. लौकर लौकर हातपाय धुवून या. तोंपर्यंत मी सारी तयारी करून ठेवतें. कसं ?"

"पण बडेबाबू— मुखर्जीमहाशय ? त्यांचं काय ? "

"त्यांची कांहीं काळजी करायला नको ताईसाहेब." अन्नदा म्हणाली, त्यांची ही नित्याचीच संवय आहे. कांहीं खाण्यापेक्षां उपासपोटींच रहाणं त्यांना परवडतं."

"पण कुठं आहेत ते ? "

"दक्षिणेश्वरला गेले आहेत कालीमातेच्या दर्शनासाठीं. इतक्यांत येतील."

"असं ना ? मग येऊं देत त्यांना. पण बाकीच्या मंडळीचं काय ? त्यांची काय व्यवस्था केली आहे ? चल ना अन्नदा, तुमच्या सैंपाकघरांत एकदां जाऊन येऊं."

"चला." अन्नदा म्हणाली, "पण आज त्यांची व्यवस्था या सैंपाकघरांत केलेली नाहीं ताईसाहेब. ती व्यवस्था केली आहे हॉटेलांत, तिकडनंच येणार आहे जेवणखाण."

"याचा अर्थ काय ?" वंदना आश्चर्यचकित होऊन म्हणाली, "कुणी केली ही उठाठेव ? "

"खुद्द बड्या बाबूंच्याच हुकमानं झालंय हें सारं."

"पण ते सारे निषिद्ध पदार्थ इथं वाढायचे कुठं ? या घरांत ? तुमच्या आईंनीं ऐकलं तर त्या काय म्हणतील ? "

अन्नदा ओशाळली आणि म्हणाली, " नाहीं—त्यांना नाहीं हें कळायचं. खालच्या एका खोलींत केली आहे ही सारी तजवीज. भांडीकुंडीं सारीं हाटेलवालाच घेऊन येणार आहे. कांहीं गैरसोय नाहीं व्हायची."

वंदना म्हणाली, "ते हुकूम देऊन गेले खरे. पण हा बजावला कुणी ! मला एकदां त्यांची गांठ घालून दे पाहूं."

"जास्त चर्चा कशाला हवी आहे बाईसाहेब ! चला. मीच त्यांची भेट घालून देतें."

"चल तर."

कलकत्त्यांत मुखर्जींचा बऱ्याच मोठ्या प्रमाणावर धान्य गल्ल्याचा व्यापार होता. तळमजल्याच्या चार खोल्या या कामासाठीं ऑफिस म्हणून वापरल्या जात होत्या. कारकून, गुमास्ते, हिशेबनीस, शिपाई, मनेजर वगैरे या कामीं जरूर असणारीं सारीं माणसें तिथेंच काम करीत असत. वंदना त्या जागीं येतांच सारे उठून उभे राहिले. वयोमान आणि स्थानाधिकाराकडे पाहिल्यावर

मॅनेजर कोण तें ओळखायला तिला कठीण गेलें नाहीं. खूण करून तिनें त्यांना बाहेर बोलावलें आणि म्हटलें, "आपणच का हॉटेलांत ऑर्डर देऊन आलांत?"

मॅनेजरनीं नुसता मानेनें होकार दिला त्यावेळीं ती म्हणाली, "पुनः एकदां जा आणि ऑर्डर रद्द करून या."

बिचारा मॅनेजर आश्चर्यचकित झाला. काय करावें हें त्याला सुचेना. तो म्हणाला, "बडे बाबू परत येईपर्यंत—"

वंदना म्हणाली, "तोंपर्यंत थांबलों तर ऑर्डर रद्द करतां यायची नाहीं. मुखर्जीमहाशयांचा राग झाला तर तो माझ्यावर होईल. आपल्याला कांहीं भ्यायला नको. जा आतां. वेळ लावूं नका." असें म्हणून त्याच्या उत्तराची अपेक्षा न करतां ती एकदम जायला निघाली.

विचाऱ्या मॅनेजरला पंचाईत पडली. त्याला वाटलें एकंदरींत कांहीं वाईट नाहीं. तरी पण विप्रदासचा हुकूम अमान्य करणें कठीण होतें—अगदीं अशक्य होतें म्हटलें तरी चालेल. पण ही अपरिचित मुलगीसुद्धां तितकीच करारी—तेव्हां तिचा हुकूम मोडणें हेंही तितकेंच कठीण होतें—तितकेंच अशक्य होतें. कांहीं वेळ अनिश्चितपणें मुकाट राहून ते कांचरत म्हणाले, "जी. जातों तुम्हीं म्हणतां तर—नको म्हणून सांगून येऊं होय? पण त्याला ॲडव्हान्स दिला आहे—"

"असेना का—आपण आतां वेळ लावूं नका." असें म्हणून ती तिथून चालती झाली.

संध्याकाळीं विप्रदास घरीं आला त्यावेळीं त्याला ही सारी हकीकत कळली. खूष व्हावें कीं रागें भरावें हें त्याला ठरवतां येईना. सैंपाकघरांत जाऊन त्यानें पाहिलें त्यावेळीं जेवणाची सारी तयारी झाली असल्याचें त्याला दिसून आलें. एका छोट्या स्टूलवर बसून वंदना आचाऱ्याला समजावून देत होती. तो आलेला पहातांच ती उठून उभी राहिली आणि व्यंगपूर्ण विनयानें म्हणाली, "रागाच्या भरांत मॅनेजरबाबूंच्या हातीं नारळ तर दिलात नाहींना मुखर्जीमहाशय?"

विप्रदास म्हणाला, "मुखर्जीमहाशय एवढा अविचारी आहे असं कुणी सांगितलं तुम्हांला?"

वंदना म्हणाली, "वाघाचा वास एका योजनावरून सुद्धां येत असतो म्हणतात."

विप्रदास हंसत सुटला. तो म्हणाला, " पण आतां या पाहुण्यांचं कसं होणार ? रात्रीं, ' डिनर'ची संवय आहे त्यांना—त्याचं काय करायचं आतां ? "

वंदना म्हणाली, " ज्यांना हें जेवण चालत नसेल त्यांना माणूस देऊन हॉटेलांत पाठवा. बिलाचे पैसे मी देईन. "

" थट्टा नव्हे वंदना—झालं तें कांहीं बरं झालं नाहीं. "

" हे असले जिन्नस या घरांत आणले असते तर तें बरं झालं असतं का ? आईना कळतं तर त्या काय म्हणाल्या असत्या ? "

ही गोष्ट विप्रदासच्यासुद्धां लक्षांत आली नव्हती असें नाहीं पण त्याला निश्चितपणें कांहीं ठरवतां येत नव्हतें. तो म्हणाला, " तिला कळलं नसतं ! "

" कळलं असतं. " वंदना मान वेळावीत म्हणाली, " मी पत्र लिहिलं असतं. "

" कां ? "

" कां ! जें कधीं केलं नाहीं तें दोन दिवस बाहेरचीं माणसं आलीं म्हणून करायचं का ? नाहीं बरं ! " तिचें भाषण ऐकून विप्रदास नुसता खूषच झाला नाहीं—आश्चर्यचकित झाला. कांहीं वेळ उगीच राहून तो म्हणाला, " पण कालपासून तूं कांहीं खाल्लं नाहींस वंदना ! अजून रागाचा पारा उतरला नाहीं वाटतं ? " बोलतांना त्याचा आवाज गहिंवरल्यागत येत होता. "

" राग येऊं दिला कां ? " वंदना हळूच म्हणाली, " आतां असं पहा — आपल्या फराळाची सारी तयारी झाली आहे. आपण आपली संध्या पूजा आटोपून घ्या. मी पुढल्या तयारीला लागतें. आज कुणी कांहींही दिलं तरी मीं कांहीं खायची नाहीं. सांगून ठेवतें. "

" बरं बरं. आलों. " असें म्हणून विप्रदास माडीवर गेला.

सुमारें एक तासानें संगमरवरी दगडाच्या थाळींत फळें व मिठाई घेऊन वंदना विप्रदासच्या खोलींत येऊन हजर झाली. आसन आणि पाण्याचें भांडें घेऊन अन्नदा आली होती. पाणी शिंपडून जमीन साफ करून तिनें ताट मांडलें.

वंदनेकडे पाहून विप्रदास आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " पुनः यावेळीं स्नान केलंस वाटतं ? "

" आतां बसा फराळाला ! " असें म्हणून तिनें हातांतली थाळी त्याच्या समोर ठेवली.

२८४९
आ.वा
१५२७

१०

विप्रदास आसनावर बसला. त्यानें पुनः तोच प्रश्न केला, " खरोखरच का स्नान करून आलीस ? प्रकृति बिघडेल ना ? "

" बिघडूं दे. पण शिवाशिवीचं निमित्त करून माझ्या हातचं न खायचं जें तुम्हीं ढोंग करतांहां तें चालूं द्यायचं नाहीं, असा पण केला आहे मी. तुझ्या हातचं खायचं नाहीं, तूं म्लेंच्छाघरची आहेस, असं उघड उघड बोलायला लावीन. "

विप्रदास हंसून म्हणाला, " दुष्ट माणसं ढोंगी असतात असं तुझ्या पुस्तकांत आहे ना ? वाचलं आहेस ना तें ? "

" वाचलं आहे ! " वंदना म्हणाली, " पण आपण दुष्टही नाहीं कीं भयंकरही नाहीं. आमच्यासारखेच गुणदोषानं परिपूर्ण असलेले एक माणूस आहां तसं नसतं तर आज त्या बिचाऱ्यांचं डिनर मी बंद केलं नसतं. "

" पण तुझा खरा उद्देश काय ? "

" खरा उद्देश मी तेव्हांच सांगितला आपल्याला. आपल्या कुटुंबांत असलं कांहीं नाहीं चालत. तिकडे गांवीं नाहीं कीं इथंही नाहीं, मग जें चालत नाहीं तें करायचं काय म्हणून ? "

" पण ते विलायतेला जाऊन आलेले—त्याच खाण्याची त्यांना संवय—तें माहीत आहे ना तुला ? "

" संवय कसलीही असो, " वंदना म्हणाली, " तरी पण बंगाली डिनर मिळालं, विलायती नाहीं म्हणून कुठला बंगाली पाहुणा मेल्याचं कधीं ऐकिवांत नाहीं. एवढा हा अट्टहास कशाला ? उगीच आपण वायफळ बोलतांहां. "

" मग वायफळ नाहीं असं काय तें तरी सांग ना ? " विप्रदास म्हणाला.

" तें कांहीं मला चांगलंसं माहीत नाहीं. " वंदना म्हणाली, " पण मला वाटतं, आपण जें बोलतां ते सारंच कांहीं आपल्या मनाला पटलेल नसतं. नाहीं तर आमुर्ख्ला नकळत ही अशी व्यवस्था कां केली असती आपण ? उगीच लोक्यां स्तात एवढीं आपल्याला ! कुणाला भ्यायचंच असलं तर तें आपल्याला नकांची आपल्या आईला. "

कडे सा या भाषणामुळें विप्रदासाला मुळींच वाईट वाटलें नाहीं. उलट तो

हंसून म्हणाला, " तूं दोघांनाहीं ओळखलंयस. पण आईला नकळत ती व्यवस्था केली होती हें तुला सांगितलं कुणी ? "

वंदनेनें नांव सांगितलें नाहीं. ती नुसती म्हणाली, " चौकशी केली तेव्हां कळलं मला. उगीच कशाला ती तसली भानगड ? माझ्या ताईला कळलं तर ती मुळींसुद्धां गय करायची नाहीं. वंदनेसाठीं एवढं करावं लागलं म्हणून जन्मभर दोष देईल. म्हणूनच मी आपला सारा बेत मोडून काढला. "

विप्रदास म्हणाला, " किती झालं तरी तूं अगदीं जवळच्या लग्याबांध्याची. नात्यांत हें सर्वांत मोठं नातं. तूं म्हणतेस तें खरं आहे. पण चोरटेपणा केल्याशिवाय तुझ्या हातचं उघड उघड मी खाईन कीं नाहीं, हें त्या कुणाला विचारलं होतंस का तूं ? नाहींतर एकदां विचारून ये. मी तोंपर्यंत वाट पहातों. " असें म्हणून हंसत त्यानें फराळाची थाळी थोडी पुढें लोटली.

वंदना शरमेनें लालीलाल झाली. पण तितक्यांत मन सांवरून घेऊन म्हणाली, " हें असलं कांहीं विचारायला मी कुणाकडे जायची नाहीं. आपण नकाच खाऊं कांहीं ! "

" पण ही मुश्किल आहे ना ? " विप्रदास म्हणाला, " माझ्या घरांत तुला तर उपाशीं ठेवतां येत नाहीं. " असें म्हणून त्यानें खायला सुरवात केली.

क्षणभर उगीच राहून वंदना म्हणाली, " पण आतां पुढं काय करणार ? "

" घरीं गेलों कीं पंचगव्य घेऊन प्रायश्चित्त करणार असें म्हणून तो हंसला. तो हंसला खरा--पण त्याचे उद्गार खरे होते कीं नुसती थट्टा होती, हें निश्चित ठरवतां न आल्यामुळें ती पुनः उगीच राहिली.

विप्रदास म्हणाला, " आईची समजूत कशीबशी घालतां येईल पण तुझ्या बहिणीच्या कडक शिक्षेतून कसं सुटायचं हा त्यापेक्षांही मोठा प्रश्न आहे. " असें म्हणून तो पुनः हंसला आणि म्हणाला. " खरं नाहीं वाटत ? ठीक आहे. लग्न झालं कीं मुखर्जीमहाशयाचं हें म्हणणं पटेल तुला. " असें म्हणून फराळाचें संपवून तो उठून उभा राहिला.

डिनर रद्द झालें खरें पण जे पदार्थ केले होते ते पाहुण्यांना कांहीं फ़ाकाऊ वाटले नाहींत. एकंदरींत पाहुण्यांच्या समाधानाच्या दृष्टीनें कुठेंच [illegible] पडली नाहीं.

सारीं कामेंधामे आटोपून वंदना ज्यावेळीं बिछान्यावर [illegible] त्यावेळीं एकेक गोष्टीचा विचार करूं लागली. तिच्या बाबत तिच्या

केलेली वागणूक अनपेक्षित नव्हती, तशीच अवास्तवही नव्हती. अपुलकी होती खरी—नातेंही जवळचें—पण आजवर तितकासा परिचय नव्हता—घसटही नव्हती—अशा वेळी जुनी गोष्ट उकरून काढून उगीच आघात करणें अवास्तव होतें.

प्रणाम करायला गेल्यावेळीं शिवशिव चुकवण्याकरतां विप्रदासची आई मागें हटली. त्या रागानें वंदना उपासपोटीं निघून आली, अशिक्षित स्त्रीची अवास्तव अशी धार्मिकतेची कल्पना तिला जाणवली असें नव्हे—तो मागसलेपणा एक दिवस विसरून जाणें शक्य होतें—पण विप्रदासनें जें कांहीं केलें त्याचा प्रतिवाद कशाप्रकारें करायचा हें कांहीं वंदनेला सुचेना. तिच्या हातचीं फळेंमुळें, मिठाई त्यानें खाल्लीं खरीं – पण ती स्वेच्छेनें नव्हे—सक्तीनें. बलरामपुरला घडलेल्या प्रकाराची पुनरावृत्ति होऊं नये या भीतीनें. एकाद्या पागल व्यक्तीच्या हातून माणूस सुटायचा प्रयत्न करतो त्या रीतीनें ! पण अशा प्रकारानें घडलेला अनाचार विप्रदासला जाणवला आहे—घरीं जातांच त्याला त्याबद्दल प्रायश्चित्त घ्यावें लागणार—असें निश्चयपूर्वक वाटल्यामुळें वंदनेच्या डोळ्यांना झोंप शिवेना.

या प्रकाराबद्दल एवढें मोठें अवडंबर कां वाटावें हाही तिला प्रश्न पडला. त्यांचा मार्ग एक नव्हता. या जगांत दोघांचे मार्ग दोन बाजूंनी होते. ते चांगले प्रशस्त होते. कदाचित झगडा होण्याचा प्रसंग आला तर त्यांत काय बिघडत होतें ? या प्रश्नाची रुजवात करायची कुणी तिच्यावर कांहीं सक्ति का केली होती !

मनाला शांतता यावी म्हणून ती अशा रीतीनें मनाची समजूत करून घेऊं पहात होती. पण या माणसांनीं मुकाट्यानें केलेल्या वर्तनांचा परिणाम कांहीं केलें तरी तिला दूर सारतां आला नाहीं.

विचार करतां करतां केव्हांतरी तिला झोंप लागली. त्या अस्वस्थपणाच्या झोंपेंतून ती एकाएकीं जागी झाली. अजून उजाडलें नव्हतें. आपल्या झोंपेची झांपड अजूनही तिच्या डोळ्यांवर भार टाकीत होती. तिच्यानें बिछान्यावर पडून रहावेना. बाहेर येऊन ती गच्चीचें रेलिंग धरून उभी राहिली. रात्र संपत आल्यामुळें काळ्या आकाशांतला अंधकार जास्तच काळवंडला होता. पलिकडे मोठ्या रस्त्यावर एकाद्या गाडीच्या चाकाचा अस्पष्ट आवाज कानीं येत होता. लोकांची रहदारी सुरू व्हायला अजून बराच अवकाश होता. घरांतसुद्धां जिकडे तिकडे सामसूम होतें. सहसा तिच्या नजरेला आलें, कीं दुसऱ्या मजल्यावरच्या

आईच्या देवघरांत दिवा जळत होता. त्या दिव्याच्या प्रकाशाची बारीकशी रेषा झांकलेल्या खिडकीच्या भेगेंतून समोरच्या खांबावर पडत होती. रात्रीं दिवा मालवायला नोकर कदाचित विसरला असेल असें क्षणभर तिला वाटलें—पण पुनः वाटलें, कदाचित विप्रदास पूजेला तर बसला नाहीं!

तिचा चौकसपणा जागा झाला. चटकन् कुणी आपल्याला पाहिलें तर शरमेनें मरायला होईल असें तिला वाटलें. भरल्या रात्रीं आपली खोली सोडून बाहेर आल्याचें कोणतेंच कारण तिला सांगतां आलें नसतें. तरीही मनांत आलेली उत्सुकता तिला आवरतां आली नाहीं.

ध्यानाच्या गोष्टी तिनें पुस्तकांत वाचल्या होत्या—चित्रांत पाहिल्या होत्या—पण प्रत्यक्ष ध्यान करीत असतांना तिनें कुणाला पाहिलें नव्हतें. निस्तब्ध रात्रींतल्या त्या निःसंग काळोखांत तें दृश्य आज तिच्या दृष्टीला पडलें.

विप्रदासचे दोन्ही डोळे झांकलेले होते. त्याची मजबूत शरीरयष्टी आसन ठोकून बसल्यामुळें उठावदार दिसत होती. वरच्या दिव्याचा प्रकाश त्याच्या चेहऱ्यावर पडून परावर्तित झाला होता. तसें विशेष कांहीं नव्हतें—इतर वेळीं हा देखावा तिच्या नजरेला आला असता तर ती हंसलीसुद्धां असती. पण ज्या एका विशेष प्रकारच्या झांपडींतून ती उठली होती त्या नजरेनें दिसणारी ती मूर्ति पाहून ती मुग्ध होऊन गेली.

किती वेळ ती त्याच्याकडे पहात राहिली होती याचें तिलाच भान नव्हतें. ज्यावेळीं ती भानावर आली त्यावेळीं पूर्वेला दिशा उजळूं लागल्या होत्या. नोकरचाकर झोंपेंतून उठून वावरुं लागले होते. पण भाग्य तिचें, कीं कुणीही त्यावेळीं तिच्या समोरासमोर आला नाहीं. ती जी तशीच निघाली ती सरळ आपल्या खोलींत जाऊन बिछान्यावर पडली आणि एका क्षणांत गाढ झोंपीं गेली.

दार ठोठावीत अन्नदा हांका मारीत होती, "उशीर झाला. उठा ना ताईसाहेब. आज उठणार नाहीं वाटतं?"

घाईघाईनें उठून दार उघडून वंदना बाहेर आली. खरोखरच दिवस बराच वर आला होता. तिनें शरमून विचारलें, "अजूनसुद्धां ते वाट पहाताहेत का माझी? जरा लवकर कां उठवलं नाहींस मला? आंघोळबिंघोळ करून यायला आणखी एक घंटा वेळ लागेल ना?"

तिची ओशाळलेली मुद्रा पाहून अन्नदा हंसून म्हणाली, "कांहीं काळजी नको. आज ते कांहीं थांबले नाहींत कुणी. सारं आटोपलं आहे त्यांचं. आतां अगदीं स्वस्थपणें स्नान करा. कोणी हांक मारायचं नाहीं या वेळेला."

वंदनेचा जीव खालीं पडला. मग तीही हंसतमुखानें म्हणाली, "तुमच्या बऱ्याचशा चाली मला आवडत नाहींत खऱ्या; पण एवढं मात्र पसंत आहे. सगळे मिळून कट करून घड्याळाचा कांटा फिरवून ठेवीत नाहींत हें भाग्य म्हणायचं."

"पण आपल्याला सकाळीं भूक लागत नाहीं का ताईसाहेब?" अन्नदा म्हणाली.

"केव्हांही नाहीं." वंदना म्हणाली, "लहानपणापासून हीच संवय आहे मला. आतां जातें. उगीच उशीर नको." असें म्हणून ती निघून गेली.

एकदोन तासांनीं खालीं येतांना तिला विप्रदास भेटला. कचेरींतलें काम उरकून तो बाहेर येत होता. वंदनेनें त्याला नमस्कार केला.

"चहा झाला?"

"हो"

"ते कांहीं थांबेनात. पण तुझ्यासाठीं—"

"त्याच्याबद्दल माझी कांहीं तक्रार नाहीं मुखर्जीमहाशय." वंदना मधेंच म्हणाली.

विप्रदास हंसला आणि म्हणाला, "तशी तुझी तब्येत कडक आहे, हें कांहीं मी नाहीं म्हणत नाहीं. पण आधींच दोन बहिणींतला फरक चंद्रसूर्याइतका आहे, आणे आतां ऐकतोंय, कीं विलायतला जाणार पुढल्या अभ्यासासाठीं! जा बरं. आल्यावर मला कळवायला विसरूं नको—एकदां येऊन नजर टाकून जाईन."

त्याचें भाषण ऐकून वंदना हंसत सुटली. पण तिनें उत्तर दिलें नाहीं.

विप्रदास म्हणाला, "त्या देशांत म्हणे बारा वाजेपर्यंत माणसाला झोंपून रहावं लागतं. कठीण तपश्चर्याच आहे म्हणायची. पण ती करायला कांहीं तुला फारसं कठीण जाणार नाहीं. या देशांतच होऊन गेलंय सारं."

यावेळींही वंदना हसली. पण तशीच विप्रदासाच्या चेहेऱ्याकडे नुसती पहात राहिली. अगदीं साधासीधा साधारण माणसासारखा चेहरा, थट्टामस्करी करणारा, आपल्यांतलाच एक वात्सल्यपूर्ण माणूस—पण कालरात्रीं त्या निःस्तब्ध आणि निर्जन देवघरांत याच माणसाची ती ध्यानमग्न मूर्ति पहातांना

तिच्या मनावर जो विलक्षण परिणाम झाला होता तो आतां दिवसा उजेडीं आठवतांच तिला मोठें कौतुक वाटलें.

"हे सारे गेले कुठं मुखर्जीमहाशय ? कुठंच कुणी दिसत नाहींत ?"

"नाहींतच इथं कुणी—मग दिसणार कसे ?" विप्रदास म्हणाला, "कुणी म्हणजें अर्थात् आमचे श्वसुरमहाशय आणि सपत्निक बॅरिस्टर—तिघेहीं गेलीं आहेत हावरा स्टेशनवर जागा रिझर्व करायला."

वंदना आश्चर्यचकित होऊन म्हणाली. "बरिस्टर साहेबांचं ठीक आहे. पण बाबा कशाला गेले आहेत रिझर्व करायला ? त्यांची रजा संपायला अजून आठदहा दिवस आहेत, अन् मला सांगितल्याशिवाय !"

"सांगायला सवड होती कुठं ?" विप्रदास म्हणायला, "आतां सांगतील आल्यावर. सकाळीं मुंबईच्या ऑफिसमधून अर्जंट तार आली होती. मुद्रा पाहिली तेव्हां वाटलं, कीं जाणं चुकवणं कांहीं शक्य नाहीं."

"आणि मी ? इतक्या लवकर मी काय म्हणून जावं ?"

तिच्या सुराला सूर मिळवून विप्रदासही म्हणाला, "अर्थात काय म्हणून जावं ? मी तरी तेंच म्हणतों."

त्याच्या उद्‌गाराचा अथ न कळल्यामुळें ती नुसती प्रश्नांकित मुद्रेनें पहात राहिली.

विप्रदास म्हणाला, "बहिणीला एक तार कर ना—म्हणावं दीराला घेऊन ये की इथं. तुम्हां दोघांचीही भेट होईल अन् पाहुण्यांची उठाबस करायच्या संकटांतून मीही बचावेन."

वंदना कावरीबावरी झाली. तिनें अगदीं जपून विचारलें, "शक्य आहे का तें ? आई देतील का परवानगी यायला ? मला भेटायला आलेलं आवडेल का आईना ?"

"एकदां प्रयत्न करून तर पहा !" विप्रदास म्हणाला, "म्हटलंस तर तारेचा फॉर्म पाठवून देतों—कसं ?"

क्षणभर उत्सुकतेनें त्याच्या चेहऱ्याकडे पहात वंदना मुकाट्यनें राहिली होती. शेवटीं निश्चय करून ती म्हणाली, "जाऊं दे. नकोच. तें कांहीं जमायचं नाहीं."

"राहुंदे तर."

"नाहींतर मी जातेंच बाबांच्याबरोबर."

•

" तेंही ठीक ! " असें म्हणून विप्रदास निघून गेला.

टेबलावर तिच्या बापाच्या नांवाची तार पडली होती. वंदनेनें ती उघडून पाहिली. खरोखरच मुंबई ऑफिसची तार होती—अत्यंत जरुरीची. आतां थांबणें शक्यच नव्हतें.

वंदना खोलींत गेली आणि सामानसुमानाच्या बांधाबांधीला लागली.

अजूनही तिचे वडील परत आले नव्हते. घटकाभऱ्यानें अन्नदा खोलींत डोकावून म्हणाली, " आपल्या नांवाची एक तार आली आहे ताईसाहेब. ही घ्या. "

" माझी तार ? " आश्चर्यचकीत होऊन वंदनेनें तार घेऊन उघडून पाहिली. बलरामपूरहून आलेली ती आईची तार होती. सुनबाई आणि द्विजूला घेऊन रात्रीच्या गाडीनें येत आहों तोंपर्यंत दोघांनींही जाऊं नये, असें तिनें आग्रह-पूर्वक लिहिलें होतें.

११

रात्रीच्या गाडीनें येत होती ताई आणि बरोबर येणार होता द्विजदास. वंदनेचा आनंद त्रिभुवनांत मावेना. ताईच्या सासुरवाडीला त्या दिवशीं आपल्या हातून ज्या प्रकारचें वर्तन झालें त्याबद्दल ती मनांतल्या मनांत शरमिंदी झाली होती. त्याचा प्रतिकार कसा करायचा तें तिला सुचत नव्हतें. मनांत नसतांना सुद्धां आज बापाबरोबर तिला मुंबईला जावें लागणार होतें. पण अभावितपणें आज हा मार्ग सांपडल्यामुळें कोड्याचा उलगडा झाला.

तारेचा कागद घेऊन तिनें कितीतरी वेळ आरतून पारतून पाहिला, अन्नदेला वाचून दाखवला आणि उत्सुकतेनें ती वाट पहात राहिली आपल्या बापाचो—केव्हां एकदां तो कागद त्याच्या हातीं देईन असें तिला झालें होतें. विप्रदास त्यावेळीं घरीं नव्हता. थोड्याच वेळापूर्वी तो बाहेर गेला असल्याचं तिला कळलें. ही व्यवस्था त्यानेच केली असली पाहिजे—अर्थात त्याला कळवण्याजोगें त्यांत कांहीं नव्हतें—तरीही त्याला सांगितल्याशिवाय तिला बरें वाटेना.

तें कसें सांगावें हेंच ठरत नव्हतें. पुनः पुनः मनाशीं आलटून पालटून ते शब्द ती जुळवून पहात होती पण समाधान होत नव्हतें. झालेला आनंद उघड करून दाखवायचा सरळ मार्ग बंद झाल्यासारखें तिला वाटत होतें.

या जमीदार जातीच्या कडक सनातनी माणसाबद्दल पहिल्यापासूनच तिचें मन शुद्ध नव्हतें. तो माणूस बराचसा खोल स्वभावाचा असल्याचें तिला वाटूं लागलें. पणं आतां हळुहळू तिचें मत बदलत होतें. तिला दिसून आलें, कीं या माणसाचें आचरण रेखीव होतें. भाषण बेताबाताचें, वागायला अत्यंत सभ्य आणि गोड—तरीही प्रत्येक बाबतींत प्रत्येक क्षणाला मधें कांहींतरी व्यवधान असल्याची जाणीव होत होती. सर्वांत राहूनही तो सर्वांपासून दूर होता. आश्रित, परिजन, दासी, चाकर, कारकून शिपाई वगैरे सर्वांचा त्याच्याबद्दल मोठा आदर होता—मोठी भक्ति वाटत होती सर्वांना पण त्याहीपेक्षां जास्त वाटत होती भीति. त्यांना वाटे तें असें - बडे बाबू म्हणजे अन्नदाते, बडे बाबू रक्षणकर्ते, संकटांतला आसरा म्हणजे बडे बाबू पण बडेबाबू मात्र कुणाचेच नव्हत. बापाच्या मृत्यूच्या संकटाचा पाढा त्याच्यापुढें वाचतां येई, पण मुलाच्या लग्नाच्या समारंभाला जेवायचें निमंत्रण देणें मात्र कठीण असे. आपुलकीच्या भावनेनें त्याच्याकडे पहाणें कुणाला शक्यच नव्हतें. स्वैंपाकघरांत बसल्यावेळीं काल तिथली मोलकरीण वंदनेला बोलायला सांपडली. ती स्वभावाची निर्मळ आणि थोडीशी भोळसर होती. बोलतां बोलतां तिच्याजवळ गोष्ट काढून ती या वागणुकीच्या कारणाचा अंदाज घेऊं लागली. पण त्याचें कारण कुणालाही सांगतां येत नाहीं, एवढाच निष्कर्ष त्या साऱ्या आडव्यातिडव्या भाषणांतून निघाला. सारे भीतात म्हणून तीही भीत होती. मुखर्जी कुटुंबांतला तो एक संसर्गजन्य रोग होता.

त्या दिवशीं गाडींतून येतांना विप्रदासबरोबर जें भाषण झालें, सहज घडलेल्या त्या किरकोळ प्रकाराबद्दल जे उद्गार त्यानें काढले, त्यावेळीं एक क्षणभरच त्याच्या बलिष्ट प्रकृतिची तिला कल्पना आली होती—पण लगेच त्यानें बोलतां बोलतां जीभ आंखुडती घेतली होती. त्या दिवशीं गाडींत जवळ बसल्यावेळीं हंसत खेळत कितीतरी गप्पागोष्टी त्यानें केल्या होत्या. पण आज या घरांत असलेले बडेबाबू म्हणजे तीच व्यक्ति असें आतां कांहीं तिला वाटेना.

एकाएकीं खालीं कांहींतरी गडबड सुरू झाली होती. कुणीतरी धांवत येऊन सांगितलें कीं तिचे वडील रायसाहेब स्टेशनावरून परत आले ते पांगळे होऊन.

वंदनेनें खिडकींतून डोकावून पाहिलें--पंजाबचें बॅरिस्टर आणि त्यांची पत्नी या दोघांनीं दोन बाजूला धरून साहेबांना गाडींतून खालीं उतरवलें. त्यांच्या एका पायांतले बूटस्टाकींग काढलेले होते आणि त्या पायावर दोन तीन

भिजलेले रुमाल बांधले होते. प्लॅटफार्मवरच्या गर्दीतल्या लठ्ठालठ्ठींत कुणीतरी त्यांच्या पायावर भली मोठी लांकडी पेटी फेंकली होती.

धरून उचलून कुणीतरी त्यांना वर आणून बिछान्यावर निजवलें. दरवान डॉक्टरला बोलवायला गेलाच होता. डॉक्टरनीं येऊन बँडेज बांधून औषध दिलें. दुखापत तशी फारशी झाली नव्हती पण यापुढें बरेच दिवस त्यांना चालतां येणें मात्र अशक्य झालें होतें.

दुसरे दिवशीं दुपारीं सती आली. तिचें स्वागत करण्यासाठीं वंदना उड्या मारीतच जात होती पण मोटरमधून उतरणारीं माणसें पहातांच एकदम थांबली. आली होती ती एकटी ताईच नव्हे—बरोबर होती तिची सासू दयामयी. आनंदाची उकळी तिथल्या तिथेंच निवाली. कसाबसा नमस्कार करून वंदना एका बाजूला सरकून उभी राहिली पण यावेळीं दयामर्यीनें तिला जवळ घेऊन तिच्या हनुवटीला हात लावून तिचा मुका घेतला आणि हंसत हंसत विचारलें, "खुशाल आहेस ना मुली ?"

होकारार्थी मान हालवीत वंदना म्हणाली, "खुशाल आहें. आपण अचानक कशा आलांत आई ?"

"न येऊन कसं व्हायचं !" दयामयी म्हणाली, "माझी एक वेडी पोर रागारागानं उपासपोटीं निघून आली, तिची समजूत घालून तिला पुनः घरीं घेऊन गेल्याशिवाय मला कसं समाधान वाटेल पोरी ?"

हंसें दाबून वंदना म्हणाली, "मी रागावून आलें कशावरून ?"

दयामयी म्हणाली, "आधीं तुला मुलंबाळं होऊं देत, माझ्याप्रमाणें त्यांचं संगोपन कर, त्यांना लहानाचीं मोठीं केलींस कीं तुझं तुलाच कळेल, कीं मुलगी रागावली कीं आईला कसं कळतं तें."

ती इतकी गोडगोड बोलत होती, कीं वंदनेला तें भारीच जाणवलें. कांहींच न बोलतां तिनें खालीं वांकून तिच्या पायाला हात लावून नमस्कार केला. उठून उभी राहून ती म्हणाली, "बाबा बरेच आजारी आहेत आई."

"आजारी ? काय झालंय त्यांना ?"

"पायाला मार लागला आहे. बिछान्यावर पडून आहेत. उठतां येत नाहीं—" असें म्हणून तिनें झालेला सर्व प्रकार व्यवस्थितपणें तिला सांगितला.

अस्वस्थ होऊन ती म्हणाली, "त्यांच्या सग्गबराईत कांहीं कमी पडलं नाहीं ना ? चल पाहूं—तुझे बाबा कुठं आहेत तिथं मला घेऊन चल. आधीं

त्यांची चौकशी करूं आणि मग बाकीचीं कामं—" असें म्हणून सतीला बरोबर घेऊन ती वंदनेच्या मागोमाग रायसाहेबांच्या खोलींत आली.

आज त्यांची पायाची दुःखी बरीच कमी झाली होती. बिछान्यांत उठून बसून त्यांनीं नमस्कार केला. दोन्ही हात जोडून प्रतिनमस्कार करून दयामयी म्हणाली, ' असे कुठं गेलां होतां पाय मोडून घ्यायला व्याहीमहाशय ? "

तें भाषण ऐकून सती आणि वंदना या दोघींनींही दुसऱ्या बाजूला पाहायला सुरवात केली. रायसाहेब बिचारा साधा माणूस. काकुळत वाणीनें उत्तर देतांना त्यानें अचानक स्टेशनवर कसा प्रकार झाला त्याचें इत्थंभूत वर्णन केलें.

" जें व्हायचं तें होऊन गेलं, " दयामयी हंसून म्हणाली " आतां कांहीं दिवस इथं मुलींच्या पहाऱ्यांत रहा या घरांत अडकून. एक मुलगी पुरेशी झाली नसती म्हणून या दुसरीलाही घेऊन आलेंय आतां. आळीपाळीनं दोघीही सेवाशुश्रूषा करतील. "

रायसाहेबांना तें सारें बोलणें सरळ वाटलें. या कळकळीबद्दल त्यांनीं तिला धन्यवाद दिले.

" आधीं हातपाय धुऊन घेतें आणि मग येतें भेटायला ! " असें म्हणून त्यांचा निरोप घेऊन दयामयी आपल्या खोलींत गेली.

दुसऱ्या मोटारींतून आला द्विजदास आणि त्याचा पुतण्या वासुदेव. त्या दिवशीं बहिणीच्या या मुलाला वंदनेनें गांवीं पाहिलें नव्हतें. तो त्यावेळीं पाठशाळेंत गेला होता. आणि सुट्टी होऊन तो घरीं यायच्यापूर्वी वंदना तिथून निघून आली होती. आजीला सोडून तो केव्हांच रहात नसे म्हणूनच त्याला बरोबर आणावें लागलें होतें. तिच्याबरोबरच तो पुनः गांवीं जाणार होता. काकानें परिचय करून दिला तेव्हां वासुदेवानें मावशीला प्रणाम केला. वंदनेच्या पायांत बूट असलेले पाहून त्याला आश्चर्य वाटलें. पण तो कांहीं बोलला नाहीं. आठनऊ वर्षांचा मुलगा पण त्याला सारें कांहीं कळत होतें.

मोठ्या प्रेमानें त्याला जवळ घेऊन कवटाळून वंदनेनें विचारलें, " मला ओळखलंस का वासू ? "

" ओळखलं कीं मावशी—"

" त्यावेळीं तूं होतास सारा पांचसहा वर्षांचा. त्यावेळचं कुठलं काय आठवणार आहे तुला ? "

" वाः मावशी ! आहे कीं माझ्या ध्यानांत. अगदीं पाहिल्याबरोबर मी तुला

ओळखलं. तूं घरीं आली होतीस त्यावेळीं रागावून निघून गेलीस—अन् मी परत घरीं आलों म्हणून भेट झाली नाहीं तुझी. ”

“ रागावून निघून आलें म्हणून कुणी सांगितलं तुला ?

“ काका सांगत होते आजीला. ”

द्विजदासकडे वळून वंदनेनें विचारलें, “ मी रागावून आलें तें कसं कळलं आपल्याला ? ”

“ मीच काय, ” द्विजदास म्हणाला, “ घरच्या प्रत्येक माणसाला तें कळलंय. आपण तरी कुठं असं लपवायचा प्रयत्न केला होता ? ”

वंदना म्हणाली, “ मी रागावलें तें कळलं—पण कां रागावलें तें कळलं का ? ”

“ इतरांना कळलं नसलं तरी मला कळलं. ” द्विजदास म्हणाला, “ रायसाहेबांना एकट्यालाच बाहेर टेबलावर वाढलं म्हणून ना ? ”

वंदना म्हणाली, “ हेंच कारण असं आपण धरून चालूं. पण एवढ्यासाठीं मी रागावलें हें पटलं का आपल्याला ? ”

“ पटलं. ” द्विजदास म्हणाला, “ त्याला कांहीं उपाय नव्हता, तरीसुद्धां पटलं. ”

“ आमच्या बाबांच्या पंक्तीला बसून आपण जेवाल का ? ”

“ जेवीन की. पण दादांनीं नको म्हटलं तर नाहीं बसतां यायचं. ”

“ कां नाहीं ? आपल्याला नको म्हणायचा अधिकार दादांना आहे असं वाटतं का आपल्याला ? ”

“ तें त्यांचें ते जाणोत. ” द्विजदास म्हणाला, “ माझा कांहीं संबंध नाहीं. दादांची अवज्ञा करणं माझ्यालेखीं अनुचित आहे. ”

वंदना म्हणाली, “ स्वतःच्या मनाला जें पटतं, तसं वागायचं धैर्यच नाहीं का तुमच्या ठायीं ? ”

क्षणभर स्वस्थ राहून द्विजदास म्हणाला, “ हा धैर्याचा प्रश्न नाहीं. स्वभावतः मी कांहीं भेकड नाहीं. पण उघडउघड दादाची अवज्ञा करायची कल्पनासुद्धां मला दुःसह वाटते. लहानपणीं कितीतरी वेळ बाबांचं ऐकत सुद्धां नसे—मारसुद्धां खाल्लाय त्यासाठीं. पण आमच्या दादांची गोष्टच वेगळी आहे. त्यांची उपेक्षा करणं शक्यच नाहीं कुणाला ! ”

“ उपेक्षा केली तर काय होईल ? ”

" काय होईल तें कसं सांगूं ? असं कधीं झालंच नाहीं आमच्या घरांत—तो प्रश्नच कधीं उपस्थित झाला नाहीं. "

वंदना म्हणाली, " आपण देशसेवेसाठीं दादांच्या इच्छेविरुद्ध कितीतरी गोष्टी केल्या, असं ताईनं पत्रांत लिहिलं होतं. तें कसं झालं ? "

द्विजदास म्हणाला, " त्यांच्या इच्छेविरुद्ध असलं तरी त्यांच्या निषेधाविरुद्ध नव्हतं तें. त्यानीं निषेध केला असता तर कांहीं करतां आलं नसतं मला. "

एकदोन मिनिटें उगीच राहून वंदना म्हणाली, " ताईच्या पत्रावरून ज्या माणसाची मी कल्पना केली होती ते आपण नव्हे. आतां तिला निर्धास्त व्हायला सांगायला मला संकोच वाटायचा नाहीं. स्वदेशसेवेच्या आपल्या अभिनयापायीं मुखर्जी घराण्याच्या बड्या दौलतीचं एक रतिभरसुद्धां नुकसान व्हायची भीति नाहीं. आतां निश्चिंत हो म्हणेन ताईला. "

द्विजदास हंसून म्हणाला, " वहिनीचं नुकसान व्हावं अशी का आपली इच्छा आहे ? "

वंदना दचकून म्हणाली, " वाः ! असं कां वाटेल मला ? मी म्हटलं तिची भीति एकदां जाऊं दे—निर्धास्त होऊं दे. "

" कांहीं काळजी करूं नका. " द्विजदास म्हणाला, " सारीं निर्धास्त आहेत अगदीं—निदान दादांच्या बाबतींत तरी मी निःसंकोचपणें सांगेन, कीं भीति म्हणजे काय हें त्यांच्या गांवींसुद्धां नाहीं. तसलं कांहीं त्यांच्या जाणिवेंतच नाहीं. "

वंदना हंसून म्हणाली, " म्हणजे भीति ही वस्तु घरांतल्या बाकीच्या लोकांच्या वांट्याला आली आहे—आपल्यालाही त्यांतला थोडासा वांटा मिळाला आहे—तेव्हां त्यांच्या वांट्याला कांहीं राहिलं नाहीं असंच ना ? "

तिचें भाषण ऐकून द्विजदास देखील हंसला आणि म्हणाला, " कांहींसं असंच खरं. तरीपण आपल्याला अगदींच निराश व्हायला नको. त्यांतली जी कांहीं थोडीबहुत भीति राहिली असेल ती आपल्याही वांट्याला येईल. तीन-चार दिवस एका जागीं राहिलां होतां – अजून नाहीं का ओळखलं त्यांना ? "

" नाहीं. " वंदना म्हणाली, " त्यांना कसं ओळखायचं हें आपल्याकडून शिकायची वाट पहातें आहें. "

" असं का ? " द्विजदास म्हणला, " तर मग आतां पहिला घडा घ्या. हे पायांतले बूट आधीं काढून टाका. "

नोकर येऊन म्हणाला, " आईसाहेब आपल्याला वर बोलावताहेत. "

जातां जातां वंदनेनें विचारलें, " आई अशा अचानक कां आल्या ? "

द्विजदास म्हणाला, " पहिल्यानं, हिमालयावर जाण्याच्या बाबतींत मावशी-बरोबर ठरवाठरवी करायला. दुसरं, आपल्याला बलरामपुरला पुनः घेऊन जायला. नाहीं म्हणून बसूं नका हं. "

" ठीक आहे. " वंदना म्हणाली, " कबूल. "

द्विजदास म्हणाला, " आईच्यासमोर आपल्याला मिस् राय म्हटलेलं चालायचं नाहीं. आपण माझ्यापेक्षां वयानं लहान—वहिनीच्या धाकट्या भगिनी—अर्थात् नांवानंच हांक मारणार मी. पुनः रुसवारुसवी करून आणखी कांहीं भानगड उपस्थित करूं नका. "

" रुसायचं कशाला ? " वंदना हंसून म्हणाली, " आपण माझ्या नांवानंच हांक मारीत जा मला. पण आपल्याला कोणत्या नांवानं हांक मारायची ? "

" मला द्विजूबाबू म्हणत जा. " द्विजदास म्हणाला, " तसंच दादांना मुखर्जीमहाशय म्हटलेलं चालायचं नाहीं. सारे लोक त्यांना म्हणतात बडे दादाबाबू. आपण हांक मारायची बडे दादा म्हणून. हा झाला दुसरा धडा. "

" कां ? "

" वितंडवाद घालून शिकतां येत नाहीं. द्विजदास म्हणाला, " आधीं मन लावून ऐकून घ्यायचं. धडा पाठ झाला, कीं मग त्याचं कारण सांगण्यांत येईल—यावेळीं नाहीं. "

वंदना म्हणाली, " मुखर्जीमहाशयच स्वतः आश्चर्यचकित होतील ! "

" झाले तरी हरकत नाहीं " द्विजदास म्हणाला, " पण आई, वहिनी सारीं भारी खूष होतील. असंच झालं पाहिजे. "

" ठीक. तसंच होईल. "

जिन्याच्या एका बाजूला पायांतले बूट काढून ठेवून वंदना दयामयीच्या खोलींत गेली. तिच्या मागोमाग गेले द्विजदास आणि वासुदेव. ट्रंक उघडून ती सामानसुमान पहात होती आणि स्वैंपाकाची व्यवस्था विचारीत अन्नदा जवळच उभी होती. दयामयीनें वर पाहिलें. आणि कांहींसुद्धां प्रस्ताव न करतां अगदीं सहजपणें विचारलें, " रोजची वापराची साडी सोडूंन ठेवली आहेस ना ? "

" होय आई. "

" तर मग आतां सैंपाकघरांत जा. एवढ्या लोकांच्या सैंपाकाची कशी तयारी करायची तें भटजींना कळायचं नाहीं—मी माझी पूजाबिजा आटोपून येतें. "

वंदना स्तब्धपणें पहात होती. पण तिकडे तिनें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. ती म्हणाली, " द्विजूची प्रकृति तितकीशी बरी नाहीं. सकाळीं त्यानं कांहींच खाल्लं नव्हतं. त्याच्या जेवणाची व्यवस्था जरा लौकर होऊं दे. " असें म्हणून अन्नदेला बरोबर घेऊनं ती देवघराकडे निघून गेली. वंदनेच्या उत्तराचीसुद्धां तिनें वाट पाहिली नाहीं.

" काय झालं आहे ? " वंदनेनें विचारलें.

" जरा आंग गरम झालं आहे. " द्विजदास म्हणाला.

" मग काय हवंय आपल्याला ? "

द्विजदास म्हणाला, " साबूदाणा आणि बार्लीखेरीज द्याल तें. "

वंदनेनें विचारलें, " सैंपाकघरांत मी गेलें तर पुढं कांहीं भानगड उपस्थित नाहीं ना व्हायची ? "

" नाहीं. " द्विजदास म्हणाला, " अन्नदा अक्कानं आपल्याबद्दल तिला जें सांगायचं तें सांगितलंच असेल. आई तिच्या शब्दाबाहेर कधीं जात नाहीं. फार लोभ आहे तिच्यावर. आपल्यावरचा म्लेंच्छपणाचा शिक्का मला वाटतं पार उडून गेला. "

" मोठं आश्चर्य आहे ! " वंदना क्षणभर उगीच राहून म्हणाली.

होकार देत द्विजदास म्हणाला, " इतक्यांत आपण इथं काय केलं ? अन्नदा अक्कानं आईला काय सांगितलं तेंच कळत नाहीं. आपल्यापेक्षांसुद्धां जास्त आश्चर्य वाटतंय तें मला. पण आतां वेळ लावूं नका. जा पाहूं लवकर आणि जेवणाच्या तयारीला लागा. पुनः भेटतोंच आहों आपण. " असें म्हणून तीं दोघेंही आईच्या खोलीबाहेर पडलीं.

१२

हिमालयाच्या प्रवासाचा मार्ग फारच अवघड असल्याचें कळल्यावरून तीर्थयात्रा करण्याच्या बाबतींत मावशीनें माघार घेतली. स्वतः दयामयीदेखील जायला फारशी उत्सुक नव्हती. तरीदेखील दक्षिणेश्वर, कालीघाट, वगैरेचें दर्शन घेऊन गंगास्नान करण्यांत कलकत्याला तिचे पांच सहा दिवस गेले.

काम करणारें माणूस सांपडलें, कीं त्याच्या माथीं कामाचा बोजा आपोआप येऊन पडतो. तसेंच झालें. घरची सारी व्यवस्था पहाण्याची जबाबदारी येऊन वंदनेच्या माथ्यावर पडली. सती कांहीं करीत नव्हती. प्रत्येक बाबतींत वंदनेकडे बोट दाखवीत होती आणि स्वतः हिंडत होती आपल्या सासूबरोबर. तरीदेखील कुठें बाहेर जायचें असलें म्हणजे तिला हांक मारून म्हणे, "चल ना वंदना आमच्याबरोबर - तूं बरोबर असलीस कीं कुणाला कांहीं विचारावं लागत नाहीं."

आजउद्यां म्हणतां म्हणतां विप्रदासचें गांवीं जाणें तसेंच राहिलें. आई म्हणत होती, कीं विपिन निघून गेला-तर आपल्याला गांवीं घेऊन जाईल कोण ?

त्या दिवशीं संध्याकाळीं ती व्हिक्टोरिया मेमोरियल पाहून आली त्यावेळीं विप्रदासला हांक मारून मोठ्या उल्हासानें सांगूं लागली, "विपिन, तूं कांहीं म्हण बाबा, शिकल्यासवरलेल्या मुलीचं लक्षणच कांहीं वेगळं."

विप्रदासला कळून चुकलें कीं हें कांहींतरी वंदनेच्या संबंधींच आहे. तो म्हणाला, "काय झालं आई ?"

"काय झालं ?" दयामयी म्हणाली, "आज एका भल्यामोठ्या लाल-तोंड्या सार्जेंटनं रस्त्यांत आमची गाडी अडवली. भाग्य म्हणायचं कीं ही बरोबर होती. ही इंग्रजींत त्याच्याबरोबर कांहींतरी किडबिडली आणि तेव्हांच त्यानं गाडी सोडून दिली ! नाहींतर काय झालं असतं सांग ना ? सहजासहजीं सुटका झाली नसती. ठाण्यापर्यंत ओढून नेलं असतं त्यानं. भयंकर कांहींतरी झालं असतं. तुझा हा नवा पंजाबी ड्रायव्हर अगदींच मेंग्या आहे."

"काय केलंत तुम्ही ?" विप्रदास हंसून म्हणाला, "धक्का लागला वाटतं ?"

तितक्यांत वंदना आली. मोठ्या उत्साहानें पुनः पुनः होकार देत दयामयी तिला म्हणाली, "तुझीच गोष्ट आतां विपिनला सांगत होतें मुली. शिकल्या सवरल्या मुलीचं लक्षणच कांहीं वेगळं. आज तूं बरोबर नसतीस तर मोठा कठीण प्रसंग होता. खरं पाहिलं तर सारा दोष होता त्या वेड्या मडमेचा. गाडी चालवतां येत नाहीं अन् निघाली गाडी घेऊन ! कळत नाहीं कांहीं पण बहादुरीच फार मोठी.

"शिकल्यासवरल्या बायकांचं लक्षणच वेगळं आई." विप्रदास हंसून म्हणाला, "ती मडमसुद्धां शिकली सवरलेलीच असणार ना ?"

आई आणि वन्दना दोघीही मोठमोठ्यानें हंसल्या. वंदना म्हणाली, "मुखर्जीमहाशय, तो दोष त्या मडमेचा—शिक्षणाचा नव्हे. मी आतां एकदां स्वैंपाकघरांतून पाहून येतें आई. काल द्विजूबाबूच्या चपात्या भटजीनीं अगदीं कडक केल्या. त्यांना त्या आवडल्या नाहींत." असें म्हणून ती निघून गेली.

वात्सल्यपूर्णतेनें क्षणभर तिच्याकडे पहात राहिल्यावर दयामयी विप्रदासला म्हणाली, "सगळीकडे सारखी नजर आहे पोरीची! नुसतं लिहिणंवाचणंच नाहीं विपिन, पोरीला कळत नाहीं असं काम नाहीं कुठलं. अन् बोलतेही तशीच मिठास. काम सांगावं अन् निश्चिन्त व्हावं. संसाराकडे एवढंसुद्धां पहायला नको मला."

विप्रदास म्हणाला, "म्लेंच्छ म्हणून शिसारी येत नाहीं ना तुला आई?"

"तुझं भलतंच कांहींतरी!" दयामयी म्हणाली, "कसली आली आहे म्लेंच्छ! तिची आई एकदां कुठं विलायतेला गेली होती म्हणून 'मेमसाहेब मेमसाहेब' म्हणत लोकांनीं बदनामी चालवली होती तिची. नाहींतर अगदीं आमच्यासारखी अस्सल बंगाल्याघरची लेक! आतां वंदना पायांत बूट घालते—काय बिघडलं त्यांत? परदेशांत सारेच घालतात पायांत बूट. परक्यांच्या अगदीं समोर येऊन रहाते—त्यांत तरी काय बिघडलं? मुंबईत कुणी कांहीं माथ्यावर एवढा लांब पदर घेत नाहींत—लहानपणापासून जी संवय आहे तसंच करतेय. जशी माझी ही सून तशीच ती! बापाबरोबर जायचंय म्हणते—ऐकलं तेव्हां मला कसंसंच वाटलं बाबा."

"कसंसंच वाटलं कां आई?" विप्रदास म्हणाला, "वंदना कांहीं इथं रहायला आली नव्हती. चारदोन दिवशीं केव्हांतरी तिला जायला हें हवंच."

"जाणार खरी," दयामयी म्हणाली, "पण जाऊं द्यावंसं वाटत नाहीं मनाला. असं वाटतं कीं कायमची इथंच ठेवून घ्यावी तिला."

क्षणभर थांबून विप्रदास म्हणाला, "पण खरोखरच तसं कांहीं व्हायचं नाहीं आई. परक्याच्या मुलीच्या लोभांत एवढं गुंतून पडणं बरं नव्हे. दोन दिवसांसाठीं आली आहे तेंच ठीक!" असें म्हणून विसराळूपणानें तो एकदम बाहेर निघून गेला.

त्याचें भाषण दयामयीला तितकेंसें पटलें नाहीं. पण तें तेवढ्या वेळापुरतेंच.

बलरामपूरला जायची गोष्ट कुणीच काढीत नव्हतें. उत्सवी वृत्तीनें एकेक दिवस निघून जात होता. हंसणें, गोष्टी करणें, इकडे तिकडे हिंडायफिरायला

जाणें सारखें सुरू होतें. सर्वांत मिसळून इतकी थट्टामस्करी करण्याइतका आपला दर्जा दयामयीनें खालीं आणलेला कधींच कुणी पाहिला नव्हता. तिच्या अंतःकरणांत कुठेंतरी कसली तरी एक आनंदाची उकळी सारखी सळसळत होती. वयाला आणि स्वभावाला अनुसरून असलेलें गांभीर्य, त्या उकळीच्या झोतामधून वहावत जात होतें. सतीबरोबर तिच्या ज्या कांहीं कानगोष्टी चालत त्या एकट्या सासूला माहीत कीं सुनेला माहीत—आणखी थोडासा अंदाज जर कुणाला आला असेल तर तो अन्नदेला.

पंजाबचे बॅरिस्टर इतके दिवस राहिले होते पण ते कालच आपल्या पत्नी-समवेत आपल्या गांवीं निघून गेले. त्या दोघांचेंही नांव होतें वसंत. (बंगालमध्यें 'वसंत' म्हणजे देवीचा रोग.) त्या नांवावर आधारून दयामयीनें तीं दोघें जातांना त्यांचें थोडेंसें कौतुक केलें आणि आपल्या कामगिरीवर जायच्यापूर्वी पुनः एकदां भेटून जायचें वचन त्या दोघांकडून घेतलें. पुनः यायचें तें कलकत्त्याला नव्हे—बलरामपूरला.

रायसाहेबांचा पाय आतां बरा होत आला होता. यत्या आठवड्यांत ते मुंबईला जाणार होते. स्वतः दयामयीनें दरबार भरवून वंदनेची रजा मंजूर करून घेतली.

मुंबईला जाण्याऐवजीं निदान एक महिना तरी तिनें आपल्या बहिणीच्या घरीं रहावें असें सर्वांनुमतें ठरवण्यांत आलें.

कलकत्त्याच्या हायकोर्टांत मुखर्जीचा कुठला ना कुठला तरी मुकद्दमा चाललेलाच असे. एका भारीच मोठ्या दाव्याची तारीख जवळ आली होती म्हणून गांवीं न जातां कोर्टांतलें काम उरकल्यावर सर्वांना स्वतःच बरोबर न्यायचें विप्रदासनें ठरवलें. कांहीं ना कांहीं तरी कामासाठीं त्याला सारा दिवसभर बाहेर रहावें लागे. आज होता रविवार. दयामयी येऊन हंसत हंसत म्हणाली, "एक गम्मत आहे. ऐकलंस का विपिन ?"

विप्रदास कोर्टाचे कागद चाळीत होता. खुर्चींवरून उठून उभा राहून तो म्हणाला, "कसली गम्मत आई ?"

दयामयी म्हणाली, "द्विजूच्या टोळक्याची आज कसली तरी एक सभा होती. तिथं दंगल होईल म्हणून पोलीसांनीं बंदी केली होती. अन् ही सभा भरवणार म्हणून यांनीं हट्ट धरला होता. लाठालाठी, डोकेफोडी कांहीं तरी होणार यांत शंकाच नव्हती. ऐकून मी घाबरलें—"

"गेला वाटतं तो !"

"नाहीं. तीच तर गंमत सांगायला आलेंय ना तुला ? तो कुणाचं ऐकेना. सूनबाईनं आग्रह केला तरीसुद्धां ऐकेना—शेवटीं ऐकावं लागलं वंदनेचं."

ही गोष्ट कितीही गमतीची असली तरी दयामयीच्या आणि त्याच्या दर्जावर झुंडी तरी आम्हाल होत होता. आश्चर्य वाटलें तसें तें मनांत ठेवून विप्रदास नुसता उद्गारला, "खरं कीं काय ?"

"तेंच तर सांगतेंय ना मी.—" दयामयी हंसत हंसत म्हणाली. "केव्हां तरी त्यांचं ठरलं होतं—कीं एका माणसानं इथं पायांत बूट घालायचे नाहींत—थली रीतभात मोडायची नाहीं. आणि त्याच्या बदल्यांत दुसऱ्यानं सांगितलेलं पहिल्यानं ऐकायचं. वंदना नुसती त्याच्या खोलींत गेली आणि म्हणाली, 'काय ठरलं होतं तें आठवतं ना द्विजूभाबू ? कांहीं झालं तरी आज जायचं नाहीं !' द्विजून मुकाट्यानं कबूल करीत म्हटलं, 'ठीक. जात नाहीं. आतां झालं ना ?' ऐकलं तेव्हां माझा जीव खालीं पडला विपिन. कुठं जाईल, काय करील, कोणती आपत्ती ओढवून आणील !—घरधनी आतां हयात नाहींत – कसे भिऊन भिऊन दिवस कंठतेंय मी, तें कांहीं सांगतां यायचं नाहीं."

विप्रदास कांहींच बोलला नाहीं. आई तशीच बोलत होती, "—पूर्वी शाळाकॉलेजांत जायचं, अभ्यास करायचा, परीक्षा पास व्हायचं, आतां तें सारं संपलंय. आतां रिकामा वेळ मिळालाय, तेव्हां हा भलतीं संकटं केव्हां कशीं ओढवून घेईल तें सांगतां यायचं नाही. मला वाटे, शेवटीं एवढ्या मोठ्या कुळाला कलंक लावला नाहीं कीं मिळवली !"

"नाहीं आई," विप्रदास नकारार्थी मान हालवीत म्हणाला, "ती भीति नको—कलंक लागेल अशी कोणतीही गोष्ट द्विजू करायचा नाहीं."

"समज," आई म्हणाली, "तसं कांहीं केलं—समज, तुरुंगांत जावं लागलं—ती भीतिच नाहीं का वाटत तुला ?"

"ती भीति आहे खरी," विप्रदास म्हणाला, "पण तो जो कलंक असायचा तो त्या माणसाचा नव्हे आई. कलंक असतो तो त्या कार्याचा. कलंक लागेल असं कोणतंही काम तो केव्हांही करायचा नाहीं. समज, मला कधीं तुरुंगांत जावं लागलं—तसं होणं शक्य आहे—तर तूं काय माझ्यासाठीं मान खालीं घालणार आई ? असं का म्हणणार आहेस, कीं विपिननं आमच्या कुळाला कलंक लावला ?"

त्याचे उद्गार दयामयीच्या अंतःकरणाला भाल्यासारखे वेधून गेले. तिला वाटलें, असें म्हणण्यांत कांहीं अर्थ तर नसेल ? कडेखांद्यावर घेऊन या मुलाला आपण वाढवलें, सत्यासाठीं—धर्मासाठीं विप्रदास करणार नाहीं अशी कोणतीही गोष्ट नाहीं हें तिला चांगलें माहीत होतें. अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीं यशापयशाची किंवा संकटाची त्यानें पर्वा केली नसती. तो अठरा वर्षांचा होता त्यावेळीं एका मुसलमान कुटुंबाची बाजू घेऊन त्यानें एकट्यानेंच केवढा तरी मोठा प्रसंग आणला होता. त्या प्रसंगांतून तो जिवानीशीं कसा सुटला तें दयामयीला हा वेळपर्यंत सुद्धां कळून आलें नव्हतें. त्या दिवसाची आगगाडीची हकीकत वंदनेच्या तोंडून ऐकल्यावेळीं ती नुसती थक्क होऊन गेली होती. द्विजूच्या बाबतींत ती अस्वस्थ असे खरी; पण त्याहीपेक्षां अंतरांत तिला जास्त भीति वाटत असे ती या मोठ्या मुलाची. मनांतल्यामनांत ती याच गोष्टीचा विचार करीत होती.

विप्रदास म्हणाला, " काय आई ? कलंकाची काळजी आतां गेली ना ? तुरुंग काय, एके दिवशीं माझ्यासुद्धां नशिबीं येईल ! "

" इडापीडा टळो ! " दयामयी घाबरीघुबरी होऊन म्हणाली, " नाहीं रे बाबा, असलं कांहीं अभद्र बोलूं नकोस. तुला तुरुंगांत कशी जाऊं देईन मी जिवंत असतांना ? इतके दिवस देवदेवतांना हांक मारली ती उगीच का ? एवढी ही दौलत आहे तिचा मग उपयोग काय ? त्यापूर्वी आहे नाहीं तें सारं खर्चीं घालीन पण तसं होऊं द्यायची नाहीं. "

खालीं वांकून विप्रदासनें तिच्या पायाला हात लावून नमस्कार केला. एकदम त्याला जवळ घेऊन दयामयी म्हणाली, " द्विजूचं काय व्हायचं असेल तें होईल, पण तूं दृष्टिआड झालास तर मी गंगेंत उडी घेऊन जीव देईन विपिन ! असलं कांहीं सहन व्हायचं नाहीं मला हें पक्कं ध्यानांत ठेव ! " बोलतां बोलतां तिच्या डोळ्यांतून टपाटप आसवें गळूं लागलीं.

" यावेळीं आई हें—" असें तो म्हणत होता तोंच वंदना आंत आली. दयामयीनें त्याला दूर सारलें आणि आपले डोळे पुसले. वंदनेच्या आश्चर्य-चकित चेहऱ्याकडे पहात ती हंसत हंसत म्हणाली, " फार दिवस पोराला कधीं जवळ घेतलं नव्हतं—आज वाटलं जवळ घ्यावंसं. "

" बुद्धा पोर ! " वंदना म्हणाली, " आतां मी सांगतें सर्वांना. "

" सांगायचं तर सांग—" दयामयी तिला थांबवून म्हणाली, " पण त्याला

बुद्धा म्हणूं नकोस तूं ! असं वाटतं, अगदीं पर्वीचीच गोष्ट, लग्नाची वरात आली. सून उंबरठ्याआंत येऊन उभी राहिली माझी आतेसासू त्यावेळीं हयात होती — तिनं विपिनला माझ्या ओटींत घालून सांगितलं, ' हा घे तुझा मोठा मुलगा सुनबाई. या लग्नाच्या भानगडींत त्याला कांहीं भरवतां आलं नाहीं. आधीं त्याला कांहीं तरी खायला घालून थोपटून झोंपवला कीं बाकीचीं कामं. ' ती माझी कसोटी पहात होती—कसोटीला उतरलें कीं नाहीं कोण जाणे ! " असें म्हणून ती पुनः हंसली.

" मग काय केलं तुम्हीं आई ? " वंदनेनें विचारलें.

दयामयी म्हणाली, " बुरख्यांतून आंत डोकावून पाहिलं—एवढीशी एक चालती बोलती सोन्याची बाहुली. मोठाले डोळे टवकारून माझ्याकडे पहात होती. एकदम उराशीं कवटाळून धांवत सुटलें. लग्नांतले बरेचसे आचार अजून व्हायचे होते. सर्वांनीं थांब थांब म्हटलं पण कांहीं ऐकलं नाहीं. कुठं कोणती खोली, कुठं तिचं दार, कांहींच माहीत नव्हतं. मागोमाग जी दासी धांवत आली तिनं खोली दाखवून दिली. तिलाच मी म्हटलं, ' आण ग बाई माझ्या बाळाची दुधाची वाटी. दुध भरवल्याशिवाय आतां मी कांहीं थांबायची नाहीं. ' शेजारणी पाजारणी गोळा झाल्या होत्या त्यांनीं कुणी मला बावळी म्हटलं, तर कुणी आणखी कांहीं म्हटलं. मी कांहीं तें हिशेबांत घेतलं नाहीं. म्हटलं, म्हणेनात का ? जें हें रत्न ओटींत पडलं तें तर आतां कुणी काढून घेत नाहीं. अन् त्या माझ्या बाळाला म्हणतेस बुद्धा ? "

तीस वर्षांपूर्वीची ती हकीकत आठवतांना हंसण्यांत आसवें मिसळत होतीं. तिच्या मुद्रेवर विलक्षण उल्हास आलेला पाहून वंदनेला देखील आनंदाचें भरतें आलें. अकृत्रिम वात्सल्याचें एवढें सुंदर चित्र पहायचें भाग्य तिला यापूर्वी केव्हां लाभलें नव्हतें. थक्क नजरेनें क्षणभर तिच्याकडे पहात असतांना तिनें स्वतःचें मन सांवरून घेतलें आणि म्हटलें, " आपले हे जे दोन मुलगे आहेत आई, त्यांतल्या कुणावर जास्त माया आहे तें खरं खरं सांगा. "

दयामयी हांसली आणि म्हणाली, " अशक्य गोष्ट खरी असली तरी सांगूं नये मुली. शास्त्राचा निषेध आहे. "

किती झालें तरी वंदना परकी—नुकताच कुठें परिचय झालेला. तिच्या समोर या पूर्वीच्या हकिकतीची उजळणी झाल्यामुळें विप्रदास अस्वस्थ झाला. तो म्हणाला, " सांगितलं तरी तुला पटायचं नाहीं वंदना. तुझ्या कॉलेजांतल्या

इंग्रजी पुस्तकांत हें असलं कांहीं सापडायचं नाहीं. आईच्या गोष्टी त्या पुस्तकांशीं पडताळून पाहूं लागलीस तर तुला अद्‌भुत वाटतील. आतां ती चर्चाच नको."

त्याचे ते उद्गार वंदनेला आवडले नाहींत. ती म्हणाली, "इंग्रजी पुस्तकं आपणसुद्धां कांहीं कमी वाचलीं नाहींत मुखर्जीमहाशय! मग हें आपल्याला कसं कळतं?"

"कोण म्हणतोय आईला आम्हीं ओळखलंय म्हणून?" विप्रदास म्हणाला, "नाहीं बरं वंदना. हें सारं कांहीं तत्त्वज्ञान केवळ आमच्या या आईच्या पोथींत लिहिलेलं आहे — त्या पोथीची भाषाच वेगळी, अक्षर वेगळं, व्याकरणही वेगळं. तें केवळ तिचं तिलाच कळतं – दुसऱ्या कुणाला नाहीं!—बरं आई, जें सांगायचं होतं तें तसंच राहिलं."

ही सूचना आपल्यासाठीं आहे हें वंदनेला कळलें. ती म्हणाली, "आतांच्या सैंपाकाबद्दल विचारायला आलें होतें मी. मी जातें. पण जरा लौकरच या. सारं कांहीं विसरून मुलाला कवटाळून घेऊन बसूं नका बरं!" असें म्हणून विप्रदासकडे एक कटाक्ष फेंकून ती निघून गेली.

ती निघून गेल्यावर दयामयीच्या चेहऱ्यावर काळजीची छाया उत्पन्न झाल्याचं दिसून आलें. क्षणभर मागें पुढें करीत ती चांचरत चांचरत म्हणाली, "तूं तर मोठा धार्मिक आहेस विपिन. माहेत आहेना तुला, कीं आईला कधीं फसवूं नये."

"हें काय बोलतेस आई?" विप्रदास म्हणाला, "आतां ही प्रस्तावना नको आहे. काय विचाराचं आहे तें विचारून टाक."

दयामयी म्हणाली, "ही तुरुंगांत जायची गोष्ट आज एकाएकीं तुला कां आठवली? कां असं बोललास? हिमालयावर जायचं सध्यां रद्द केलंय खरं पण आतां तर बाबा एक पाऊलसुद्धां पुढं टाकायचा मला धीर व्हायचा नाहीं."

विप्रदास हंसत सुटला. तो म्हणाला, "हिमालयावर तुला पाठवायची सध्यां मला कांहीं घाई नाहीं. तसला कांहीं आळ उगीच माझ्यावर घेऊं नकोस. मी नुसता तो दृष्टांत दिला. द्विजूच्या बाबतींत तुला समजावून द्यायचं होतं. माझं म्हणणं एवढंच होतं, कीं तुरुंगांत गेलं म्हणजे कांहीं कुळाला कलंक लागत नाहीं."

"अशानं मी फसायची नाहीं विपिन." दयामयी म्हणाली, "उगीच

कांहींतरी आडवंतिडवं बोलायची तुला संवय नाहीं. मला वाटतं कांहींतरी केलं आहेस—किंवा कांहींतरी करायचा तुझा मतलब आहे. मला अगदीं खरं खरं सांग. ”

विप्रदास म्हणाला, “ अगदीं खरं खरं सांगतों, मी कांहींसुद्धां केलं नाहीं. माणसाच्या मनांत केव्हां कशा कल्पना येतात तें कधीं निश्चयानं सांगतां येतं का आई ? ”

“ नाहीं—तेंहीं नव्हे ! ” दयामयी पूर्वीप्रमाणेंच निश्चयपूर्वक म्हणाली, “ कांहींतरी आहे—नाहींतर तुझ्याकडे पाहिलं, कीं आजकाल माझं मन असं कां कासावीस हातं ? तुला लहानाचा मोठा मी केला अन् आतां मी हयात असतांना शेवटीं एवढी मोठी भानगड करणार आहेस का बाबा ? ” बोलतां बोलतां तिचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले.

विप्रदास ओशाळून म्हणाला, “ अमंगळ कल्पना केली तर तुला जर उगीच भय वाटतं आई, तर मी तरी त्याचं निराकरण कसं करणार ? तुला माहीत आहे ना, कीं तुझ्या परवानगीशिवाय मी आजवर कोणतंच काम केलं नाहीं ? ”

“ केलं नाहींस खरं. ” दयामयी म्हणाली, “ मग काल द्विजूला कां बोलावून आणलंस ? सारा कारभार पहायचं समजावून घ्यायला त्याला कां सांगितलंस ? ”

“ आतां एवढा मोठा झाला तो—अजून त्यानं मदत करायची नाहीं का मला ? ”

“ त्याची तारीफ ती काय ? ” दयामयी रागारागानें म्हणाली, “ मला फसवायचा प्रयत्न करूं नकोस विपिन. त्याची मदत घ्यावी लागण्याइतका का तूं आज थकला आहेस ? काय तुझ्या मनांत आलंय तें मला उघड उघड सांग. ”

विप्रदास उगीच राहिला. पुढल्या साऱ्या व्यवहाराबद्दल आतांच द्विजदास-बरोबर त्याचें भाषण झालें होतें. त्यानें तिच्याजवळ त्याचा उल्लेख केला नाहीं.

पण या प्रकाराबद्दल दयामयीला कांहींतरी किंतु वाटला होता असें तिच्या पुढील भाषणावरून वाटलें. ती म्हणाली, “ हा आमचा सारा पुण्याचा संसार, धर्माचा परिवार, इथं अनाचार होणं योग्य नाहीं. सारे कडकडित नियम आहेत इथले. तुझं लग्न मी करून दिलं तुझ्या सतराव्या वर्षी, तें कांहीं तुला

विचारून नव्हे. मला वाटलं म्हणून मी केलं. पण आतां द्विजू म्हणतो, कीं लग्न करायचं नाहीं. आतां तो एम्. ए. झालाय. बरं वाईट कळायची शक्ति आलीय त्याला. आतां त्याच्यावर सक्ति करणं शक्य :नाहीं. तो संसारांत पडला नाहीं तर त्याच्याबद्दल मला खात्री वाटायची नाहीं. संसारांत पडल्याशिवाय त्यानं माझ्यासारख्याच्या दौलतीला हात लावायला न यावं हेंच बरं."

विप्रदासनें विचारलें, "लग्न करणार नाहीं असं द्विजू केव्हां म्हणाला !"

"रोजच म्हणतोय की ! तो म्हणतो, ज्याला लग्न करायचं आहे त्यानं खुशाल करावं. तो करणार आहे नुसतं देशकार्य. तुला वाटत असेल कीं हा वेळपर्यंत मी रात्रंदिवस धडपड करतेंय — चांगली सुखानं आहें — पण सुख वाटत नाहीं बरं मला. त्यावर आतां तूं दिलास हा तुरुंगाचा दृष्टांत — माझी समजूत घालायला तुला याशिवाय दुसरा दृष्टांतच जसा कांहीं मिळाला नाहीं ! एके दिवशीं पटेल खूण तुला विपिन."

विप्रदास म्हणाला, "त्याच्या वहिनीकडून एकदां त्याला सांगून पहा ना आई."

"तिचंही ऐकन नाहीं तो या बाबतींत" —

ऐकेल आई, ऐकेल. वेळ आली कीं ऐकेल !" थोडेंसें हंसून तो म्हणाला, "अन् तूं सांगत असलीस तर मी वधू शोधायच्या उद्योगाला लागतों."

तितक्यांत वंदना आंत आली आणि रुसल्यासारखें करून म्हणाली, "हें काय ? आलांच नाहीं ! मी किती वेळ वाट पहात बयलेंय आई."

"चल मुली, आलें."

विप्रदास म्हणाला, "आपल्या अक्षयबाबूची ती मुलगी आठवते ना तुला ? आतां चांगली मोठी झाली आहे. रूपानं अन् गुणानं मोठी छान आहे मुलगी. आपल्या वळणांतली आहे. म्हणत असलीस तर पाहून येतों — बोलणंही काढतों. माझी खात्री आहे कीं द्विजूला तें स्थळ नापसंत व्हायचं नाहीं."

"नाहीं नाहीं, तें सध्या राहूं दे." दयामयी म्हणाली आणि एक मिनिटभर वंदनेच्या चेहऱ्याकडे पाहून घेऊन पुढें म्हणाली, "सतीची इच्छा अशी आहे — नाहीं नाहीं विपिन, सुनबाईला विचारल्याशिवाय या कसल्या भानगडींत पडूं नकोस."

वंदनेनें मघेंच तोंड घातलें. अर्दी शांत मुद्रेनें दोघांकडेही एकदां नजर

फेंकून ती म्हणाली, "त्यांत काय बिघडलं आई ? कलकत्त्यांत आहोंच आपण, ताईला घेऊन एकदां आपण पाहून येऊं."

तिचे उद्‌गार ऐकून दयामयी अस्वस्थ झाली. काय उत्तर द्यावें तें तिला सुचेना.

विप्रदास म्हणाला, "हा प्रस्ताव उत्तम आहे. अक्षयबाबू म्हणजे मोठे धर्मनिष्ट पंडित आहेत. संस्कृतचे अध्यापक आहेत. मुलीला शाळाकॉलेजांत घातली नाहीं तरीही त्यांनीं तिला खूप खूप शिक्षण दिलं आहे. एके दिवशीं त्यांच्या तिकडे गेलों होतों त्यावेळीं त्या मुलीबरोबर बराचसा बोललों, बरेचसे प्रश्न केले तिला—मला वाटलं, बापानं हौसेनं मुलीचं जें 'मैत्रेयी' नांव ठेवलं आहे तें अगदीं सार्थ आहे. जा ना आई, एकदां तिला पाहून ये. आपल्यापेक्षां या जगांत सुंदर बायका दुसऱ्या कुणी आहेत हें तुझ्या मोठ्या सुनेला एकदां कळूं दे."

आईला हंसावेंसें वाटलें पण हंसूं आलें नाहीं—जिभेवर शब्दही आला नाहीं. वंदनेनें पुनः गळ घातली, "चला ना आई, आपण जाऊन एकदां मैत्रेयीला पाहून येऊं. घर तसं फारसं लांब तर नाहीं!" वंदनेच्या मुद्रेवरची लावण्याची छटा कसल्या तरी छायेखालीं झांकली गेली आहे असें तिच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर दयामयीला वाटलें.

काय उत्तर द्यायचें तें दयामयीला आतां कुठें सुचलें. ती म्हणाली, "नाहीं मुली, फार दूर नाहीं तें मला माहीत आहे. पण सध्यां मला सवड नाहीं. चल आपण जाऊं. आधीं सैपाकाचं काय झालंय तें पाहूं." असें म्हणून तिचा हात धरून ती तिला घेऊन स्वैंपाकघराकडे गेली.

१३

संध्यापूजा आटोपून विप्रदास नुकताच आपल्या लायब्ररींत येऊन बसला होता. सकाळच्या टपालानें आलेलीं पत्रें पहायला तो हातीं घेत होता तोंच त्याची आई तिथें आली आणि म्हणाली, "काय रे विपिन ? बरंच अवास्तव बोलूं लागलास ?"

खुर्चीवरून उठून उभा राहून विप्रदास म्हणाला, "काय आई ?"

"अक्षयबाबूंच्या मैत्रेयीला पाहून आलों आम्हीं."

" वाईट आहे का मुलगी ? "

जरा काचरत काचरत दयामयी म्हणाली, " नाहीं—वाईट असं कांहीं मी म्हणत नाहीं.—तशी चार चौघींत असली मुलगी क्वचितच दिसून येते हेंही खरं—पण म्हणून काय तिची आमच्या सूनबाईंबरोबर तुलना होईल ? सूनबाई तर राहूंदेच पण या वंदनेच्या देखील ती सरीला यायची नाहीं. "

" तर मग तुम्हीं खास कुठली तरी दुसरीच मुलगी पाहून आलांत ! " विप्रदास आश्चर्यचकीत होऊन म्हणाला, " ती मैत्रेयी नव्हे. "

" पाहिली ती तीच ! " दयामयी हंसून म्हणाली, " तिचीं आमचीं किती तरी बोलीभाषणं झालीं. सुनबाईंची तिनं कितीतरी उठबस केली—त्यानंतर पोथीग्रंथांच्या बाबतींत वंदनेबरोबर ती किती किती बोलली--आणि तूं म्हणतोस आम्हीं दुसरीच कुणी पाहून आलों म्हणून ! "

विप्रदास म्हणाला, " वंदनेच्या साऱ्याच प्रश्नांचीं उत्तरं कदाचित तिला देतां आलीं नसतील. वंदना शाळा कॉलेजांत जाते, पुष्कळ पुस्तकं वाचलींयत तिनं, परीक्षा दिल्या आहेत—नि ती घरीं बसल्या बसल्या बापाकडे शिकली आहे. हा मी आणि तुझा धाकटा मुलगा - तशीच आहे ही तफावत. "

त्याचे उद्गार ऐकून दोन्ही डोळे कौतुकानें नाचवीत दयामयी म्हणाली, " पुरे झालं विपिन, पुरे झालं ! पलीकडल्या खोलींत द्विजू बसलाय, त्यानं ऐकलं तर शरमेनें पळून जाईल घरांतून. कॉलेजांत जाऊन परीक्षा दिल्या म्हणजे स्वर्ग हाताशीं आला असं म्हणण्याइतकी तुझी आई कांहीं मूर्ख नाहीं. तसं नव्हे रे ! तसं पाहीलं तर तिनं थोडक्यांतला थोडक्यांत गोड गोड शब्दांत वंदनेच्या साऱ्या प्रश्नांचीं उत्तरं दिलीं. गाडींतून परत येतांना वंदना तिची तोंड फाटेपर्यंत स्तुति करीत होती. पण मी म्हणतें, आम्हां गृहस्थांच्या घरांत एवढ्या विद्वत्तेची काय आहे जरुरी ? अशी माझी एक सून आहे अशीच दुसरी असली कीं झालं. नाहींतर विद्वत्तेच्या दिमाखानं वडिलांना लाथाडावयाची एकादी ? तें नकोय मला. "

उत्तर देतांना आईच्या भाषणाची कांहींतरी उलटापालट होते आहे हें हेरुन, हासनें ताडलें. तो हंसून म्हणाला, " ती भीति नको आई. अपुरी विद्वत्ता जवळ बसते त्याचाच दिमाख असतो मोठा. बापाकडे जर खरोखरच ती कांहीं पदर पुढे असेल तर तिच्या वागणुकींत मुळींच दोष सांपडायचा नाहीं, हें विप्रदास म्हणे. "

त्याचें म्हणणें दयामयीला नाकबूल करतां आलें नाहीं. ती म्हणाली, " हें तुझं म्हणजं बरोबर आहे पण तें आधींच कसं कळावं सांग ना ? शिवाय असं पहा, विद्या किती झाली आहे याची चर्चा कुणी आमच्या खेड्यांत करीत नाहीं. पण उद्यां कुणी नवी सून पहायला आली तर त्यांनीं नाक खळवटावं नि म्हणावं, का आसल्या सुनेच्या शेजारीं असली ही आणून उभी केली, त्या या म्हातारीला डोळे होते कीं नव्हते--असं मात्र कुणी म्हणूं नये. तें मात्र मला सहन व्हायचं नाहीं विपिन. "

एक क्षणभर थांबून विप्रदास म्हणाला, " पण अक्षयबाबूंना कांहींतरी उत्तर दिलं पाहिजे ना आई ? आईचं दुमत व्हायचं नाहीं, असं परवांच त्यांना मी सांगून चुकलों. "

तें ऐकून दयामयी अस्वस्थ झाली आणि म्हणाली, " हें असं कांहीं बोलला नसतास तर बरं झालं असतं विपिन. आतां झालं तें झालं. सूनबाईंचं म्हणणं काय आहे तें आधीं ऐकून घेतें नि मग त्यांना काय सांगायचं तें तुला सांगतें. "

" अक्षयबाबू कांहीं आम्हांला अगदींच परके नाहींत. " विप्रदास म्हणाला, " आजवर प्रत्यक्ष परिचय झाला नव्हता म्हणून कांहीं कळलं नव्हतं आपल्याला. तो आपलेपणा आहे म्हणूनच कांहीं मी म्हणत नाहीं—पण एका मुलाचं लग्न करून दिलंस तें स्वतःच्या मर्जीप्रमाणं—दुसऱ्या कुणाला विचारायला गेली नव्हतीस तेव्हां—अन् याच वेळीं आतां कुणाकुणाचीं मतं घ्यायचीं कां जरूरी वाटतेय तुला ? "

युक्तिवादाच्या दृष्टीनें हार घ्यावी लागल्यामुळें ती हंसून म्हणाली, " पण आतां म्हातारी झालेंच बाबा. आतां अशी किती दिवस जगणार आहें सांग ना ? पण उभें आयुष्य जिच्याजवळ काढावं लागणार आहे, तिचं मत घेतल्याशिवाय कशी कुणा मुलीला लग्न लावून घरांत आणूं ! तें कांहीं नाहीं. विचार करायला दोन दिवस सवड हवीय आम्हांला. " असें म्हणून ती बाहेर निघून गेली.

बाहेर आल्यानंतर स्वतःच्या खोलीकडे न जातां दयामयी व्याह्यांच्या खोलीकडे वळली. या थोड्या दिवसांच्या परिचयामुळें वंदनेच्या बापाशी बोलायचा संकोच आतां दूर होत चालला होता. रोज ती स्वतःच येऊन खबर घेत असे. संध्याकाळ होत आली होती. एकदां पुजेला बसल्या

येतां येणार नाहीं म्हणूनच ती त्यांच्या खोलींत आली आणि म्हणाली, "कशी काय आहे प्रकृति ?"

तिचें बोलणें तिथल्या तिथेंच राहिलें. जवळच बसलेल्या एका देखण्या तरुणाबरोबर वंदना अगदीं मोकळेपणानें हळुहळु बोलत होती. नखशिखान्त साहेबी थाटानें सजलेल्या या अपरिचित माणसासमोर एकाएकीं येऊन उभे राहिल्यामुळें, दयामयी तशीच मागल्या पावलीं निघून जाऊं पहाते आहे असें पाहून रायसाहेब मोठ्यानें म्हणाले, "कुठं पळतांहां विहीणबाई ? हा तर आमचा सुधीर. याच्यासमोर लाजायला नको कांहीं. जसे विप्रदास द्विजदास तसाच हा एक आपला मुलगाच. मी आजारी पडलों आहें असं कळल्यामुळं मद्रासहून भेटायला आला आहे. सुधीर, ही वंदनेच्या ताईची सासू—विप्रदासची आई—नमस्कार कर तिला."

बंगाली पद्धतीनें नमस्कार करायची सुधीरला संवय नसावी. त्या तसल्या पोषाखांत तसला नमस्कार करणेंही कठीण होतें. जवळ येऊन मान वांकवून त्यानें कसाबसा नमस्कार केला.

दयामयीशीं मुलगा म्हणून या मुलाचें नातें आपण एकदम कां जोडलें याचें स्पष्टीकरण करण्यासाठीं रावसाहेब म्हणाले, "याचा बाप आणि मीं विलायतेला होतों. एका जागींच अभ्यास करीत होतों. तेव्हांपासून आमची दोस्ती जमली. सुधीरसुद्धां विलायतेला गेला होता. तिथल्या बऱ्याचशा परीक्षा देऊन आलाय तो. आतां मद्रासच्या शिक्षण खात्यांत चांगलीच नोकरी मिळालीय त्याला. लग्न झालं कीं वंदनेला बरोबर घेऊन त्यानें विलायतेला जायचं असं ठरलंय. वाटलं तर वंदना तिथं, कालेजांत जाईल. नाहींतर नुसता तिकडचा फेरफटका करून दोघंही परत येतील. असं पहा सुधीर, तुम्ही जर ऑगस्ट सप्टेंबरांत जायचं ठरवीत असाल तर तीन एक महिन्यांची रजा घेऊन मी सुद्धां तुमच्याबरोबर एकदां चक्कर मारून येईन. काय म्हणतेयस ग म्हातारे, ठीक होईल नाहीं ?"

बसल्या जागेवरूनच वंदना म्हणाली, "होय तर काय बाबा ! तुम्हीं बरोबर असलां तर तेवढंच बरं."

हंडी, मोठ्या उत्साहानें रायसाहेब म्हणाले, "तसं झालं तर आणखीही एक अशी जवळ बसलेईल, कीं लग्न झाल्यावरसुद्धां तुम्हां लोकांना एक महिन्याभऱ्याची सवड पदर पुंढ उगीच घिसाडघाई करावी लागणार नाहीं. आतां आलं ना तुझ्या विप्रदास म्हं

उभयतांनीं होकारार्थी मान हलवून संमती दिली. हा तरुण म्हणजे रायसाहेबांचा भावी जामात, हें आतां दयामयीला कळून चुकलें. म्हणूनच त्याला त्यानीं मुलाच्या जागीं बसवला होता तो !

तिच्या अंतःकरणाची एकाएकीं कालवाकालव झाली. किती झालें तरी ती विप्रदासची आई होती. बलरामपूरच्या प्रख्यात मुखर्जी घराण्याची गृहिणी होती. तेव्हांच मन सांवरून घेऊन तिनें त्या तरुणाला विचारलें, "सुधीर, तुझं घर कोणत्या गांवीं बाबा ?"

"सध्यां मुंबईला —" सुधीर म्हणाला, "पण पूर्वीचे आम्हीं दुर्गापुरचे, असं बाबा म्हणत असत. पण मला वाटतं आतां आमचं म्हणायला तिथं कुणीच नाहीं."

"कुठलं दुर्गापूर ? बरद्वान जिल्ह्यांतलं !"

"हो," सुधीर म्हणाला, "बाबाच सांगत असत. कालनाच्या शेजारचं हें एक छोटसं गांव आहे. आतां म्हणे मलेरियानं त्या गांवाचा समूळ विध्वंस केला आहे."

क्षणभर उगीच राहून दयामयीनें विचारलें, "नांव काय तुझ्या बाबांचं ?"

सुधीर म्हणाला, "माझ्या बाबांचं नांव रायचंद्र बोस."

दयामयी दचकली आणि म्हणाली, "तुझ्या आजोबाचं नांव काय हरिहर बोस ?"

तिचा प्रश्न ऐकून रायसाहेबदेखील आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, "या लोकांना ओळखतां का आपण ?"

"हो, ओळखतें. दुर्गापूरलाच माझे मामा रहात होते. आजीजवळच मी लहानाची मोठी झालें कीं नाहीं, तेव्हां त्या गांवच्या सर्वांचीच औळख आहे. आमच्याच गावांत घर होतं त्यांचं.—पण आतां मला बोलायला वेळ नाहीं. पूजेची वेळ होऊन गेली आहे. पण सुधीर, कांहींतरी खाल्ल्याशिवाय जाऊं नकोस बाबा. मी जाऊन सारी व्यवस्था करतें."

सुधीर हंसत हंसत म्हणाला, "आतां तो प्रश्नच नाहीं. विप्रदासबाबूनीं तें सारं कांहीं आधींच उरकून टाकलं आहे."

"असं का ? तर मग मी आतां जातें." असें म्हणून दयामयी बाहेर गेली. वंदनेकडे तिनें नुसतें पाहिलें नाहीं कीं तिच्याबरोबर ती एक चोलली नाहीं.

दुसरे दिवशीं सकाळीं संध्यापूजा आटोपून नित्याच्या संवयीप्रमाणें विप्रदास ज्यावेळीं आईला नमस्कार करण्यासाठीं गेला त्यावेळीं आंत पाऊल टाकतांच तो अगदीं आश्चर्यचकित झाला. सामानाची बांधाबांध सुरू झाली होती.

"हें काय आई ? जायला निघाली आहेस कीं काय कुठं ?"

दयामयी म्हणाली, "तूं कुठं जवळपास नव्हतास—तेव्हां दत्तमहाशयांना विचारलं. ते म्हणाले, 'साडे नऊच्या गाडीनं गेलं तर काळोख पडायच्यापूर्वी घरीं जाऊन पोहोंचूं.' तुझी कोर्टाची तारीख आहे परवां, तेव्हां तुला कांहीं बरोबर येतां यायचं नाहीं. द्विजूला सांग आम्हांला पोंचवायला."

तिचे डोळे लाल झाले होते, चेहराही उतरला होता, असें विप्रदासला दिसून आलें. सारी रात्रभर तिच्या मनांत कसलें तरी वादळ उठून गेलें असावें असें त्याला वाटलें.

विप्रदासनें भीतभीत विचारलें, "एकदम कांहीं काम निघालं का आई ?"

ती म्हणाली, "दोन दिवसांसाठीं आलें—सहज आठ दहा दिवस निघून गेले. तिकडे देवाधर्माचं काय झालंय कोण जाणे ! पांच सहा गाई व्यायला झाल्या आहेत—येतांना पाहून आलें होतें—पण अजून त्यांचं कांहीं कळलं नाहीं. वासूची शाळा बुडते आहे. आतां कांहीं इथं राहायची सवड नाहीं विपिन."

दयामयीच्या दृष्टीनें या सर्व भानगडी कांहीं क्षुल्लक नव्हत्या खऱ्या, पण खरें कारण सांगायचें ती टाळते आहे असें पाहून विप्रदास म्हणाला, "आजच्च गेलं नाहीं तर नाहीं का चालायचं आई ?

"नाहीं बाबा, तूं आतां नको म्हणूं नकोस. द्विजूला सांग माझ्याबरोबर यायला. नाहींतर दुसरा कुणी तरी दे माझ्याबरोबर."

"ठीक आहे !" असें म्हणून विप्रदास तिच्या पायाला हात लावून नमस्कार करून बाहेर गेला.

स्वतःच्या खोलींत येऊन पहातो तों सती मोठ्या गडबडींत होती. फराळाची हंडी, फळेंमुळें, मुलाच्या दुधाचा तांब्या वगैरे करंडींत ठेवीत अन्नदा तिच्याजवळ बसली होती.

पदर पुढें माथ्यावर ओढून सती उठून उभी राहिली.

विप्रदास म्हणाला, "अन्नदा आक्का, हा काय प्रकार आहे माहीत आहे ?"

" नाहीं दादा, कांहीं माहीत नाहीं मला. सकाळींच आईनीं मला बोलावलं नि गाडींत सुनामुलांच्या फराळाची तजवीज करून ठेवायला सांगितलं. नवाच्या गाडीनं जायचं म्हणाल्या. "

सतीला विचारलें त्यावेळीं तिनेंही नुसत्या मानेनें खूण करून आपल्याला कांहीं माहीत नसल्याचें जाणवलें. विप्रदास स्तब्ध होऊन राहिला. अन्नदेला कदाचित नसेल माहीत पण सासूची बात या सुनेला माहीत नाहीं याहून दुसरें आश्चर्य कोणतें ? कांहीं वेळ वाट पाहून तो तसाच खालीं निघून गेला. हा एकंदर प्रकार आईच्या नित्याच्या स्वभावाविरुद्ध होता असें त्याला वाटल्यामुळें तो उद्विग्न झाला. कुणालाही कळूं देऊं नये असें कोणतें संकट आलें आणि त्यामुळें ती अशी विलक्षणपणें वागते आहे, याचा त्याला अंदाज येईना.

जाण्याच्या तयारीनें ज्यावेळीं दयामयी खालीं आली त्यावेळीं गाडीला पुष्कळच अवधी होता. पण तिला अगदीं घाई झाली होती. केव्हां एकदां घराबाहेर पडेन असें तिला झालें होतें. समोर एक मोटार उभी होती. दुसऱ्या मोटरींत सामान भरून नोकर तयार राहिला होता. हातीं बॅग घेऊन विप्रदास येतो आहे असें पहातांच दयामयीनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, " द्विज कुठं आहे ? "

" तो येत नाहीं आई. " द्विजदास म्हणाला, " मीच तुला पोंचवून येईन. "

" कां ? यायला खूषी नाहीं वाटतं तो ? "

विप्रदास नम्रपणें म्हणाला, " त्याच्यावर असा आरोप करणं बरं नव्हे आई. तो कधीं तुझ्या हुकुमाबाहेर गेला होता का ? "

" मग झालं काय ? तो कां येत नाहीं ? "

" मीच त्याला सांगितलं नाहीं आई. " असें म्हणून विप्रदास उगीच थोडेंसें हंसला आणि म्हणाला, " ज्या देवांची आणि गुरावासरांची काळजी वाटून तूं इतक्या घाईघाईनं जायला निघाली आहेस, त्यांचं काय झालंय तें स्वतःच्या डोळ्यांनीं पहावं म्हणून मी येतोंय बरोबर. दुसरं कांहीं नाहीं. "

इतर वेळीं दयामयीनें हें त्याचें बोलणें हंसण्यावारी नेलें असतें पण यावेळीं मात्र ती उगीच राहिली.

वंदनेला हांक मारायला अन्नदा गेली होती. स्नान करून ती नुकतीच आपल्या बापाच्या खोलीकडे जात होती. अन्नदेनें हांक मारली म्हणून घाईघाईनें ती खालीं आली आणि सारा प्रकार पाहून हतबुद्ध झाली.

" आज आम्हीं गांवीं निघालों आहों वंदना. " दयामयी म्हणाली.

" गांवीं ? काय झालंय तिकडे आई ? "

" नाहीं. तसं कांहीं झालं नाहीं. एका दिवसासाठीं आलें--आतां दहा बारा दिवस झाले. इतके दिवस घर टाकून राहून चालत नाहीं. निघायच्या वेळीं तुझ्या बाबांची भेट झाली नाहीं – अजून ते उठले नव्हते—त्यांची परवानगी घेतली नाहीं याबद्दल मला क्षमा करायला सांग त्यांना. द्विजू आहे, अन्नदा आहे – तुम्ही जरा नजर ठेवा. त्यांचं कांहीं कमी पडूं देऊं नका. ये सूनबाई, आतां वेळ लावूं नकोस—" असें म्हणून ती गाडींत जाऊन बसली.

सती मागेंच होती ती जवळ आली आणि बहिणीचा हात धरून एकदम रडूं लागली,—" येतें बरं ! " यापलीकडे दुसरा कोणताच शब्द तिच्या तोंडून बाहेर पडला नाहीं. डोळे पुशीत पुशीत ती गाडींत जाऊन सासूच्या शेजारीं बसली.

वंदना चकित झाली. आश्चर्यानें तिच्या तोंडून शब्द निघेना. दगडाच्या पुतळीप्रमाणें ती ताठरून उभी राहिली होती. काय झालें एकाएकीं !

" मी येतों मावशी—" असें म्हणून वासूनें येऊन ज्यावेळीं तिच्या पायाला हात लावून प्रणाम केला त्यावेळीं ती भानावर आली. आपण कुणालाच प्रणाम केला नाहीं याची तिला आठवण झाली. घाईघाईनें वासूचा एक मुका घेऊन ती गाडीच्या दरवाजाजवळ आली आणि हात पुढें करून दयामयीच्या आणि सतीच्या पायाला हात लावून तिनें प्रणाम केला. सतीनें नुसता तिच्या हनुवटीला हात लावला आणि आईनें तिला कसला आशीर्वाद दिला तो चांगलासा कळलाही नाहीं.

मोटार चालू झाली.

" चल ताई, " अन्नदा म्हणाली, " आतां आपण वर जाऊं. "

तिच्या मायेच्या बोलीमुळें वंदनेला लाज वाटली. मनाला वाटणारा अस्वस्थपणा बळेंबळेंच झाडून टाकून ती म्हणाली, " आता तूं जा अन्नदा, सैंपाकघरांतलं काम मी आधीं उरकून घेतें. " असें म्हणून ती त्याच बाजूकडे वळली.

मुंबईला जायच्या वेळीं रायसाहेबांसह सर्वत्रांनीं आधीं बलरामपूरला जायचें असें कालच ठरलें होतें, पण आज त्याचा उल्लेखसुद्धां नाहीं ! पुढें केव्हां तरी यावें म्हणून तोंडदेखलें आमंत्रणसुद्धां नाहीं !

सुमारें एक तासानंतर चहाचा सरंजाम घेऊन वंदना ज्यावेळीं बापाच्या खोलींत गेली त्यावेळीं ते अस्वस्थ होऊन म्हणाले, " विहिणबाई निघून गेल्या. मला उठायला उशीर झाला मुली. छेः छेः त्यांना काय वाटलं असेल ! "

" मुंबईला आपण केव्हां जायचं बाबा ? " वंदनेनें विचारलें.

बाबा म्हणाले, " पण तूं बलरामपूरला जाणार होतीस ना ? कां गेली नाहींस ? "

मुलगी म्हणाली, " तुम्हाला इथं एकटे टाकून मी कशी जाऊं बाबा ? अजून तुमची प्रकृति बरी झाली नाहीं—"

" तसा बरा झालोंय मी पोरी. तूं येशील म्हणून विहिणबाईंना मी सांगितलंय. आतां असं करूं, जातांना मी तुला बलरामपूरला उतरून देतों. कसं ? "

" नाहीं बाबा. नकोच तें. एवढ्या मोठ्या प्रवासांत तुम्हांला एकटं जाऊं देणं मला नाहीं बरं वाटत. "

मुलीचें भाषण ऐकून बापाला मोठा आनंद झाला. तो तिला डिंवचून म्हणाला, " चल म्हातारे ! विहीणबाईंना कळलं तर त्या म्हणतील, कीं ही पोरगी क्षणभर-सुद्धां आपल्या बापाला दृष्टीआड होऊं देत नाहीं. छे ! छे !—"

" आतां हा चहा घ्या. मी आलेंच ! " असें म्हणून वंदना एकदम बाहेर पडली.

१४

संध्याकाळ उलटून गेली होती. द्विजदासच्या खोलीसमोर येऊन वंदना उभी राहिली आणि हांक मारून म्हणाली, " एकदां येऊं कां आंत द्विजूबाबू ? "

" ये ना ! " आंतून उत्तर आलें, " एकदांच कां ? शंभरदां, हजारदां, असंख्यदां ये. "

वंदना आंत गेली. दोन्ही दरवाजे सताड उघडून आंत प्रवेश करतांना तिनें आंतले सारे दिवे लावले आणि दरवाजांतून बाहेर दिसेल अशा रीतीनें एक खुर्ची ओढून घेऊन ती बसली.

हातांतलें पुस्तक जवळच उघडें टाकून द्विजदास बिछान्यांत उठून बसला आणि म्हणाला, " काय हुकूम ? "

"काय वाचतांहां ?"

"भुतांच्या गोष्टी."

"पाहुणा मोठा कीं भुताची गोष्ट मोठी ?"

"भूताची गोष्ट मोठी."

"सदा सर्वदा ही थट्टा बरी नव्हे." वंदना चिडून म्हणाली, "आम्ही तुमच्या घरीं पाहुणे म्हणून आलों आहों याची जाणीव आहे का आपल्याला ?"

द्विजदास म्हणाला, "दादांच्या घरीं तुम्ही पाहुणे म्हणून आलांहांत याची मला पुरी जाणीव आहे ! तुमची कांहीं गैरसोय होऊं नये म्हणून घरवाल्यानं जातांना हुकूम दिला आहे. गैरसोय झाली नसती—पण भुतांच्या गोष्टी वाचतांना भान राहिलं नाहीं—कर्तव्यांत थोडीशी घालघसर झाली म्हणून पाहुण्यांकडे क्षमा मागतों."

"सारा दिवस मला कसा कंटाळवाणा गेला त्याची आहे का कल्पना ?"

"अवश्य आहे."

"अवश्य आहे ? मग त्यासाठीं आपण केलं का कांहीं ?"

"केलं नाहीं खरं." द्विजदास म्हणाला, "त्याचं कारण आधींच सांगितलं मी. दुसरं कारण—तें काम माझ्याकरवीं होणं शक्य नाहीं."

"कां ?"

"तें मी बोलूं नये हेंच बरं."

वंदनेनें प्रश्न केला, "आणि ताई अशी एकाएकीं कां गांवीं गेली ?"

"ताई गेली ती प्रबलपराक्रमी सासूच्या हुकुमामुळं. एरवीं तिचा कांहीं दोष नाहीं."

"आणि आई कां गेली ?"

"तें आईलाच माहीत."

"तें आपल्याला नाहीं माहीत ?"

'मुळींच माहीत नाहीं असं म्हटलं," द्विजदास म्हणाला, "तर खोटं बोलल्यासारखं होईल. कारण वहिनीनं थोडासा अंदाज केला आहे. अन् त्यामुळं यांतला थोडाबहुत अंदाज मलाही आलाय."

वंदना म्हणाली, "मग तो थोडाबहुत अंदाज सांगा ना मला."

द्विजदास जराच वेळ उगीच राहिला आणि म्हणाला, "मोठ्या संकटांत पाडते आहेस वंदना ! तुला नाहीं कळलं तर नाहीं का चालायचं ?"

"नाहीं. मुळींच नाहीं. सांगाच काय तें."

"कशाला तें—जाऊंदे."

"असं पहा द्विजूबाबू," वंदना म्हणाली, "पहिल्यांदाच आपलं ठरलं आहे—या घरीं असेपर्यंत आपण सांगाल तें मी ऐकायचं अन् आपणही मी सांगेन तें ऐकायचं. आपल्या एकाही शब्दाबाहेर अजून मी गेलें नाहीं ना?" बोलतांना तिच्या डोळ्यांना पाणी आलें म्हणून मान वळवून दुसरीकडे पाहात तिनें बाजू सांवरून घेतली.

द्विजदास ओशाळून म्हणाला, "तसा कांहीं त्यांत फारसा अर्थ नाहीं म्हणून बोलावंसं वाटत नव्हतं मला. आई गेली ती तुझ्यावर रागावून खरी, पण त्यांत तुझा दोष मुळींच नाहीं. सारा दोष आहे तो आईचा स्वतःचा—थोडासा वहिनीचाही आहे!—कारण प्रत्यक्ष नसला तरी या भानगडींत तिनं अप्रत्यक्ष हात घातला होता अशी मला शंका आहे. पण या सर्वांत अगदीं निरपराध कुणी असेल तर तो बिचारा द्विजदास स्वतः."

अधीर होऊन वंदना म्हणाली, "भानगड कसली ती सांगा ना मला चट्कन्."

"भानगड हा शब्द बरोबर नाहीं म्हटलं तरी चालेल." द्विजदास म्हणाला, "लंकेंतल्या सोन्याची हांव धरली होती पण हिशेबाच्या गल्लतींत पदरीं पडलं शून्य—तेव्हां आई साऱ्या जगावर रागावून उसळून उठली. रागावणंच असं कांहीं म्हणतां येणार नाहीं – तो बराचसा होता निराशेचा रुसवा."

वंदना नुसती टकमक पहात राहिली होती. द्विजदास बोलत होता,—"तुला माहीत आहे ना—पूर्वी तुझ्या बाबतींत तिला फार मोठा तिटकारा आला होता—पण पुढं एकदम उत्पन्न झालं केवढं तरी वात्सल्य. रूपानं, गुणानं, विद्येनं, बुद्धीनं, कामाकाजांत, दयामायेच्या बाबतींत एक वहिनी सोडून तुझ्यासारखं दुसरं कुणीच नाहीं असं ठरलं. कोण म्हणेल तुला म्लेंच्छ म्हणून? एवढी मोठी निष्ठावंत ब्राह्मणकन्या साऱ्या भारतवर्षांत शोधूनसुद्धां मिळायची नाहीं असं सिद्ध करायला आई कमर कसून तयार झाली!—" असें म्हणून द्विजदास स्वतःच्या विनोदावर स्वतःच खूष होऊन मोठमोठ्यानें हंसत सुटला.

त्या हंसण्याचा रोख वंदनेला आवडला नाहीं खरा, पण तीसुद्धां तशीच हंसत सुटली.

"हंसतेस काय वंदना?" द्विजदास म्हणाला, "मुळांत तेंच झालं ना साऱ्या संकटाचं कारण?"

"यांत कसलं आलंय संकट ?" वंदना म्हणाली.

"तर मग अवधान देऊन श्रवण कर." द्विजदास म्हणाला, "दयामयीचे दोन पुत्र. ज्येष्ठ आणि कनिष्ठ. ज्येष्ठावर तिचा निस्सीम भरंवसा—तितकाच कनिष्ठाच्या बाबतींत निस्सीम संशय—अन् भीति. तिच्या मतें या जगांत त्याच्या तोडीचा कुचकामीं माणूस दुसरा कुणी नाहीं. पण किती झालं तरी आई ना ? गर्भांत वाढलेल्या संतानाला सहजासहजीं जलांजली देतां येईना तेव्हां काय केलं तिनं ?—पोटच्या गोळ्याच्या काळजीनं तिनं एक उपाय शोधून काढला. या कुचकामी मुलाला तुझ्या मानगुटीला बसवून स्थिरस्थावर केला, कीं या संसाराच्या मरुभूमींतून बिनधोक निभावलें असं तिला वाटलं. पण बेटा विधाता पडला आडवा—काल संध्याकाळीं अचानक कळून आलं, कीं वंदनेच्या मानगुटीवर कुणाला बसवायला आतां मुळीं जागाच नाहीं ! अर्थात् काय झालं—दयामयीचे सारे संकल्प, सारीं स्वप्नं एकदम कोसळून पडलीं. आणि हें केलं कुणी, तर सुधीरचंद्र नांवाच्या एका माणसानं. तो आधींच त्या मानगुटीला बसलेला होता आणि त्याला तिथून काढणं कांहीं शक्य नव्हतं !" असें म्हणून तो पुनः एक वेळ घर डोक्यावर घेत हंसत सुटला.

बराच वेळपर्यंत वंदना त्याच्या तोंडाकडे पहात राहिली होती. नंतर तिनें विचारलें, "असं अचाट हंसायला कारण काय झालं ? आईची फजिती झाली म्हणून, कीं एका संकटांतून आपण सुटलों म्हणून ? बोला ना."

द्विजदास गालांतल्या गालांत हंसून म्हणाला, "कारण कोणतंही असो पण एवढं खरं कीं, अकस्मात् पदस्खलन झाल्यामुळें मा—जननी जी धराशायिनी झाली, त्या मूर्तिची कल्पना नजरेसमोर येतांच मला आनंदाच्या उकळ्यावर उकळ्या येऊं लागल्या आहेत. पण या जगांत बुद्धीचं सारं भांडवल तिच्याच वांट्याला आलेलं नाहीं, दुसऱ्याला देखील थोडथोडा हक्क आहे त्या बुद्धीवर, एवढं तरी आतां तिला जर पटलं, तर मग कांहीं फारसं बिघडलं नाहीं म्हणायचं. मला नाहीं तर नाहीं. पण निदान दादाला तरी या कटाची थोडीशी कल्पना तिनं दिली असती तर आजचा प्रसंग खास टळला असता. तूं दुसऱ्याची वाग्दत्त वधू आहेस—तुम्हीं उभयतां प्रेमबद्ध झालेलीं आहांत — अर्थात या व्यवस्थेंत कांहीं फरक होणं शक्य नाहीं—इष्टही नाहीं—हें दादांप्रमाणेंच मलाही ठाऊक होतें."

"कुणी सांगितलं आपल्याला ?" वंदनेनें विचारलें.

"तुझ्या बाबांनीं." द्विजदास म्हणाला, "आम्ही आलों त्याच दिवशीं तुझ्या बाबांनीं तुझ तें प्रेम, वाग्दान, लवकरच होणारा विवाह वगैरे मोठ्या मनोरंजक चर्चेचा अमृतवर्षाव आम्हां दोघांच्या श्रवणसंपुटांत केला होता. नाहीं—नाहीं—रागावूं नकोस वंदना—मी आपला साधासीधा माणूस, मनाला आनंद वाटला तर ती आनंदाची बातमी आपल्या माणसाकडून उगीच लपवून ठेवणं कांहीं मला बरं वाटत नाहीं."

पुनः वंदना कांहीं वेळपर्यंत उगीच राहिली.

"एवढ्यासाठींच का मुखर्जीमहाशयांनीं मैत्रेयीला पहायला आम्हांला पाठवलं होतं ?" वंदनेनें विचारलें.

"तें नीटसं माहीत नाहीं मला." द्विजदास म्हणाला, "दादाच्या मनाचा अंत परमेश्वरालासुद्धां लागायचा नाहीं. माहीत आहे तें एवढंच, कीं त्यांच्यामतें मैत्रेयीदेवी ही सर्वगुणान्विता कन्या आहे. बलरामपूरल्या श्रीमान आणि महा-माननीय मुखर्जी कुटुंबांत प्रविष्ट व्हायला ती अयोग्य नाहीं."

वंदनेनें विचारलें, "मैत्रेयीदेवीसंबंधीं आपलं काय मत आहे ?"

द्विजदास म्हणाला, "या घरांत असला प्रश्न करणें अवैध आहे. या प्रकरणांत माझा नंबर तिसरा. पहिला आणि दुसरा नंबर, अर्थात आई आणि दादा, ज्या कुणा स्त्रीरत्नाच्या गळ्यांत मला बांधतील तिला कवटाळून मी मोठ्या आनंदानं झुलत रहावं, हीच या घरची सनातन रीत – ती बदलणं कांहीं शक्य नाहीं."

त्याच्या त्या व्यंगोक्तीमुळें वंदनेला हंसूं लोटलें. ती म्हणाली, "अन् समजा, मैत्रेयीच्या ऐवजीं त्यांनीं तुम्हांला वंदनेच्या गळ्यांत बांधलं तर ?"

"हाय वंदना !" द्विजदास कपाळावर हात मारून म्हणाला, "ती आशा निष्फल आहे. दुष्ट राहूनं पूर्णचंद्राला ग्रासून टाकलं आहे. कुठून हा सुधीरचंद्र उडुाण करून आला, त्यानं प्रासादाला आग लावली आणि द्विजदासाची सोन्याची लंका डोळ्यांदेखत पहातां पहातां भस्मसात् झाली. आतां ती गोष्ट काढूं नकोस कल्याणी. या दुर्भागी जीवाचं हृदय विदीर्ण होतं आहे त्यामुळं !"

त्याचें तें नाटकी भाषण ऐकून वंदना पुनः एकदां हंसत सुटली. ती म्हणाली, "सोन्याची लंका सारीच कांहीं जळून गेलेली नाहीं द्विजूबाबू. अशोकवन अजून बचावलं आहे. एवढं हृदय विदीर्ण व्हायला नको कांहीं."

" हें आश्वासन फुकट आहे. " द्विजदास मान हलवीत म्हणाला, " श्रीरामचंद्राचं नशीब मोठं जोरावर होतं. मी सर्वांच्या मतानें ठरलेला हतभागी द्विजदास आहें. माझ्या पोळलेल्या भांड्यांतले आशेचे सारे अंकूर जळून खाक झाले आहेत. कांहींसुद्धां शिल्लक राहिलेलं नाहीं त्यांतलं ! "

" कांहीं झालं नाहीं. "

" काय, कांहीं झालं नाहीं ? "

" कांहींसुद्धां खाक झालं नाहीं ! " वंदना जोरजोरानें म्हणाली, " द्विजदास हतभा[illegible] असला, तरी वंदना कांहीं हतभागिनी नाहीं. माझं अदृष्ट जाळून राख करायचं सामर्थ्य कांहीं सुधीरच्या ठायीं नाहीं—या जगतांत कुणाच्याच ठायीं नाहीं – आपल्या आईच्या नाहीं कीं दादाच्याही ठायीं नाहीं. "

तिच्या त्या धीरगंभीर वाणीनें निघालेल्या उद्गारांमुळें द्विजदास थक्क होऊन पहात राहिला.

" कां ? उगीसे राहिलांत ! माझ्या मनाची गोष्ट आपल्याला कळली नाहीं असं ढोंग करायचा का बेत आहे ? "

" नाहीं—ढोंग करीत नाहीं वंदना—अंदाज केला होता हें मला कबूल आहे—पण संशय देखील होता बराचसा. "

" आज तो संशय काढून टाका. " वंदना म्हणाली. क्षणभर त्याच्या तोंडाकडे पहात राहून ती म्हणाली, " पण मला तरी संशय नव्हता—पहिल्या दिवसापासूनच नव्हता. तुमच्या गांवीं आलें होतें तेव्हां रागावून घरांतून निघालें—वरच्या मजल्यावरच्या खिडकींतून हात वर करून तुम्हीं खुणेनं मला निरोप दिलात—परिचय थोड्या वेळाचा होता खरा, पण मला उद्देश कळला नाहीं असं का आपल्याला वाटलं ? "

द्विजदास कांहीं बोलत नाहीं असें पाहून वंदना म्हणाली, " गेला संशय ? "

" आणखी एक फटका दिला कीं जाईलसं वाटतं. पण मला प्रश्न पडलाय तो हाच, कीं संशयनिरसनाची हीच पद्धत का अखंड चालू रहाणार ? "

वंदना म्हणाली, " अखंडाची व्यवस्था आधीं होऊं दे तर खरी. पण सारं कांहीं कळून सवरून अजाणत्याचं ढोंग करणाऱ्या माणसाची समजूत कशी घालावी तें कांहीं मला माहीत नाहीं. "

" पण तो अजाणता मी नव्हे—माझी आई ! तिची समजूत कशी घालायची ? "

" आईला कळेल आपोआप. " वंदना म्हणाली, " पोटच्या मुलीइतकं तिचं प्रेम आहे माझ्यावर. आज उगीच घाईघाईनं निघून गेली,—जो समज करून घेऊन गेली तो खरा नव्हे हें जर तिला पटवून द्यायचं नाहीं, तर मग मी आशा तरी कसली धरायची ? मला भीति वाटत नाहीं द्विजूभाबू. केव्हांना केव्हां तरी मी तिची समजूत घालीनच घालीन ! " बोलत असतांना शेवटीं शेवटीं तिचा गळा एकदम दाटून आला आणि डोळे पाण्यानें भरून आले.

द्विजदासच्या मनांतला खरेखोटेपणाचा संशय अजून जात नव्हता. पण या गळ्यांतल्या गहिंवरानें आणि डोळ्यांतल्या पाण्यानें तो संशय साफ पुसून गेला. आतां ती कांहीं थट्टा नव्हती. त्याला जितकें आश्चर्य वाटलें होतें तितकीच ती गोष्ट त्याच्या मनाला लागून राहिली होती. तो गहिंवरून म्हणाला, " हें काय वंदना, तूं रडतेयस होय ? "

वंदनेनें उत्तर दिलें नाहीं. नुसते डोळे पुसून तिनें मान दुसरीकडे वळवली.

बराच वेळपयत द्विजदासच्या तोंडूनही शब्द उमटत नव्हता. नंतर अगदीं जपून तो म्हणाला, " सुधीरनं तर तुझा कांहीं अपराध केला नाहीं वंदना ! "

मान न वळवतां वंदना म्हणाली, " अपराधाची चर्चा कशाला करायची ? सांगा ना ? मी काय त्याच्या अपराधाबद्दल त्याला शिक्षा करायला निघालेंय ? "

या प्रश्नाचें उत्तर द्विजदासाला सुचेना. निरर्थक हा प्रश्न केला असें त्याला वाटलें.

पुनः कांहीं वेळ थांबून तो म्हणाला, " पण सुधीर तुझ्या समाजांतला — शिक्षण, संस्कार, अभ्यास आणि आचरणाच्या बाबतींत मुखर्जीघराण्यांशीं तुम्हां लोकांचं जुळणं कठीण. मग कळून सवरून या तुरुंगांत घुसावं असं तुला कां वाटतं वंदना ? माझ्यासाठीं ?—आज तुला कळायचं नाहीं. पण ज्यावेळीं ही तुझी चूक तुला कळून येईल त्यावेळीं पश्चात्ताप करायला अवसर रहाणार नाहीं. माझ्याकडे तूं कोणत्या दृष्टीनं पहाते आहेस त्याची कांहीं मला कल्पना नाहीं.—पण वहिनी, आई, दादा आमच्या देवदेवता आमची अतिथीशाळा, आमचा सारा गोतावळा यांतलाच मी एकजण आहें. त्यांना वगळून मला मोजणं मला शक्यच नाहीं. हें झेपेल का तुला सारा जन्मभर ? "

वंदना म्हणाली, " नाहीं झेंपलं तर मृत्युचा दरवाजा उघडा आहेच ना सदाचा ? कुठल्याही कैदखान्याची बंदी तिथं आड येत नाहीं. माझ्याबद्दल

आपण काय कल्पना केली आहे कोण जाणे—पण माझी सासू, माझी जाऊ, माझा दीर, माझ्या देवदेवता, अतिथीशाळा आणि सारा गोतावळा यांच्यापासून दूर झालेला पति मला नकोच आहे केव्हांही. सर्वांत सामावून तो माझा झाला पाहिजे. ”

द्विजदास आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला, “ ही कांहीं तुझी बुद्धि नव्हे. कुणाकडे शिकलीस हें वंदना ? ”

“ कुणी शिकवलं नाहीं मला द्विजूबाबू, ” वंदना म्हणाली, “ आपली आई पाहिली, मुखर्जीमहाशय पाहिले, त्यांना पहातां पहातांच सारं कांहीं मनांतल्या-मनांत मला कळून आलं. या घरांत सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे आई, त्यानंतर मुखर्जीमहाशय, त्यानंतर ताई, त्यानंतर आपण. अन्नदेलासुद्धां इथं कांहीं विशेष जागा आहे. त्या या घरांत जर मला जागा मिळाली—मग ती कितीही लहान असो—तर ती मला एवढीसुद्धां अप्रिय व्हायची नाहीं. ”

तिचें तें भाषण द्विजदासला जितकें आवडलें तितकेंच त्याचें अंतःकरण त्या उद्गारांनीं व्यथित झालें. अशा प्रकारें वंदनेच्या मनांतील गोष्ट आपण काढून घेतली हें अयोग्य झालें असें त्याला वाटलें. आतां ही चर्चा बंद होणें अवश्य होतें. बळेंच मन कठिण करून तो म्हणाला, “ आपल्या या साऱ्या गोष्टी आईला कळवण्यांत कांहीं अर्थ नाहीं. पोटच्या मुलीइतकं तिचं तुझ्यावर प्रेम आहे तें मला माहीत आहे. म्हणूनच तिला वाटत होतं, कीं तूं या घरची धाकटी सून झालीस तर तुम्हा दोघां बहिणींच्या हातीं दोन्ही मुलांना सोंपवून आपण कैलासदर्शनाला जावं. कदाचित् तिकडून परत यायला झालं नाहीं, त्या विकट मार्गावर परलोकचं बोलावणं आलं, तर हीच खूणगांठ बांधून मनाच्या निश्चयानं यात्रा निर्भयपणें पुरी करतां येईल असं तिला वाटलं असेल. एवढ्या मोठ्या संसाराची जबाबदारी हातावेगळी करायला कुठं अडचण व्हायची नाहीं असंही तिला वाटलं असेल. पण आतां तें होणं शक्य नाहीं ! वाग्दान आणि कन्यादान हीं तिच्यालेखीं एकच आहेत. प्रेमाच्या बळानं ज्यानं संमति मिळविली तोच तुझा पति. लग्नाचे मंत्र म्हटले गेले नाहींत एवढ्या जोरावर तूं त्याला टाकूं शकशील, पण त्या दुसऱ्यानं खालीं केलेल्या जागेवर दयामयीचा मुलगा बसणं शक्य नाहीं. ”

वंदनेचा चेहरा एकदम उतरला—पांढरा फटक झाला. तिनें विचारलें, “ जातांना आईच असं बोलल्या का द्विजूबाबू ? ”

द्विजदास म्हणाला, " ती तरी निदान असं बोलणं अशक्य आहे असं मला वाटत नाहीं. आईच्या मनाला सर्वांत जास्त लागलं तें हें, कीं सुधीर आमच्या जातीचा नाहीं—असं वहिनी म्हणाली. तसं पाहीलं तर तुम्ही जात मानीत नाहीं पण या भेदामुळं जी खिंड पडते ती कोणत्याही प्रकारें भरून येणं शक्य नाहीं. "

" आपल्यालाही असंच वाटतं ना का ? "

" मी तिसरा नंबर वंदना. माझ्या होकार नकाराला किंमत देतो कोण ? "

रायसाहेबांच्या जेवणाची वेळ झाली होती. वंदना उठून उभी राहिली. जायच्या पूर्वी ती म्हणाली, " बाबांची रजा संपली. उद्यां ते जायला निघणार—मीही त्यांच्याबरोबरच जाऊं का द्विजूबाबू ? "

द्विजदास म्हणाला, " तें सुद्धां मला सांगतां येतंय का वंदना ? पण गेलीस तर माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊन जाऊं नकोस. तूं गेल्यानंतर तुझ्या वतीनं हें सारं कांहीं स्पष्ट करून मी आईला सांगेन. लाज शरम धरणार नाहीं. त्यानंतर माझ्यापाशीं राहिली माझी ही आजच्या संध्याकाळची स्मृति—अन् राहिला माझा ' वंदेमातरम् ' मंत्र. "

वंदनेनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. मुकाट्यानें ती तिथून निघून गेली.

१५

वंदना खोलींतून बाहेर आली त्यावेळीं तिला अत्यंत थकवा आल्यासारखें वाटत होतें. याचकाप्रमाणें निर्लज्जपणें आपलें हृदय असें उघडें करून, स्वाभिमानावर पाणी सोडून देण्याइतका आपण कसला नशा केला होता असा तिला प्रश्न पडला. पुरुष असूनही द्विजदासनें आपलें अंतरंग तसेंच झांकलेलें ठेवलें होतें. त्याच्या मुद्रेवर आग्रह नव्हता कीं उल्हासही नव्हता. त्यानें आशाही दाखवली नाहीं, कीं सांत्वनही केलें नाहीं. उलट पुनः पुनः थट्टेच्या पांघरुणाखालीं तो जाणवून देत होता, कीं आपण तिसरा नंबर—आपली इच्छा अनिच्छा या घरांत कुणाच्या हिशेबीं नाहीं.

खरोखरच का असें होतें ? आईचे शब्द म्हणून त्यानें सांगितलें—कीं वाग्दान म्हणजेच कन्यादान. निरपराध सुधीरची रिकामी जागा दयामयीच्या मुलाला योग्य नव्हे असेंही त्यानें सांगितलें. आपल्या डोळ्यांत पाणी आलेलें

पाहून शेवटीं त्यानें दयाभूत होऊन एवढेंच सांगितलें, कीं वंदनेची ही वेडगळपणाची कहाणी आपण आपल्या आईपाशीं निवेदन करीन !—या एकाच गोष्टीनें अपमानाचा घडा कांठोकांठ नाहीं भरला ?

एवढ्यावरच्च का संपलें होतें ? या कुटुंबांत जीं जीं म्हणून कुणी आहेत त्या सर्वांपेक्षां लहान होऊन रहायची आपली तयारी आहे असें द्विजदासला उत्तर देतांना तिनें सांगितलें होतें ! काय हें झालें ? तिला कांहीं सुचत नाहींसें झालें होतें. आपण होऊन स्वतःला कमीपणा घेतला याची जाणीव होऊन ती तिथेंच स्तब्धपणें बसून राहिली होती. केवढा हा कमीपणा ! केवढा हा आत्मघात ! कुठं प्रायश्चित्त आहे का या हीनतेला ?

कुणीतरी येऊन रायसाहेब बोलावताहेत असें तिला सांगितलें. ती त्याच्या खोलींत गेली. आग्रह करकरून उद्यांच्या उद्यां मुंबईला जायला निघायची कबूली तिनें त्यांच्याकडून घेतली. विप्रदास येतांच रात्रीच्या गाडीनें जायचें असें ठरलें. अशा रीतीनें एकाएकीं जाणें बरें दिसणार नाहीं असें साहेबांना वाटत होतें. अजून बरीच रजा होती. सुखानें रहातां आलें असतें असें वाटत होतें तरीही मुलीचा आग्रह म्हणून त्यांनीं कबूल केलें.

बिछान्यावर पडल्यापडल्या ती डोळ्यांतून आसवें गाळीत होती. केव्हांतरी तिला झोंप लागली. सकाळीं उठल्याबरोबर तिनें आपल्या आणि आपल्या बापाच्या साऱ्या सामानाची बांधाबांधी केली, फोन करून जागा रिझर्व केली, आणि मुंबईला तार दिली. संध्याकाळीं गाडी होती पण तोंपर्यंत थांबायची तिची तयारी नव्हती.

त्यावेळीं नऊ वाजले होते. अन्नदा आंत आली आणि पाहून आश्चर्यचकित होऊन म्हणाली, " हें काय चाललंय ? "

वापरलेल्या कपड्याच्या घड्या करून त्या ट्रंकेंत ठेवीत वंदना म्हणाली, " आज आम्हीं जाणार. "

" जायचं तें आज नव्हे ताईसाहेब. ठरलं होतं उद्यां जायचं म्हणून. "

" नाहीं आजच गेलं पाहिजे. " असें म्हणून ती मुकाट्यानें कामाला लागली.

क्षणभर थांबून तिच्याकडे पहात अन्नदा म्हणाली, " आपण बाजूला व्हा. मी करीन बांधाबांध. आपल्याला तें जमायचं नाहीं. त्रास होईल. "

" त्रास व्हायचा प्रश्न नाहीं. तूं जा आपल्या कामाला. "

या घरच्या साऱ्या लोकांची जशी कांहीं तिला शिसारी आली होती.

कारण कळलें नाहीं तरी कांहीं तरी रागारागीचें प्रकरण आहे असें अन्नदेला वाटलें. काल आई अशीच अचानक घरीं निघून गेली. आज वंदनादेखील तशीच अचानक निघून जाऊं पहाते आहे. रागाचें उट्टें रागानें काढावें असा अन्नदेचा स्वभाव नव्हता. ती जितकी सहनशील होती, तितकीच सभ्यही होती. कांहीं वेळ ती उगीच राहिली. नंतर संकोचानें म्हणाली, "माझी चूक झाली ताईसाहेब. आज वेळीं जागो झालें नाहीं मी."

वर पाहून वंदना म्हणाली, "मी कांहीं तुझी कैफियत मागितली नाहीं अन्नदा. काय सांगावंसं वाटलं तर आपल्या धन्याला सांग. द्विजबाबू आहेत आपल्या खोलींत. त्यांना सांग काय तें." असें म्हणून ती पुनः आपल्या कांमाला लागली.

बापाची एकुलती एक मुलगी असल्यामुळें वंदना बरीचशी लाडावलेली होती—म्हणूनच सहनशक्ति तिच्या ठायीं फार कमी होती—तरीही कुणालाही टाकून बोलण्याची संवय तिला कधीं लागली नव्हती. एवढ्या कठोरपणानें आजवर ती कुणालाही टाकून बोलली नव्हती.

एकदां बोलून गेल्यावर तिची तिलाच लाज वाटली. इतक्यांत अन्नदाही चांचरत चांचरत म्हणाली, "डॉक्टर निघून गेले, दिशा फांकत आल्या; तेव्हां म्हटलं आतां कसलं झोपायचं ? तशी झोपलें नव्हतेंच. भिंतीला टेकून बसलें होतें तितक्यांत चटकन् डोळा लागला. कसा एवढा उशीर झाला तें कळलंसुद्धां नाहीं. धन्याचं नांव काढलं आपण ताईसाहेब, पण आपणसुद्धां धनीच नव्हे का माझे ? आजवर कधीं अशी चूक झाली होती का माझ्या हातून ! सांगा ना ? उठा, बाजूला व्हा. मी भरतें सामान."

शेवटचें भाषण वंदनेच्या कानीं गेलें नाहीं. अन्नदेच्या तोंडाकडे पहात ती म्हणाली, "डॉक्टर निघून गेले म्हणजे ?"

"काल रात्रीं द्विजू भारी आजारी झाला होता." अन्नदा म्हणाली, "इकडे यायच्या पूर्वीच त्याची प्रकृति बरीशी नव्हती. अन् हट्टानं आला. काल आई-वगैरे मंडळी जायची गोष्ट निघाली तेव्हां मला बोलावून घेऊन त्यानं सांगितलं—कीं 'आईला कांहीं सांगूं नकोस, दादाला सांग आणि तेवढं माझं जाणं रहित करायला लाव. आज मला उठायची सुद्धां ताकद नाहीं.' पहिल्या-पासून तो माझ्याजवळ वाढलेला कीं नाहीं, तेव्हां त्याचं काय सांगणं असतं तें माझ्याकडे. मी घाबरलें. म्हटलं, 'असं काय रे, प्रकृति बरी नाहीं तर लपवतोस

कां ?' केवढाही बिकट प्रसंग असो पण हंसून उडवून द्यायची त्याची संवयच. तसंच हंसला आणि मला म्हणाला, 'त्यांना एकदां घालवून दे, कीं पहा मी कसा बरा होऊन उठतो तें.' मला वाटलं आईबरोबर याचं पटत नाहीं—बरोबर जायचं मनांत नाहीं—तेव्हां कांहींतरी ढोंग करतोय. म्हणून मी अधिक कांहीं बोललें नाहीं. दादाबाबू त्यांना घेऊन निघून गेले. त्यानंतर सारा दिवस बिछान्यांत पडून होता. कांहींसुद्धां खाल्लं नाहीं. दुपारीं जाऊन मी विचारलं. म्हटलं, 'द्विजू, कसं काय वाटतं ?' तो म्हणाला, 'बरं वाटतं.' पण चेहरा पाहिला तेव्हां मला त्याचं म्हणणं पटेना. डॉक्टरला बोलावते म्हटलं. पण तो कांहीं ऐकेना. म्हणाला,—'दादाला कां उगाच खर्चांत घालतेस. तुझी ही उधळ माधळ बघितली तर आई रागें भरेल.' हं: —हा त्याचा आईवरचा राग कांहीं गेला नव्हता. सारा दिवस कांहीं खाल्लं नाहीं—बिछान्यावर पडून दिवस काढला—तिसऱ्या प्रहरीं जाऊन विचारलं, म्हटलं, 'द्विजू, खरोखरच प्रकृति बरी नाहीं तर असं नुसतं पडून राहून कसं होईल ?' तो तसाच हंसून म्हणाला, 'असं पहा अनुताई, सारा दिवस झोंपून काढण्यासारखं दुसरं कुठलं पुण्य नाहीं असं शास्त्रांत सांगितलंय. कैवल्यपद मिळतं त्यामुळं. परमार्थसाधनाचा हा थोडासा प्रयत्न करतो आहे. उगीच भीतेस कशाला !' अशी ही त्याची थट्टेची संवय. बोलायची सोयच नाहीं मुळीं. रागारागानं निघून आलें पण मनांत भीति वाटत होती. एक पुस्तक काढून घेऊन तो वाचीत बसला—"

अन्नदा कांहीं वेळ थांबली आणि नंतर पुढें सांगूं लागली, "—तेव्हां रात्रीचे बारा वाजले होते वाटतं. कुणीतरी माझं दार ठोठावलं 'कोण रे ?' बाहेरून जबाब आला, 'मी तो अनुताई, दार उघड.' एवढ्या रात्रीं दिजू कां हांक मारतोय ? घाबऱ्याघाबऱ्या दार उघडून बाहेर आलें. द्विजूचं ध्यान पाहून घाबरलें. डोळे एवढे खालीं गेलेले—आवाज ओढलेला—अंगाला थरकांप सुटलेला—तरी देखील हंसत होता. म्हणाला, 'तुझ्याच कुशीला वाढलों ना ताई, म्हणून तुला भर रात्रीं उठवलं. डोळेच झांकायचे असले तर म्हटलं तुझ्याच कुशीला राहून झांकीन'—असें म्हणून अन्नदा ओक्साबोक्शी रडूं लागली. ती इतकी कासावीस झाली होती, कीं कांहीं केल्या तिचें रडणें थांबेना. मन आवरायला तिला कितीतरी वेळ लागला. त्यांनंतर ती म्हणाली, "—जवळ घेऊन त्याला खोलींत घेऊन गेलें. सारख्या वांत्या सुरू झाल्या होत्या. पोटांत कळ येत होती. वाटलं कीं रात्र कांहीं निभत नाहीं. केव्हां स्वारी आखडेल असं

भय वाटलं. डॉक्टरला बोलवायला पाठवलं. तो आला. कसलं तरी औषध दिलं त्यानं. गरम पाण्यानं शेकायला सुरुवात केली. सारे नोकरचाकर सारी रात्र जागत होते. पहाटे द्विजूचा डोळा लागला तेव्हां डॉक्टर म्हणाले, 'आतां भय नाहीं.' कशी रात्र काढली ताईसाहेब, तें सांगतां यायचं नाहीं ! स्वप्न पाहिल्या-सारखं वाटतंय आतां !—तसं कांहीं झालंच नसावंसं वाटतंय !" असें म्हणून अन्नदेनें पदरानें आपले डोळे पुसले.

वंदना म्हणाली, "मला कांहींच कळलं नाहीं ! मला कां जागं केलं नाहींस अन्नदा ?"

अन्नदा म्हणाली, "सकाळींच तें प्रकरण झालं होतं. म्हटलं तुम्हांला कशाला उगीच त्रास देऊं ? बाकी द्विजू मात्र म्हणत होता —"

तो विषय टाळून वंदना म्हणाली, "आतां द्विजूबाबूंचं कस आहे ?"

"बरं आहे." अन्नदा म्हणाली, "झोंप लागली आहे; डॉक्टर सांगून गेलेयत कीं संध्याकाळपयत झोंपमोड व्हायची नाहीं. एकदां बडेबाबू आले म्हणजे माझा जीव खालीं पडेल ताईसाहेब."

"त्यांना कळवलंय का कुणी ?"

"नाहीं. दत्तमहाशय म्हणाले, त्यांना कांहीं कळवायला नको. ते यायचेच आहेत."

तिथं आहे का दुसरं कुणी ?"

"होय ताईसाहेब. दोघांना बसवलंय तिथं."

"आतां डॉक्टर पुनः केव्हां येतील ?"

"संध्याकाळीं येतील. कांहीं भीति नाहीं म्हणून सांगून गेलेयत."

डॉक्टरनीं मांगितलें आहे एवढ्यावरच वंदनेनें आपलें समाधान करून घेतलें. यापेक्षां ती तरी आणखी काय करणार होती ?

वंदनेनें जाऊन द्विजदासच्या आजारीपणाची हकिकत आपल्या बापाला सांगितली. पण ती जास्त कांहीं बोलली नाहीं. तेवढेंच ऐकून ते अस्वस्थ होऊन म्हणाले, "हें काय ? मला कसं कुणी कळवलं नाहीं ?"

"नाहीं. आमची झोपमोड होईल असं वाटलं त्यांना. उगीच आम्हांला जागवणं बरं वाटलं नाहीं."

"पण एकंदरींत हें कांहीं बरं झालं नाहीं !"

वंदना उगीच राहिली. थोड्या वेळानें ते आपणच म्हणाले, "तिकीटं आणायला माणूस पाठवला, जागा रिझर्व केली आहे, पण आतां अशावेळीं आपण जाणं बरं दिसायचं नाहीं."

"कां बरं दिसायचं नाहीं बाबा ?" वंदना म्हणाली, "असं काय करणार आहों आपण इथं राहून ?"

"तसं नव्हे – तरीपण—"

"नाहीं बाबा, असं उगीच एकएक दिवस लांबणीवर टाकणं बरं दिसत नाहीं. आतां हा बेत बदलायचा नाहीं." असें म्हणून वंदना बाहेर निघून गेली.

दिवस वर आला होता. अन्नदा येऊन वंदनेच्या खोलींत जमिनीवरच बसली. त्यांना निघायला अजून तास दोन तास अवधी होता. वंदनेनें विचारलें, "द्विजू-बाबू आतां बरे आहेत ना ?"

"होय ताई, बरे आहेत. झोपले आहेत."

वंदना म्हणाली, "जायच्या पूर्वी आमची आतां कुणाशींच भेट होत नाहीं. एकाला झोप लागलेली आणि एकजण अजून गांवाहून आले नाहींत. येतील तेव्हां आम्ही किती तरी दूर गेलेलीं असूं."

होकार देऊन अन्नदा म्हणाली, "तें तर खरंच. बडेदादा येतील रात्रीं नऊ वाजतां—एकदां ते आले कीं सर्वांचा जीव खालीं पडेल. निर्धास्त होतील सारे."

"पण तसं भ्यायचं कारण नाहीं ना अन्नदा ?"

"नाहीं खरं." अन्नदा म्हणाली, "पण दादाबाबू घरीं आहेत म्हटलं म्हणजे तेवढंच विशेष वाटतं ताई. मग जबाबदारी वाटत नाहीं कुणाला. सारा भार त्यांच्यावर. मागलं पुढलं धोरण असतं त्यांना. तसेच अगदीं निर्भय—अगदीं गंभीर – सर्वांना वाटतं कीं जणूं काय मोठ्या वृक्षाच्या छायेखालीं आहोंत !"

त्याच जुन्या गोष्टी ! तींच सारीं विशेषणं ! सर्वांच्या मेंदूच्या कणाकणांतून हीच कल्पना खिळलेली. इतर वेळीं वंदनेनें कदाचित् चिमटा घ्यायचें सोडलें नसतें पण यावेळीं ती उगीच राहिली.

अन्नदा बोलत होती, "—आणि हा द्विजू ! दोघे भाऊ जसे काय पृथ्वीच्या या अन् त्या टोंकाला !"

"म्हणजे ?" चकित होऊन वंदनेनें विचारलें.

"म्हणजे काय ताई ?" अन्नदा म्हणाली, "नांहीं एवढी ज़बाबदारीची जाणीव, कीं नाहीं कसली काळजी, कीं नाहीं एवढासा गंभीरपणा !. सूनबाई म्हणते तें कांहीं खोटं नव्हे. शरद्ऋतुंतला ढग—नाहीं विजेचा कडकडाट, कीं नाहीं पाण्याचा थेंब. नुसता आला आला, गेला गेला. केवढा का प्रसंग असेना पण याचं आपलं हंसण्यावारी नेणं कांहीं थांबायचं नाहीं ! नाहीं संसारी, नाहीं वैरागी. किती जणांनीं किती प्रकारें त्याच्याकडून 'समजावणी' लिहून घेऊन सुटका करून घेतली आहे त्याला पारावार नाहीं."

"रागावत नाहीं कधीं ?" वंदना म्हणाली.

"रागावतो तर. खूप रागावतो. विशेषेंकरून आईवर. पण तिथं काय कुणाचं चालतंय ? एकदां असाच डोईंत राख घालून कुठं नाहींसा झाला होता. वहिनीनं रडारड सुरू केली तेव्हां सर्वांनीं जाऊन कुठून तरी शोधून आणला. पण अशा रीतीनं कांहीं सारेच दिवस निभायचे नाहींत. उद्यां लग्न झालं, चार पोरंबळं झालीं, अन् हें असंच चाललं तर हटकून दिवाळं वाजेल."

"मग तूं कां नाहीं त्याला समजावून सांगत वेळेवर ?" वंदना म्हणाली.

"हजार वेळां सांगितलं," अन्नदा म्हणाली, "पण कानच देत नाहीं. म्हणतो, तुम्हां लोकांना कशाला ही काळजी ? माझं दिवाळं वाजलं तरी वहिनीचं तर दिवाळं वाजत नाहीं ? तसंच कांहीं होईल तेव्हां सर्वांचा बोजा नेऊन तिच्या माथीं मारीनं."

वंदनेनें हंसत हंसत विचारलें, "ताई काय म्हणते यावर ?"

अन्नदा म्हणाली, "दिरावर तिची किती माया आहे त्याला अंत नाहीं. ती म्हणते, 'आम्ही जेवावं आणि द्विजूनं काय उपास करावा ? माझे सत्तेचे पांचशें रुपये येताहेत ते तर कुणी काढून घेऊं शकत नाहीं ? त्यांत कसंबसं गरीबागत चालेल आमचं. बडेबाबूंचे लाखोंलाख त्यांचे त्यांनाच लखलाभ होवोत. आम्हीं कांहीं हात पसरणार नाहीं त्यांच्याकडे ?'"

तें तिचें भाषण ऐकून वंदनेला जो आनंद झाला त्याला पारावार नव्हता. हे उद्गार जिनें काढले ती तिचीच ना बहीण ? ज्या समाजांत ती लहानाची मोठी झाली होती त्या समाजांत कुणी असें म्हटलें नसतें. असें म्हणायची कुणाला कल्पनासुद्धां आली नसती ! असें म्हणायचा प्रसंगच त्या समाजांत आला असता कीं काय कोण जाणे !

पण अन्नदा बोलत होती ती एक पुरातन कालची कहाणी होती. तें अविभक्त कुटुंब होतें. नुसतें दिखाऊ नव्हे तर अंतरींच्या जिव्हाळ्याचें. अन्नदा या घरांत नुसती दाई नव्हती. द्विजदासची ती आई होती. केवळ तोंडापुरती नव्हे, मनापासून ! जें कांहीं सांगायचें तें तो तिलाच सांगे. या घराण्याची नोकरी करीत करीत अन्नदेच्या बापानें देह ठेवला होता. तिचा मुलगा देखिल याच घराण्यांत लहानाचा मोठा होऊन शिकून सवरून संसारी बनला होता. अन्नदेला आतां दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याची जरूरी नव्हती तरीही या घराची माया तोडणें तिच्यालेखीं अशक्य होतें. या समृद्ध घराण्यांत वाडवडलांपासून कित्येक पिढ्यांत हाच प्रकार चालत आला होता.

दयामयीचा चंडखोर मुलगा द्विजदास काल असेंच नाहीं का म्हणाला, आई, दादा, वहिनी, घरचं देवस्थान, अतिथी शाळा हें सारं मिळूनच आपण ! त्यांना वगळून वंदनेला त्याचा लाभ होईल ही आशाच नको. त्याच्या त्या उद्गारांना वंदनेनें त्यावेळीं विरोध केला नाहीं खरा—पण त्या उद्गारांचा खरा अर्थ तिला आज कळून आला.

अन्नदेचें भाषण संपलें नव्हतें. आणखी बऱ्याच गोष्टी ऐकाव्या अशी वंदनेचीही इच्छा होती पण अडथळा आला. नोकरानें येऊन सांगितलें कीं सहा वाजले म्हणून रायसाहेब घाई करताहेत. निघायला आतां एक तासांपेक्षां जास्त वेळ नव्हता. लौकर निघायची तयारी करायला त्यानीं वंदनेला सांगितलें होतें.

रायसाहेब वेळींच खालीं आले. येतांयेतां त्यांनीं मुलीच्या नांवानें एकदां हांक मारली. वंदनेच्या ती कानीं आली. अशा रीतीनें जाण्यांत चूक होवो वा न होवो, इच्छा असो वा नसो, आतां जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें. पुनः पुनः हट्ट करून तिनें स्वतःच जी गोष्ट ठरवली ती आतां बदलणें इष्ट नव्हतें. ती घरांतून बाहेर निघाली. तिच्या मनांत पहिल्यानें विचार आला तो हा, कीं भविष्यकाळाकडे जितकी जाईल तितकी दृष्टी फेकली आणि पाहिलें तर आतां या घरीं पुनः येण्याचा संभव नाहीं. तरीपण या घरांत अनेक सुखाच्या स्वप्नांचा जो पसारा थाटलेला दिसला तो केव्हांही विसरला जाण्याजोगा नव्हता. रस्ता सोडून बाजूला वळून द्विजदासच्या खोलीच्या बाजूच्या गच्चीवरून जातांना तिनें सहज तिकडे नजर फेकली पण जी खिडकी उघडी होती तींतून द्विजदास तिला दिसला नाहीं. मोटरजवळ दत्तमहाशय उभे होते, त्यांना जवळ बोलावून रायसाहेबांनीं नोकरांना पोस्त म्हणून देण्याकरतां बरीचशी रक्कम दिली, एकाएकीं

जावें लागल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली आणि द्विजदासच्या प्रकृतीची खबर लौकर कळवण्याबद्दल बजावून सांगून ते जायला निघाले.

गाडींत बसण्यापूर्वी अन्नदेला एका बाजूला बोलावून घेऊन वंदना म्हणाली, " द्विजूबाबूंची तूं दाई—तूंच त्याला लहानाचा मोठा केलास—ही आंगठी तुझ्या सुनेला दे अनुताई—तिनं ती रोज घातली पाहिजे आपल्या हातांत. " असें म्हणून हातांतली आंगठी काढून तिच्याकडे देऊन ती गाडींत जाऊन आपल्या बापाशेजारीं बसली.

मोटर चालू झाली. इकडे तिकडे उभे राहून बरेचसे नोकरचाकर आणि दत्तमहाशय त्यांना नमस्कार करीत होते.

अगदीं नकळत वंदनेनें मागें वळून वर पाहिलें—मागें एकदां सर्वांना नकळत खिडकीआड राहून अबोल खुणेनें तिला निरोप देणारा द्विजदास तिला तिथें दिसला नाहीं.

आज तो आजारी होता—निश्चेष्ट झोपी गेला होता.

१६

दयामयीच्या वागणुकीमुळें वंदनेला जी प्रच्छन्न जाचणूक झाली होती, अस्पष्ट असा जो ठपका लागला होता, तो सतीच्या मनाला फारच लागून राहिला होता. सासूसमोर तिला तसें कांहीं बोलणें शक्य नव्हतें म्हणून तिनें एक पत्र लिहिलें आणि तें बहिणीला पोंचवण्यासाठीं आपल्या नवऱ्याकडे दिलें. दुपारच्या गाडीनें विप्रदास कलकत्त्याला जाणार होता इतक्यांत दयामयी येऊन तिथें हजर झाली. अशा प्रकारें मधेंच केव्हां ती त्याच्या खोलींत येत नसे. मुलगा आणि सून दोघेंही आश्चर्यचकित झालीं. माथ्यावरचा पदर पुढें ओढून सती जायला निघाली होती तिला थांबवून सासू म्हणाली, " थांब सूनबाई, जाऊं नकोस. तुझ्या गैरहजेरींत तुझ्या बहिणीची बदनामी करायची नाहीं मला. जरा थांब !—तुला माहीत आहे विपिन, इतक्या घाईघाईनं मीं कां गांवीं निघून आलें ? "

" नीटसं माहीत नाहीं आई. " विप्रदास म्हणाला, " पण कुठंतरी कांहीं तरी भानगड झाली आहे एवढा अंदाज केला मी. "

" भानगड झाली नाहीं, " आई म्हणाली, " पण झाली असती. त्यांतून आई दुर्गेनं मला वांचवलं. काल व्याही मुंबईला जायचे असं ठरलं होतं. ते गेल्यावर वंदना इथं येऊन आपल्या बहिणीजवळ राहणार होती असंही ठरलं होतं. पण त्या पोरीच्या डोक्यांत कांहीं अक्कल असेल तर ती इथं यायची नाहीं. सरळ बापाबरोबर मुंबईला जाईल. जर गेली नाहीं तर तिला जायला सांग. वाईट वाटूं देऊं नको सुनबाई. असल्या बहिणीला वनवासाला पाठवणं पुरवेल पण घरीं घेणं पुरवायचं नाहीं."

विप्रदास निरुत्तर होऊन पहात राहिला होता. आश्चर्याची परमावधी झाली होती.

दयामयी बोलत होती, "—तिची माया लावून घ्यायला कुठली गेलें कोण जाणे. मला वाटलं होतं, कीं ती आपल्यापैकींच एक होणार. चालचलणुकींत थोडा फरक आहे—म्हटलं शाळा कॉलेजांत जायचं लक्षण तें—चंद्राआड आलेले ढग वाऱ्यानं उडून जातात तसं जाईल निघून म्हटलं. किती झालं तरी ती सतीची बहिणीच ना ! पण तिला नवरा निश्चित केलाय कायस्थाच्या जातींतला. ब्राह्मणाच्या कुळांत जन्म घेऊन माणूस एवढा अधःपाताला जाईल असं कुणाला वाटलं असतं विपिन ! "

" हं ! असं का ! " विप्रदास म्हणाला, " पण ते जात मानीत नाहींत हें तुला माहीत होतं ना आई ? "

" माहीत होतं." दयामयी म्हणाली, " पण प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं. मनाला तेवढंसं पटलं नव्हतं म्हणेनास. आपलं आजीबाईच्या गोष्टीसारखं. पण आतां प्रत्यक्ष कळलं तेव्हां जी शिसारी आलीय मला ती कांहीं सांगतां यायची नाहीं बाबा ! " बोलतां बोलतां खरोखरच ती शहारून उठली आणि म्हणाली, " मरोत तीं ! हवं तें करोत. तशीं कोण आमची तीं ?—पण आमच्या घरीं तें तसलं कांहीं नको."

विप्रदास कांहीं उत्तर देत नाहीं असें पाहून ती म्हणाली, " कांहीं उत्तर दिलं नाहींस तें विपिन ? "

" तूं कुठं विचारलं होतंस आई ? तूं हुकूम दिलास, वंदनेनं इथं येऊं नये—नाहीं येणार ती. "

त्याचे ते उद्गार ऐकून दयामयीचें मन द्विधा झालें. असा हुकूम देण्यांत आपली चूक झाली कीं काय असा तिला प्रश्न पडला.

" असंच चालायचं आई. वंदनेचा त्यांत कांहीं अपराध नाहीं. सामाजिक आचारविचारांच्या बाबतींत त्यांचं आमचं जुळायचं नाहीं. ते लोक जात मानीत नाहींत हें माहीत असूनसुद्धां तूं त्यांना इथं यायचं आमंत्रण दिलंस— मायेच्या पाशांत सांपडलीस — तुला उगीच वाटलं होतं कीं हे लोक नुसतं तोंडानं बोलतात — तसं कांहीं करीत नाहींत — इथंच झाली तुझी चूक — अन् फटका बसला तो याचमुळं. "

" असं झालं खरं. " दयामयी म्हणाली, " पण ही लग्नाची गोष्ट ऐकून तुला शिसारी नाहीं आली विपिन ? तुला काय वाटतं तें सांग ना ? "

" अजून कांहीं त्यांचं लग्न झालं नाहीं. " विप्रदास हंसून म्हणाला, पण झालं तरी त्यांना आम्हीं नांव ठेवणं योग्य नाहीं आई. उलट आपल्याला अभिमानच वाटला पाहिजे. ज्या गोष्टीवर विश्वास आहे ती उघड उघड करून दाखवण्याचं धैर्य आहे त्यांना. कुणाला फसवीत नाहींत ते. मी कलकत्त्याला पाहिलं आहे, बोलण्याचंच अवडंबर मोठं — कांहीं मानीत नाहींत म्हणतात— जातीभेदावर विश्वास नाहीं म्हणतात — शिवीगाळ करतातही पुष्कळ — पण प्रसंग आला कीं तोंड लपवतात. शोधूनसुद्धां सांपडत नाहींत कुठं — अशा लोकांचा सर्वांपेक्षां मला राग येतो. रागावूं नकोस आई, तुझा द्विजू आहे या जातीचा. "

त्याचें तें भाषण ऐकून दयामयीला तितकेंसें कांहीं वाईट वाटलें नाहीं.

द्विजूच्या बाबतींत ती म्हणाली, " तो आहेच तसा दगलबाज ! पण असं पहा विपीन, तुला वंदनेबद्दल जर तसं कांहीं वाटत नाहीं तर तिच्या हातचं कांहीं खात नाहींस कसा ?— तिला सैंपाकघरांत मी जाऊं दिलं तेव्हांपासून तूं तिथं जेवायला जायचं बंद केलंस. माझ्याच खोलींत येऊन जेवूं लागलास दुसऱ्या कुणाच्या नसेल ध्यानांत आलं — पण मला कळलं नाहीं असं का वाटलं तुला ? "

" तुला कळलं नाहीं तर मग तूं आई कसली ? " विप्रदास म्हणाला, " पण मी खरोखरच जात मानतों ना आई ? मग तिच्या हातचं कसं खातां येईल मला ? ज्या दिवशीं हे भेदाभेद सोडून देईन त्या दिवशीं उघड उघड तिच्या हातचं खाईन. एवढीसुद्धां लपवालपवी करणार नाहीं. "

दयामयी म्हणाली, " मी या साऱ्या गोष्टी तिच्या नजरेला येऊं नयेत म्हणून कसं पांघरूण घालीत होतें याची तुला कल्पना यायची नाहीं विपीन. ती

इथं येवो कीं न येवो, पण हें कांहीं तिला कळूं देऊं नकोस हं. फार लागेल तिच्या मनाला तें. तुझ्यावर फार भक्ति आहे तिची !—" शेवटचीं वाक्यें उच्चारतांना तिचा कंठ सद्गदित झाला होता.

विप्रदास हंसत म्हणाला, " माझ्यावर तिची भक्ति आहे कीं नाहीं तें कांहीं मला माहीत नाहीं आई—पण तिच्या हातचं मीं कांहीं खात नाहीं हें मात्र तिला नक्की माहीत आहे. "

" एवढी अभिमानी मुलगी—हें सारं कळूनसुद्धां तुझ्यावर तिची एवढी भक्ति कशी ? याचा अर्थ काय ? "

" भक्तीच्या गोष्टी तुझ्या तुलाच माहीत आई. मला एवढंच कळतं कीं ती अत्यंत बुद्धिवान आहे. तुझी ही सारी लपवालपवी फुकट आहे तिच्याजवळ. "

क्षणभर उगीच राहून दयामयीनें आपल्या मनाशीं पडताळा पाहिला आणि म्हटलें, " म्हणूनच मला वाटतं ती एवढी पिडापीड करीत होती ? "

" कसली पिडापीड ? "

दयामयी म्हणाली, " मी विधवा माणूस. नुसता भात खातें तें तिला माहीत होतें. पण तिचं समाधान होत नव्हतं. मार्केटमधून रोज नव्या भाज्या आणी, स्वतः चिरून देई, सैंपाकीणबाईला दाखवून देऊन रोज आपल्या मनासारखं करून घेई तेव्हां उगी राही. समोरासमोर जिथं चालत नाहीं तिथं दुसऱ्याकरवीं लांच द्यावा लागतो हें कळत होतं तिला. असला सैंपाक सैंपाकीणबाईनं बापजन्मीं कधीं रांधला नव्हता ! जेवीत होतास तेव्हां तें वाटत नव्हतं तुला ? "

विप्रदासनें हंसत हंसत उत्तर दिलें, " नाहीं आई, मी एवढं लक्ष दिलं नाहीं. मधून मधून मला नुसतं वाटे, कीं तुझ्या त्या पाहुण्यांच्या सैंपाकघरांतल्या भरपूर सैंपाकांतून आमच्या सैंपाकघरांत चारदोन थेंब येऊन पडत असावेत. पण हें दैवानं घडत नव्हतं, कुणातरी माणसाच्या इच्छेनं घडत होतं हें आतां कळलं तेव्हां आनंद वाटला !—आतां तुझा शेवटचा काय हुकूम द्यायचा आहे तो देऊन टाक पाहूं. गाडीची वेळ झाली. आतां मला निघालंच पाहिजे. त्यांचं आमंत्रण कायम आहे कीं रद्द केलं, तें सांग पाहूं ! "

" तुझं काय म्हणणं आहे सूनबाई ? " दयामयी सतीला उद्देशून म्हणाली.

लहानपणीं सती सासूच्यासमोर नवऱ्याबरोबर बोलत असे. पण आतां मोठेपणीं तें बंद झालें होतें. अशावेळीं ती सटकून निघून जाई किंवा मुकाट्यानें बसे. पण

आज ती बोलली,—अगदीं हळुहळु बोलली, "जाऊं दे. त्यांना इथं आणण्यांत कांहीं अर्थ नाहीं."

तिचें तें उत्तर ऐकून सासूला फारसें बरें वाटलें नाहीं. मनांत होतें एक, पण तसें बोलतां येत नाहीं म्हणून ती वेगळेंच बोलली असें तिला वाटलें. ती म्हणाली, "मोठ्याघरची सून कीं नाहीं ! दिमाख आला वाटतं ?"

"नाहीं आई दिमाख नव्हे; पण आजवर आपल्या ज्या चालीरीती चालत आल्या आहेत तसंच वागायचं, म्हणजे त्यांना इथं बोलावून आणणं कांहीं योग्य नाहीं."

"कां योग्य नाहीं ? एक चूक झाली. पण चुकीची दुरुस्तीच का करायची नाहीं ?"

"नाहीं म्हणत नाहीं मी—पण जरूर काय ? पूर्वीं किती वेळ तरी ती येणार येणार म्हणत होती. त्यावेळीं आम्हीं होय म्हटलं नाहीं. आतां तसंच पूर्वींप्रमाणं चाललंय. ती आंत येते म्हणून यांनीं सैंपाकघरांत पाऊल टाकायचं सोडलं—अशा माणसाला इथं आणण्यांत काय फायदा ?"

"ही तक्रार करायची तिनं !—तूं नव्हे !" असें म्हणून विप्रदास हंसत सुटला. "तरी सुद्धां वंदना माझ्यावर भयंकर भक्ति करते, साक्ष आहे खुद्द आई."

सतीनें त्याच्या तोंडाकडे पाहिलें. समोर सासू आहे हें ती विसरली असावी—ती म्हणाली, "नुसत्या आईंच कां, मी सुद्धां आहें साक्ष. जिथं भक्ति असते तिथं बायकांची जात कधीं तक्रार करीत नाहीं. देवदेवता काय कमी छळ करताहेत—पण पूजा कुणी बंद करीत नाहीं.—म्हणतात, संकटं येतात तीं कल्याणासाठींच—" सासूला उद्देशून ती म्हणाली, "तुमच्यावर देखील तिची कांहीं कमी भक्ति नाहीं आई ! किती लोभ लागलाय तुमचा ? भाज्याबिजांची व्यवस्था ती करी, ती यांच्यासाठी असं तुम्हांला वाटत होतं ना ? तसं नव्हे बरं ! जें कांहीं ती करीत होती ती तुम्हां दोघांसाठीं – दोघांचीही माया वाटत होती म्हणून. त्यानंतर तुम्हीं सैंपाकघराचा भार तिच्यावर टाकलात—काम दिलं सर्वांना खायला घालायचं—पण तुम्हांला वगळून इतरांना पंचपक्वान्नं घालणं कांहीं तिला पटलं नसतं आई !—सर्वांनाच नुसता भात खावा लागला असता. पण आतां कशाला उगीच ही उठाठेव हवीय ? जी आशा होती ती आतां गेली आहे. ती आतां पुनः यायची नाहीं आई !" असें म्हणून सती एकदम तिथून निघून गेली.

दोघेंही आश्चर्यानें थक्क झालीं. अशा प्रकारें नित्याची पद्धति सोडून सती कधींही बोलणार नाहीं हें माहीत असल्यामुळें तिचें भाषण ऐकून त्यांनाच आश्चर्य वाटलें.

" काय झालंय आई ? " विप्रदासनें विचारलें.

" कांहीं कळत नाहीं बाबा ? " दयामयी म्हणाली.

" कसली आशा होती वंदनेच्या बाबतींत ? आणि निराशा कसली झाली ? "

दयामयीला मनांतल्या मनांत फार लाज वाटली. आपला संकल्प काय होता तें उघड बोलून दाखवणें तिला शक्य झालें नाहीं. ती नुसती म्हणाली " आतां कशाला हवं तें ? केव्हांतरी सांगेन—आज नको. "

" असं पहा आई. अक्षयबाबूंच्या मुलीच्या बाबतींत कांहीं निश्चित केलं का ? त्यांना कांहींतरी उत्तर दिलं पाहिजे. "

" माझी कांहीं हरकत नाहीं विपीन – त्यांना पटलं कीं झालं. द्विजूलासुद्धां विचारून पहा तो काय म्हणतो तें "—असें म्हणून ती एकदम तिथून निघून गेली.

विप्रदास घोटाळ्यांत पडला. स्पष्टपणें विशेष कांहीं कळलें नाहीं, पण स्पष्ट करून घ्यायला आतां वेळ नव्हता.

विप्रदास कलकत्त्याला आला त्यावेळीं घर खालीं झालें असल्याचें त्याला दिसून आलें. वंदना आणि तिचा बाप तर सुमारें एक तासापूर्वी निघून गेलीं होतीं. तीं जातील अशी त्याची अपेक्षा नव्हती असें नाहीं पण इतक्या लवकर जातील असें वाटलें नव्हतें. निश्चित कारण त्याला कळलें नाहीं. कळलें तें एवढेंच, कीं रायसाहेबांना जाण्याची तेवढीशी घाई नव्हती—केवळ मुलीनें आग्रह करून बापाला ओढून नेलें.

तसें पाहिलें तर वंदनेवर कुणाची कांहीं सक्ति नव्हती. मुद्दाम रहाण्याची जबाबदारीही नव्हती. ती पाहुणी म्हणून आली होती—पण कुणाचा निरोप न घेतां आजारी असलेल्या द्विजदासला बेफाम स्थितींत टाकून घाईघाईनें ती निष्कारण निघून गेली, ही गोष्ट त्याच्या मनाला फार लागून राहिली. त्याला राग आला म्हटलें तरी चालेल—या निष्ठुर निदर्यपणाबद्दल तिला शिक्षा करावी

असें देखील क्षणभर त्याच्या मनांत आलें असावें. तें उघड करून सांगणें हा त्याचा स्वभाव नव्हता म्हणून त्यानें तें मनांतल्या मनांत ठेवलें.

तीनचार दिवसांनंतर विप्रदास हायकोर्टांत गेला होता, तो अंगांत सडकून ताप भरून घरीं आला. म्हटला तर मलेरिया नाहींतर दुसराही कसला तरी ताप असणें शक्य होतें. डोळे लाल झालेले, मस्तकांत असा ठणका बसत होता कीं अन्नदा आली तेव्हां तिला तो म्हणाला, " अनुताई, कधीं मी आजारी पडत नाहीं—पुष्कळ दिवसांत या ज्वरासुराला टाळलं होतं – पण आज तो व्याजमुद्दल वसूल करणारसं वाटतं. वाटतंय, भोगावं लागणार बरंच. लवकर सुटका होण्याचं लक्षण नाहीं. "

त्याची ती अवस्था पाहून अन्नदा घाबरली. तरीही धीर देण्याचा आव आणून ती म्हणाली, " नाहीं दादा, या पुण्यवान देहावर दैत्यदानवाचा प्रभाव चालायचा नाहीं. दोन दिवसांत बरं वाटेल. आपलं डॉक्टरला बोलवावं हें बरं उगीच हेळसांड नको व्हायला. "

" मग बोलाव तर ताई. " असें म्हणून विप्रदासनें अंथरूण धरलें.

अन्नदा बिचारी संकटांत पडली. तिकडे गांवाकडून वासुदेव एकाएकीं आजारी पडल्याची बातमी आल्यामुळें कालच द्विजदास गांवीं गेला होता. दत्तमहाशय शहरांत नव्हते – धन्याच्या कामासाठीं ढाक्याला गेले होते. बिचारी एकटी काय करणार होती ? अस्वस्थ हीऊन ती विप्रदासकडे आली आणि म्हणाली, " असं पहा विपीन, एक गोष्ट सांगतें—रागवायचा नाहींस ना ? "

" मी कधीं तुझ्यावर रागावलोंय का अनुताई ? "

त्याच्या मस्तकावरून हळूहळू हात फिरवीत अन्नदा म्हणाली, " तुझ्या सेवाशुश्रुशेसाठीं जीव टाकून झटेन. पण मी बेडीभोळी बायको – कांहींच कळत नाहीं मला. गांवीं कळवावं तर मुलगा आजारी आहे त्याला तसाच टाकून सूनबाई येणार कशी ? वंदनाताईला कळवलं तर नाहीं का चालायचं ? "

विप्रदास हंसून म्हणाला, " बोलावल्याबरोबर यायला मुंबई म्हणजे कांहीं पलीकडली गल्ली नाहीं ! मीठ पिकून येईपर्यंत आमटीच खपून जायची कदाचित—ती भानगड नको. "

" इडापीडा टळो ! " जीभ चावून अन्नदा म्हणाली, " असं कांहीं अभद्र बोलूं नकोस बाबा. मुंबईला कांहीं जायला नको - वंदना कलकत्त्यांतच आहे. "

" वंदना कलकत्त्यांतच आहे ? "

" हो. तिच्या मावशीच्या घरीं बालीगंजमधें. तिचा मावसा पंजाबला बडा डॉक्टर आहे. मुलीच्या लग्नासाठीं तो इकडे आला आहे. ते गाडींतून उतरत होते आणि ही मुंबईला जायला गाडींत चढत होती त्यावेळीं अचानक हावरा स्टेशनवर गांठ पडली. मावशीनं बोलावलं. त्यांना आपल्या घरीं ओढून नेलं. दैवयोगानं भेट झाली, तेव्हां आतां मुलीचं लग्न झाल्याशिवाय जाऊं द्यायचं नाहीं म्हणून ती म्हणाली. एकच दिवस राहिल्यावर वंदनेच्या बापाला त्यानीं जाऊं दिलें. "

" तूं ओळखतेस का या मावशीला ? " विप्रदासनें विचारलें.

" हो. आपलीसुद्धां ती दुरून दुरून मावससासूच होते ना ! तशी फारशी गांठभेट झालेली नाहीं खरी—पण किती झालं तरी तीं आपलींच माणसं आहेत."

" पण हें तुला सारं कसं कळलं अनुताई ! "

" काल ती मंडळी फिरायला निघाली होती तेव्हां द्विजूच्या खबरीला आली होती. वरच्या गच्चींत बसून काल मी नातीसाठीं कपडे शिवीत होतें. पहातें तों बाहेर दोन गाड्या आलेल्या. बायकापुरुष बरेच होते. म्हटलं कोण मंडळी ? डोकावून पहातें तों आमची वंदनाताई—पण अगदींच बदललेली. पोषाखबिशाख असा केला होता, कीं सहजासहजीं मी ओळखलं नसतं. जशी कांहीं ती म्हणजे ती नव्हेच. आतां म्हटलं, कशी यांची उठाबस करूं ? मोठ्या काळजींत होतें. इतक्यांत वंदना आली वर. सर्वांना भेटली. सर्वांची खबर काढली तिनं—अन् स्वतःचीही खबर दिली सर्वांना—तेव्हां तिच्याच तोंडून कळलं, कीं कमींत कमी महिनाभर तरी ती कलकत्त्यांत रहाणार. खुशाल आहें म्हणाली. नाटक सिनेमा, हिंडणं फिरणं, वनभोजनं—पारावार नाहीं मजेला ! रोज कांहीं तरी नवीन नवीन चाललेलं—"

" वासू आजारी असल्याचं सांगितलंस का तिला ? " विप्रदासनें विचारलें.

" हो सांगितलं तर. सांगितलं तेव्हां ती म्हणाली, विशेष कांहीं नाहीं त्यांत. होईल बरा. "

विप्रदास क्षणभर उगीच राहिला आणि नंतर म्हणाला, " तिला कळवून काय व्हायचंय अनुताई ? होईन बरा ! हे थोडे दिवस निभावून नेणं तुला एकट्याला नाहीं का झेपायचं ? "

" अन्नदा बळेबळेंच म्हणाली, " झेपेल रे बाबा. तरीपण वाटतं, एकदां

कळवलेलं बरं. नाहींतर उद्यां सूनबाईला तेवढंच वाईट वाटायचं. किती झालं तरी बहीण ना ती ?"

"पत्ता माहीत आहे ?"

"आपल्या शोफरला माहीत आहे. तोच गेला होता त्यांना पोंचवायला."

विप्रदास कितीतरी वेळ उगीच राहिला होता. त्यानंतर म्हणाला, "ठीक आहे. एकदां कळव तिला. पण एवढ्या गमती मौजा सोडून ती येईल का ? मला तरी वाटत नाहीं !"

"मलासुद्धां संशयच वाटतो बाबा." अन्नदा म्हणाली, "तो तिचा पोषाख-विशाखच येतोय माझ्या नजरेसमोर. पण एकदां बोलावणं पाठवतें."

फारशी उत्सुकता न दाखवतां थकल्या वाणीनें विप्रदास म्हणाला, "पाठव बोलावणं —तेंही तुला वाटतंय म्हणून हो !"

१७

हावरा स्टेशनवर अचानक मावशीची भेट झाली त्यावेळीं मुंबईचें जाणें तहकूब करून वंदनेला पुनः घरीं आणणें मावशीला फारसें कठीण गेलें नाहीं. मुलीच्या लग्नासाठीं ती पंजाबमधून इकडे मुद्दाम आली होती. मावशीच्या आग्रहाला कबूली द्यायचें अस्सल कारण वंदनेच्या दृष्टीनें वेगळेंच होतें. लहानपणापासून वंदना परदेशांत वाढली होती. तिचें शिक्षण वगैरे जें कांहीं झालें होतें तें परप्रांतांतच. ज्या समाजांत तिच्या लग्याबांध्यांची बरीचशी मंडळी होती त्या कलकत्त्यांतील नातेवाईक मंडळीशीं अजून तिचा तितकासा परिचय झाला नव्हता. जो कांहीं परिचय झाला होता तो केवळ वर्तमानपत्र, मासिक पुस्तक आणि साधारणपणें वाङ्मयांतील गोष्टी कादंबऱ्यांच्या द्वारें. वारंवार कलकत्त्याला ये जा करणाऱ्या मुंबईच्या माणसांकडून तोंडातोंडीं बऱ्याचशा गोष्टी तिच्या कानीं आल्या होत्या. ॲनिटा चर्टजी एम्. ए., विनीटा बॅनर्जी बी. ए., अनुसूया, चित्रलेखा. प्रियवन्दा वगैरे वगैरे भरगच्च नांवें आणि त्यांच्या भरगच्च गोष्टी —विसाव्या शतकांतील अत्यंत आधुनिक अशा मनोभावना आणि रोमांचकर जीवनांचीं वर्णनें पुस्तकांतूनच तिला परिचित झालीं होतीं. पण त्यांतलीं किती खरीं आणि किती खोटीं याचा पडताळा मुंबईसारख्या दूर देशांतून अचुकपणें घेणें तिला तरी कठीण गेलें होतें.

आपल्या समाजांतील कोणतीं चित्रें आपल्या दृष्टीनें अतिरंजित होतीं आणि कोणतीं अस्वाभाविक वाटत असल्यामुळें फिकीं पडत होतीं, याचा प्रत्यक्ष परिचय अगदीं स्पष्ट आणि सत्य स्वरूपांत घेण्याची संधी, मावशीची मुलगी प्रकृति हिच्या लग्नाच्या मिषानें, लाभत आहे असें दिसून आल्यामुळें वंदनेला या आग्रहाची उपेक्षा करावी असें वाटलें नाहीं. तिनें एकदम संमती दिली आणि वालीगंजमधल्या त्यांच्या घरीं ती येऊन हजर झाली.

या कुटुंबाचा पुष्कळांशीं निकटचा परिचय होता. प्रकृति ही इथल्याच शाळा कॉलेजांत शिकून बी. ए. झाली होती. तिच्या मित्रमंडळीचा परिवारही अगदींच थोडाथोडका नव्हता. आल्यापासून याच गोतावळ्यांत वंदनेचे कांहीं दिवस मोठ्या गडबडींत गेले. तिचा बाप अनाथ राय जरी मुंबईला निघून गेला होता तरी सुधीर होता कलकत्त्यांतच. आगामी विवाहाची गडबड धांदल रोज चालली होती. वेलघरमधल्या एका बागेंत पिकनिकसाठीं गेल्यावेळीं सारी मंडळी जेव्हां परत घरीं यायला निघाली त्यावेळीं द्विजदासची चौकशी करण्यासाठीं ती त्याच्या घरीं गेली होती. तीच ही हकिकत अन्नदेनें विप्रदासला सांगितली.

मावशीच्या घरच्या गोतावळ्यांत येणाजाणारांची, खाणापीणाऱ्यांची, सल्ला-मसलत घेणाऱ्यांची वर्दळ कांहीं थोडीथोडकी नव्हती. आज बऱ्याच लोकांना चहाचें आमंत्रण होतें. पाहुणे येऊन हजर झाले होते. माडीवर चहापानाची धूमधाम चालू होती. इतक्यांत विप्रदासच्या घरची भली मोठी मोटार येऊन दारांत उभी राहिली. दारावरचे नोकर घाईघाईनें सामोरे आले—पण शोफरनें दरवाजा उघडतांच जी प्रौढ बाई खालीं उतरली तिचा पोषाख पाहून सारेच आश्चर्यचकित झाले. मोटर आणि मोटरींत बसणारें माणूस यांचा मेळ पडत नव्हता. अन्नदा नेसली होती एक साधी साडी—तसलीच एक साधी जाडी-भरडी शाल पांघरली होती तिनें—अनवाणी पायीं, रिकाम्या हातानें, माथ्या-वरचा पदर कपाळापर्यंत ओढून घेऊन ती ज्यावेळीं उतरली त्यावेळीं ती स्वतःच लाजेनें चूरमार झाली होती. नोकरांच्या अंगावरचे कपडे आणि पगड्या पाहिल्यावर ते कोणत्या देशचे आहेत याची तिला कल्पना करतां येईना. समोरच दिसणारा एकजण बंगाली असावा असा अंदाज करून अन्नदेनें त्याला प्रश्न केला, "वंदना ताई आहे का घरीं ?"

बंगालीच होता तो. तो म्हणाला, "हो, आहेत. त्या चहा घेताहेत वर. आपण आंत येऊन बसा."

"नाहीं—मी इथंच उभी रहातें. तिला जरा कळवतां का जाऊन ?"

"कळवतों. काय सांगायचं ?"

"म्हणावं विप्रदासबाबूंच्या घरून अन्नदा आली आहे."

शिपाई निघून गेला. थोड्याच वेळांत वंदना खालीं आली आणि अन्नदेचा हात धरून तिला ओढून आंत घेऊन गेली. आजवर असें कधीं झालें नव्हतें. ही एक गरीबशी विधवा—त्या घरची एक दासी—तिला असें हात धरून ओढून नेणें म्हणजे समाजदृष्ट्या योग्य नव्हे हें सुद्धां ती विसरली.

अगदीं उगीचच तिचे डोळे भरून आले. ती म्हणाली, "तूं अशी माझ्या खबरीसाठीं येशील असं मला वाटलं नव्हतं अनुताई. वाटलं होतं, कीं तुम्ही सारीं विसरून गेलां मला."

"कशी विसरेन ताई ? विसरणार नाहीं बरं. बडेबाबूंनीं मला पाठवलंय आपल्याकडे—"

"नाहीं अनुताई. मला 'आपण' म्हणशील तर मी एक शब्दसुद्धां बोलायची नाहीं."

उगीच आढेवेढे न् घेतां अन्नदा नुसती हंसली आणि म्हणाली, "सारे माझ्या अंगाखांद्यावर वाढलेले म्हणून त्यांना मी अरेतुरे म्हणतें—किती झालं तरी मी त्या घरची नुसती मोलकरीणच ना ?"

"राहूं दे तें !" वंदना म्हणाली, "मुखर्जी महाशय पांचसहा दिवसांपूर्वी आले ना कलकत्त्याला ?—त्यांना स्वतः यावं असं नाहीं का वाटलं ? मी मुंबईला गेलें नाहीं तें कळलं असेल ना त्यांना ?"

"हो. मींच सांगितलं त्यांना. पण त्यांचा कामाचा जंजाळ केवढा मोठा आहे तें माहीत आहे ना तुला ? एक घडीची सुद्धां फुरसत नव्हती त्यांना."

तें उत्तर ऐकून वंदना कांहीं खूष झाली नाहीं. ती म्हणाली, "साऱ्यांनाच कामं असतात अनुताई. आम्ही निघून गेलों तेव्हां गृहस्थपणा दाखवायच्या मिषानं त्यांनीं तुला पाठवलं. नाहींतर तेवढंसुद्धां केलं नसतं. त्यांना म्हणावं, माझ्या मावशीच्या घरीं त्यांच्यासारखं ऐश्वर्य नाहीं खरं, पण एकदां माझी खबर घेण्यासाठीं या घरांत पायधूळ झाडली असती तर कांहीं बाट आला नसता त्यांना—कीं मोठेपणाही कोसळला नसता त्यांचा !"

या साऱ्या तक्रारींचीं उत्तरें देत बसण्याच्या मनःस्थितींत अन्नदा नव्हती. घरीं परत जाण्याची घाई असल्याचा तिनें उल्लेख केला आणि घरीं येण्याचा

आग्रह केला त्यावेळीं वंदना मधेंच म्हणाली, " नाहीं अनुताई, तें शक्य नाहीं. सध्यां कुठं जायला मला वेळ नाहीं. उद्यांचा दिवस गेला कीं परवां माझ्या बहिणीचं लग्न आहे. "

" परवां ? "

" हो. परवां. "

अशा वेळीं विप्रदास आजारी असल्याबद्दल तिला कळवावें कीं नाहीं याचा अन्नदा विचार करीत होती. तितक्यांत वंदनेनें बोलायला सुरवात केली, " कुणी हुकूम दिला तुला, मला घेऊन ये म्हणून ? छोटेबाबू इथं नाहींत तें माहीत आहे मला. बड्याबाबूंनीं वाटतं ? त्यांना जाऊन सांग, कीं ही हुकूम सोडायची त्यांची संवय आतां फार झाली. हुकूम सोडल्याबरोबर निघून यायला मी कांहीं त्यांची आश्रित नाहीं, कीं त्यांच्या जमीदारीची रयतही नाहीं ! —ताई खुशाल आहे ना ? "

" हो. खुशाल आहे. "

" अन् बाकीची मंडळी ? "

अन्नदा म्हणाली, " मुलगा आजारी आहे म्हणून कळलं. "

" कोण आजारी ? वासू ? काय झालंय त्याला ? "

" तें मला नीटसं माहीत नाहीं ताई. "

वंदना अस्वस्थ झाली—पण काळजी वाटत होती तरी उघड म्हणाली, " तिकडे मुलगा आजारी असतांना मुखर्जीमहाशयांना इथं कसं बसून रहावतं ? मुलापेक्षां पैसारुका अन् दावादरखास्ती जास्त वाटतात का त्यांना ? जनाची नाहीं तरी मनाची तरी लाज पाहिजे ! "

" पैशाची ओढ नव्हे ताई—" अन्नदा म्हणाली, " आज दोन दिवस ते स्वतःच अंथरूण धरून आहेत. ते स्वतः आजारी आहेत म्हणून मुलगा आजारी असल्याचं त्यांना कळवलं नाहीं अजून. दत्तमहाशयसुद्धां इथं नाहींत. ते गेले आहेत ढाक्याला ! मी खुळीभोळी बायको माणूस—कांहीं कळत नाहीं मला ! दुखणं बळावलं तर काय करावं याचीच भीति पडलीय मला. विपिन कधींच आजारी पडत नाहीं म्हणूनच मी घाबरलें आहें. एवढं हें लग्न उरकलं कीं येशील ना ताई ? "

वंदनेचा चेहरा एकदम उतरला. ती घाबरून म्हणाली, " डॉक्टर आले होते ? काय सांगितलं त्यांनीं ? "

अन्नदेचे डोळे पाण्यानें भरून आले. एकदम, वंदनेचा हात दाबून धरून ती म्हणाली, "हे दोन दिवस कसेबसे पाहून घेतें पण लग्न उरकलं म्हणजे येशील ना तूं ? कीं अशीच राग धरून रहाणार आहेस ? कुठं काय बिघडलं नि तूं निघून आलीस तें मला कांहीं माहीत नाहीं—अन् तें मला कळायलाही नको ! चूक झाली असेल ती कुणाचीही असो – पण विपिनची नव्हे खास. त्याच्या नकळत कांहीं झालं असलं तर !—पण त्याला माहित असतांना कसलीच चूक व्हायची नाहीं ताई. "

क्षणभर थांबून वंदना एकदम उठून उभी राहिली आणि म्हणाली, " चल मी आलेंच. "

" आत्तां ? अशीच ? "

" हो—अशीच तर काय ? "

" घरीं सांगायचं नाहीं कुणाला ? तीं काय म्हणतील ? "

" आतां सांगायला गेलें तर उगीच वेळ जाईल अनुताई. चल तूं. " असें म्हणून उत्तराची अपेक्षा न करतां ती एकदम जाऊन मोटरींत बसली. दारावरच्या शिपायाला खुणेनें जवळ बोलावून तिनें सांगितलें, " मावशीला सांग, कीं मी ताईच्या घरीं गेलें आहें. विप्रदासबाबू तिथं आजारी आहेत. "

ज्यावेळीं वंदना विप्रदासच्या खोलींत आली त्यावेळीं संध्याकाळ झाली होती खरी पण दिवे लावणीची वेळ झाली नव्हती. एकावर एक उशा चढवून भिंतीला टेकून बिछान्यांत बसला होता. त्याच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर तो बराच आजारी असेल असें वाटलें नसतें. त्याला पहातांच तिचा जीव खालीं पडला. ती म्हणाली, " नमस्कार मुखर्जीमहाशय. ताई इथं असती तर ती रागावली असती—वडिलांच्या पायाला हात लावून नमस्कार केला नाहीं म्हणून ! पण हात लावतांना भीति वाटते—शिवाशीव व्हायची ! "

विप्रदास कांहीं बोलला नाहीं. नुसता हंसला.

वंदना म्हणाली, " मला बोलावलं ? शुश्रूषेला ना ? औषध घ्यायची वेळ झाली आहे म्हणून अनुताई म्हणाली. पण हें काय ? डॉक्टरी औषधाची बाटली दिसतेय ! वैद्यबुवांच्या गोळ्या कुठं आहेत ? डॉक्टरला आणायची सल्ला कुणी दिली आपल्याला ? "

विप्रदास म्हणाला, " आपल्याकडे ' डेंपो ' कुणाला म्हणतात ते माहीत आहे तुला ? कां म्हणतात माहीत आहे ? "

" माहीत आहे बरं महाराज. " वंदना म्हणाली, " स्वतः माणूस असून जो माणूसघाण्या असतो त्याला नांव देतात तें. तसल्या माणसापेक्षां मोठा ' डेंपो ' कुणी सांपडेल का या जगांत ? "

" सांपडेल ! " विप्रदास म्हणाला, " खरं काय आणि खोटं काय हें ताडून पहाण्याइतका धीर ज्याला नाहीं, उगीच कुणावर तरी दोष लादून स्वतःची बहादुरी मिरवायची ज्याला संवय आहे, तो अन् या असल्या लोकांच्या मंडळांत कुणी शिरोमणी असेल तर ती तूं स्वतः ! "

" निष्कारण निर्दोषी माणसाला दोष कुणी दिला तें सांगून टाका एकदां. "

" तें मी सांगायला नको वंदना. वेळ आली कीं आपोआप कळेल. "

" ठीक आहे. त्या वेळेची वाट पहात रहातें तर ! " असें म्हणून खाटेजवळ एक खुर्ची ओढून घेऊन बसत वंदना म्हणाली, " आतां सांगा—कशी काय आहे प्रकृति ? "

" बरी आहे—पण अजून ताप आहे. रात्रीं थोडा वाढेल असं वाटतं. "

" पण मला कां बोलावलंत ? माझ्या हातून काय होण्यासारखं आहे ? कसली जरूरी वाटली ? "

" जरूरी मला नव्हे—अनुताईला. घाबरली आहे ती. तिनंच मांगितलं मला कीं परवां तुझ्या बहिणीचं लग्न आहे. म्हटलं उरकलं कीं ये एक दिवस. तुझ्या ताईनं माझ्याकडे कांहीं निरोप दिला आहे तोही म्हटलं सुनावीन तुला. "

" आज नाहीं ? "

" नाहीं. आज नाहीं. "

एक दोन मिनिटें वंदना उगीचच बसून राहिली. त्यानंतर म्हणाली, " मुखर्जी महाशय, हें दुखणं तसं मोठं नाहीं—दोन दिवसांनीं बरं वाटेल. तरी माझी फारशी आवश्यकता नाहीं. तरी पण आपल्या शुश्रूषेचं ढोंग करून इथंच रहाणार म्हणतेंय. पुनः कांहीं जाणार नाहीं तिकडे. माझी ट्रंक आणायला माणूस पाठवलाय. आपली कांहीं हरकत नसावी. "

" कसली हरकत वंदना ? " विप्रदास हंसून म्हणाला, " तूं इथं रहायच्या वावतींत ? पण तिकडे तुझ्या बहिणीचं लग्न आहे ना ? "

" लग्न कांहीं माझ्याबरोबर लागायचं नाहीं. मी गेलें नाहीं म्हणून लग्न कांहीं खोळंबून रहायचं नाहीं ! "

" खरंच लग्नाला जाणार नाहींस ? "

"नाहीं."

"पण एवढ्यासाठींच ना कलकत्त्याला राहिली होतीस ?"

वंदना म्हणाली, "निघालें होतें मुंबईला. स्टेशनवरून फिरलें परत. पण तें एवढ्यासाठींच नव्हे. आज परदेशांत होतें, आपलीं माणसं कुणी परिचयाचीं झालीं नव्हतीं,—तोंडातोंडीं किती कांहीं ऐकत होतें, गोष्टी कादंबऱ्या वाचीत होतें—आजवर त्याचा मेळ घालून पहायला मिळाला नव्हता. वाटत होतं, साऱ्या साऱ्या समाजानं वाळींत टाकलेलीं आम्हीं – बहिष्कृत ! मावशीनं बोलावलं, मनाला वाटलं, प्रकृतीच्या लग्नाच्या मिषानं ही संधी सुदैवानं मिळाली आहे—पुनः अशी संधी यायची नाहीं—म्हणून परत आलें मुखर्जीमहाशय."

विप्रदास हंसून म्हणला, "पण आतां तें लग्नच तेव्हढं राहिलंय. गोतावळ्याच्या लोकांचा परिचय व्हायचा सुयोग मिळालाय कुंठ ?"

"पुरेसा योग मिळाला नाहीं खरा, पण जेव्हढा मिळाला आहे तेव्हढाच मला पुष्कळ वाटतोय."

"स्वतःच्या बरोबर एकदां पडताळा घेऊन पाहिलास का त्यांचा ? कितीसं जुळलं तें कळून आलं का तुला ? ऐकवशील का मला ?"

वंदना हंसत सुटली आणि म्हणाली, "आपण आधीं बरे व्हा, म्हणजे मग सांगेन सारी हकिकत विस्तारानं !"

नोकर दिवा लावून निघून गेला. उशाकडची खिडकी बंद करून वंदनेनें त्याला औषध दिलें. ती म्हणाली, "आतां बसणं पुरे झालं. आतां जरा आडवे व्हा."

सुरकुतलेला बिछाना झाडून पुसून स्वच्छ करून तिनें उशा नीट रचून ठेवल्या. विप्रदास बिछान्यावर आडवा होतांच तिनें पायापासून छातीपर्यंत त्याच्या अंगावर पांघरूण घातलें आणि म्हटलें, "उद्यां बरे झाल्यावर सारं कांहीं शुद्ध करून घ्यायला किती शेण, किती गोमुत्र आणि किती गंगाजल खर्च होणार आहे कोण जाणे !"

दोन्ही हातांनीं माप दाखवीत विप्रदास म्हणाला, "हें एव्हढं !—एकंदरींत सेवाशुश्रुषा करायची तुला थोडीबहुत माहिती दिसते. आश्चर्य आहे म्हणायचं !"

"थोडी बहुत कां ? हें चालायचं नाहीं बरं का मुखर्जीमहाशय. माझ्या बाबतींत यापेक्षां जरा जास्त चौकशी करून थोडी जास्त माहिती मिळवा."

"अर्थात्—"

"अर्थात्! आमची निंदाच करायची असली तर ती कळून सवरून केलेली बरी. असं डोळे झांकून वाटेल तें बोलायला द्यायची नाहीं मी तुम्हाला."

"हे 'आम्ही' कोण वंदना?" विप्रदासच्या चेहऱ्यावर थट्टेचें हंसू चमकत होतें. तो म्हणाला, "कुणाच्याबद्दल माहिती काढायला हवी? आतांच ज्या माणसांच्या मेळाव्यांतून पळून आलीस त्यांच्याबद्दल का?"

"कुणी म्हटलं मी पळून आलें म्हणून?"

"मी म्हणतों."

"कसं कळलं तुम्हाला?"

"कळलं तुझ्या चेहऱ्यावरून."

कांहीं वेळ त्याच्या चेहऱ्याकडे निरखून पाहिल्यावर वंदना म्हणाली, "एकदां द्विजूबाबू मला म्हणाला होता, कीं दादाच्या नजरेंतून कांहीं सुद्धां सुटणं कठीण!—त्यावेळीं मला तेव्हढंसं पटलं नव्हतं. आपण आजारी पडावं असं कांहीं मी मागणं मागितलं नव्हतं. पण आपल्या या आजारामुळें बरीचशी अक्कल आली मला. खरोखरच मी पळून आलें त्या गोतावळ्यांतून. आपण आजारी आहांत तोंवर इथंच राहीन आपल्याकडे, त्यानंतर सरळ घरांकडे निघून जाईन – यापुढं आतां मावशीच्या घरीं जाणार नाहीं. दूर होतें तोंवर वाटत होतं, कीं एकदां पाहून घ्यावं. आतां एकदां पाहून घेतलं. आतां यापुढं या लोकांच्या संगतींत एक दिवससुद्धां काढायची माझी तयारी नाहीं—"

विप्रदास नुसता तिच्याकडे पहात राहिला होता आणि ती बोलत होती, "—ऐकावं तेव्हां साडी, गाडी आणि खोट्या प्रेमाच्या गोष्टी. नैनीताल कुठं आहे अन् मसुरीचं हॉटेल कुठं आहे, तें कांहीं मला माहीत नाहीं; पण उठल्या-सुटल्या त्यांच्या तोंडून त्या नांवांचा पुनः पुनः उच्चार ऐकतांना मला शिसारी येऊं लागली. तीं नांवं घेतांना असा कांहीं झांकला उद्देश त्यांतून बाहेर पडे—ऐकतां ऐकतां वाटे, कुठंतरी एकदाचं पळून जावं! जसं कांहीं वावटळींतल्या धूळरेतींत सांपडून आजवर दिवसरात्र काढीत होतें, असं आतां या इथं बसल्या-वर वाटतंय मला. कशीं हीं माणसं असल्या या वावटळींत जगून राहातात मुखर्जीमहाशय?"

"तें मला कसं सांगतां येईल?" विप्रदास म्हणाला, "मला वाटतं, वैराण वाळवंटांत कबरी राहातात ना टिकून—तसंच हें."

"कसलं हें दुःखमय जीवन!" एक सुस्कारा सोडून वंदना म्हणाली, "नाहीं कुठं एव्हढी शांति, कीं नाहीं कुठं कसली धर्माची भावना. विश्वास नाहीं कशावरच—चाललाय नुसता वितंडवाद—" थोडावेळ थांबून ती म्हणाली, "सारखीं वर्तमानपत्रं वाचताहेत ना, तेव्हां त्यांना माहीत असतं खूपखूप! या अफाट जगांत कुठं काय चाललं आहे, हें सारं कांहीं त्यांना माहीत आहे. मी तसलं तें कांहीं वाचलेलं नाहीं त्यामुळं तीं काय बोलत होतीं तें निम्मेशिम्मे मला कळतच नव्हतं. ऐकतां ऐकतां शिसारी आली, कीं कुठं तरी एका बाजूला बसून कशीबशी सुटका करून घेत असें. मोठीं विलक्षण माणसं!—थकवा कसा तो माहीत नाहीं. सारखी बडबड—बडबडीचा मोठा कैफ आहे त्या लोकांना!"

"तुझे बाबा असते म्हणजे एकंदरींत बरं झालं असतं वंदना. वर्तमानपत्रांत काय आहे तें त्यांना विचारलं असतंस कीं सहज कळलं असतं अन् मग त्या लोकांपुढं मान खालीं घालावी लागली नसती."

हंसत हंसत होकार देत वंदना म्हणाली, "बाबांना तो नाद आहे खरा. साऱ्या बातम्या अथपासून इतीपर्यंत वाचल्याखेरीज त्यांचं समाधानच होत नाहीं. पण आम्हा बायकांना काय करायचंय या बातम्या घेऊन? रोज जगांत कुठं काय चाललंय याची उठाठेव आम्हांला कशाला?"

"हें असलं भाषण तुझ्या ताईच्या तोंडीं शोभेल वंदना. तुझ्या तोंडी नाहीं शोभत हें!—" असें म्हणून विप्रदास हंसला.

वंदना म्हणाली, माझ्या ताईपेक्षां त्यांना कांहीं जास्त कळतं, असं का वाटतं तुम्हांला? रिकाम्या कळशींतला आवाज आहे तो नुसता. त्याच्या अकलेची धांव कुठपर्यंत गेली आहे त्याचा अंदाज मी चांगलाच घेतला आहे मुखर्जीमहाशय?"

"पण ज्ञानाची आवड तर हवीच!"

"कांहीं नको. ज्ञानाच्या दिमाखानं तोंडच्या अमृताचं विष होत असतं. साऱ्या लहान मोठ्या माणसांना माझ्या ताईसारखं वात्सल्यानं वागवायचं कळतंय का त्यांना? मुळींच नाहीं. ताईसारखी श्रद्धाभक्तीची ओळख आहे का त्यांना? मुळींच नाहीं. जिवाभावाचे मित्र म्हणून कुणी आहेत का त्यांना? मला वाटतं, नाहींच. नुसता एकमेकांचा मत्सर. सारं अभावानं भरलेलं. बाहेरच्या झोकावरून आंतला पोकळपणा कळून येत नाहीं एव्हढंच. कशाला

एव्हढी बकाबकी चालली आहे या लोकांची ? सारं अंतरंग पोखरून अधू झालेलं आहे या लोकांचं. ”

विप्रदास पुनः हंसून म्हणाला, “ असं काय झालंय वंदना ? कसला एवढा राग हा ! कुणी पैशाच्या व्यवहारांत फसवलं का तुला ? ”

“ फसवलं नाहीं. उसने घेतलेयत. ”

“ किती ? ”

“ फार नाहीं — चार पांचशें. ”

“ नांवं माहीत आहेत का त्यांचीं ? ”

“ होतीं माहीत, पण आतां विसरलें ! ” असें म्हणून वंदना हंसत सुटली. ती उद्गारली, “ छी छी ! एव्हढ्या थोड्या परिचयांत कुणी कुणापाशीं उसनवारी करील असं नव्हतं वाटलं मला. मागायला जीभ वळते कशी यांची ? लाज शरमेची एवढीसुद्धां छटा नाहीं मागतांना. जसा कांहीं रोजचाच सराव आहे मागायचा. हें असं कसं होतं मुखर्जीमहाशय ? ”

विप्रदासची मुद्रा गंभीर झाली. क्षणभर स्तब्ध राहून तो म्हणाला, “ फार परिणाम झालाय तुझ्या मनावर वंदना. पण सारेच कांहीं तसे नाहींत. तुझ्या मावशीच्या घरचा हा गोतावळा म्हणजेच कांहीं सारा समाज नव्हे. या गोतावळ्याबाहेर आहेत ते जर आढळले, तर एक दिवस तुला कळून येईल आपोआप. ”

वंदना म्हणाली. “ पण हीं जीं माणसं भेटलीं तीं सारीं आहेत सुशिक्षित — चांगल्या दर्जाचीं — मोठमोठ्या लोकांचे लागेबांधे असलेलीं. गोष्टी कादंबऱ्यांच्या रंगवलेल्या भाषेनं सजलेलीं या माणसांचीं चित्रं दुरून पहात होतें. त्यावेळी किती सुंदर दिसत होतीं. केवढा अभिमान वाटत होता त्याबद्दल मला ! असं वाटत होतं, आमच्या स्त्रीजातीच्या मागासलेपणाचा आतां शेवट झाला. तो सारा भ्रम आतां दूर झाला मुखर्जीमहाशय. ”

“ भ्रम कसला ? ” विप्रदास म्हणाला, “ हे लोक भराभर पुढं चालले आहेत हें कांहीं खोटं नाहीं ! ”

तें ऐकून वंदना हंसली आणि म्हणाली, “ नाहीं. नाहीं. मुळींच खोटं नाहीं ! पण हीं माणसं संख्येनं थोडीं आहेत एव्हढीच समाधानाची गोष्ट आहे. जिकडे तिकडे शेतवाडीपासून, किल्ले बुरुजांवरून, याच माणसांचा पसारा मांडून ठेवणं जेव्हढं फुकट तेव्हढंच हास्यास्पद आहे. ”

विप्रदास म्हणाला, "हा आणखी एक तुझा नवा सनातनीपणा आहे. स्वधर्मत्यागांत मोठा धोका असतो बरं वंदना. सावध !"

त्याचे उद्गार कानीं न घेतां वंदना बोलत होती, "—या क्षुद्र टोळक्याच्या बाहेर आहे या बंगालचा प्रचंड महिला समाज. अजून तो मला पाहायला मिळाला नाहीं. कदाचित् असा बाहेरून पाह्यलासुद्धां मिळायचा नाहीं—तरी पण वाटतं, बंगालच्या प्रत्येक श्वासोच्छ्वासांत, साऱ्या वातावरणांत भरून राह्यलाय तो ! कांहीं अगदीं छोटे आहेत, तर कांहीं बडे आहेत. बड्यांचीं उदाहरणं म्हणजे माझी ताई अन् तिची सासू !—कलकत्त्याला आलें त्याचं सार्थक झालंसं वाटलं मुखर्जीमहाशय.—आपण हंसताहांत वाटतं ?"

"पैसा बुडाला कीं माणसाची जीभ कशी सैल सुटते, त्याचा विचार करतोंय मी. माझ्या अंगींसुद्धां आहे ना तो दोष ?"

"कसला दोष ? पैसा बुडाल्याचा होय ? या चार पांचशेंचीच बूड ?"

"असं वाटलं मला !"

"पैशाची मला पर्वा नाहीं." वंदना हंसून म्हणाली, "आतां आपली ही सेवा करतेंय त्याची मजुरी दामदुपटीनं घेतल्यावांचून सोडायची नाहीं. आपण नाहीं दिली तर आपल्या आईकडून घेईन !"

दारांतून डोकावून अन्नदा म्हणाली, आठ वाजले. जेवायची वेळ झाली विपिनची."

"चल अनुताई, आलें." वंदना अस्वस्थ होऊन म्हणाली, "कसं ? जाऊं ना मुखर्जीमहाशय ?"

"जा." विप्रदास हंसून म्हणाला, "पण सेवेंत अंतर पडलं तर मजुरी काटली जाईल."

"अंतर पडायची भीतीच नको बरं." असें म्हणून हंसत हंसत ती बाहेर निघून गेली.

१८

वंदना म्हणाली, "जेवण तयार आहे, घेऊन येऊं ?"

विप्रदास हंसून म्हणाला, "मला बाटवायचा सारा प्रयत्न चाललाय तुझा — पण अजून माझं संध्या आन्हिक झालं नाहीं. आधीं ती तयारी करून दे."

" मी स्वतः केली तरी चालेल ? "

नाहींतर आहे कोण इथं दुसरं ? आईच्या देवघरांत माझ्यानं जाववत नाहीं—देहांत तेवढी ताकत नाहीं—इथंच करून दे तयारी. तूं कशी काय तयारी करतेस तें आधीं पाहीन, कुठं कांहीं कमी पडतें कीं नाहीं त्याचा अंदाज घेईन अन् मग जेवायला तूं वाढायचं कीं भटजींनीं वाढायचं त्याचा विचार करीन. "

तें ऐकून वंदनेच्या देहावर रोमांच उभे राहिले. ती म्हणाली, " या साऱ्या अटी कबूल. पण या परीक्षेंत पास झालें तर उगीच कांहींतरी कारण काढून फेल ठरवायचं नाहीं बरं ! आधीं वचन द्या. "

" वचन देतों. पण मला आपल्या हातीं खायला घालण्यांत तुझा काय फायदा ? "

" तें मी सांगायची नाहीं ! " असें म्हणून वंदना घाईघाईनें निघून गेली.

आठदहा मिनिटांतच ती स्नान करून आली. येतांना तिनें पाण्याची भरलेली घागर आणली होती. पूर्वेच्या बाजूनें ज्या उघड्या खिडकींतून सूर्याचे किरण येत होते ती जागा तिनें पाण्यानें धुऊन काढली—स्वतःच्या पदरानें पुसून घेतली देवघरांतून कुशासन आणून त्या जागीं मांडलें—धूपदाणींत धूप घालून फिरवला—त्यानंतर विप्रदासचा घोतरपंचा आणि हात धुवायचें तस्त आणून ठेवल्यावर ती म्हणाली, " फुलं काढून आणून माळा गुंफायला आज वेळ नाहीं. नाहींतर त्या आणल्या असत्या. उद्यां ही उणीव रहायची नाहीं. आतां अर्ध्या तासाची मुदत देतें. जास्त नाहीं. आतां नऊ वाजलेयत— साडेनऊ वाजतां पुनः येईन. तोंपर्यंत कुणी आपल्याला विक्षेप करणार नाहीं. मी निघालें. " असें म्हणून दार बंद करून ती चालती झाली.

कांहीं न बोलतां विप्रदास नुसता पहात राहिला.

अर्ध्या तासानंतर वंदना जेव्हां परत आली त्यावेळीं संध्याआन्हिक उरकून विप्रदास एका आरामखुर्चीवर आडवा झाला होता.

" पास कीं फेल मुखर्जीमहाशय ? "

" पास, फर्स्टक्लास. आईलासुद्धां हार घ्यावी लागेल तुझ्यापुढं. कोण म्हणेल तुला म्लेंच्छ ?—कोण म्हणेल म्लेंच्छांच्या शाळाकॉलेजांत शिकून बी. ए. झाली आहेस म्हणून ? "

" तर मग आतां ताट घेऊन येऊं ? "

" आण. पण त्यापूर्वी हें सारं कांहीं नेऊन ठेवून दे. " असें म्हणून विप्रदासनें कुशासन वगैरेकडे बोट दाखवलें.

" तें मला सांगायला नको बरं महाशय ! " असें म्हणून पूजेची भांडीं उचलून ती हातीं घेत होती, तोंच खोलीच्या बाहेर बऱ्याचशा उंच टांचाच्या बुटांचे खट्खट् आवाज तिच्या कानीं आले—त्याचक्षणीं अन्नदा दारांतून डोकावून म्हणाली, " वंदनाताई, तुझी मावशी—"

बरोबर दोनतीन अल्पवयी मुली घेऊन मावशी एकदम आंत आली. उठून उभें राहून विप्रदासनें तिचें स्वागत केलें.

मावशी म्हणाली, " खालींच कळलं मला कीं विप्रदासबाबू आतां बरे आहेत—"

विप्रदास म्हणाला, " हो. आतां जरा बरं वाटतंय—" आलेल्या मुली वंदनेला पहातांच अत्यंत आश्चर्यचकित झाल्या. अनवाणी पाय — अंगांत कांहीं नाहीं — केंस भिजलेले — भिजलेली रेशमी साडी — ओले केस पाठीवर मोकळे सोडलेले — दोन्ही हातीं पूजेचें सामान — तिचें तें ध्यान पाहून त्या थक्क झाल्या. अशा स्वरूपांत ती दिसेल अशी त्यांना कल्पनासुद्धां नव्हती.

वंदना म्हणाली, " दार सोडून जरा बाजूला व्हा. हें एवढं ठेवून येतें. "

" शिवाशीव होईल वाटतं ? " एक मुलगी म्हणाली.

" हो ! " असें म्हणून वंदना निघून गेली.

थोड्या वेळानें ती त्याच वेषांत परत आली आणि विप्रदासच्या खुर्चीला धरून उभी राहिली.

मावशी म्हणाली, " आम्हाला कांहींच न सांगतां तूं निघून आलीस त्याबद्दल मी कांहीं म्हणत नाहीं. पण आज तुझ्या बहिणीचं लग्न. आज आलं पाहिजे तुला."

दोन्ही मुली म्हणाल्या, " आम्ही तुला धरून पकडून न्यायला आलों आहों."

वंदना म्हणाली, " नाहीं मावशी, मला येतां येत नाहीं. "

" हें काय बोलणं झालं वंदना ? तूं आली नाहींस तर प्रकृतीला किती वाईट वाटेल याची कल्पना आहे का तुला ? "

" आहे. तरीपण मला येतां येत नाहीं ! "

तिच्या भाषणाबद्दल मावशीला जितकें आश्चर्य वाटलें तितकाच संतापही

आला. ती तावातावानें म्हणाली, " मुंबईला जायचं तहकुब केलं ते एवढ्या-साठीच का ? तुझ्या बाबांनीं तुला आणून माझ्या हवालीं केली—त्यांना कळलं तर ते काय म्हणतील ? "

ती पहिली मुलगी म्हणाली, " शिवाय सुधीरबाबू, मिस्टर डाटा (दत्त) किती रागं भरतील ! तुम्हीं आलांत इथं तेंच आधीं त्यांना आवडलेलं नाहीं. "

वंदनेनें एकदां तिच्याकडे पाहिलें पण उत्तर दिलें मावशीला. ती म्हणाली, " मी नाहीं गेलें तर प्रकृतीचं लग्न कांहीं अडून पडायचं नाहीं. पण इथनं गेलें तर मुखर्जीमहाशयांची शुश्रुषा कोण करील ? सध्यां इथं कुणीच नाहींत त्यांच्या सेवेला. "

" पण आतां तर ते बरे झालेयत – त्यांनीं होऊन तुला जायला सांगावं हेंच योग्य — नाहीं का ? " असें म्हणून मावशीनें विप्रदासाकडे नजर फेकली.

" बरोबर आहे. " विप्रदास हंसून म्हणाला, " मी जायला सांगावं हेंही योग्य अन् वंदनेनं जावं हेंही योग्य. उलट न गेलं तर गुन्हा होईल तो. "

वंदना म्हणाली, " नाहीं—गुन्हा होईलसं वाटत नाहीं मला. आपण जा म्हणतांहां म्हणून मी जातें हवीतर. पण पुनः रात्रींच परत येईन. तिथं रहाणार नाहीं. आधीं हें कबूल केलं पाहिजे मावशीनं. "

" एक रात्रसुद्धां रहाणार नाहींस ? "

" नाहीं. "

" बरं आहे – कबूल ! " असें म्हणून मनांतल्या मनांत जळफळत मावशी सपरिवार निघून गेली.

" पाहीलंस ना ? " विप्रदास म्हणाला, " तुझी मावशी रागारागानं निघून गेली. पण एकाएकीं हें वेड कां आलं तुझ्या डोक्यांत ? "

" रागावून गेली नाहीं— " वंदना म्हणाली, " कांहीं तरी डोक्यांत वेड घेऊन मी जातेंय असं नाहीं. या माणसांच्या बाबतींत मला अगदीं तिटकारा आला आहे. आतां यापुढं तिथं केव्हांही जाऊं नयेसं वाटतंय मला मुखर्जीमहाशय. "

" हें भलतंच कांहींतरी बोलते आहेस वंदना. "

" भलतंच आहे कीं नाहीं तें सांगतां यायचं नाहीं. मी सारखं मनाला विचारून पहातें आहें—अगदीं पुरेपूर पटतंय मला—कीं तिथं गेल्यानं मला सुख वाटायचं नाहीं कीं समाधानही वाटायचं नाहीं. एकदां मुंबईला कपड्याची गिरणी पहायला गेलें होतें - पुनः पुनः तेंच आठवतंय मला—किती चक्रं, किती यंत्रं, मागपुढं, इकडं तिकडे, सारखीं घरघरत होतीं. जरा कुठं इकडचं तिकडे झालं, तर माणूस आंत अडकून चक्काचूर होईल असं वाटत होतं. तें सारं पहायला बरं वाटलं.--पण केव्हां एकदां त्या घरघरींतून बाहेर निघेन असंही वाटलं !—जाऊं दे. आतां उगीच उशीर नको. मी ताट घेऊन येतें तुमचं—" असें म्हणून ती बाहेर जायला निघाली तोंच समोर दाराजवळ पायाची धूळ आणि बूटांचे डाग तिच्या नजरेस पडले. ती थबकून उभी राहिली आणि म्हणाली, " जरा थांबलं पाहिजे आतां. एव्हां ताट आणतां यायचं नाहीं. नोकराला सांगून आधीं हें सारें धुऊन काढलं पाहिजे. " असें म्हणून ती जायला निघाली तेव्हां विप्रदास चकित होऊन म्हणाला, " वंदना, या बारीक-सारीक गोष्टी तूं शिकलीस कुणाकडे ? "

वंदनेला स्वतःलाच आश्चर्य वाटलें. ती म्हणाली, " कुणी शिकवल्याचं आठवत नाहीं मला ! " असें म्हणून ती क्षणभर स्तब्ध राहिली आणि नंतर म्हणाली, " नाहीं. कुणी शिकवलं नाहीं. आपोआपच कळूं लागलंय मला, कीं आपल्या सेवेंतली ही मोठीच बाब आहे. हें सारं नाहीं केलं तर खूट येईल माझ्या सेवेंत. " असें म्हणून ती निघून गेली.

तिसऱ्या प्रहरीं यथायोग्य पोषाक करून वंदना विप्रदासच्या खोलीच्या दारासमोर येऊन उभी राहिली आणि म्हणाली, " बहिणीच्या लग्नाला चाललेंय बरं मुखर्जीमहाशय. हट्टच धरला मावशीनं म्हणून जावं लागतंय. "

विप्रदास म्हणाला, " या हट्टाचं उट्टं काढायची संधी तुला लवकर मिळो असा माझा आशीर्वाद आहे. तेवढ्यासाठीं या मावशीला पंजाबांतून खेंचून मुंबईला घेऊन जा एकदां. "

" मावशीवर कसला राग ? न्यायचंच असलं तर आपल्यालाच नेईन खेंचून. भिऊं नका. गाडीभाडं आम्ही देऊं. आपल्याला नाहीं द्यावं लागणार. " असें म्हणून वंदना हंसली आणि म्हणाली, " परत यायला मला रात्र होईल पण सारी व्यवस्था करून ठेवून जातेंय. नाहीं ऐकलंत तर आल्यावर मी रागावेन हं ! "

"अर्थात रागावणारच्च ! नाहीं रागावलीस तरच आश्चर्य वाटेल सर्वांना. म्हणतील, लगीनघरीं ताव मारल्यानं प्रकृति बिघडली हिची—तेव्हांच अशी उगीच रहातेय."

वंदनेच्या चेहऱ्यावर हंसू झळकलें. ती मान हालवीत म्हणाली, "हीं माझीं स्तुतीस्तोत्रं पुरे झालीं. आतां संध्यापूजा करायची असली तर खालीं जाऊं नका मात्र. अनुताई सारं कांहीं आणून देईल इथं. त्यानंतर अर्घ्यां तासानं भटजी ताट घेऊन येतील इथं—त्यानंतर एका तासानं गडी औषध देईल अन् दिवा मालवून दरवाजा बंद करून निघून जाईल. सर्वांना असा हुकूम देऊन ठेवलाय. कळलं ?"

"हो. कळलं."

"तर मग आतां जातें."

"जा. आतां मात्र तूं जशी दिसावी तशी दिसतेस हें कबूल केलं पाहिजे मला. हा जो पोषाख केला आहेस तोच तुझा खरा पोषाख—इथं करतेस तो सारा कृत्रिम."

"हें काय बोलणं झालं ? बायकांनीं पायांत बूट घातले तर आपल्याला आवडत नाहीं असं सारीं सांगतात ना ?"

"खोटं सांगतात तें. तुझ्या हातचं मी खाणार नाहीं असं सांगतात, तसंच तें !"

आश्चर्यचकित होऊन वंदनेनें विचारलें, "खोटं कसं मुखर्जीमहाशय ? खरोखरच्च माझ्या हातचं खायला विरोध होता."

"विरोध होता—" विप्रदास म्हणाला, "पण तो विरोध खरा असता तर अजून असा टिकून राहिला असता—गेला नसता."

त्याच्या या प्रत्युत्तराचा अर्थ वंदनेला नीटसा कळला नाहीं. पण तो केव्हांही खोटं बोलणार नाहीं हें माहित असल्यामुळें ती म्हणाली, "दादाच्या मनाचा थांग कुणालासुद्धां लागायचा नाहीं असं द्विजूबाबू एकदां म्हणाले होते. नुसतं बाहेर दिसतं तेवढंच लोक पहातात—तेवढ्यावरूनच अंदाज काढतात—पण अंतरंगांत आहे तें आंतल्याआंत झांकून रहातं—असं त्यांनीं सांगितलं तें खरं का मुखर्जीमहाशय ?"

उत्तरादाखल विप्रदास नुसता हंसला आणि म्हणाला, "आतां तुला उशीर

होतोय वंदना. खरोखरच तिथं रहायचं नसेल तर राहूं नकोस. सरळ निघून ये."

"निघूनच येणार आहें मुखर्जीमहाशय. तिथं रहाणं शक्यच नाहीं मला."

असें म्हणून वंदना तशीच निघून खालीं गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं भेट झाली त्यावेळीं विप्रदासनें विचारलें, "बहिणीचं लग्न निर्विघ्न पार पडलं ना ?"

"हो पार पडलं. कांहीं विघ्न आलं नाहीं."

"स्वतःचा हट्ट चालवलास. मावशीचं ऐकलं नाहींस ! रात्रीं केव्हां आलीस ?"

"रात्रीं तीन वाजतां. मावशीचं ऐकणं शक्यच नव्हतं. रात्रींच आलें परत." असें म्हणून वंदनेनें कांहीं वेळ आपल्या मनाशींच विचार करून पाहिलें, जें बोलावें असें तिला वाटत होतें तें बोलावें कीं नाहीं, असा प्रश्न तिला पडला होता. मनाचा निश्चय करून ती म्हणाली, "कांहीं तासच होतें तिथें—पण काम उरकलीं मात्र कितीतरी. एक वर्षभर साधलं नव्हतं तें पांचसहा मिनिटांत होऊन गेलं. सुधीरचं प्रकरण संपवून आलें !"

"म्हणतेस काय ?" विप्रदास आश्चर्यचकित होऊन उद्गारला.

"हो—अगदीं असंच ! पण त्याला कांहीं वाऱ्यावर उडवून आलें नाहीं. काल सकाळीं इथं मुलगी आली होती ना ? तिचं नांव हेम—हेमनलिनी राय. तिच्या पदरीं सुधीरला सोंपवून आलें. पुनः तीं मुंबईच्या गिरणीचीं यंत्रं आठवलीं. तसंच चाललंय इकडे. पहातां पहातां या प्रेमाचे ताणेवाणे विणले जाताहेत अन विसकटलेही जाताहेत. माणसाचं भवितव्य ठरवलं जातंय अन् पुनः तसंच कोंसळतंय."

"असं झालंय तरी काय ?" विप्रदास तितकाच आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "सुधीरचं प्रकरण संपवून आलीस म्हणजे काय ?"

"संपवलं म्हणजे संपवलं." वंदना म्हणाली, "पण म्हणून हें अचानकच झालं असं कांहीं नाहीं. त्या तिकडला सारा ताल द्रुतलयींतच चालतो. त्यामुळं जें झालं तें अचानक झालं असा बाहेरून पहाणाराला भास होतो. पण तें कांहीं खरं नव्हे. मला बोलावून घेऊन सुधीर म्हणाला, कीं माझ्या हातून मोठा गुन्हा झालाय. मीं म्हटलं, 'कसला गुन्हा झाला सुधीर ?' तो म्हणाला,

' कुणाला न सांगतां—(अर्थात् त्याला न सांगतां)—एकदम तूं तिकडे गेलीस हें बरं केलं नाहींस. विशेषतः तिथं विप्रदासबाबूखेरीज सध्या दुसरं कुणी नाहीं.' तिथं अन्नदाताई आहे असं मी म्हटलं त्यावेळीं सुधीर म्हणाला, ' पण ती तर नुसती मोलकरीण ! घरची तर कुणी नव्हे ? ' मी म्हटलें, ' त्या घरीं तिला सारे अक्का म्हणतात ! ' तें ऐकून ती हेम पोरटी गालांतल्या गालांत हंसत म्हणाली, ' खेड्यापाड्यांत असं म्हणायची चाल आहे वाटतं ! अशामुळं नोकरचाकरांची मिजास मात्र वाढते. दुसरं कांहीं नाहीं. त्यांत धन्याला कांहीं मोठेपण येत नाहीं ! " सुधीर म्हणाला, ' तिथं तूं म्हणालीस मी इथं रहाणार नाहीं—रातोरात परत येईन—पण तूं त्या घरीं जाऊन रहाणं आम्हां कुणालाच पसंत नाहीं. तुझ्या बाबांना कळलं तर ते काय म्हणतील ? ' मी म्हटलं, ' बाबा काय म्हणतील याची काळजी तुम्हाला नको. माझं मी पाहून घेईन. पण हें पसंत नाहीं म्हणणारांत तुम्हीदेखील सामील आहां का ? ' हेम म्हणाली, ' अर्थात आहेत. ते कांहीं सर्वांच्या बाहेर नाहींत.' उगीच ती आपल्या अंगावर ओढून घेत होती. तिला उत्तर द्यावं असं कांहीं मला वाटलं नांहीं म्हणून मी सुधीरला म्हटलं, ' तुला जर असं वाटतं, तर मीसुद्धां असं म्हटलं असतं, कीं निष्कारण रजा वाढवून तूं इथं कलकत्त्यांत रहातो आहेस तें मलासुद्धां पसंत नाहीं. पण मी तसं म्हणणार नाहीं. तूं जो घाणेरडा आरोप ध्वनित केलास तो हलकट लोकांना शोभतो. तुमच्यासारख्या बड्या समाजांतलीं माणसंदेखील तसल्याच लायकीचीं आहेत हें मला माहीत नव्हतं. मला आतां वेळ नाहीं. गाडीवाला वाट पहातोय. मी चाललें ! ' ती पोरटी ओरडून म्हणाली, ' छोट्या काय कीं मोठ्या काय, साऱ्याच लोकांची दृष्टि असल्या बाबतींत सारखीच असते. त्याची चर्चा ही व्हायचीच ! ' मी म्हटलं, ' आपण मनमुराद चर्चा करीत बसा. माझी कांहीं हरकत नाहीं. मी चाललें ! ' सुधीर एकदम कावराबावरा झाला. त्याचा चेहरा पडला—कसंबसं मन सांवरून तो म्हणाला, ' आपल्या मावशीला सांगून जाते आहेस का ? ' मी म्हटलं, ' कितीही रात्र झाली तरी लग्न उरकल्या-बरोबर मी जाणार तें मावशीला माहीत आहे.' सुधीर म्हणाला, ' उद्यां एकदां तुझी भेट होईल का ? ' मी म्हटलं, ' नाहीं.' तो म्हणाला, ' परवां ? ' मी म्हटलं, ' परवांहीं नाहीं.' ' त्याच्यानंतर दुसऱ्या दिवशीं ? ' ' नाहीं. त्याच्या दुसऱ्या दिवशींहीं नाहीं ' ' केव्हां सवड होईल तुला ? ' केव्हांही सवड व्हायची

नाहीं.' ' पण एका महत्त्वाच्या बाबतींत मला तुझ्याशीं जरूर बोलायचं आहे त्याचं काय ? ' तुला जरुरी असेल. मला नाहीं.' असें म्हणून मी बाहेर निघालें. सुधीर मला चांगलं ओळखतो. माझ्या मागोमाग यायची त्याला छाती झाली नाहीं. तो तिथंच ताठरून उभा राहिला अन् मी येऊन गाडींत बसलें. "

उगीच थोडें हंसून विप्रदास म्हणाला, " हेंच का तुझं तें प्रकरण संपवणं ? अग हा नुसता प्रेमकलह. तुला शंका असली तर, एकदां तुझ्या ताईला पहा ना विचारून. "

वंदना हंसली नाहीं. गंभीर होऊन म्हणाली, " कुणाला विचारायची जरूर नाहीं मुखर्जीमहाशय. हें प्रकरण माझ्यापुरतं संपलं आहे निश्चित ! त्यांत आतां बदल व्हायचा नाहीं. "

हतबुद्ध होऊन विप्रदास तिच्या तोंडाकडे नुसता पहात राहिला. नंतर म्हणाला, " म्हणतेस काय वंदना ? इतक्या थोड्या वेळांत संपण्याइतकी ती बाब क्षुल्लक का आहे ? सुधीरच्या मनावर केवढा आघात झाला असेल त्याची कल्पना तर करून पहा ! "

" कल्पना केली आहे मुखर्जीमहाशय. " वंदना म्हणाली, " हा आघात सांवरायला सुधीरला फारसे दिवस लागायचे नाहींत. ती पोरटी त्याला अचुक मार्ग दाखवून देईल. पण मी माझ्या स्वतःपुरता विचार करतेंय. गाडींतून येतांनाच केवळ नव्हे; तर काल रात्रीं बिछान्यावर पडलें असतांना सारखा तोच विचार करीत होतें. झोपसुद्धां आली नाहीं त्यामुळें. अस्वस्थ वाटतंय खरं पण क्लेश कांहीं होत नाहींत यांत शंकाच नाहीं. "

" रागाचा पारा उतरला कीं क्लेश जाणवूं लागतील. मग याच सुधीरसाठीं पुनः वाटेकडे डोळे लावून बसशील. " असें म्हणून विप्रदास हंसला.

या त्याच्या हंसण्याला वंदनेनें जोड दिली नाहीं. ती शांतपणें म्हणाली, " राग नव्हताच मुळीं. निघून यायच्यावेळीं माझ्या तोंडून कठोर शब्द गेले नसते तर बरं झालं असतं—आतां पश्चात्ताप होतोय मला. मी पटवून आलें कीं जसा कांहीं दोष त्याचाच—त्यांना जाणवून देऊन आलें, कीं मर्मावर बाण लागला आहे तो माझ्या ! पण तें कांहीं खरं नाहीं. या खोटेपणाचीच मला मोठी शरम वाटतेय मुखर्जीमहाशय—यापेक्षां दुसरं कांहीं नाहीं." शेवटचे शब्द उच्चारतांना तिचे डोळे भरून आले.

विप्रदासला आधींच वाटत असलेलें आश्चर्य आणखी कितीतरी पटींनीं वाढलें. तिच्या त्या भाषणांत दांभिकपणा मुळींच नव्हता हें एवढ्या वेळानंतर त्याला पटलें. तो म्हणाला, "खरोखरच का आतां तुझं सुधीरवर प्रेम नाहीं ?"

"नाहीं."

"यापूर्वीं होतं ना ?"

"मग इतक्या सहजासहजीं तें प्रेम नाहींसं झालं कसं ?"

इतक्या सहजासहजीं गेलं म्हणूनच इतक्या सहजीं त्याचं उत्तर मिळालं मला. नाहींतर आपल्यासमोर मला कांहींतरी खोटंच सांगावं लागलं असतं—" असें म्हणून ती कांहीं वेळ स्तब्ध राहिली. कांहीं वेळ तशीच त्याच्याकडे पहात ती म्हणाली, "काय विचारलंत ? सुधीरवर केव्हांतरी माझं प्रेम होतं कीं नाहीं ? पूर्वीं वाटत होतं कीं खरोखरच प्रेम आहे. त्यानंतर एकजण आला नजरेसमोर—सुधीर गेला कुठल्या कुठं आतां पहातें तों तोही गेला कुठल्या कुठं ! हें ऐकलं म्हणजे आपल्याला माझी कींव येईल. हिंच मन इतकं उल्लू कसं असं वाटेल. मुलीच्या जातीच्या दृष्टीनं हीच रमेची गोष्ट आहे हें मी जाणतें. कुठलीही मुलगी हें कबूल करायची नाहीं—उलट त्याच्यावरच दोष ठेवायचा प्रयत्न करील—कदाचित मीसुद्धां दुसऱ्या कुणासमोर कबूल केलं नसतं. पण कां कोण जाणे, आपल्यासमोर मन मोकळं करून बोलायला मला मुळींच संकोच वाटत नाहीं."

कांहींसुद्धां न बोलतां विप्रदास स्तब्ध राहिला. वंदना बोलत होती,—"कदाचित हा माझा स्वभावच असेल—कदाचित या वयांत हें असंच होत असेल. मन शून्यावर ठरूं शकत नाहीं. चोहींकडे उधळायला पहातं. कदाचित तसंही असेल ! मुलीच्या जातीचा स्वभावच असेल हा—सारा जन्मभर शोधतांना प्रेमाचं स्थान सांपडत नसेल !" असें म्हणून ती स्तब्ध राहिली. मनांतल्या मनांत ती कसला तरी विचार करीत असावी. त्यानंतर ती एकदम म्हणाली, "कदाचित ही शोधून सांपडायची वस्तूच नसेल—नुसतं मृगजळ !"

विप्रदास तसाच मुकाट्यानें बसला होता. वंदनेच्या मनाच्या दरवाजाची खीळ खुली झाली होती. ती बोलूं लागली, "—एक वर्षापूर्वी या सुधीरबरोबर माझं लग्न व्हायचं ठरलं होतं. त्याची आई आजारी होती म्हणून त्यावेळीं तें झालं नाहीं. काल घरीं आलें त्यावेळीं मनांत आलं, त्याचवेळीं जर लग्न झालं असतं तर आज असंच त्याला तोडून टाकायला माझं मन तयार झालं असतं

कां ? कोणत्या उपायानं मन काबूत ठेवतां आलं असतं ? धर्मबुद्धीच्या जोरावर ? संस्काराच्या जोरावर ? पण बेफाम झालेलं मन जर काबूत रहायला तयार झालं नसतं तर काय झालं असतं ? ज्या लोकांत हे कांहीं दिवस घालवले त्यांच्याच-प्रमाणें का मी वागलें असतें ? अशीच लबाडी—असंच ढोंग—अशीच लपवा-लपवी करीत चेहऱ्यावर खोटं हंसू ओढून आणून लोकांना फसवीत का राहिलें असतें ? अशीच एकमेकांची निंदा करीत—असाच द्वेष—असाच मत्सर—असंच वैर माजवीत का राहिलें असतें ?—पण आपण कांहींच बोलत नाहीं मुखर्जीमहाशय ? ”

विप्रदास म्हणाला, “ तुझ्या मनांत जें वादळ उठलं आहे त्याच्या भयंकर वेगावरोवर मला कसं ठरतां येईल वंदना ?—म्हणूनच उगी राहिलोंय मी. ”

“ नाहीं—तें चालायचं नाहीं. ” वंदना म्हणाली, “ मी तुम्हाला अशी उडवाउडवी करूं द्यायची नाहीं. माझ्या प्रश्नाचं उत्तर द्या. ”

“ पण तुझं मन थंडावलं नाहीं तोंपर्यंत उत्तर देण्यांत काय अर्थ ! आजची तुझी मनाची जी अवस्था झालो आहे ती स्वाभाविक नव्हे, हें तुला कसं पटणार ? ”

“ कां पटणार नाहीं मुखर्जीमहाशय ? माझी बुद्धी तर ढांसळली नाहीं ! ”

“ ढांसळली नाहीं पण डळमळली आहे. संध्याकाळीं सारं कामधाम उरकलं म्हणजे ये. मग आपण शांतपणें बसूं अन् मोकळ्या मनानं बोलूं. त्यावेळीं शक्य झालं तर याचा जवाव देईन. ”

“ ठीक आहे तर मग ? मलासुद्धां सवड नाहीं. ” असें म्हणून वंदना निघून गेली.

खरें पाहिलें तर तिला काम पुष्कळ होतें. सकाळींच परवानगी घेऊन अन्नदा कालीघाटावर गेली होती. तिचें कामही आज तिच्यावरच येऊन पडलें होतें. शाळाकॉलेजांतून जाणारे कितीतरी विद्यार्थी, कितीतरी नोकरचाकर—त्या सर्वांची व्यवस्था लावणें अवश्य होतें. रात्रीं आपल्याला झोंप आली नाहीं हें सुद्धां ती या कामाच्या बोजामुळें विसरून गेली होती. तरीही ती आज फारच थकली होती.

संध्याकाळीं विप्रदासचें भोजन उरकलें, खालची सारी व्यवस्था पुरी झाली त्यावेळीं वंदना येऊन त्याच्या बिछान्याशेजारीं एक खुर्ची ओढून घेऊन बसली आणि म्हणाली, “ मुखर्जीमहाशय, मी एक गोष्ट विचारतें त्याचं खरं उत्तर द्याल ? ”

विप्रदास म्हणाला, "केव्हांही मी खरंच उत्तर देतों नाहीं का?—प्रश्न काय आहे तुझा?"

वंदना म्हणाली, "माझ्या ताईवर खरोखरच तुमचं प्रेम आहे का? लहानपणीं आपलं लग्न झालं होतं—कितीतरी दिवस उलटून गेले—त्यांत कांहीं विपरीत असं कधीं झालं नाहीं का?"

विप्रदास थक्क झाला. कुणाच्याही मनांत अशी कांहीं कल्पना येईल असें त्याला वाटलेंसुद्धां नव्हतें. पण मन ताब्यांत ठेवून तो सहज हंसत म्हणाला, "खरं म्हटलं तर, तुझ्या ताईलाच हा प्रश्न तूं विचारायला हवा होतास."

"तिला कसं कळेल?" वंदना म्हणाली, "आपल्या मनाचा थांग कुणाला लागलेला नाहीं असं म्हणतात. सांगायचं नसलं तर सांगूं नका. मी कशीबशी आपल्या मनाची समजूत करून घेईन–पण सांगायचं असलं तर मात्र खरं सांगा."

"खरंच सांगेन. पण माझ्याबद्दल तुला संशय वाटतो का?"

"होय. आपण फार मोठे माणूस आहांत—तरीपण माणूसच आहांत. असं वाटतं, जसे कुठंतरी आपण एकटेच वावरतां आहांत—त्या तिथं आपल्या जोडीला कुणी नाहीं. असंच नाहीं का?"

विप्रदासनें त्या प्रश्नाचें सरळ उत्तर दिलें नाहीं. तो म्हणाला, "आपल्या पत्नीवर प्रेम करणं हा आमचा धर्म आहे."

वंदना म्हणाली, "धर्माची मर्यादा जिथपर्यंत पोंचली आहे तिथपर्यंत आपण अस्सल आहांत—पण त्यापेक्षां या जगांत अधिक कांहीं नाहींच का?"

"मला तरी दिसत नाहीं वंदना."

"पण मला दिसतंय मुखर्जीमहाशय." वंदना म्हणाली, "सांगूं काय तें?"

विप्रदासचा चेहेरा एकाएकीं पांढरा फटक पडला. त्याच्या त्या बलशाली गौरवर्ण चेहऱ्यावर रक्ताचा लवलेशही राहिला नव्हता. दोन्ही हात पुढें करून तो म्हणाला, "नको—कांहींसुद्धां सांगूं नको वंदना. जा आतां आपल्या खोलींत. जेव्हां मला जरा बरं वाटेल, चर्चा करण्याइतकी बुद्धीला ताकत येईल त्यावेळीं याचं उत्तर देईन. किंवा कुणीं सांगावं—तुझ्या मावशीच्या घरीं तुझ्या बुद्धीवर ज्यांनीं झांकण टाकलं तींच माणसं म्हणजे कांहीं सारं जग नव्हे, हेंही कदाचित तोंपर्यंत तुला पटेल. धर्म टाकून देणं ज्यांना अशक्य आहे अशींही माणसं या जगांत आहेत—या जगांत वावरताहेत. नाहीं नाहीं. आतां यावेळीं वाद नको. तूं जा आतां."

या हुकमाचा अनादर करणें शक्य नव्हतें हें वंदनेला कळून चुकलें. घरांतलीं सारीं मंडळीं भीत असत तीं कदाचित याचमुळें.

एक शब्द मुद्धां न बोलतां वंदना खोलींतून बाहेर निघून गेली.

१९

दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या प्रहराच्या सुमारास वंदना येऊन म्हणाली, "मुखर्जीमहाशय, पुनः चाललें मावशीच्या घरीं. यावेळचं जाणं तासभऱ्यासाठीं नाहीं – मला मुंबईला पाठवायची व्यवस्था मावशीकडून होईपर्यंत!"

"अर्थात?"

"अर्थात! अर्जंट टेलिग्रॅमनं आलाय बाबांचा हुकूम. उद्यां सकाळीं मावशी गाडी पाठवणार आहे मला न्यायाला."

विप्रदास म्हणाला, "अर्थात काय तें आतां कळलं मला. सूड उगवायची अक्कल आहे, तसाच उपद्व्याप करायचीही ताकद आहे तुझ्या मावशीच्या ठायीं. तिच्या प्रिपेड टेलिग्रॅमचा जवाब आहे वाटतं तो? पाहूं बरं तो कागद."

"नाहीं—आपल्याला तो दाखवतां येत नाहीं."

तिचें तें उत्तर ऐकून विप्रदास क्षणभर स्तब्ध होऊन राहिला. त्यानंतर उगीच थोडेंसें हंसून म्हणाला, "ईश्वर कुणाचा अभिमान चालूं देत नाहीं त्याच्याच आहे हा नमुना. इतके दिवस मला वाटे, कीं मला कुठं गुंतवतां यायचं नाहीं कुणाला. आतां कळलं—कीं येतं! निदान अशीं कुणीतरी माणसं कुठंतरी आहेत. तुझ्या मावशीच्या डोक्यांत ही असली अक्कल खेळतेय म्हणायची! पाहूं बरं—इकडे दे—कितीशी बिकट फिर्याद केली आहे ती तरी पाहूं दे." असें म्हणून त्यानें हात पुढें केला.

आतां मात्र वंदनेनें तार त्याच्या हातीं दिली. रायसाहेबांची तार बरीच लांबलचक होती. ती अथपासून इतिपर्यंत वाचून घेऊन तिच्या हातीं परत दिल्यावर विप्रदास म्हणाला, "तसं पाहिलं तर तुझ्या बाबांनीं गैर कांहीं लिहिलेलं नाहीं. निःस्वार्थ परोपकार करण्यांत धोका आहे. आजारी नातलगाची सेवा करायला येणंसुद्धां तितकंसं सोपं नाहीं."

वंदनेनें विचारलें, "तर मग मी मावशीच्या घरीं जावं असं का आपलं म्हणणं?"

"तसा तुझ्या बापाचा हुकूम आहे वंदना. हिं कांहीं बलसमपूरच्या मुखर्जींचं घर नव्हे, कीं हुकूम देणारा तुझा मुखर्जीमहाशयही नव्हे! — ती मावशी आहे — अन् हुकूम आला आहे तो तुझ्या बापाकडून. तेव्हां तो आतां पाळलाच पाहिजे."

"हें झालं आपलं मामुली सांगणं." वंदना म्हणाली, "बाबांना माहित नाहीं कांहींसुद्धां. बरोबर असो कीं चूक असो, त्यांचा तो हुकूम पाळलाच पाहिजे का? मावशीचं घर म्हणजे काय तें तर आतां आपल्याला कळलंय?"

"कळलं!" विप्रदास म्हणाला, "तुझ्या तोंडून कळलंय कीं ती जागा कांहीं चांगलीशी नव्हे. माझी प्रकृति बरी असती तर मी स्वतः तुला मुंबईला पोंचवून आलों असतों. पण सध्यां तेवढं सामर्थ्य नाहीं."

"अन् या अशा परिस्थितींत तुम्हाला टाकून मी जायचं का निघून? ज्या मावशीची धड ओळखसुद्धां नाहीं, तिचाच हट्ट का चालू द्यायचा?"

"पण त्याला उपाय काय?"

"तर मग इथंच रहा. बाबाना एक तार करून टाक. पण मावशी न्यायला आली तर तिला काय सांगणार?"

वंदना म्हणाली, "नुसतं 'येत नाहीं एवढंच सांगेन. त्यापेक्षां दुसरं कांहीं बोलणार नाहीं."

विप्रदास म्हणाला." पण एवढ्यानं तुझ्या मावशीचं समाधान व्हायचं नाहीं. असं कांहीं झालं तर कदाचित ती तिकडे माझ्या आईलाही तार करील."

वंदनेला ही कल्पना आली नव्हती. ती उदासीन होऊन म्हणाली, "बरोबर आहे आपलं म्हणणं मुखर्जीमहाशय. कदाचित यापूर्वीच तिनं तसं कांहीं केलं असेल—तिकडे कळवूनसुद्धां टाकलं असेल. पण कां? माहीत आहे?"

"मला त्याची कल्पना येणं शक्य नाहीं." विप्रदास म्हणाला, "पण मला थोडासा अंदाज आहे. ती एवढा उपद्व्याप करते आहे तो कांहीं निःस्वार्थ बुद्धीनं नव्हे—केवळ तुझ्या कल्याणासाठींही नव्हे. यांत कांहींतरी तिचा अंतस्थ उद्देश असला पाहिजे."

"तें काय आहे तें मी जाणतें." वंदना म्हणाली, "तिचा भाचा बॅरिस्टर होऊन आलाय. मावशीनं त्याची न् माझी ओळख करून दिली आहे.

तिची अगदीं खात्री आहे, कीं मला कुणी योग्य असा वर असेल तर तोच. कारण मी आहें बाबांची एकुलती एक मुलगी. त्यांची जी इष्टेट मला मिळेल त्यावर तिच्या भाच्याचं यथास्थित चालेल— मग त्याचा धंदा चालला नाहीं तरी हरकत नाहीं. "

विप्रदास म्हणाला, " भाच्याच्या कल्याणाची काळजी मावशीनं करायची नाहीं तर करायची कुणी ? मुलगा दिसायला कसा काय आहे ?

" बरा आहे. "

" माझ्यासारखा ? "

वंदना हंसून म्हणाली, " हा झाला आपला आत्माभिमान. असलीं माणसं जगांत क्वचितच दिसून येतात हें आपण चांगलंच जाणतां. पण तुलनाच करून जर पाहूं लागलं, तर मग साऱ्याच उपवर वधूंना जन्मभर अविवाहित रहावं लागेल मुखर्जीमहाशय. नुसतं आपल्या तोंडाकडे पहात आयुष्य कंठावं लागेल ! तरीपण मी म्हणतें, दिसायला अशोक चांगला आहे. उगीच नांव ठेवणं मला आवडत नाहीं. "

" तर मग तो तुला पसंत आहे म्हणतेस ?

" अन् आहे असं म्हटलं, तर त्या माझ्या पसंतीला कुणी नांवही ठेवायचं नाहीं. " असें म्हणून वंदना मोठमोठ्यानें हंसत उठून उभी राहिली.

" पांच वाचले. " ती म्हणाली, " बार्ली घ्यायची वेळ झाली आपली— आधीं घेऊन येतें. तोंपर्यंत अशोकच्या बाबतींत आणखी थोडा विचार करून ठेवा. " असें म्हणून ती निघून गेली.

पांच मिनिटांनंतर जेव्हां ती परत आली त्यावेळीं तिच्या हातीं बर्फांत थंड केलेलें बार्लीवाटर असलेली रुप्याची वाटी होती. आंत लिंबू पिळून देत देत ती म्हणाली, " हें सारं एकदम पिऊन टाका. अर्धं टाकून चालायचं नाहीं. मला या बाबतींत कुणी दोष दिला अन् जाब विचारला असं व्हायला नकोय. "

विप्रदास म्हणाला, " जबरदस्ती करायची विद्या अगदीं सोळा आणे शिकलीस. त्याबाबतींत कुणाला हार जायची नाहींस खास."

" नाहीं. " वंदना म्हणाली, " कुणी विचारलं तर सांगेन, कीं मुखर्जी-महाशयांच्या तालमींत मी पक्की होऊन गेलेंय."

जेवण झाल्यानंतर उष्टें ताट हातीं घेऊन वंदना निघून जात होती ती फिरून उभी राहिली आणि म्हणाली, " माझ्या एका प्रश्नाचं उत्तर द्याल मुखर्जीमहाशय ? "

" कोणता प्रश्न वंदना ? "

" या जगांत सर्वांपेक्षां आपल्यावर कुणाचं प्रेम आहे तें सांगाल का ? "

" सांगेन. "

" सांगा ना तें नांव. "

' तें नांव वंदनादेवी ! "

उत्तर ऐकतांक्षणींच निमिषार्धांत वंदना बाहेर निघून गेली.

सुमारें पंधरा मिनिटांनीं ती पुनः परत आली आणि विछान्याजवळ एक खुर्ची ओढून घेऊन बसली. विप्रदासनें हंसत हंसत विचारलें, " अशी एकदम पळून कां गेलीस तें सांग ना. "

वंदनेला उत्तर देतां आलें नाहीं. त्यानंतर ती हळुच म्हणाली, " प्रश्न ऐकतांक्षणींच उत्तर पचवतां आलं नाहीं मुखर्जी महाशय. माझ्याकरवीं घडलेली एकादी ओंगळ चोरी आपण अचानक पकडली असं वाटलं मला. "

" म्हणूनच डोळे वर करून पहावत नव्हतं वाटतं ! "

" कां पहावत नाहीं ? " असें म्हणून बळेंबळेंच नजर वर करून पहात ती हंसायला लागली—पण लगेच तिचा सारा चेहरा लालीलाल होऊन गेला. कसेंबसें मन आवरीत ती म्हणाली, " आपल्याला हें कसं कळलं सांगा ना ? "

" हा प्रश्न करणं निरर्थक आहे वंदना. " विप्रदास म्हणाला, " एवढं सुद्धां कळूं नये इतका का मी दगड आहें ? कुठं कांहीं संशय असला तर तुझ्या तोंडाकडे पाहिल्यावर आतां तो साफ नाहींसा झाला आहे. "

आतां मात्र वंदनेनें मान खालीं घातली. विप्रदास म्हणाला, " तरी पण हें कांहीं चालायचं नाहीं वंदना. नीट वर तोंड करून पहा माझ्याकडे. शरम वाटण्याजोगं तूं कांहींच केलेलं नाहींस—अन् माझ्यासमोर लाज बाळगायचं कांहीं कारणही नाहीं. पहा—वर पहा. मी काय सांगतों तें ऐक. "

हीच ती हुकुमाची जरब !

वर नजर करून वंदनेनें पाहिलें—क्षणभर उगीच राहून ती म्हणाली, " माझ्यावर आपला भारीच राग झाला असेल, नाहीं मुखर्जीमहाशय ? "

"मुळींच नाहीं ?" विप्रदास हंसत म्हणाला, "ही काय रागाची बाब आहे ? मी केवळ एवढीच अपेक्षा करतोंय, कीं ही चूक केव्हांतरी एकदां तुझी तुलाच कळून येईल—अन् त्याच दिवशीं तुला तिचा प्रतिकारही करतां येईल."

"पण ही चूक नाहींच कळली तर ? ही चूक आहे असं कधीं काळीं जर मला मुळीं कळलंच नाहीं तर ?"

"कळेल. या प्रकरणांतून केवढे अनर्थ उद्भवतील याची जाणीव जर तुला झाली नाहीं तर मी म्हणेन, कीं तुझं प्रेमच नव्हतं माझ्यावर ! सुधीरच्या प्रेमासारखाच हा एक तुझा खेळ—कुणाला तरी कवटाळून धरून स्वतःची फसवणूक करणं—यापेक्षां जास्त कांहीं नाहीं."

वंदनेचा चेहरा एकदम उतरला. काकुळतीला येऊन ती म्हणाली, "इथं सुधीरची तुलना करूं नका मुखर्जीमहाशय. तें सहन व्हायचं नाहीं मला पण यामुळं जगांत अनर्थ उद्भवतील हें जें आपण म्हटलं तें मात्र मी कबूल करायची नाहीं. असं देखील कबूल करीन, कीं यामुळं अकल्याण होईल—पण तेवढ्यासाठीं तें खोटं आहे असं मात्र मी केव्हांच म्हणायची नाहीं. खोटं असतं तर एवढा प्रेमाचा ठेवा आपल्याकडून कसा मिळाला असता मला ? नाहीं का मिळाला ?"

तें भाषण ऐकत् असतांना विप्रदासचा श्वासोच्छ्वास रुद्ध झाला होता. प्रश्न संपल्यानंतर वंदनेनें ज्यावेळीं नजर वर करून पाहिलें त्यावेळीं तो म्हणाला, 'मिळाला आहे तर वंदना ! किती तरी मिळाला तुला ! नाहीं तर तुझ्या हातचं मी कसं खाल्लं असतं ? रात्रंदिवस तुझ्याकरवीं सेवा करून घेणं कोणत्या जोरावर मला शक्य झालं असतं ? पण म्हणून काय मी तुला अधर्मांत ओढूं ? स्वतःला अधर्मांत ओढून घेऊं ? तुला खेंचून खालीं लोटूं ? माझ्या तोंडाकडे पहा. माझ्यावर अखंड विश्वास ठेवून जीं कुणी आज आपली मान उंचावून आहेत, त्यांच्या मानेचा कांटा मोडून त्यांना खालीं पहायला लावूं ? असं का तुझं म्हणणं आहे ?"

गर्वभरानें वंदना म्हणाली, "तर मग आपणसुद्धां कबूल करा, कीं तो आपला आवडता दंभ टाकायची आपली तयारी नाहीं. सरळ सरळ त्यांना खरं खरं सांगा, कीं मोठं होऊन रहायचा हा मोह आपल्याला सोडवत नाहीं. सर्वांपेक्षां तोच आपल्याला मोठं बनवून राहिला आहे ! नाहींतर ही ग्लानी

तरी कसली ? कशाॅला मानायला हवं या अधर्माला ? धर्म म्हणजे माणसानं घडवलेली एक व्यवस्था — माणसानंच पुनः पुनः मानली—पुनः पुनः जिचा भंग केला--तीच ना ? आपल्याला पटलं असेल--मला पटायचं नाहीं. ”

विप्रदास गंभीर होऊन म्हणाला, “ तुला पटलं नाहीं तरी मला पटेल—अन् त्यांतच माझं काम होऊन जाईल. इंग्रजी पुस्तकं फार वाचलीं आहेस, मावशीच्या घरीं पुष्कळ चर्चा ऐकली आहेस, ती विसरायला बराच वेळ लागेलसं वाटतंय मला. ”

वंदना म्हणाली, “ आपण थट्टा करतांहांत माझी. पण मी मात्र एवढीसुद्धां थट्टेनं बोललें नाहीं मुखर्जीमहाशय. जें बोललें तें अगदीं खरं खरं बोललें. ”

“ तें मला माहीत आहे—पण हें वेड कुणी तुझ्या डोक्यांत घातलं ? ”

“ आपण ! ”

“ काय बोलतेस हें ? ही असली अधर्मबुद्धि तुला शेवटीं मीच का शिकवली ?”

“ हो आपणच—आपणच शिकवली. कदाचित् नकळत असेल—पण आपल्याखेरीज दुसऱ्या कुणी नव्हे— ”

तें ऐकून विप्रदास स्तब्ध झाला. आश्चर्यचकित होऊन पहात राहिला. वंदना बोलत होती, “ — ज्याला आपण अधर्म असं नांव देऊन वाईट ठरवलं, तें मी मानीत नाहीं. धर्म म्हणून जें कांहीं आपण पत्करतों, तो नुसता आपला मनाचा संस्कार असतो अस मला वाटतं अत्यंत दृढ संस्कार—तरी पण तो कांहीं त्यापेक्षां मोठा नव्हे ! ”

विप्रदासनें मानेनें होकार दिला. तो म्हणाला, “ कदाचित तुझं हें म्हणणं खरं असेल वंदना. तो आमचा संस्कारच—अगदीं बळकट असा संस्कारच. पण माणसाचा धर्म जेव्हां या संस्काराचं रूप धारण करतो, तेव्हां तो एकदम यथार्थ बनून जातो--अगदीं स्वाभाविक होऊन बसतो. जीवनाच्या कर्तव्याच्या बाबतींत मग त्यावेळीं कांहीं सुद्धां आड येत नाहीं. पटलं पाहिजे म्हणून स्वतःबरोबर लढाई करून मरावं लागत नाहीं त्यावेळीं बुद्धि होऊन जाते शांत—अखंड वाहाणाऱ्या जलप्रवाहासारखी ती संथपणें वाहूं लागते. विप्रदासाचा अत्याज्य धर्म म्हणून त्या दिवशीं जो मी तुला सांगितला, तो हाच—त्यांत आतां बदल होण नाहीं.”

“ केव्हांच बदल व्हायचा नाहीं का मुखर्जीमहाशय ? ”

"तसं आज तरी वाटतंय वंदना. या आयुष्यांत त्या बाबतींत कधीं बदल होईल अशी आज कल्पना सुद्धां करवत नाहीं."

एवढ्या वेळानंतर वंदनेचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले. मोठ्या वात्सल्यानें तिचा हात धरून ओढून विप्रदास म्हणाला, "पण बदल तरी कशाला व्हायला हवा? प्रेम तुझ्यावर केलं—तुझं तें प्रेम राहिलंय माझ्या अंतरंगाच्या आंत. तें प्रेम यापुढं मला दुःखांत सांत्वना देईल—दुबळेपणांत बळ देईल—तो भार एकट्यानं उचलायचं सामर्थ्य ज्यावेळीं रहाणार नाहीं त्यावेळीं तुला हांक घालीन. ती हांक मी आजपासून तुझ्यासाठीं राखून ठेवली आहे. येशील ना तेव्हां?"

डाव्या हातानें डोळे पुसून वंदना म्हणाली, "येईन—जर यायचं सामर्थ्य राहिलं तर येईन!—तोंपर्यंत मार्ग जर खुला राहिला तर—नाहीं तर कशी येणार मी सुखर्जीमहाशय?"

तिचे ते उद्गार ऐकून विप्रदास दचकल्यासारखा झाला. तो म्हणाला, "खरं आहे! खरं आहे! यायचा मार्ग मोकळा राहिला तर!—एकदम कायमचा बंद नाहीं झाला तर! तेव्हां मात्र ये. हट्टानं तोंड फिरवून राहूं नकोस."

पुनः वंदनेनें आपल्या डोळ्यांतलीं आसवें पुसून घेतलीं आणि म्हटलें, "माझं एकच मागणं आहे मुखर्जीमहाशय, यांतलं कांहीं कुणाला सांगूं नका."

"नाहीं सांगणार! सांगण्याजोगं तसं माझं कुणीच नाहीं हें तुला माहित आहेच."

"हो—आहे माहित."

दोघेंही कांहीं वेळपर्यंत उगीच राहिलीं.

विप्रदास म्हणाला, "या अफाट जगांत मी असा हा एकटाच आहें, हें तुला कसं कळलं वंदना?"

"कसं कळलं कोण जाणे. वंदना म्हणाली, "रागारागानं आपल्या घरांतून मी निघून आलें—आपण आलांत बरोबर. गाडींतल्या त्या दारुड्या साहेबांची आहे ना आठवण? तो प्रसंग कांहीं तसा विशेष नव्हता—तरीपण मला वाटलं—इकडेतिकडे पाहिलं कीं जीं माणसं समोर दिसताहेत त्यांतलें कांहीं आपण नव्हे. कसलाही बोजा एकट्यानं खांद्यावर घ्यायचा आपल्याला कधीं

संकोच वाटत नाहीं. त्या दिवशीं हेंच म्हटलं दिजूबाबूनीं. मी पडताळून पाहिलं —कुठूनच आपण कधीं मोबदल्याची अपेक्षा करीत नाहीं. रात्रीं बिछान्यावर पडलें. केवळ आपली आठवण येत होती—कांहीं केल्या झोंप येईना—उजाडतां उजाडतां उठून पाहिलं. खालीं देवघरांत दिवा तेवत होता. आपण ध्यानाला बसलां होतां. सारखी नजर लावून पहातां पहातां दिवस उजाडला. कुणा नोकरचाकराच्या तें ध्यानीं येईल म्हणून मी घाबरलें अन् पळून आलें आपल्या खोलींत. ती त्यावेळीं पाहिलेली आपली मूर्ति विसरणं अशक्य झालंय मला—डोळे झांकले कीं ती मला समोर दिसते."

विप्रदास हंसून म्हणाला, "पूजा करतांना मला पाहिलंस वाटतं ?"

वंदना म्हणाली, "पूजा करतांना मीं आपल्या आईलासुद्धां पाहिलंय—पण तें तें नव्हे. हें वेगळंच !—आपण कुणाचं ध्यान करतां मुखर्जीमहाशय ?"

"त्याच्याशीं तुला काय करायचंय ?" विप्रदास पुनः हंसून म्हणाला, "तूं तर ध्यान करीत नाहींस !"

"नाहीं करीत—तरीसुद्धां वाटतं कीं तें कळावं म्हणून."

विप्रदास उगीच राहिला.

वंदना बोलत होती, "—त्याच दिवशीं मला पहिल्यानं वाटलं, कीं जगांत राहून आपण जगावेगळे आहां. आपण एकटे, आपली सोबत करायला जितक्या उंचावर चढून गेलं पाहिजे तेवढी मजल गांठायचं सामर्थ्य कुणाला नाहीं.—आणखी एक प्रश्न विचारूं मुखर्जीमहाशय ? सांगाल ?"

"कोणता प्रश्न वंदना ?"

"स्त्रीजातीच्या प्रेमाची आपल्याला आवश्यकता नाहीं. नाहीं ?"

"म्हणजे काय ?"

"म्हणजे काय तें मला माहित नाहीं म्हणूनच विचारतेंय. मला वाटतं कीं आपल्याला त्याची आवडच नाहीं—आपल्या हिशेबीं ती वस्तु एकदम तुच्छ होऊन राहिली आहे !—खरं कीं नाहीं सांगा !"

विप्रदासनें उत्तर दिलें नाहीं. हंसतमुखानें तो नुसता तिच्याकडे पहात राहिला.

खालीं अंगणांत एकाएकीं गाडीचा आवाज ऐकूं आला—मागोमाग ऐकूं आला द्विजदासचा आवाज—त्याच क्षणाला दारापाशीं येऊन अन्नदा म्हणाली, "द्विजू आला विपिन."

"एकटाच का ? कीं आणखी कुणी आलंय बरोबर ?"

"नाहीं. एकटाच आहे वाटतं. दुसरं कुणी नाहीं."

वंदना अस्वस्थ झाली आणि म्हणाली, "मी जातें मुखर्जीमहाशय. त्यांच्या जेवणाखाणाची कांहीं व्यवस्था आहे कीं नाहीं तें पहातें."—असें म्हणून ती बाहेर निघून गेली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं द्विजू येऊन जेव्हां विप्रदासच्या पायावर डोकें ठेऊन नमस्कार करूं लागला त्या वेळीं खोलीच्या एका कोपऱ्यांत बसून वंदना पूजेची तयारी करीत होती. द्विजदास म्हणाला, "येत्या पंचमीला तलावाची वास्तुशांति करणार आहे आई. मोठं अवडंबर माजवलंय दादा."

"आईचं काम म्हणजे अवडंबर असायचंच द्विजू. त्याची कसली काळजी करायची ?" असें म्हणून विप्रदास हंसला.

द्विजदास म्हणाला, "तें खरं आहे. आणखी त्याच्याचबरोबर दुसरं एक निघालं आहे—वासू आजारांतून उठला त्याची नवसफेड—तोही आहे एक अश्वमेध यज्ञ. शास्त्रीपंडितांना आमंत्रण द्यायची यादी तयार होते आहे. शेजारीपाजारी, नातलग, अथिती अभ्यागत या सर्वांची जी संक्षिप्त यादी वहिनीनं तोंडातोंडीं सांगितली त्यावरून मला शंका आली, कीं आपल्या गंगाजळींत यावेळीं थोडी जास्त बुडी मारली जाणार. वेळींच सावध व्हा."

वंदनेनें वर पाहिलें नाहीं तरीही तिला अनावर हंसू लोटलें. विप्रदास मोठा संसारी, विप्रदास कृपण, अशी त्याची बदनामी करायला एक त्याची आईखेरीज सारींच जणें टपून बसलेलीं असत. स्वतः विप्रदाससुद्धां हंसला आणि म्हणाला, "यावेळीं मात्र तुझी पाळी. यावेळीं खर्च व्हायचा तुझ्याकडून."

"माझी कांहीं हरकत नाहीं तसं झालं तर. पण मग मात्र त्या व्यवस्थेंत थोडा अदलबदल करावा लागेल. संभावना व्हायची ती पाठशाळेंतल्या शास्त्रीपंडितांची नव्हे—उलट पाठशाळेचे दरवाजे बंद करून ज्यांना बाहेर ठेवण्यांत येतं,—त्यांची."

तसाच हंसून विप्रदास म्हणाला, "या पाठशाळांवर तुझा हा राग काय म्हणून ? लोकांच्या तोंडून नुसती निंदाच ऐकत आलायस. स्वतःच्या डोळ्यांनीं कधीं पाहिलं नाहींस. त्यांच्याच मेळाव्यांत मी सामील झालों आहें म्हणून मला वाटतं, मलासुद्धां तुझ्या कारकिर्दींत घांसभर अन्न मिळायचं नाहीं."

"असं कांहीं बोलूं नका !" असें म्हणून द्विजदासनें जवळ येऊन त्याच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि म्हटलें, "आपण त्या दोघांच्याही पलीकडचे आहोंत. पण ही तिसरी जागा कुठली हें मात्र मला अजून कळलं नाहीं. मी जाणतों एवढंच, कीं माझे दादा माझ्या विचारशक्तीपलीकडचे आहेत."

विप्रदासनें विषयांतर केलें. त्यानें विचारलें, "मी आजारी असल्याचं आईला कळलं नाहीं ना ?"

"नाहीं. कळलं नाहीं म्हणूनच बरं. नाहींतर तळ्याची वास्तुशांति बंद झाली असती."

"साऱ्या आपल्यापरक्या मंडळींना बोलवायची व्यवस्था झाली आहे ?"

"झाली आहे—भूत भविष्य वर्तमानकालीन सर्वांचीच. सकन्या अक्षय-वाबूंना आमंत्रणचिट्ठी दिली आहे. आईची खात्री आहे कीं या सगळ्या उपद्व्यापांत मैत्रेयीची अग्निपरीक्षा होऊन जाईल.—अन् त्यांना घेऊन जायची कामगिरी आली आहे खुद्द माझ्यावर."

"आणखी दुसऱ्या कुणाला आणायचं बोलली नाहीं का आई ?"

"हो खरंच. अनुताईला घेऊन जायचं आहे. तसंच इथले कॉलेजांतले विद्यार्थी कुणी येणार असले तर त्यांनाही."

"अन् तुझ्या वहिनीची मोठी फर्मायीश नाही का ?"

"नाहीं."

खालीं मोटारचा आवाज ऐकूं आला. हॉर्नचा ओळखीचा आवाज कानीं पडतांच वंदनेनें खिडकींतून डोकावून पाहिलें आणि म्हटलें, "मावशीची गाडी. मी पाहून येतें. मुखर्जीमहाशय, आपण संध्या आन्हिक उरकून घ्या. वेळ होतोय." असें म्हणून ती बाहेर निघून गेली.

"मीही हातपाय धुऊन घेतों. तासभऱ्यानें पुनः येईन." असें म्हणून द्विजदासही चालता झाला.

विप्रदासची पुजा वगैरे उरकली. आज फराळाचे जिन्नस आणून दिले अन्नदेनें. मावशीच्या घरून जी मुलगी आली होती तिच्या बरदास्तींत वंदना गुंतली होती. तें सुद्धां अन्नदेनेंच विप्रदासला सांगितलें.

त्यानंतर द्विजदास आला. त्याच्या हातीं एक भली मोठी यादी होती. साऱ्या कलकत्त्यांतले अर्धेअधिक जिन्नस खरेदी करून गाडी करून पाठवून दिले पाहिजे

होते. दोघेही भाऊ त्या प्रकरणाची चर्चा करीत अगदीं रंगून गुंतले होते, अशावेळीं बाहेरून साद ऐकूं आला, " मुखर्जीमहाशय, आंत येऊं का ? पायांत बूट आहेत माझ्या. "

" बूट असेनात—ये. "

वंदना आंत आली. बलरामपूर येथें ज्या वेषांत ती पहिल्यानें दिसली होती तोच हा वेष. विप्रदास अत्यंत आश्चर्यचकीत होऊन म्हणाला, " कुठं जातेयस कीं काय वंदना ? "

" हो. मावशीच्या घरीं. "

" केव्हां येणार ? "

" केव्हां येणार तें मला कुठं माहित आहे मुखर्जीमहाशय ? " असें म्हणून वांकून तिनें विप्रदासला प्रणाम केला—नित्याप्रमाणें पायाला हात लावून स्पर्श केला नाहीं.

मान वळवून न पहातां, नुसते हात जोडून द्विजदासलाही नमस्कार करून ती त्या खोलींतून बाहेर चालती झाली.

द्विजदासनें विचारलें, " वंदना अशी अचानक गेली कां ? मी आलों म्हणून का ? "

" नाहीं. " विप्रदास म्हणाला, " मुंबईला जायचं ठरेपयत तिनं मावशीच्या घरीं जाऊन रहावं, अशी तिच्या बापाची तार आली आहे. "

" पण हीं मावशी कुठून उपटली अचानक ! माझ्याबरोबर वंदना तर धड बोललीसुद्धां नाहीं. मी आल्यापासून सारखी आडआड रहात होती. आतां सकाळपासून पहातोंय तरी ती चुकवते आहे मला, जातांना एक नमस्कार करून गेली खरी; पण तोसुद्धां तोंड फिरवून ! असं माझ्या विरूद्ध काय झालंय तिचं ? "

द्विजदासच्या प्रश्नाचें उत्तर सरळ न देतां विप्रदासने मावशीच्या बाबतींत घडलेली सारी हकीकत त्याला थोडक्यांत सांगितली आणि म्हटलें, " मी आजारी पडलों तेव्हां घाबरून अनुताईनं तिला मावशीच्या घरून आणलं माझी सेवा-शुश्रूषा करण्याकरतां—हेंच आधीं मोठं झालं. तुला उपकार वाटले पाहिजेत तिचे याबद्दल. "

" मी कुठं नाहीं म्हणतोंय ? " द्विजदास म्हणाला, " पण आपली सेवा करायला मिळाली हें काय थोडं भाग्य झालं ? उभयपक्षीं या बाबतींतली किंमत जर ठरवायला गेलं, तर कृतज्ञतेच्या हिशेबीं तीच आमची ऋणकरी ठरेल. "

"तूं अगदीं नराधम आहेस!" विप्रदास हंसत हंसत उद्‌गारला.

"नराधम असेन पण निर्बुद्ध नाहीं खास!" द्विजदास म्हणाला, "सध्यां माझं राहूंद्या—पण ही सेवा करायची वातमी जर आईच्या कानीं गेली तर—तर मात्र कठीण. जन्माची ऋणकरी करून ठेवील ती आईला. हें काय थोडं-थोडकं झालं?"

तें ऐकून विप्रदास हंसला आणि म्हणाला, "एवढ्या वेळानं तरी तुला आईची ओळख पटली म्हणायची?"

"पटली असली तर ती आपल्याच पुरती म्हणायची," द्विजदास म्हणाला, "आईच्या लेखीं मी कुपुत्र—मी कुलांगार—तिला तसं वाटतंय तेंच ठीक आहे. तो तिचा समज दूर करून देण्यांत अर्थ नाहीं दादा."

"पण कां? आईचा तुझ्यावर विश्वास बसला, तिनं तुला बऱ्या बोलानं लेखलं, तर खरोखरच तें तुला नको का आहे? या रुसव्यांत तुला लाभ कसला?"

"लाभ कसला तें नाहीं कळलं, तरी विशेष लोभ नाहीं खरा. मला लाभला आहे आपला स्नेह—लाभलंय वहिनीचं वात्सल्य—हीच माझी कुवेराची संपत्ती आहे. सात जन्म दोन हातांनीं उधळली तरी संपायची नाहीं!—" तो बोलून गेला खरा पण लगेच लाजेनें त्याचा चेहरा गोरामोरा झाला. आजवर आपल्या अंतरंगांतला सारा आवेग व्यक्त करायचें तो टाळीत आला होता. निस्पृहतेच्या आवरणाखालीं झांकला राहून तो वावरत होता. तो देहस्वभावच झाला होता. त्याचा. लगेच स्वतःला सांवरून घेऊन तो म्हणाला, "पण ही चर्चा हवीय कशाला? चर्चाच करायची तर ती गोष्ट वेगळीच आहे—वंदना आतां निघून गेली ती रागारागानं गेली असं निदान माझ्या नजरेला तरी वाटतं. कां असं झालं हें? काय याचा अर्थ?"

"याचा अर्थ एवढाच—आतां तूं आलास तेव्हां आपली गरज नाहीं असं तिला वाटलं असावं. आतां यापुढं साऱ्या शुश्रूषेचा भार आहे तुझ्यावर!" असें म्हणून विप्रदास हंसत-सुटला.

"आपण ही थट्टा करतां खरी!—" द्विजदास म्हणाला, "पण मी म्हणतों, या इंग्रजीवाल्या पोरी एक दिवस नुसत्या दंभाखालीं मरायच्या. सेवेची संधि मिळण्यासाठीं आपण आजारी पडावं असं म्हणूं नये खरं, पण तशी संधि आली, तर या द्विजूच्या पासंगाला यायला असल्या दहा वंदनांना देखील कठीण जाईल म्हणावं! केव्हांतरी तिला सांगून टाका हें."

वात्सल्यपूर्ण हास्याच्या तेजानें विप्रदासचा चेहरा एकदम उजळून उठला. तो म्हणाला, " ठीक आहे. सांगतों. पण तिला पटेल कीं नाहीं तें सांगतां यायचं नाहीं. पण ती जी तिची कसोटी ठरायचीय ती तुझ्या दादाकडून नव्हे. तो हक्क आहे दुसऱ्याच एका माणसाचा—आईचा. पटवून द्यायचं असेल कुणाला तर तें तिला. कळलं ना रे द्विजू ? "

" नाहीं दादा, " द्विजदास म्हणाला, " कळलं नाहीं. पण आई आहेच—जगलों वांचलों तर केव्हांतरी एकदां तिलाही समजावतां येईल ! — पण याच वेळीं तिच्या कसोटीची जरूरी कां वाटली तुम्हांला तेंच कळत नाहीं मला—" असें म्हणून तो क्षणभर उगीच राहिला आणि म्हणाला, " माझ्या प्राक्तनांत सारंच कांहीं उलटं होतंय. जन्म दिला बाबांनीं, पण एक कवडीसुद्धां ठेवली नाहीं माझ्यासाठीं—तें देतां आहां आपण. जन्माला आलों आईच्या पोटीं, पण पालनपोषण केलं अन्नदाताईनं आणि माझा सारा भरिभार उचलून मला माणसांत आणलं वहिनीनं !—ही दोन्हीही माणसं परक्या घरून आलेलीं. ' पिता स्वर्ग ' ' पिता धर्म ' अन् ' स्वर्गादपि गरीयसी ' हे श्लोक पाठ केले तरी ते पटावे कसे तें आपणच सांगा ना दादा ? "

विप्रदास म्हणाला, " आईची तरफदारी करायला मला कांहीं वकिली करायला नको. एके दिवशीं तें तुला आपोआपच कळेल. पण बाबांच्या बाबतींत तूं जो गैरसमज करून घेतलायस ती चूक आहे तुझी. खरोखरच तूं अर्ध्या इस्टेटीचा मालक आहेस. "

" खरोखरच असेनही कदाचित. " द्विजदास म्हणाला, " पण खरं सांगा, बाबा वारले त्यावेळीं खोलीचं दार बंद करून त्यांचं मृत्युपत्र आपण जाळून टाकलं कीं नाहीं ? "

" कुणी सांगितलं तुला ? "

" आजवर चोहींबाजूंनीं जी माझं संरक्षण करीत आली आहे तिच्याच तोंडून ऐकलं मी हें. "

" तसं असेल देखील. पण तुझ्या वहिनीनं तें मृत्युपत्र वाचून तर पाहिलेलं नाहीं. कदाचित असंहि असेल—बाबांनीं सारी इस्टेट त्यांत तुलाच देऊन टाकलेली असेल म्हणूनच मी रागारागानं तें जाळून टाकलं असेल—तसंही कांहीं अशक्य नाहीं. "

तें ऐकून द्विजदास मोठ्या कौतुकानें आधीं पोट धरधरून हंसला आणि

म्हणाला, " दादा, आपण कधींच का खोटं बोललां नाहीं ? द्वापारयुगांत युधिष्ठिराच्या खोट्या बोलण्याची नोट केली आहे वेदव्यासानं अन् कलियुगांत आपली तशीच नोट केली आहे द्विजदासानं. दोघेही सारखेच. कांहीं का असेना, मला एवढं कळलं, कीं कात्रींत पकडलं कीं सारं कांहीं शक्य होतं. उगीच आणखी पापाचा बोजा वाढवूं नका. बोला,—यापुढं काय केलं पाहिजे मी ? "

" या पुढं या इस्टेटीची सारी देखरेख तूं केली पाहिजेस. "

" पण कां ? हा एवढा बोजा काय म्हणून मी माथीं बाळगावा तें आधीं पटवून द्या ना मला. आपल्याला एकट्याला झेपत नाहीं का ? अशक्य ! मी कुचकामी होत जातों आहें का ? नाहीं मुळींच नाहीं. आईनं विचारलं तर तिला सांगा, मला कांहींसुद्धां नको आहे. कुचकामी होऊन मीं कसेबसे दिवस काढीन असं तिला कांहीं वाटायला नको. आपण समोर आहांत तोंवर पैसारुका, विषयसंपत्तीचा बोजा मी केव्हांही घेणार नाहीं. शेवटीं काय आपल्यासारखाच भयंकर व्यवहारी बनवून टाकणार आहांत मला ? लोक म्हणतील—यांच्या धमन्यांतून रक्त नाहीं वाहात—वाहतोय नुसता पैशाचा झोत—" बोलत असतांना त्याच्या ध्यानीं आलें, कीं विप्रदासचें लक्ष आपल्या भाषणाकडे नाहीं. तो आपल्याच विचारांत मग्न होता. सहसा असें कधीं होत नसे. तो विप्रदासचा स्वभावधर्म नव्हता. म्हणूनच आश्चर्यचकित होऊन तो म्हणाला, " खरोखरच का दादा, मी हा व्यवहार पहावा असं म्हणतांहांत आपण ? स्वदेशसेवेच्या माझ्या आवडत्या स्वप्नावर मी तिलांजली का देऊं ? "

त्याच्या नजरेला नजर देऊन विप्रदास दृढ वाणीनें म्हणाला, " तिलांजली दे असं मी तुला मुळींच सांगत नाहीं द्विजू. तुझं स्वप्न तुझ्याजवळ राहूं दे—चिरकाल राहूं दे—तरीही मी म्हणतों, कीं हा संसाराचा भार आतां तूं घे. "

" पण कां तें सांगा ना ? कारण कळल्याशिवाय मी केव्हांही होकार द्यायचा नाहीं. "

एक क्षणभर स्तब्ध राहून विप्रदास म्हणाला, " याचं कारण तर अगदीं उघड उघड आहे द्विजू. आज मी आहें—उद्यां असेन असं कुणी सांगावं ?—"

" नाहीं. " द्विजदास जोरजोरानें बोलत म्हणाला, " नाहीं. असं व्हायचंच नाहीं. आपण नाहीं—कुठंच नाहीं—ही कल्पनासुद्धां करवत नाहीं मला. "

त्याच्या भावनेची प्रबलता विप्रदासला जाणवली. तरीही तो हंसला आणि म्हणाला, " या संसारांत कांहीं अशक्य नाहीं. जें होणार तें व्हायचंच. भलतीच कल्पना करून जे भीति घेतात ते स्वतःचीच फसवणूक करतात. शिवाय असं पहा, मी थकलों असेन कदाचित्—मला रजा हवीयशी वाटत असेल—ती देणार नाहींस तूं ? "

" नाहीं दादा, तें शक्य नाहीं. त्यापेक्षां आपला हुकूम पाळणंच मला जास्त सोपं वाटतं. सांगा, केव्हांपासून मीं या कामाला लागूं ? "

" आजपासून या संसाराचा सारा भार तुझ्यावर. "

" आजपासून ? एवढ्या घाईंत ? ठीक—कबूल ! मी आपल्या शब्दाबाहेर नाहीं " असें म्हणून तो एकदम चालता झाला. पण जातां जातां त्याच्या कानीं दादांचे शब्द पडले, " तें सांगायला नको रे मला, माझी खात्री आहे, तूं माझ्या शब्दाबाहेर जायचा नाहींस ! "

त्या दिवसापासून द्विजदास आपल्या कामावर रुजू झाला. तो आळशी आहे, कुचकामी आहे, कामसू नाहीं, अशी आजवर सर्वांची तक्रार होती, पण दादाच्या हुकमानें आईच्या व्रताच्या उद्यापनासाठीं मांडलेलें सारें अवडंबर यथास्थित पार पाडण्याची जी जबाबदारी त्याच्यावर पडली, तीं सारीं कामें एकहाती करून दाखवतांना, आजवर होत असलेली बदनामी धुऊन टाकायला त्याला मुळींच वेळ लागला नाहीं. पूर्वीची संवय नाहीं, बोजा मोठा, तो इतक्या सहज त्याच्याकडून उचलला जाईल असें विप्रदासलाही वाटलें नव्हतें; पण यत्किंचितही आळस न करतां अत्यंत व्यवस्थित रीतीनें सारीं कामें तो सरावलेल्या कर्त्या माणसाप्रमाणें उरकतो आहे असें पाहून तो आश्चर्यचकित होऊन गेला. खरेदी करून ज्या जिनसा गाडीनें पाठवायच्या त्या द्विजदासनें तशा पाठवून दिल्या, बरोबर द्यायच्या त्या मागें ठेवल्या, नात्यागोत्याच्या साऱ्या माणसांना एकत्र करून मानमरातबानें रवाना करून दिलें, अशाप्रकारें सर्व कामें संपल्यावर घरीं जायच्यापूर्वी दादाचा शेवटचा हुकूम घेण्यासाठीं तो त्याच्या खोलींत आला त्यावेळीं पहातों तों तिथें बसलेली होती वंदना. त्या दिवशीं ती जी गेली ती आजवर आली नव्हती. कामाच्या गर्दींत द्विजदास तिला विसरला होता. आज एकाएकीं ती आलेली पाहातांच त्याला आश्चर्य वाटलें. पण तें मनांतल्या मनांत ठेवून एक मामुली नमस्कार करून त्यानें शिष्टाचार पाळून दाखवला. विप्रदासला उद्देशून तो म्हणाला,

" आज रात्रींच्या गाडीनं मी गांवीं जातोंय दादा. माझ्याबरोबर येताहेत अक्षय-बाबू, त्यांची बायको आणि मुलगी मैत्रेयी. कॉलेजांतले विद्यार्थी बहुधा उद्यां परवां येतील. त्यांच्या प्रवासखर्चाची व्यवस्था मी केली आहे. अनुताईला आपल्या-बरोबर घेऊन याल का ? पण तीनचार दिवसांपेक्षां जास्त वेळ मात्र लावूं नका. "

" मी आलंच पाहिजे का ? "

" हो. नाहीं आलांत तर एक खडावाची जोडी विकत आणून भरतासारखी ती सिंहासनावर ठेवून देईन. "

" फाजिलांचा शिरोमणी झालायस तूं. " विप्रदास म्हणाला, " पण मला आश्चर्य वाटतंय अक्षयबाबूंचं. ते कसे येणार ? सव्यां त्यांना तर रजा नाहीं— कामांत खूट पडेल ना ! "

" पडेल ! " द्विजदास म्हणाला, " त्यांत कांहीं नुकसान नाहीं. इकडे ल्यापेक्षांही मोठं काम व्हायचं आहे ना ? बड्या घरीं मुलगी पडेल. पैसेवाला जांवई म्हणजे पुढल्या काळाचा आधार – कॉलेजच्या दरमहा मिळणाऱ्या पगारा-पेक्षां तो आधार जास्त मोठाच नव्हे का ? "

विप्रदास चिडून म्हणाला, " तुझ्या बोलण्याला कांहीं धरबंध आहे कीं नाहीं द्विजू ? बोलतांना वडील माणसांचा मान एवढासुद्धां राखवत नाहीं का तुला ? "

द्विजदास म्हणाला, " तें काय तें वहिनीला विचारून पहा. माझा मोठा दोष म्हणजे हाच, कीं मी सौजन्याची उधळमाधळ करीत नाहीं. "

विप्रदासला हंसू आवरेना. तो म्हणाला, " तुझा एकटा एकच साक्षीदार— जेव्हां तेव्हां केवळ वहिनीच. दारुड्याला साक्षी कलाल ! "

" तसं का म्हणाना ! " द्विजदास म्हणाला, " पण आपलं बोलणं देखील कांहीं अगदींच साखरेंत घोळवलेलं नाहीं ! कारण मीही दारुड्या नाहीं न् तीही कधीं दारुदुकान उघडून बसलेली नाहीं. दिलंच तर देते अमृत—गुप्तदान करते अन्नाचं—किती जणांना ! मोठ्यामोठ्या बड्यांनासुद्धां साधत नाहीं तें. "

" आणि त्यांना नकोही तें साधायला ! " विप्रदास म्हणाला, " दिराला लाडावून ठेवून लंगडापांगळा करून टाकण्यापेक्षां बड्या लोकांना दुसरीं पुष्कळ कामं आहेत ! "

वंदना खालीं मान घालून हसूं लागली. द्विजदासच्या तें लक्षांत आलें. तो म्हणाला, " या बाबतींत आपण वाद घालूं नका दादा. आपल्याला कांहीं

वहिनी नाहीं. बंगाली माणसाच्या घरांतलं वात्सल्य कसं काय असतं याचा अजून आपल्याला पत्ता लागलेला नाहीं. आंधळ्याला प्रकाश कसा असतो तें सांगण्या-सारखंच तें—" खवचटपणें हंसून तो म्हणाला, " तोंड फिरवून वंदना हंसतेय. पण मावशीच्या घराच्याऐवजीं कांहीं दिवस जर आमच्या घरीं काढील, तर पटेल तिला माझं म्हणणं. पण हवी कशाला ही चर्चा? आपण केव्हां गांवीं येणार तें सांगा. "

" मी फार थकलोंय द्विजू. आईची समजूत घालतां यायची नाहीं तुला? "

खरोखरच असे थकव्याचे उद्गार विप्रदासच्या तोंडून यापूर्वी त्यानें कधीं ऐकले नव्हते. तो दचकला—त्यानें निरखून पाहिलें त्यावेळीं अत्यंत क्षीण अशी हास्याची रेषा विप्रदासच्या चेहऱ्यावर उजळलेली त्याला दिसली. त्याला वाटलें—हा दादा नव्हे आपला—दुसराच कुणीतरी. त्या तसल्या मनःस्थितींतच त्यानें प्रश्न केला, " अजून दुखणं बरं झालं नाहीं का दादा? "

" बरं झालं कीं! "

" तर मग आईनं हातीं घेतलेलं काम—तुम्ही येत नाहीं म्हणतां—आईची समजूत मी घालूं तरी कशी? ती घाबरेल आणि धांवत इकडे येईल. आणि तिथं उभारलेला सारा डोलारा कोसळून पडेल. "

क्षणभर विचार करून विप्रदास म्हणाला, " मी केव्हां यावं असं तुझं म्हणणं आहे? "

द्विजदास म्हणाला, " आज, उद्यां, परवां—केव्हांही. तुम्ही सांगत असलां तर मी येऊन तुम्हांला घेऊन जाईन. "

विप्रदास हंसतमुखानें क्षणभर तसाच विचार करीत बसला होता.

" ठीक आहे. " विप्रदास म्हणाला, " मी स्वतःच येतों. तुला उगाच खेप नको. "

द्विजदास निघून गेल्यावर वंदनेनें विचारलें, " झालंय काय मुखर्जीमहाशय? गांवीं जायचं नाहीं असं कां म्हणतां आपण? "

विप्रदास म्हणाला, " आत्तांच तूं कारण ऐकलंस ना? "

" ऐकलं. पण तें उत्तर दुसऱ्याला दिलं होतं. सांगा ना, कां गावीं जात नाहीं? मला सांगायलाच हवं? "

" मी थकलोंय. "

" नाहीं. "

" नाहीं कसा ? सर्वांनीं थकावं अन् मीच तेवढा थकूं नये ? "

" नाहीं कुणी म्हटलं ? पण खरोखरच तसं असतं तर सर्वांच्या आधीं कळलं असतं मला. सर्वांच्या डोळ्यांत धूळ टाकतां येईल तुम्हाला पण माझ्या डोळ्यांना नाहीं चकवता यायचं. आपल्या रोगाचं निदान ठरवायची कधीं जरुरी लागली तर मला बोलावणं पाठव, असं जातांना ताईला पत्र लिहून कळवणार आहें. "

" तुझ्या ताईला स्वतः निदान करतां येत नाहीं—तुला तें साधतं !—हें तिनं ऐकलं तर तिला फारसं बरं वाटायचं नाहीं. "

" नाहीं बरं वाटायचं खरं—पण कृतज्ञता तर वाटेल ? माझी ताई आहे आपली जुन्या काळची – तिला कांहीं शोधून टिपून नवरा मिळवावा लागला नाहीं. देवानं आयतंच सारं कांहीं दिलं. चांगला धट्टाकट्टा माणूस मिळाल्याचं ओंजळ भरभरून समाधान होतंय तिला. पण तो माणूससुद्धां एके दिवशीं अचानक कोसळून पडेल असं तिला वाटावं तरी कसं ?

विप्रदास कांहीं बोलला नाहीं. उगीच थोडासा हंसला.

" असे हंसलां कां ? " वंदनेनें विचारलें.

" आपोआप हसूं आलं वंदना ! " विप्रदास म्हणाला, " ज्यांना नवरा शोधून टिपून काढणं भाग पडतं अशींच माणसं तूं आजवर पाहिलीं आहेस. त्यांखेरीज आणखी कुणी आहेत याची तुम्हां लोकांना कल्पनासुद्धां नाहीं. जगाचे सर्वसाधारण नियम तुम्ही मानतां, त्याची कधीं उलटापालट होईल हें पटतच नाहीं तुम्हाला. त्या उलटापालटीच्या जोरावरच आज धर्म टिकून राहिलाय, पुण्य टिकून राहिलंय, काव्य साहित्य राहिलंय, अविचलित श्रद्धा, विश्वास राहिलीं आहेत. हें सारं कांहीं टिकून राहिलं नसतं तर या पृथ्वीचं सारं वाळवंट झालं असतं, हें सुद्धां अजून तुम्हां लोकांना कळलेलं नाहीं. "

" आणि या उलटापालटीची प्रत्यक्ष मूर्ति म्हणजे आपण स्वतः ! " वंदना खवचटपणें म्हणाली, " पण त्या दिवशीं आपण म्हटलेंत तें — माझ्यावरही प्रेम आहे म्हणून म्हटलंत तें ? "

" आजही म्हणतोंय. पण तुम्हां लोकांना प्रेमाचा मार्ग मळलेल्या एकाच वाटेनं दिसतो. इतर वाटांच्या बाबतींत तुम्हीं आहांत आंधळे—म्हणूनच त्या दिवशींच्या माझ्या बोलण्याचा अर्थ तुला चांगलासा कळला नाहीं. द्विजू आणि त्याच्या वहिनीला एकदां पाहून ये. पाहायची नजर म्हणून कुठं असली तर

श्रद्धेचं प्रेमाशीं कसं मिश्रण होतं तें तुला तिथं दिसून येईल. थट्टामस्करींत, कोडकौतुकांत, निकट संघटनांत, ती नुसती तुझी ताईच नव्हे, ती त्याची मैत्रीण—ती त्याची आई !—तोच संबंध तुझा न् माझा. त्याच दृष्टीनं कां माझ्याकडे पाहिलं नाहींस वंदना ? " उदार स्नेहाबरोबरच त्याच्या वाणींत जी कींव करण्याची छटा दिसून येत होती ती वंदनेच्या हृदयाला चांगलीच जाणवली.

कांहीं वेळपर्यंत ती मान खालीं घालून उगीच राहिली होती. एकदम वर पाहून ती म्हणाली, " आपल्या बाबतींत माझा चुकीचा समज झाला मुखर्जी-महाशय. खरोखरच माझ्या ताईवर आपलं प्रेम असतं तर मी कांहीं म्हटलं नसतं—पण तसं तें नाहीं. आपण पालन करतांहां तो नुसता धर्म—पालन करतांहां नुसतं कर्तव्य. मोठा कठोर स्वभाव आहे आपला. कुणावरच्च प्रेम करीत नाहीं आपण. झांकून ठेवायचा कितीही प्रयत्न केला तरीही ही गोष्ट एके दिवशीं उघडकीस येईलच्च येईल ! "

क्षणभर स्तब्ध राहून ती नंतर म्हणाली, " आज माझा भ्रम दूर झाला. शून्यांत हात घालून चांच्पडत शोधीत रहायची बुद्धी मला न होवो, एवढाच मला आशीर्वाद द्या. "

" हा घे माझा आशीर्वाद ! " विप्रदास हंसतमुखानें हात वर उचलीत म्हणाला, " आजपासून तुझा हा माणसाचा शोध संपला जावो—अन् जो चिरकाल तुझाच होऊन रहायचा असेल तोच तुला मिळो ! "

विप्रदास आपली निर्दयपणें थट्टा करीत आहे अशी कल्पना करून वंदना रागावून म्हणाली. " आपण चुकतांहां मुखर्जीमहाशय. माणसं धुंडाळणं हा कांहीं माझा पेशा नव्हे. त्या पेशाचीं माणसं वेगळींच आहेत. आज मी अशी ही अचानक कां आलें तें सांगायचं राहून गेलंय. तसं पाहिलं तर इकडचा सुद्धां माझा एक मोठा भ्रम दूर झालाय. इथं आपल्या सहवासांत असतांना मला वाटत होतं, कीं हें सारे आचारविचार खरोखरच्च मोठे चांगले आहेत,—जेवणाखाण्याचे शिवाशिवीचे सारे नियम पाळणं, फुलं वेचणं, चंदन उगाळणं, पूजेची तयारी करणं,—आणखी असंच बरंच्चसं कांहीं मला वाटत होतं. खरोखरच्च हे सारे आचार माणसाला पावित्र्य देतात. पण या खेपेला मावशीच्या घरीं गेलें तेव्हां हें माझं वेड नाहींसं झालं. कित्येक दिवस काय वेडेपणा करीत होतें मी मुखर्जीमहाशय ! अगदीं खरोखरच्च जसं कांहीं तें मला पटत होतं !—

शिक्षणांत, संस्कारांत खरोखरच एवढासुद्धां कुठं भेद नाहीं असं वाटत होतं !—" असें म्हणून ती मोठमोठ्यानें हसूं लागली.

तिला वाटलें होतें, कीं हें भाषण विप्रदासला जाणवेल - मनाला लागेल—पण तसें कांहीं झाल्याचें तिला दिसून आलें नाहीं. तिच्या खोट्या हंसण्याच्या जोडीला अगदीं मोकळेपणानें हंसण्याची जोड देत विप्रदास म्हणाला, " हें मला माहीत होतं वंदना. मी तुला एकदां सावध केलं होतं तें आठवतं ना ? हें असलं कांहीं करूं नकोस म्हणून तुला एक दिवस सांगितलं होतं. तें तुझं वेड गेलं हें ऐकून मला मोठा आनंद झाला. तूं असं म्हटलंस म्हणून मला वाईट वाटेल असं तुला वाटलं होतं. पण तें खोटं होतं. ज्याला जें स्वाभाविक नाहीं तें त्यानं केलं नाहीं तर मला त्याचं मुळींच वाईट वाटत नाहीं. मी कसलं ध्यान करतों म्हणून तूं विचारलंस त्यावेळीं मी उगीच राहिलों, तें आठवत असेल तुला. सांगायला कांहीं हरकत नव्हती पण मी सांगितलं नाहीं. तें सांगण्यांत कांहीं हंशील नव्हतं. कशाला हवीय ती चर्चा ? तूं मुंबईला केव्हां जाणार तें ठरलं का ? "

वंदनेच्या चेहऱ्यावर रागाची लाली आली. नुसतें 'नाहीं' म्हणून ती स्वस्थ राहिली.

" त्या दिवशीं तुझ्या मावशीच्या भाच्याची—अशोकची गोष्ट सांगत होतीस ना ?—कसं काय आहे त्याचं ? आवडला का तो तुला ? अलीकडे आणखी कांहीं कळून आलं का तुला त्याच्याबद्दल ? "

" नाहीं. "

" तुझं लग्नच जर झालं तर मी आशीर्वाद द्यायला येईन. पण केवळ मावशीचा आग्रह म्हणून भलतंच काहीं करून बसूं नकोस. तगादाच करूं लागली तर थोडंसं धीरानं घे. "

वंदनेच्या डोळ्यांत आसवें आलीं. पण खालीं मान घालून तिनें तीं आवरून घेतलीं. ती म्हणाली, " बरं. "

" मी परवां गांवीं जाणार, " विप्रदास म्हणाला, दोनतीन दिवसांपेक्षां तिथं जास्त रहातां यायचं नाहीं. फिरून आलों आणि तूं इथं कलकत्त्यांत असलीस तर एकदां भेटून जा. "

खालीं मान घालून वंदना तोंडांतल्या तोंडांत काय पुटपुटली तें नीटसें कळलें नाहीं.

विप्रदास म्हणाला, "ऐकलंस ना, माझी रजा मंजूर झाली ! यापुढं सारी जबाबदारी द्विजूवर. लहानपणापासून बाबांनीं मला या संसाराच्या घाण्याला जुपलं होतं. कुठं जायला कधींच अवसर मिळाला नाहीं. आज एकदांचा सुटलों असं वाटलं."

आतां मात्र वंदनेनें वर पाहून विचारलें, "खरंच का ? असं वाटायची जरूरी खरोखरीच का उत्पन्न झालीय ? खरंच का आपण इतके थकलां आहां ?"

या प्रश्नाचें उत्तर द्यायचें टाळून विप्रदास म्हणाला, "हो खरंच ! वंदना, माझ्या आजारांत तूं जी माझी सेवा केलीस त्याचा मी उल्लेख केला होता, यांना तुझे उपकार वाटले पाहिजेत असंही म्हटलं होतं. याच्या अर्धअधिकसुद्धां त्यांना झेपलं नसतं. उपकाराबद्दल द्विजूनं कबुली दिलीही—तरीही तो म्हणाला, 'कधीं तशीच वेळ आली तर दादाची जी सेवा माझ्याकडून होईल तशी व्हायला आणखी दहा वंदना आल्या पाहिजेत !'"

"त्यांना सांगा," वंदना म्हणाली, "या आव्हानाचा मी स्वीकार करतें पण कसोटी लावायची वेळ जेव्हां कधीं येईल त्यावेळीं तुम्हीं इथं असलांत म्हणजे झालं."

ते उद्गार ऐकून विप्रदास हंसतमुखानें म्हणाला, "असेन असेन वंदना—तसा तो हटणारा माणूस नाहीं. अजून त्याला तूं ओळखलं नाहींस."

"ओळखतें मुखर्जीमहाशय, अगदीं चांगली ओळखतें. आपल्या सेवेंत त्यांच्याशीं चढाओढ करायचं सामर्थ्य खरोखरच वंदनेच्या अंगीं नाहीं."

विप्रदासला आपल्या भावाबद्दल मोठा अभिमान होता. त्या अभिमानाची जाणीव धरून तो म्हणाला, "तुला माहीत आहे वंदना, आमचा द्विजदास म्हणजे एक साधुपुरुष आहे."

"आपल्यापेक्षांही का ?"

"हो—माझ्यापेक्षांही !" असें म्हणून विप्रदासनें कांहीं वेळ आपल्या मनाशीं विचार करून पाहिलें आणि म्हटलें, "पण तूं त्याच्यावर रागावली आहेस असा त्याचा समज झालाय. कां बोलली नाहींस त्याच्याशीं ?"

"बोलायची. जरूरीच पडली नाहीं मुखर्जीमहाशय."

"तर मग तूं खरोखरच रागावलीस." विप्रदास हंसून म्हणाला, "तुला एक सांगायचंय मला वंदना, द्विजू बोलण्यांत रुक्ष आहे—केव्हां केव्हां त्याचं

बोलणं मोठंसं गोड, नसतं—पण हें कठोर आवरण दूर होऊन जर कधीं पहातां येईल त्याला, तर एवढा गोडा माणूस दुसरा कुणी नाहीं असंच वाटेल तुला. माझं हें बोलणं ऐकून ठेव. त्याच्यासारखा विश्वास टाकायला योग्य असा दुसरा माणूस तुला शोधूनसुद्धां सांपडायचा नाहीं."

वंदना भलतीकडेच पहात राहिली. तिनें उत्तर दिलें नाहीं. एकदम घाई-घाईनें उठून ती म्हणाली, "गाडी फार वेळ तिष्ठत राहिली आहे वाटतं. मी आतां जातें मुखर्जीमहाशय. आपण पुनः येईपर्यंत जर मी असलें तर नक्की येईन. नसलें तर हाच माझा नमस्कार शेवटचा—" असें म्हणून खालीं वांकून त्याच्या पायाला हात लावून तिनें नमस्कार केला आणि ती एकदम बाहेर निघून गेली. विप्रदासला एक शब्दसुद्धां बोलायचा अवसर तिनें दिला नाहीं.

दरवाजाबाहेर पडून ती जिन्याजवळ आली त्यावेळीं तिथें हात जोडून द्विजदास उभा असल्याचें पाहून तिला आश्चर्य वाटलें. तिला हंसूं कोसळलें. ती म्हणाली, "हें काय आणखी ?"

"एक विनंती आहे. दादाला बरोबर घेऊन आपण आमच्या गांवीं एकदां आलं पाहिजे."

"मी दादांना घेऊन यायचं ? म्हणजे ?"

"तेंच सांगायला इथं उभा राहिलोंय." द्विजदास म्हणाला, "एक दिवस न बोलावतां तुम्हीं आमच्या घरीं पायधूळ झाडली होती. आज पुनः तसंच एकदां आलं पाहिजेय म्हणतों."

वंदनेचें मन क्षणभर मागेंपुढें होऊं लागलें. ती म्हणाली, "पण हें निमंत्रण मला कोण देतंय ? आई, दादा कीं आपण स्वतः ?"

"मी स्वतःच देतोंय."

"पण आपण तर त्या घरचे तिराऱ्या नंबरचे. आमंत्रण द्यायचा अधिकार कुठं आहे आपल्याला ?"

द्विजदास म्हणाला, "दुसरा कसला अधिकार नसला तरी एवढा अधिकार आहे मला—हा मी असा आहें ना !—याच अधिकाराच्या जोरावर मी ही मागणी करतों आहें. बोला, मंजूर झाली मागणी ? तशीच जरुरी भासल्या-शिवाय मी कधीं कुणापुढं याचना करीत नाहीं !"

कितीतरी वेळ वंदना दुसऱ्याच बाजूला पहात राहिली होती.

"ठीक आहे." ती म्हणाली, "मी येईन—पण माझ्या मान-अपमानाची जबाबदारी तुमच्यावर आहे हें ध्यानांत ठेवा."

कृतज्ञतापूर्वक द्विजदास म्हणाला, "माझी शक्ति सामान्य आहे—तरीही ही जबाबदारी मी घेतों."

वंदना म्हणाली, "तशीच वेळ येईल त्यावेळीं मात्र हें विसरूं नका हं!"

"नाहीं—विसरणार नाहीं." द्विजदास म्हणाला.

२१

किती तरी दिवसांनंतर विप्रदास खालच्या मजल्यावरील कचेरींत आला होता. समोरच्या टेबलावर कागदपत्रांचा ढिगारा पडला होता. किती दिवसांचीं कितीतरी कामें शिल्लक होतीं. देह थकला होता तरीही द्विजूवर सारा विश्वास टाकून राहणें चाललें नसतें.

एक भली मोठी खातेवही उघडून तिचीं पानें तो उलटीत होता. तितक्यांत बाहेर मोटरचें हॉर्न वाजलें आणि त्याच्या मागोमाग च पूर्वेकडच्या खुल्या दरवाजांतून वंदना आंत आली. आज ती एकटी नव्हती. बरोबर एक अपरिचित तरुण होता. पंजाबी धोतर नेसलेला, पायांत कटकी जोडे, खांद्यावरून जानव्याप्रमाणें तिरपी घेतलेली पांढरी चद्दर, अशा पोषाखांत सुमारें तिशीच्या आंतला, साधारणपणें शरीराचा बांधा चांगलाच असलेला, पहातांच ज्याला सहज कुणी देखणाही म्हटलें असतें असा तो तरुण आंत आला. त्याच्या स्वागतासाठीं विप्रदास खुर्चीवरून उठून उभा राहिला.

वंदना म्हणाली, "मुखर्जीमहाशय, हेच मिस्टर चाऊड्री (चौधुरी)! बार-ॲट-लॉ. पण अशोकबाबू म्हणून म्हटलं तरी ऑफेन्स घेणार नाहींत अशी अट कबूल करून घेऊनच मी त्यांना बरोबर आणलंय. आपण थोडंसं बोलूं पण त्यापूर्वीं आधीं आपलं काम उरकून घ्या.—" असें म्हणून जवळ येऊन तिनें वाकून नमस्कार केला आणि म्हटलें, "पायाला हात लावून नमस्कार केला नाहीं खरा—केला असता तर यांना वाटलं असतं, कीं हिनं समाजाला काळिमा फासला. पण तेवढ्यासाठीं आपण उगीच रागावूं नका—कीं ही नवीन रीत मावशीच्या घरून आणली असा गैरसमजही करून घेऊं नका.

त्यानंतर आपल्या मनाच्या प्रसन्नतेवर माझीं पुढलीं कामं अवलंबून राहणार आहेत. "

विप्रदास म्हणाला, " तिकडे मावशीकडे अशाच प्रकारें माझं गुणगान करतेस कीं काय ? —" त्या नव्या आलेल्या तरुणाकडे वळून पाहून तो म्हणाला, " वंदनेच्या तोंडून आपल्या इतक्या गोष्टी ऐकल्या आहेत, लीं परकेपणा वाटत नाहीं आपल्याबद्दल. आजारी नसतों तर मी स्वतःच गप्पा मारायला तिकडे आलों असतों. पाहिल्याबरोबरच वाटलं, कीं हा चेहरा यापूर्वी बऱ्याच वेळां पाहिला असावा. फारशी दिरंगाई न करतां हीच तुम्हाला घेऊन आली हें एकंदरींत बरं झालं. "

उत्तर देण्यासाठीं तो गृहस्थ पुढें सरसावत होता, त्याला नाकासमोर बोट धरून दाखवून दटावून वंदना विप्रदासला म्हणाली, " आतां ही अतिशयोक्ति भलत्या थराला गेली. खोट्याच्या सीमेवर आल्यासारखी वाटते. आतां पुरे झालं — आवरतं घ्या, नाहींतर दंगा करीन. "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे असं, कीं आमच्यासारखीं जीं सामान्य माणसं आहेत त्यांच्या प्रमाणें तुम्ही देखील खऱ्या खोट्याची गल्लत करून बोलूं शकतां. तसं पाहिलं तर, आपण मुळीं असामान्य नाहींच. आमच्यासारखेच एक अगदीं सामान्य माणूस—"

" नाहीं—" विप्रदास म्हणाला, " कुणालाही विचारून पहा. हें तुझं बोलणं कुणालाच पटायचं नाहीं — कुणीच कबूल करायचा नाहीं. "

वंदना म्हणाली, " आतां मात्र मी तुम्हाला त्या सर्वांच्यापुढं घेऊन जाणार आहें अन् हें तुमचं पांघरलेलं सिंहाचं कातडं दोन्ही हातांनीं फाडून काढून फेकून देणार आहें. तेव्हांच त्यांना अस्सल मूर्ति दिसेल—अन् मग त्यांची भीति आपोआप नाहींशी होईल !—आतां ' राजाची राणी हो, ' असा मला आशीर्वाद द्या ना. "

" आशीर्वादाला माझी हरकत नाहीं. " विप्रदास हंसून म्हणाला, " आतां आपोआपच आशीर्वाद देणार होतों. पण तुम्हा लोकांना आशीर्वाद हवा असतो कुठं ? तुम्ही त्याला म्हणतां कुसंस्कार—नुसतं शब्दाचं अवडंबर. "

" पुनः चिमटा घ्यायचा आहे वाटतं ? " वंदना तसेंच बोट उचलून म्हणाली, " कोण म्हणतो कीं आम्ही वडिलांचा आशीर्वाद धुडकावतों

म्हणून ? कोण म्हणतो कुसंस्कार म्हणतों म्हणून ? आतां मात्र खरोखरच तुमचा राग येतोय मुखर्जीमहाशय. ”

“ खरोखरच राग आला का ? ” विप्रदास गंभीर होऊन म्हणाला, “ तर मग आतां पुरे झालं हें रटाळ भाषण. पण आज अगदीं सकाळींच अचानक येणं कां झालं ? कांहीं काम आहे का ? ”

“ बरींच ! ” वंदना म्हणाली, “ पहिलं, आपली कैफियत घ्यायची माझ्या हुकूमाशिवाय खालीं येऊन कामाला सुरवात कां केली ? ”

“ केली नाहीं. करणार होतों. हें ठेवलं क म बाजूला । ” असें म्हणून ती मोठाली खातेवही विप्रदासनें दूर लोटून दिली.

प्रसन्न मुद्रेनें वंदना म्हणाली, “ कैफियत सॅटिस्फॅक्टरी ! आज्ञाभंगाचा गुन्हा माफ करण्यांत आला आहे. यापुढं असाच आज्ञाधारकपणा दाखवण्यांत आला कीं सारं कांहीं सुरळीत होईल !—आतां ऐकत चला मी सांगेन तसं. मुखर्जींच्या ऐश्वर्याची हकिकत यांना जरा सांगा. राज्याचा कारभार कसा चालतो, तेंही जरा यांना ऐकवा. काय वाटेल तें जरा बोलत बसा यांच्या-बरोबर. तोंपर्यंत मी वर जाऊन अनुताईला सांगून सारी आवराआवर करतें. उद्यां सकाळच्या गाडीनं बलरामपूरला जायचंय. दिवसा उजेडीं गेलं म्हणजे मग थंडी बाधायची भीति नाहीं. आमच्याबरोबर यावं अशी मि. चाऊड्रींची इच्छा आहे. बड्या घरची बड्या थाटाची व्यवस्था, यागयज्ञ, क्रियाकलाप, दीयताम् भूज्यताम्, घटपटादि खटपट यांनीं कधीं पाहिलेली नाहीं--अन् पहाणार तरी कुठं म्हणा ?—”

“ अन् तूं स्वतः बरीच पाहिली आहेस, होय ?—” विप्रदासनें विचारलें.

वंदना म्हणाली, “ हा प्रश्न पूर्णपणें अप्रस्तुत आणि सदभिरुचीला शोभण्या-जोगा नाहीं. यांनीं पाहिलेलं नाहीं एव्हढंच म्हटलं होतं—तेव्हढंच ऐकून घ्या. यांना बरोबर यायला संमति दिली त्यावेळीं हे इतके खूष झाले, कीं तिकडून आल्यावर मला मुंबईला नेऊन पोंचवायची यांनीं संमतीसुद्धां दिली. ”

“ काय – म्हणतेस काय ? ” विप्रदास अत्यंत गंभीरपणाचा आव आणून म्हणाला, “ एवढी मोठी त्यागी वृत्ती केवळ तुमच्याच समाजांत दिसते म्हणायची ! आमच्याकडे नाहीं सांपडायची. ऐकतांच मी नुसता थक्क झालों ! ”

“ थक्क होण्याजोगीच गोष्ट आहे ना ? ” वंदना म्हणाली, “—जप-तपही आहे अन् सोळा आणे द्वेषमत्सरही आहे ! ” असें म्हणून एक झटक्याचा

कटाक्ष त्याच्यावर फेकून ती बाहेर जायला निघत होती तोंच तिला हांक मारून विप्रदास म्हणाला, " ही ती शाळेंतल्या पुस्तकांतली गोठ्यांतल्या कुत्र्याची गोष्ट वाटतं ? स्वतः गवत खायचं नाहीं, अन् गवत खाणाऱ्या बैलांना तें खाऊं द्यायचं नाहीं - माणसानं कसा जीव धरावा ? "

वंदना दारांत थबकली, खोट्या रागाचा आव आणून भुवईला आठी पाडून म्हणाली, " अगदीं आमच्यासारखा सामान्य माणूस ! कांहींसुद्धां फरक नाहीं. उगीच हे लोक भीतिखालीं चेंगरून मरताहेत ! "

" आतां तूं एकदां त्यांची भीति घालवून टाक ना ! "

" म्हणून तर येतें आहें अन् गोठ्यांतल्या कुत्र्याची उपमा देणारांचा चांगला सूड घेणार आहें. " असें म्हणून वंदनेनें पुनः एकदां त्याच्याकडे एक जळजळित कटाक्ष फेकला अन् खोलींतून एकदम बाहेर पाय काढला.

विप्रदास म्हणाला, " मिस्टर—"

" नाहीं नाहीं. " अशोक विनयपूर्वक उद्गारला, " तें नको आहे. तें कांहीं नसलं तरी चालावं, म्हणूनच तर धोतर चद्दर अन् पायीं वहाणा घालून आलोंय विप्रदासबाबू. तिनंही मला खात्री दिली - "

विप्रदास मनांतल्या मनांत खूष झाला अन् म्हणाला, " तें ठीक झालं. अशोकबाबू म्हणणं जिभेला सहज मानवतं. खेडवळ माणसं आम्ही, सवय नाहीं अन् ध्यानांतही राहात नाहीं—आतां मात्र बोलायला मुळींच संकोच वाटत नाहीं. आमच्या खेड्यांत यावं असं आपल्याला वाटलं, हें ऐकून मला बरं वाटलं. खरोखरच आलांत तर मलाही समाधान वाटेल. आमच्या घरांत कर्त्याच्या जागीं माझी आई आहे. तिच्या वतीनें मी आपल्याला आदरपूर्वक आमंत्रण देतों. "

विप्रदासचें तें विनययुक्त भाषण ऐकून अशोक रोमांचित अंतःकरणानें म्हणाला, " अवश्य येईन. किती दरिद्री अनाथ आतुर लोक तिथं येतील किती शास्त्रीपंडितांची संभावना होईल, या आनंदोत्सवांत किती येणं जाणं, किती खाणं पिणं, देणं घेणं—एकेक जें पाहिलं नाहीं तें—"

विप्रदास हंसून म्हणाला, " सारं उगीच मोठं करून सांगितलेलं आहे बरं, अशोक बाबू. वंदनेची ती नुसती थट्टा—"

धट्टा करण्यांत तिला काय लाभ विप्रदासबाबू ?"

"पहिला लाभ हा, कीं मला ओशाळायला लावणं. बलरामपूरच्या मुखर्जी घराण्यावर राग आहे तिचा. अन् दुसरा लाभ हा, कीं कांहीं तरी निमित्त करून तुम्हांला मुंबईपर्यंत खेंचून नेणं."

अशोक म्हणाला, "तशीच जरूर पडली तर मुंबईपर्यंत मी तिच्याबरोबर जायचं असं बोलणं झालंय खरं—पण मुखर्जी घराण्यावर तिचा राग आहे, आपल्याला खालीं पहायला लावावं असा तिचा उद्देश आहे असं म्हटलेलं मात्र मला पटायचंच नाहीं. बलरामपूरला जायची गोष्ट कांहीं काल निघाली नव्हती. पण काल मावशीबरोबर जो तिचा झगडा झाला तो आपली तरफदारी केल्यामुळेच. मावशी म्हणाली, 'सर्वांच्या उपयोगासाठीं म्हणून विप्रदासच्या आईनं तलाव खणला त्याचं मला कौतुक वाटतं, पण उगीच अवडंबर माजवून वास्तुशांति कशाला हवी ती ?—कुसंस्कार म्हणतात तो हा. असल्या बाबतींत भाग घेणं मी गुन्हा समजतें.' वंदना म्हणाली, 'ते मोठे लोक आहेत. मोठ्या लोकांघरच्या कार्यांत थोडं अवडंबर असलं तर त्यांत बिघडलं कुठं ?' माझी आत्या म्हणाली, "मोठ्या लोकांनीं थोडा फाजिल खर्च केला तर कांहीं बिघडत नाहीं म्हणा – पण प्रश्न आहे तो खर्चाचा नव्हे—तो एक कुसंस्कार आहे. म्हणूनच तू जाऊं नयेस असं मी म्हणेन.' वंदना म्हणाली, "मी कांहीं या गोष्टींना कुसंस्कार म्हणत नाहीं मावशी. उलट मी असं म्हणतें, जी गोष्ट आपल्याला माहीत नाहीं, माहीत करून घेण्याचा कधीं प्रयत्न केला नाहीं, त्या गोष्टीबद्दल चर्चा करणं हाच कुसंस्कार आहे." तिचं उत्तर ऐकून आत्या रागानं उसळून उठली आणि म्हणाली, 'तुझ्या बाबांची परवानगी आहे का ?' वंदनेनं उत्तर दिल, 'बाबा नको म्हणणार नाहींत. माझ्या बहिणीचा नवरा आजारी आहे त्याला सोबत करायची जबाबदारी आली आहे माझ्यावर !' त्यांनीं विचारलं, 'कुणी ही जबाबदारी टाकली तुझ्यावर ? त्यांनीं स्वतःच वाटतं ?' तो प्रश्न ऐकून वंदना एकदम ताठरून जाऊन टकमक पहात राहिली. तिच्या पायांतलं रक्त मस्तकाला चढलं असावं असं मला वाटलं. आतां एकदम कांहीं तरी भलतंच बोलून जाईल अशी मला भीतीही वाटली होती पण तसं कांहीं तिनं केलं नाहीं. अगदीं शांतपणें ती म्हणाली, 'वाटेल त्यानं वाटेल तें विचारलं तर त्याला उत्तर दिलंच पांहिजे असं कुणी आजवर शिकवलं नाहीं मला मावशी. परवां

सकाळीं मुखर्जीमहाशयांबरोबर बलरामपूरला जाणार – यापेक्षां जास्त बोलायची माझी इच्छा नाहीं.' आत्या रागावून निघून गेली. मी म्हटलं, 'मला नेतेस का बरोबर? हे असले आचार-अनुष्ठानं पहायची माझी फार इच्छा आहे.' वंदना म्हणाली, 'पण हे सारे कुसंस्कार आहेत अशोकबाबू. नुसतं पाहून सुद्धां बाट लागायचा आपल्याला.' मी म्हटलं, 'आपल्याला बाट लागायचा नाहीं ना? मग मलाही बाट लागायचा नाहीं. अन् दोघांची जात एकाच वेळीं बुडाली तर बुडू दे की! माझं कांहीं नुकसान नाहीं व्हायचं त्यांत.' वंदना म्हणाली, 'आपल्याला कांहीं तें पटायचं नाहीं. पाहिलंत तर सारं हास्यास्पद वाटेल.' मी म्हटलं, 'तुझा विश्वास आहे का त्याच्यावर?' ती म्हणाली, 'नाहीं, पण मुखर्जीमहाशयांचा आहे. त्यांच्या विश्वसांतूनच एके दिवशीं खरोखरच माझ्याही मनांत विश्वास निर्माण होईल अशी आशा आहे मला!—' विप्रदासबाबू, वंदनेच्या दृष्टीनं आपण देवमाणूस अहांत. एव्हढी भक्ति मी कधीं कुठं पाहिली नाहीं."

हें त्याला माहीत होतें, यांत नवीन असेंही कांहीं नव्हतें, तरीही दुसऱ्याच्या तोंडून ती हकिकत ऐकतांना त्याचा चेहरा गोरामोरा झाला.

बऱ्याच वेळानें त्यानें प्रश्न केला, "आपला जो हा विवाहाचा प्रस्ताव झाला आहे तो निश्चित झाला आहे का? वंदनेनं संमति दिली का?"

"नाहीं. पण नाहींही म्हटलं नाहीं."

"हा आशेला आधार आहे म्हणायचा अजून. नकार न देणं हें कित्येक बाबतींत संमतीचं लक्षण असतं."

त्या उद्गारामुळें अशोकला समाधान वाटलें. क्षणभर त्याच्याकडे पहात राहून तो म्हणाला, "कदाचित् नकारही असेल – निदान मी तरी सध्यां तसंच धरून चालतों—" पुनः थोडा वेळ थांबून तो म्हणाला, "एक मुष्कील आहे. मी गरीब आहें, वंदना श्रीमंत आहे. पैशाचा मला लोभ नाहीं असं कांहीं मी म्हणत नाहीं. पण माझ्या आत्याच्या मतें, मी एव्हढंच कांहीं पहात नाहीं. हें समजावून द्यायला जाईन तर आत्याबरोबर झगडा व्हायचा प्रसंग यायचा. म्हणूनच मी तिच्या कटांत शिरलों नाहीं."

पहिल्यानें या माणसाबद्दल विप्रदासच्या मनांत थोडीशी अवहेलनेची वृत्ती होती. पण या सरळ उद्गारामुळें ती बरीचशी कमी झाली. वात्सल्यपूर्वक तो म्हणाला, "आपण तिच्या कटांत सामील झालां नाहीं, हें खरं असेल तर तें

वंदनेलाही एक दिवस कळून येईल. अन् तेव्हां मात्र तिची संमति मिळायला वेळ लागणार नाहीं. श्रीमंतीचा प्रश्न आड यायचं कारण त्यावेळीं राहायचं नाहीं. ”

उत्सुकतेनें अशोकनें प्रश्न केला, “ आपली अशी खात्री आहे का विप्रदासबाबू ! ”

या प्रश्नाचें उत्तर देणें विप्रदासला कठीण गेलें. क्षणभर विचार करून तो म्हणाला, “ मला जेव्हढी तिची माहिती आहे त्यावरून तरी असं वाटतं. ”

“ मला काय वाटतं—माहित आहे ? ” अशोक म्हणाला, “ मला वाटतं, तिच्या खुषीपेक्षां मला जास्त जरूरी असेल तर ती आपल्या खुषीची. तेव्हढं लाभलं कीं मग अधिक लाभाची जरुरी राहायची नाहीं मला. ”

विप्रदास हंसून म्हणाला, “ माझ्या खुषीवर तिची नवऱ्याची निवड अवलंबून आहे असं कुणी सांगितलं तुम्हाला ? स्वतः वंदनेनं का ? तिनंच सांगितलं असेल तर मी म्हणेन, कीं तिनं तुम्हाला बनवलं अशोकबाबू. ”

“ नाहीं—बनवलं नाहीं—अगदीं खरं आहे हें. ”

“ कशावरून ? ”

अशोक बराच वेळ उगीच राहून नंतर म्हणाला, “ तोंडानं बोलायच्या या गोष्टी नव्हेत विप्रदासबाबू. त्या दिवशीं मावशीबरोबर झगडा करून वंदना खोलींत आली—अशी ती कधींच येत नसे. एक खुर्ची ओढून घेऊन बसून ती म्हणाली, ‘ मला मुंबईला पोंचवायला तुम्हीं आलं पाहिजे. ’ मी म्हटलं, ‘ जेव्हां हुकूम कराल तेव्हां तयार आहें ’ ती म्हणाली, ‘ मीं जातेंय बलरामपूरला. वेळ आली म्हणजे सांगेन. ’ मी म्हटलं, ‘ सांगा तर. पण मावशीला एवढं चिडवलंत कां ? या पूजापाठ, होमहवन देवदेवता, यांवर त्या लोकांचा खरोखरच विश्वास नाहीं. तरीही तुम्हीं म्हटलं, कीं विश्वास बसला तर सार्थक वाटेल आपल्याला म्हणून ! कां असं बोललां ? ’ वंदना म्हणाली, ‘ खोटं बोललें नाहीं मी अशोकबाबू. खरोखरच त्या लोकांप्रमाणें विश्वासपूर्वक या सर्व गोष्टी जर मला पत्करतां येतील तर मीं स्वतःला धन्य समजेन. मुखर्जीमहाशय आजारी होते तेव्हां त्यांची सेवा केली, त्याच्या बदल्यांत हा वर मागून घेणार आहें मी. ’ त्यानंतर सुरू झाल्या आपल्या गोष्टी. कुणावर कुणाची एवढी श्रद्धा असेल, कुणाच्या शुभेच्छेसाठीं प्रतिक्षणीं कुणी इतकं मग्न होऊन राहिलं असेल, असं यापूर्वी मला केव्हां वाटलंसुद्धां नव्हतं.

बोलतां बोलतां तिनं एक दिवसाची एक हकीकत सांगितली. आपण त्यावेळीं आजारी होतां. ती आपल्या संध्यापूजेची तयारी करीत होती. उशीर झाला होता म्हणून घाईनं येतांना कुठंतरी पाय लागला. असं कांहीं झालं म्हणून पूजेला कांहीं व्यत्यय येत नाहीं असा मनाचा समज करून घ्यायचा तिनं खूप प्रयत्न केला—पण कांहीं केल्या तिच्या मनाला तें पटेना. अशामुळं कदाचित आपल्या सेवेंत अंतर पडेल असं तिला वाटलं म्हणून ती गेली, स्नान करून आली, पुनः पुजेची सारी तयारी केली तेव्हां तिला समाधान वाटलं. आपण त्या दिवशीं जरा चिडूनच म्हटलं होतं, कीं वंदना, सकाळीं लवकर उठायला झालं नाहीं तर पूजेची तयारी करायला अनुताईला सांग. आठवतं ना विप्रदासबाबू ? ”

“ होय. ” विप्रदास मातेनें होकार देत म्हणाला.

अशोक बोलत होता, “—अशा प्रकारें किती तरी रोजच्या बारिकसारिक गोष्टी सांगायला तिनं सुरवात केली. बोलतां बोलतां फार रात्र झाली शेवटीं ती म्हणाली, ‘ त्यांच्या कुसंस्कारांबद्दल मावशी त्यांना नांव ठेवते—मीही असंच यापूर्वीं बोलत होतें अशोकबाबू—पण आज बरं काय आणि वाईट काय हें ठरवायला गेलं कीं माझा घोटाळा उडतोय. कुठं खाण्यापिण्याची मी कधीं क्षिति बाळगली नाहीं—आजन्म वाटत होतं कीं त्यांत कांहीं दोष नाहीं—पण आतां मात्र एकदम विचार पडतो. आपली आपल्यालाच लाज वाटते. इतरांसमोर उघड करूं नयेसं वाटतं. पण जेव्हां मनांत येतं कीं हें सारं त्यांना आवडत नाहीं, तेव्हां मन जसं कांहीं त्यांच्याकडे तोंड फिरवून बसू लागतं. ’ ”

तें ऐकत असतांना विप्रदासचा चेहरा गोरामोरा होऊं लागला होता. बळेंबळें हंसण्याचा प्रयत्न करीत तो म्हणाला, “ असं का ? वंदना आतां खाणंपिणं, शिवाशिव वगैरे गोष्टींचा विचार करूं लागलीय वाटतं ? पण त्या दिवशीं आली त्यावेळीं मला मोठ्या दिमाखानं म्हणाली, कीं मावशीच्या घरीं गेल्यापासून आपला समाज, आपली विचारपद्धति आतां आपल्याला फिरून जाणवूं लागली आहे म्हणून ! मुखर्जीच्या घरच्या हजार प्रकारच्या कृत्रिम प्रकारांपासून आतां आपली सोडवणूक झाली आहे असं म्हणाली ती ! ”

अशोकला आश्चर्य वाटलें. तो कांहींतरी बोलणार होता पण तें तेवढेंच राहिलें. पडदा दूर करून वंदना आंत आली आणि म्हणाली, “ सामानाची आवराआवर करून आलें मुखर्जीमहाशय. उद्यां सकाळीं साडेनवाची गाडी आहे. संध्या पूजा—

वगैरे सारे वायफळ कारभार त्यापूर्वीच उरकून घ्या. ही असली विटंबना देवानं आपल्या नशिबीं लिहिली आहे खरी ! ”

“ असं आहे खरं. ” विप्रदास हंसून म्हणाला.

“ मला वाटतं मुळींच नाही. कुणी प्रयत्न केला असता तर हें सारं कधींच बंद झालं असतं !—आतां ऐका—उद्यां सकाळच्या फराळाची व्यवस्था केली आहे,—मी स्वतः येऊन तुम्हांला वाढीन, तुमच्या अंगावर कपडे चढवीन अन् त्यानंतर तुम्हाला बरोबर घेऊन आपण गांवीं जाऊं. आजारी माणूस ना—म्हणून एवढं ! चला अशोकबाबू, आतां आपण जाऊं. पायाला हात लावून नमस्कार करणार नाहीं आतां—तो कुसंस्कार आहे मुखर्जीमहाशय. सभ्य माणसांना शोभत नाहीं ! ” असें म्हणून दोन्ही हात जोडून मस्तकाला लावून नमस्कार करून ती बाहेर गेली.

२२

दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व मंडळी बलरामपूरला जायला निघाली. घर जसजसें जवळ येऊं लागलें तसतशी ती आश्चर्यचकित झाली. द्विजदासनें जणूं काय राजसूययज्ञाचें अवडंबर माजवलें होतें. समोरच्या मैदानांत लहान लहान चालचलाऊ घरें बांधलीं होतीं. कित्येक तयार झालीं होतीं तर कित्येक होत होतीं. इतक्यांतच आहुत आणि अनाहुत माणसांच्या गर्दीनें तीं भरून जाऊं लागलीं होतीं. यापुढें आणखी किती लोक येणार होते तें खात्रीनें सांगतां आलें नसतें.

विप्रदासला पहातांच आई घाबरीघुबरी झाली. ती म्हणाली, “ अरे हें काय झालंय बाबा ! एकदम अर्धा होऊन गेला आहेस कीं ! ”

तिला प्रणाम करून विप्रदास म्हणाला, “ आतां कांहीं भ्यायला नको. आतां बरा व्हायच्या पंथाला लागलोंय. ”

“ पण आतां तुला कलकत्त्याला कांहीं जाऊं देणार नाहीं—किती का काम असेनात तुझीं—यापुढं तुला डोळ्यासमोर राखलं पाहिजे मला. ”

विप्रदास हंसतमुखानें उगीच राहिला.

वंदनेनें ज्यावेळीं प्रणाम केला त्यावेळीं आशीर्वाद देऊन दयामती उद्गारली, “ ये मुली, ये. आयुष्मती हो ! ” पण त्या बोलण्यांत फारसा उत्साह दिसत

नव्हता. तें भाषण नुसतें औपचारिक होतें. तिला आमंत्रण दिलें नव्हतें, ती स्वेच्छेनें आली होती, असा दयामयीचा समज होता.

मग मैत्रेयीची गोष्ट निघाली. मुलीच्या गुणाला पार नव्हता. हाडामासाच्या माणसाच्या तोंडानें त्या गुणाचें वर्णन करणें कठीण होतें याचेंच दयामयीला मोठें वाईट वाटत होतें. ती म्हणाली, "बापानं शिकवलं नाहीं असा मुळी विषयच नाहीं. पोरीला माहीत नाहीं असं कुठलं कामच नाहीं ! सूनबाईची प्रकृति सध्यां तितकीशी चांगली नाहीं—तेव्हां तिनं एकटीनं सारा बोजा आपल्या माथीं घेतलाय. भाग्य आपलं, कीं तिला आणायची बुद्धि झाली आपल्याला. नाहीं तर काय झालं असतं तें कांहीं सांगतां यायचं नाहीं.'

"म्हणतेस काय आई ?" विप्रदास आश्चर्य प्रकट करीत म्हणाला.

"खरोखरच बाबा—" दयामयी उद्गारली, "पोरीची काम करायची चलाखी पाहून असं वाटतं, कीं तुझ्या वडलांनीं माझ्या माथीं जो बोजा टाकला होता त्याची आतां यापुढं काळजी करायला नको. सूनबाईच्या जोडीला ही मिळाली तर मग कसलीच कमतरता पडायची नाहीं. साऱ्या जबाबदाऱ्या सहज पार पडतील. या वर्षीं कांहीं घटलं नाहीं, पण जगलें वाचलें तर पुढल्या वर्षीं निश्चिन्त मनानं कैलासच्या यात्रेला जाईन."

विप्रदास उगीच राहिला. कदाचित दयामयीचें म्हणणें खोटेंही नसेल. एवढ्या प्रशंसेला मैत्रेयी पात्रही असेल. पण गुणगानालाही कांहीं मर्यादा आहे--स्थलकालभेद आहेत. तिचं घोरण कांहींही असो पण एकंदरींत तिचा उद्देश झांकून राहिला नाहीं. आजवरच्या अतिपरिचित असलेल्या अशा स्वाभिमानावर या तिच्या भाषणानें कुठें तरी करडा आघात झाला आहे असें त्याला वाटलें. कमीपणाची भावना कुठें तरी दिसण्यांत आली ! ही चूक दयामयीच्या लक्षांत आली असावी. मुलाच्या चेहऱ्याकडे पहातांच ती विचारांत पडली आणि झाल्या गोष्टीचा प्रतिकार कसा करावा याचा विचार करूं लागली—पण तिला मार्ग दिसेना.

द्विजदास कुठें तरी जरूरीच्या कामांत गुंतला होता तो मंडळी आल्याचें कळतांच धांवत आला.

विप्रदास म्हणाला, "केवढा भयंकर डोलारा उभारला आहेस हा द्विजू! हें आतां कसं आवरणार ?"

द्विजदास म्हणाला, "आपण स्वतः तर हा भार घेतला नाहीं ना दादा ? सारा भार टाकलाय माझ्यावर. मग आपल्याला कसली भीति ?"

याचें उत्तर दिलें वंदनेनें. ती म्हणाली, " या खर्चांचे पैसे जर रयतेकडून वसूल नाहीं झाले तर मुदलाला हात घालावा लागणार, याचीच काळजी वाटतेय त्यांना. मग भीति कशी वाटणार नाहीं द्विजूबाबू ? "

सारेच हसूं लागले. आईच्या मनावरचा दाब या थट्टेमुळें तेवढाच कमी झाला. खोट्या रागाचा आव आणून ती हंसतमुखानें म्हणाली, " आतां हें आपल्या बहिणीसारखंच म्हणूं लागली आहेस तूं वंदना. अशीच ती सतावीत असते याला. केवढा धार्मिक आहे हा माझा मुलगा ! सारे मिळून जर त्याला असा खोटाच टपका देऊं लागलां, तर तें नाहीं मला सहन व्हायचं. "

" टपका खोटा असला तर तो लागायचा नाहीं आई. त्यांत रागवायला काय झालं ? "

" तो रागावतच नाहीं कधीं. " आई म्हणाली, " ऐकलं कीं नुसता हंसतो."

" तसंच कारण आहे त्याला आई. " वंदना म्हणाली, " पोटासाठीं खाल्लं तर पाठीवर सोसलं पाहिजे, अशा वेळीं रागावणं म्हणजे मूर्खपणा, हें मुखर्जी-महाशयांना चांगलं माहीत आहे. खरं ना मुखर्जीमहाशय ? "

" खरं तर काय ? " विप्रदास हंसत उद्गारला, " मूर्खांच्या बोलण्याचा राग धरूं नये. शास्त्राचा निषेध आहे त्याला. त्याची व्यवस्था शास्त्रांत निराळ्याच प्रकारें केली आहे. "

" ताई तर माझ्यापेक्षांही मूर्ख आहे मुखर्जीमहाशय." वंदना म्हणाली, " या शास्त्रांतल्या व्यवस्थेमुळंच सर्वांची आपल्यावर एवढी भक्ति आहे वाटतं ! " असें म्हणून हंसत हंसत तिनें तोंड फिरवलें. आपल्या चेहऱ्यावरचें हसूं दिसूं नये म्हणून द्विजदासही दुसरीकडे पाहूं लागला. स्वतः दयामयीसुद्धां हंसत सुटली.

ती म्हणाली, " ही वंदना पोर मोठी वाईट आहे. हिच्याबरोबर बोलायची सोयच नाहीं मुळीं ! " जरा थांबून गंभीर होऊन ती म्हणाली, " असं पहा मुली, ते होते त्यावेळीं त्यांच्या अमदानींत रयतेवर अशा प्रकारची जबरदस्ती होत नव्हती असं कांहीं मी म्हणणार नाहीं. पण एवढं तुला सांगतें, माझा विपिन म्हणजे मोठा धर्मनिष्ठ मुलगा आहे बरं. जें योग्य नव्हे—हक्काची वसुली नव्हे – तें कुणाकडूनही वसूल करायचा नाहीं तो मला भीति वाटते या द्विजूची. हा करील तसं ! "

" हा तुझा आरोप मात्र अयोग्य आहे ! " विप्रदास तिला खोडून टाकीत म्हणाला, " द्विजू कधीं रयतेचा छळ करील ! रयतेची बाजू घेऊन एकदां तो

माझ्याविरुद्ध उठला होता, सारा देऊं नका म्हणून सांगत होता, तें आठवत नाहीं का तुला ? ”

“ आठवतेंय म्हणूनच म्हणतें —” आई म्हणाली, “ जें न्यायाचं देणं आहे त्याला जो विरोध करतो तो अन्यायाच्या देण्यालाही तसंच करील विपिन ! दुसरा कुणी करायचा नाहीं. त्याला दयामाया आहे—थोडी वाजवीपेक्षां जास्तच आहे—पण तूं पहाशील, एक दिवशीं याच्याच करवीं रयतेला जास्त त्रास होईल. ”

“ नाहीं आई, त्रास व्हायचा नाहीं. तूंच पहाशील. ”

“ तूं आहेस म्हणून आशा आहे. ” दयामयी म्हणाली, “ नाहींतर त्याला योग्य मार्गाला लावायला दुसरं कुणीतरी पाहिजे. तसं कुणी नसलं तर एक दिवशीं हा स्वतः बुडेल अन् दुसऱ्यालाही बुडवील. ”

अजून द्विजदास उगीच राहिला होता पण आतां मात्र त्याला वाचा फुटली. तो म्हणाला, “ तुझं शेवटचं बोलणं तेवढंच चुकलं आई. मी स्वतः बुडेन हें म्हटलंस तें खरंही होईल एकाद्या वेळीं—पण दुसऱ्याला मात्र मी बुडवणार नाहीं हें पक्कं समजून ठेव ! ”

“ पण तें सुद्धां चांगलं नाहीं द्विजू. ” आई म्हणाली, “ स्वतः बुडण्यांत सुद्धां कांहीं आनंद नसतो. मुख्य म्हणजे हें, कीं तुला वागवून घ्यायला कुणी तरी दुसरं माणूस पाहिजे. ”

द्विजदास म्हणाला, “ तें काय तें एकदां स्पष्टपणें बोलून टाक म्हणजे सर्वांची काळजी दूर होईल. मला वागवून घ्यायला कुणीतरी एक माणूस हवं !—पण तें माणूस तूं जवळ जवळ मिळवूनच ठेवलं आहेस आई. ”

आई म्हणाली, “ खरोखरच जर मिळालं असेल तसं माणूस, तर तुझं भाग्य म्हण. ”

या चर्चेचें मुख्य तात्पर्य आतां सर्वत्रांच्या ध्यानीं येऊन चुकलें.

आई बोलत होती, “—हें एवढं अवडंबर माजवलंस, कुणाचं ऐकलं नाहींस,—म्हटलंस कीं हा दादांचा हुकूम ! पण दादानं काय अश्वमेध यज्ञ आरंभायला सांगितलं होतं ? आतां हें निभावणार कसं ? भाग्य आपलं कीं मैत्रेयी आलीय. तेवढाच आधार आहे म्हणायचा. ”

द्विजदास म्हणाला, “ आधीं हें कार्य निर्विघ्न पार पडूं दे, मग ज्याला कुणाला शिफारसपत्र द्यायचं असेल तें दे. माझी कांहीं हरकत नाहीं त्याला. पण एव्हांच याची घाई कशाला ? ”

वंदनेनें विचारलें, " पण त्यावेळीं शिफारसपत्रावर द्विजबाबू का सही करणार आहेत ? तिसरा नंबर आहेत ना ते ? "

द्विजदास म्हणाला, " छे, छे, तिसऱ्या नंबराची काय शहामत लागली आहे सही करायची ? आजसुद्धां महापराक्रमी पहिला अन् दुसरा नंबर विद्यमान आहे ना ? "

तें ऐकून वंदना हंसली आणि स्वतः द्विजदासही हंसला.

विप्रदास आईच्या तोंडाकडे आणि आई विप्रदासच्या तोंडाकडे नुसती पहात राहिली. या भाषणांतली खोंच त्यांच्या ध्यानीं आली नाहीं.

इतक्यांत अन्नदा येऊन म्हणाली, " हें काय झालं वंदनाताई ? काल बडे-बाबूंच्या औषधाच्या बाटल्या ज्या कागदी पेटींत भरल्या होत्या ती पेटी कुठं दिसत नाहीं ती ? हरवली तर नाहीं ? "

" नाहीं—हरवली नाहीं अनुताई. कलकत्त्याच्या घरांतच राहिलीय ती. "

दयामयी घाबरून म्हणाली, " मग आतां कसं करायचं वंदना ? केवढा घोटाळा झाला हा ? "

" घोटाळा झाला नाहीं आई—" वंदना म्हणाली, " येतांना जाणूनबुजूनच मी ती ठेवून आलें तिथं. "

" जाणूनबुजून ठेवून आलीस ? म्हणजे काय ? "

" असा विचार केला मी, पुष्कळ झालीं औषधं घेऊन. आतां पुरे. आई जवळ नव्हत्या त्यावेळीं औषधांची जरूरी होती. आतां औषधांशिवाय बरं वाटेल. मुळींच वेळ लागायचा नाहीं. "

तें भाषण ऐकून दयामयीसुद्धां जरा खुंलली च. तरीही म्हणाली, " तरीपण हें बरं केलं नाहींस मुली. खेडेगांवची वस्ती - डॉक्टरवैद्य चट्कन् मिळत नाहींत. जरूरी लागली—"

" आतां जरूरी लागायची नाहीं आई. " अन्नदा म्हणाली, " तसं असतं तर तिनं आणलींच असतीं तीं औषधं. कधींच तिथं टाकून आली नसती ती. औषधं, वैद्य, डॉक्टरांपेक्षां वंदनाताईलाच जास्त चागलं कळतं. "

प्रशंसापूर्ण नजरेनें दयामयी तिच्याकडे पहात राहिली. वंदना म्हणाली, " एकाद्याला चढवून ठेवायचा अनुताईचा स्वभावच मुळीं ! तसं पाहिलं आई, तर खरोखरच मला कांहीं कळत नव्हतं. जें कांहीं थोडंबहूत शिकायला मिळालं तें केवळ मुखर्जीमहाशयांची सेवा करतांना. "

अन्नदा म्हणाली, "ती सेवा म्हणजे काय तें केवळ एक मीच जाणतें. कसं अचानक संकट आलं एक दिवस ! घरीं कुणीच नव्हतं, वासू आजारी असल्याची तार आली म्हणून द्विजू इकडे निघून आलेला, दत्तमहाशय गेले होते ढाक्याला — अन् त्याचवेळीं विपिनला आला ताप. पहिले दोन दिवस कसेबसे काढले पण तिसऱ्या दिवशीं ताप भलतीकडे वाढला. डॉक्टरला बोलावून आणलं. त्यानं औषथ दिलं खरं पण भीति घातली दसपट. खुळीभोळी बायको मी— एकटीनं काय करायचं ? तुम्हा कुणाला कळवतां येईना—कारण विपिन नको म्हणाला. तशीच घाबऱ्याघुबऱ्या निघालें ती गेलें वंदनेकडे तिच्या मावशीच्या घरीं. रडत रडत म्हणालें, 'आतां राग धरून बसूं नकोस ताई. तुझे मुखर्जी-महाशय फार आजारी आहेत.' जशी होती तश्शी निघाली अन् गाडींत येऊन बसली – मावशीलासुद्धां सांगायला गेली नाहीं. घरीं आल्याबरोबर सारा ताबा घेतला. सारींजणं रात्रंदिवस खपत होतीं. कित्येक दिवस एक घटकेची सुद्धां फुरसत मिळाली नाहीं तिला. नुसतं औषध द्यायचंच नव्हे, तर सकाळीं उठल्या-बरोबर पूजेच्या तयारीपासून सुरवात करून रात्रीं मच्छरदाणी लावून विपिनची झोपायची व्यवस्था करीपर्यंत सारं कांहीं वंदनाताई करीत होती. तिनं औषध नको म्हटलं आतां, तर कुणी हवं म्हणायला नको कांहीं. ती जाणते सारं कांहीं. असीच सुधारेल विपिनची प्रकृति."

विप्रदासनें सुद्धां होकार दिला. तो गंभीर होऊन म्हणाला, "खरोखरच आतां मी साफ बरा होईन आई. तुम्ही या बाबतींत कांहीं बोलूं नका. माझं औषध बंद करायची तिला बुद्धि झाली हेंहि चांगलंच झालं म्हणायचं. मनःपूर्वक मी तुला आशिर्वाद देतों वंदना, राजाची राणी हो."

दयामयी सारखी पहात राहिली होती. तिच्या दोन्ही डोळ्यांत वात्सल्याचा ओलावा चमकत असलेला दिसत होता.

मोलकरीण येऊन म्हणाली, "सुनबाई विचारताहेत आई, कीं कलकत्त्याहून जें सारं सामान आलंय तें ठेवायचं कोणत्या खोलींत ?"

दयामयीच्या तोंडून उत्तर यायच्यापूर्वीच वंदना म्हणाली, "मी आपली म्लेंच्छ मुलगी आई, पण म्लेंच्छ आहे म्हणूनच का एवढ्या मोठ्या कार्यांत भाग घ्यायला मिळूं नये मला ? काय नुसतीं इथं उगीच बसून राहूं ? माझा विटाळ झाला तरी बिघडणार नाहीं असं कांहीं तरी काम असेलच कीं इथं ?"

तिचा हात धरून ओढून दयामयीनें तिला जवळ कवटाळलें. पदराच्या

गांठीचा चाव्यांचा जुडगा सोडून घेऊन तो तिच्या हातीं देत ती म्हणाली, "तुला उगीच बसायला कंशी देईन मुली ? या घे माझ्या कोठीच्या चाव्या. सूनबाईखेरीज इतर कुणाच्याच हातीं दिल्या नव्हत्या त्या. आजपासून ही कामगिरी तुझी."

"काय आहे त्या कोठींत ?"

हा चाव्यांचा जुडगा सर्वांच्या परिचयाचा होता द्विजदासनें त्याच्याकडे नजर फेकली आणि म्हटलें, "शिवाशिवीच्या मर्यादेपलीकडचं जें जें कांहीं आहे तें. सोनंरुपं, पैसा अडका, पितांबर पैठण्या—तुझी शिवाशिव झाली तरी अत्यंत धार्मिक व्यक्तीला सुद्धां जे जिन्नस माथीं घ्यायला बाध येणार नाहींत ते."

"मी आतां काय करूं आई ?" वंदनेनें विचारलें.

दयामयी म्हणाली, "शास्त्रीपंडितांना दक्षिणा देणं, अतिथी अभ्यागताची चरदास्त ठेवणं, नात्यागोत्याच्या माणसांच्या जाण्यायेण्याची व्यवस्था करणं—आणि या सर्वांबरोबरच या पोराला कडक शिस्तींत राखणं—" असें म्हणून तिनें द्विजदासकडे बोट दाखविलें आणि म्हटलें, "—मला हिशेब कळत नाहीं. मला फसवून हा किती पैसे नेऊन उधळतो त्याला सुमारच नाहीं मुली. आधीं हें बंद व्हायला हवं."

"दादाच्या समोर असं कांहीं बोलूं नकोस आई," द्विजदास म्हणाला, "त्याला वाटेल हें सारं खरंच. रीतसर जो खर्च झाला आहे त्याचा हिशेब खर्चाच्या खातेवहीला लिहिलाय. तपासून पाहिलं कीं पटेल बरोबर."

पण तपासायचं कसं ?" दयामयी म्हणाली, "खर्चाचा हिशेब लिहिलेला असेल पण अपव्ययाचा हिशेब कोण लिहिणार आहे ? सांग ना ! मी वंदनेला सांगतें आहें तें तें."

तें कळून तरी काय उपयोग आई ?" वंदना म्हणाली, "त्यांचे पैसे त्यांनीं उधळले तर मी अटकाव कसा करणार ?"

"तें मला माहीत नाहीं." दयामयी म्हणाली, "तूं भार घ्यायला तयार झालीस—मी भार देऊन निश्चिन्त झालें. तुला एक गोष्ट सांगतें वंदना, तुलाही एक दिवस संसार करायचा आहे, त्यावेळीं अपव्यय वांचवायची जबाबदारी येऊन तुझ्या अंगावर पडली तर मला माहीत नाहीं म्हणून चालायचं नाहीं."

"ऐकलात ना आईचा हुकूम ?" वंदना द्विजदासकडे पाहून म्हणाली.

"ऐकला तर ! द्विजदास म्हणाला, "खर्च करायचा भार माझ्यावर

टाकलाय दादांनीं—अन् खर्च न करूं द्यायचा भार तुझ्यावर टाकलाय आईनं. अर्थात खंडयुद्ध माजणार—त्यावेळीं मात्र दोष देऊन चालायचं नाहीं. ”

दोष द्यायचं कारणच पडणार नाहीं द्विजूबाबू. ” वंदना हंसतमुखानें म्हणाली, “ आपल्याच पैशाच्या हिशेबीं आपल्याच बरोबर मॉक फाईट सुरू करायचा माझा पोरकटपणा आतां गेलाय. या बंगालदेशांत आल्यापासून तें शिक्षण मला मिळालंय. असा झगडा व्हायच्या पूर्वीच सारी जबाबदारी आईच्या हातीं सोपवून मी बाजूला सरेन. ”

तिचे हे उद्गार दयामयीला तितकेसे कळले नाहींत. तरीही तिला वाटलें, कीं वंदनेला राग येणें शक्य होतें. काकुळतीच्या वाणीनें ती म्हणाली, “ ती जबाबदारी मी परत घेणार नाहीं मुली. ती तुझी तूंच निस्तरली पहिजेस. इथं किती वेळ उभं राहणार आतां ? आंत चल. तुझं काम तुला समजावून देतें. असें म्हणून तिचा हात धरून ओढून ती तिला आंत घेऊन गेली.

त्या दिवशीं वंदना आली होती त्यावेळीं सारी घटकाभरच इथें होती. कुठें काय आहे हें पहाण्याची संधि तिला मिळाली नव्हती. आज ती पाहूं लागली तेव्हां चकित झाली – सारखीं दालनांमागें दालनें लागून राहिलीं होतीं त्यांचा अंतच लागत नव्हता. गोतावळा केवढा तरी मोठा होता. याच्या नात्याचा तो, त्याच्या नात्याचा तो, असा एकेकाचा एकेक संसार वेगवेगळा होता. मुलापासून नातवंडांपर्यंत त्यांची मालिका लागलेली होती.

एका बाजूला कचेरी होती आणि त्या कचेरीच्या अनुषंगानें जी जी कांहीं व्यवस्था असायची ती तिथेंच होती. त्याच्या दुसऱ्या बाजूला होतें देवघर, सैंपाकघर, नंतर दयामयीची भली मोठी गोशाळा; त्यापलीकडे भली उंच भिंत घातलेली बाग आणि पुष्करिणी होती. दुसऱ्या मजल्याच्या पूर्वेकडच्या खोल्या दयामयीच्या होत्या. त्यांतल्या एका खोलीच्या समोर वंदनेला घेऊन ती आली आणि म्हणाली, “ मुली, ही तुझी खोली. हें जोखीम आतां सारं तुझ्यावर. ”

पलीकडल्या बाजूला सति आणि मैत्रेयी कसल्या तरी वस्तु तपासीत होत्या. दयामयीचा आवाज ऐकतांच त्यांनीं वर पाहिलें आणि वंदना आलेली पहातांच दोघीही हातचें काम टाकून जवळ येऊन उभ्या राहिल्या. ती येईल अशी कुणाचीच अपेक्षा नव्हती.

ताईला प्रणाम करून तिनें मैत्रेयीला नमस्कार केला. आई म्हणाली, “ बरं का सूनबाई, ही आमची म्लेंच्छ पोरगी म्हणते कीं कांहीं तरी काम

द्या म्हणून. स्वस्थ बसून राहायला ती नाखुष आहे. तुमच्यावर बरीचशीं कामं सोपवलीं आहेत. तेव्हां आतां हिला देतें ही कोठीची चावी."

"काय आहे या कोठींत?" मैत्रेयीनें विचारलें.

"म्लेंच्छाची शिवाशिव झाली तरी चालेल असेच जिन्नस आहेत या कोठींत!" असें म्हणून वंदनेकडे पाहून दयामयी मोठ्या कौतुकानें हंसली.

खोली उघडून सारी मंडळी आंत आली. थराथरानें जमिनीवर रचलेलीं चांदीचीं भांडीं तिथें होतीं. शास्त्री पंडितांची संभावना करण्यासाठीं कलकत्त्यांतून रुपयापासून पावलीपर्यंत मोडून आणलेल्या नाण्याच्या थैल्या राशी करून रचून ठेवलेल्या होत्या. बहुमूल्य रेशमी वस्त्रें बासनांत बांधून रचून ठेवलेलीं होतीं तीं उघडून पाहायला यावेळीं अवसर नव्हता. या सर्व वस्तूंशिवाय दयामयीची संदुक आणि तिजोरी याच खोलींत होतीं. त्यांचा निर्देश करून ती हंसून म्हणाली, "पाहिलंस वंदना, माझं जें कांहीं आहे तें यांत आहे. अन् द्विजूचा जो डोळा आहे तो सारा यावरच. सर्वांपेक्षां जास्त पहारा पाहिजे तुझा, तो या जागीं! माझ्याप्रमाणेंच तुझ्या हातावरही तो तुरी देऊं पाहील—तेवढीच काळजी घे."

वंदना कावरीबावरी झालेली पाहून बहिणीची बाजू घेऊन सति पुढें सरसावली आणि म्हणाली, "एवढ्या मोठ्या कामाचा भार तिच्यावर टाकून चालेल का आई? ही पैशाअडक्याची भली मोठी जबाबदारी—"

तिचें भाषण पुरें व्हायच्या पूर्वीच दयामयी मधेंच म्हणाली, "पैशाची जबाबदारी मोठी आहे म्हणूनच तिच्या हातीं चाव्या दिल्या आहेत सूनबाई. नाहींतर द्विजू माझं दिवाळं वाजवील."

"पण ही बाहेरून आलेली आहे आई—"

सतीला दयामयीनें भाषण पुरें करूं दिलें नाहीं. ती हंसून म्हणाली, "एके दिवशीं तूंही बाहेरून आली होतीस. आणि त्यापूर्वीं कितीतरी दिवस मीही बाहेरूनच आलें होतें. त्याला कांहीं हरकत नाहीं सूनबाई. पण मला आतां वेळ नाहीं. मी चाललें." असें म्हणून ती खोलींतून बाहेर पडली आणि सरळ जिना उतरून खालीं गेली.

वंदना म्हणाली, "तुझ्या घरीं आल्यामुळं या कसल्या जाळ्यांत मी सांपडलें ही ताई? श्वास टाकायला फुरसत मिळायची नाहीं आतां."

"असं वाटतं खरं!" असें म्हणून सती नुसती उगीच थोडीशी हंसली.

२३

या संसारांत संकटें कशीं आणि कोणत्या बाजूनें येऊन उभीं राहातात तें पाहिलें म्हणजे मोठें आश्चर्य वाटतें. कामाची गडबड सुरू असतांना कल्याणी येऊन रडत बसली आणि म्हणाली, " ते म्हणताहेत, आतांच्या आतां इथून निघायचं, बरोबर चल म्हणून. काय करूं आई, ही गाडीची सुद्धां वेळ नव्हे. तरीही म्हणताहेत स्टेशनवर बसून रहावं लागलं तरी पत्करलं पण या घरांत आतां क्षणभरसुद्धां राहाणार नाहीं. "

पुष्करणीप्रतिष्ठेचा शास्त्रोक्त विधि नुकताच संपला होता. दयामयी नुकतीच मंडपांतून बाहेर निघून घरांत पाऊल ठेवीत होती. भयंकर गडबडींत असतांही ती थबकून उभी राहिली. मुलीचें भाषण तिच्या चांगलेसें लक्षांत आलें नाहीं. हतबुद्ध होऊन ती म्हणाली, " कोण म्हणतोय असं ? शशधर कां ? कां ? "

" दादानं त्यांचा भयंकर अपमान केला. खोलींतून बाहेर ओढून काढलं ! " असें म्हणून कल्याणी एकदम ओक्साबोक्शी रडूं लागली.

चोहोंबाजूला माणसें गोळा झालेलीं, कुठें जेवणाच्या पंगती बसताहेत, कुठें गाण्याबजावण्याचे अड्डे बसले आहेत, कुठें भिकाऱ्यांची आपसांतील दंगल सुरू आहे, कुठें ब्राह्मण पंडितांची शास्त्र चर्चा सुरू आहे; असंख्य माणसांचा असंख्य प्रकारचा कोलाहल सुरू असतांना एकदम मधेंच ही भानगड सुरू झाली.

सती आणि मैत्रेयी तिथेंच हजर होत्या. कोठीला कुलूप लावून वंदना तितक्यांत आली. गोतावळ्याची मंडळी उगीचच चौकसपणानें गोळा झाली. शशधर येऊन सासूला प्रणाम करून म्हणाला, " आम्ही निघालों आई. बोलावलंत म्हणून आलों, पण राहणं शक्य नाहीं. "

" कां बाबा ? "

" विप्रदासबाबूनीं आपल्या खोलींतून मला बाहेर ओढून काढलं. "

" कारण काय ? "

" कारण हेंच, कीं ते आहेत फार मोठे माणूस ! अभिमानानं नजर बंद झालेली, कानाला दडे बसलेले, तेव्हां दिसतही नाहीं आणि ऐकूही येत नाहीं.

त्याला वाटतं, कीं घरीं माणसाला बोलावून आणून अपमान करणं सोपं. आपल्या त्या मुलाला एकदां नीट समज देऊन सांगा—म्हणावं, माझ्याही बाबांनीं जी जमीनदारी माझ्यासाठीं ठेवलीय तीही कांहीं लहान नाहीं. मला देखील कांहीं हिंडायला नको आहे भिक्षा मागत. ”

दयामयी घाबरून म्हणाली, “ थांब बाबा. मी विपिनला बोलवायला पाठवतें. काय झालं तें विचारून घेतें. अजून माझं काम संपायचंय, ब्राह्मण भोजन तेव्हढं शिल्लक राहिलंय, भिक्षुक वैष्णवांची संभावना व्हायच्यापूर्वीच तूं ज़र असा रागारागानं जायला निघालास शशधर, तर मग ज्या तळ्याची आज प्राणप्रतिष्ठा केली त्याच्यांतच उडी घेऊन मरण्याखेरीज दुसरा उपाय राहायचा नाहीं मला ! ” बोलतां बोलतां तिचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले.

सासूच्या डोळ्यांतल्या पाण्यानें जांवयाचा राग धुवून गेला नाहीं. शशधर हा थोरामोठ्याचा मुलगा, तरीपण त्याची चालचलवणूक मुळींच थोरामोठ्यासारखी नव्हती. त्याच्या शेजारीं उभें राहायला कुणालाही संकोच वाटला असता.

त्याचा तो अजस्र देह अन् त्याहूनही अजस्र चेहरा चिडलेल्या बोक्याच्या चेहऱ्यासारखा फुलून उठूं लागला. तो म्हणाला, “ इथं राहीन पण एका अटीवर—विप्रदासबाबूनं या सर्वांच्या समोर हात जोडून माझी क्षमा मागितली पाहिजे. नाहींतर चाललों. ”

ती मागणी अनपेक्षित आणि आश्चर्यकारक होती, कीं ऐकल्याबरोबर सारीं आश्चर्यानें थक्क होऊन गेली. विप्रदासानें हात जोडून क्षमा मागायची ! आणि तीही सर्वांच्या समक्ष !

क्षणभर सर्वांचीच बोबडी वळली होती. सर्वांचेच चेहरे पांढरे फटक पडले होते. अगदीं काकुळतीला येऊन सती म्हणाली, “ ही वेळ नव्हे जांवईबुवा. आतांचं हें शुभकार्य उरकूं दे, रात्रीं आई या प्रकरणाचा निकाल लावतील कांहीं तरी. उगीच कुणी कधीं तुमचा अपमान करील का ? चूकच झाली असेल तर ते निश्चित तुमची क्षमा मागतील. ”

वंदनेच्या डोळ्याच्या कोपऱ्यांतून जणूं कांहीं दोन ठिणग्या बाहेर पडल्या. तरीही ती शांतपणें म्हणाली, “ त्यांच्याकरवीं कधींच चूक व्हायची नाहीं ताई. ”

“ तूं उगी रहा वंदना, ” सती तिला दाबून म्हणाली, “ सारींच माणसं चुका करतात. ”

"नाहीं." वंदना म्हणाली, "ते नाहीं चूक करणार."

तिचें भाषण ऐकून मैत्रेयी उसळून उठली आणि चिरडीच्या आवाजांत म्हणाली, "तें कसं कळलं तुम्हाला? तिथं कांहीं तुम्ही नव्हतां! हे काय बनवून सांगताहेत?"

वंदना क्षणभर तिच्याकडे नुसती पहातच राहिली आणि नंतर म्हणाली, "बनवून सांगताहेत असं मी मुळींच म्हटलं नाहीं. मी एवढंच म्हणतें, मुखर्जी-महाशयांच्या वागणुकींत कधींच चूक व्हायची नाहीं."

मैत्रेयी अधिकच चिडून उठली आणि तावातावानें म्हणाली, "सारेच चुका करतात. कुणी कांहीं देवाचे अवतार नव्हत. माझ्या बाबांचासुद्धां अपमान करायचं ठेवलं नाहीं त्यांनीं.'

वंदना म्हणाली, "तर मग शशधरबाबू जसे जायला निघाले तसं त्यांनींही निघायला पाहिजे होतं. कां राहिले ते?"

तितक्याच चिरडीनें मैत्रेयीनें उत्तर दिलें, "ती कैफियत आपल्यासमोर द्यायची जरूरी नाहीं. जें कांहीं व्हायचं तें द्विजूबाबूंसमोर—कारण आमंत्रण दिलंय त्यांनीं."

सती काकुळतीला येऊन म्हणाली, "तुझ्या पायां पडतें वंदना, तूं जा पाहूं इथून निघून—आपल्या कामाला लाग."

दयामयीला उद्देशून शशधर म्हणाला, "मी कांहीं न्याय मागण्यासाठीं दरबार भरवायला आलों नाहीं. एवढंच विचारायचं आहे मला, आपला मुलगा हात जोडून माझी क्षमा मागणार कीं नाहीं? नाहीं तर हा निघालों—एक क्षणभरसुद्धां इथं राहणार नाहीं. आपल्या मुलीनं वाटलं तर माझ्याबरोबर यावं—नाहीं तर येऊं नये—पण आली नाहीं तर यापुढं सासुरवाडीचं नांवसुद्धां घेऊं नये—इथल्या इथं—आजच्या आज सारं कांहीं संपलं म्हणून समजावं!"

हा काय भयंकर प्रसंग! शशधरला कांहींच अशक्य नव्हतें. मुलीला आणि जांवयाला घरीं आणून कसलें हें संकट ओढवून घेतलें?

समोर उभी राहून कल्याणी रडत होती. सल्लामसलत द्यायला कुणी नाहीं, विचार करायला वेळ नाहीं, अत्यंत अपमान झाल्यामुळें झालेलें दुःख आणि उत्पन्न झालेली शरम यांच्या योगानें दयामयीची कर्तव्यबुद्धि झांकळून गेलेली, अशा परिस्थितींत काय करावें हें तिला सुचेना. ती घाबरून म्हणाली, "जरा

थांब बाबा, मी विपिनला बोलावणें पाठवतें. कुठं तरी कांहीं तरी विलक्षण गैरसमज झालाय असं वाटतंय मला. पण या साऱ्या गोळा झालेल्या लोकांत जर ही गोष्ट फैलावली तर मला आमहत्या करायचा प्रसंग येईल बाळ !"

"ठीक आहे." शशधर म्हणाला, "मी इथं आहें तोंवर त्याला बोलवा. खोटं का होईना पण विप्रदासबाबूनं सांगावं, कीं मी तसं केलं नाहीं म्हणून."

"तो कधींच खोटं बोलायचा नाहीं शशधर !" असें म्हणून दयामयीनें विप्रदासला बोलावणें पाठवलें. चारपांच मिनिटांनीं विप्रदास येऊन हजर झाला. तसाच शांत, तसाच गंभीर, तसाच स्वाभिमानी दिसत होता तो. काय ती त्याच्या नजरेंतली थकल्यागत उदासवाणी छटा ! त्याच्या अंतरांत कसली खळबळ झांकलेली होती तें सांगणें कठीण होतें. दयामयी घाबरीघुबरी होऊन म्हणाली, "तुझ्यावर हा शशधर कसला आरोप करतो आहे विपिन ? तो म्हणतोय तूं त्याला खोलींतून ओढून बाहेर काढलंस ? खरंच का असं झालंय ?"

"खरंच तर आई !" विप्रदास म्हणाला.

"खोलींतून बाहेर घालवलंस माझ्या जांवयाला ? या मंगलकार्य चाललेल्या घरांतून ?"

"हो. खरोखरच घालवून दिलं—आणखी म्हणतोंय, कीं यापुढं त्यानं माझ्या खोलींत पाऊल न टाकावं हें बरं."

वज्राघात झाल्याप्रमाणें दयामयी तिथल्या तिथें ताठरून स्तब्ध झाली. तो धक्का ओसरल्यावर कांहीं वेळानें तिनें विचारलें, "कां ?"

"तें तूं ऐकूं नयेस हेंच बरं आई."

आतां सतीच्यानें रहावेना. ती एकदम कळवळून पुढें सरसावून म्हणाली, "आम्हाला कांहीं ऐकायला नको आहे खरं; पण जांवईबुवा कल्याणीला घेऊन आतांच्या आतां निघालेयत जायला. या भरल्या घरांत एवढ्या लोकांत कळलं तर केवढं लांछन लागेल याचा विचार करायला हवा. नकळत हातून असं कांहीं तरी घडलं असं सांगा त्यांना—त्यांना राहून घ्या एकदां."

पत्नीच्या तोंडाकडे एक क्षणभर निरखून पाहून विप्रदास म्हणाला, "न कळत माझ्या हातून कांहीं घडत नाहीं सती."

"होतं—होतं ! अचानक कुणाच्याही हातून चूक होत असते. त्यांना सांगा रहायला."

"माझ्या हातून चूक झाली नाहीं." विप्रदास निश्चयपूर्वक मान हालवीत म्हणाला.

नवराबायकोच्या या बोलाबोलींत दयामयीनें तोंड घातलें नव्हतें. तितक्यांत कुणी तरी डिवंचल्यासारखें तिला वाटलें आणि ती करड्या शब्दांत म्हणाली, "कळत नकळत चूक व्हायचा झगडा सध्यां राहूं दे. मुलगी जांवयांशी माझी कायमची तारातूट होणं मला सहन व्हायचं नाहीं ! तूं शशधरची क्षमा माग विपिन."

"तें होणार नाहीं आई—तें अशक्य आहे.

"शक्य अशक्य मी जाणत नाहीं. तुला क्षमा मागितलीच पाहिजे."

एक शब्दसुद्धां न बोलतां विप्रदास तसाच उभा राहिला होता. अशक्य गोष्ट शक्य करणें शक्य नाहीं हें दयामयीलासुद्धां कळून चुकलें होतें. तिच्या रागाला सीमा राहिली नाहीं. ती म्हणाली, "घर कांहीं तुझं एकट्याचंच नाहीं विपिन. कुणालाही घराबाहेर काढायचा अधिकार तुला एकट्यालाच कांहीं देण्यांत आलेला नाहीं. ही इथं रहाणार."

"असं पहा आई," विप्रदास म्हणाला, "मला न बोलावतां तूं जर मला कुणाकडे असं सांगून पाठवलं असतंस तर मी उगीच राहिलों असतों—पण आतां तें शक्य नाहीं. या घरांत शशधर रहाणार असेल तर मला हें घर सोडणं भाग आहे. एकदां गेलों कीं मी पुनः येणार नाहीं. यांतलं काय पत्करतं बोल ?"

असल्या भयंकर पेचांत पडण्याचा प्रसंग उभ्या आयुष्यांत तिला आला नव्हता. असल्या प्रकारचा प्रसंग कधीं येईल याची कल्पनाही तिला नव्हती. एका बाजूला मुलगी आणि जांवई आणि दुसऱ्या बाजूला होता तिचा विपिन. ज्या बछड्याला हृदयाशीं धरून लहानाचा मोठा केलेला. पोटच्या गोळ्यापेक्षांही जो जास्त आपला वाटलेला, दुःखांत विसावा आणि संकटांत आधार प्राणाहून प्रिय असलेला तो मुलगा ! तिला माहीत होतं कीं मरण पत्करील पण तो आपल्या निश्चयापासून ढळणार नाहीं. सर्वनाशाची खाई तिच्या पायाखालीं जबडा पसरून बसलेली दिसत होती. या चुकीपासून निस्तार नाहीं—पिछेहाट घ्यायला जागा नाहीं—नशीबासारखाच याच्या परिणामाचा अंदाज कळणं अशक्य ! अत्यंत कठोर—पत्करलेल्या मार्गापासून न ढळणारा असा तो—हें तिला माहीत होतें. तरीपण स्वतःचें समाधान स्वतःच करणें तिला अशक्य झालें.

तिचा राग अनावर झाला. त्या भडक्यासरशीं ती एकदम चवताळून उठली आणि विषारी वाणीनें म्हणाली, " हा तुझा हट्ट योग्य नाहीं विपिन. तुझ्यासाठीं मुलगी अन् जावई यांची जन्माची ताटातूट करून घेणं शक्य नाहीं. तुला वाटेल तें तूं कर. शशधर, चल ये माझ्याबरोबर. याच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नकोस. हें घर कांहीं त्याचं एकट्याचं नव्हे. " असें म्हणून कल्याणी आणि शशधर या दोघांना बरोबर घेऊन ती निघून गेली. तिच्या मागोमाग गेली मैत्रेयी—जशी कांहीं तीही त्यांच्यांतलीच एक.

एवढें झाल्यानंतर सती कोसळून पडेल असें वाटलें होतें. पण तिचा कठोर निग्रह पाहून वंदना आणि विप्रदास दोघेंही चकित झालीं. तिचे डोळे ओलावलेले नव्हते पण तिचा चेहरा मात्र गोरामोरा झाला होता. ती म्हणाली, " जांवईबुवांनीं काय केलं तें कांहीं मला माहीत नाहीं. निष्कारण तुम्हीं प्रकरण विकोपाला नेणार नाहीं तेंही मला माहीत आहे. मी केव्हाही तुम्हांला एवढासुद्धां दोष देणार नाहीं हें पक्कं समजून ठेवा. "

विप्रदास उगीच राहिला.

सतीनें विचारलें, " आजच जाणार का तुम्हीं ? "

" नाहीं. उद्यां जाईन. "

" पुन्हां येणार नाहीं या घरीं ? "

" असं वाटतं खरं. "

" मी ? वासू ? "

" जायचं म्हणजे तुम्हीही गेलं पाहिजे—उद्यां नसलं तर पुढं केव्हांतरी. "

" नाहीं. पुढं केव्हांतरी नाहीं. आम्हींही उद्यांच येतों. " असें म्हणून वंदनेकडे वळून तिनें विचारलें, " तूं काय करणार वंदना ? उद्यांच निघणार ? "

" नाहीं. " वंदना म्हणाली, " मी कांहीं भांडण केलेलं नाहीं ताई. साऱ्यांनींच कट करून गेल्यासारखं मीही उद्यांच कशाला निघूं ? "

" मीही भांडण केलं नाहीं वंदना ? " सती म्हणाली, " यांनींही केलं नाहीं. पण जिथं हे नाहींत तिथं मी असणं शक्य नाहीं—एक दिवससुद्धां नाहीं. लग्न झालं असतं तुझं, तर हें तुला कळलं असतं. "

" लग्न झालं नसलं तरीसुद्धां मला कळतंय ताई. " वंदना म्हणाली, " नवऱ्याला जिथं जागा नाहीं तिथं बायकोलाही नसतेच. पण चूक होणं

शक्य असतं. काय झालं तें कळल्याशिवाय केवळ बायको म्हणून हवं. तें कबूल करणं, हें मात्र मला पटतं नाहीं. ”

सतीला सासूचा भारीच राग आला होता. ती म्हणाली, “ नवरा असतां कीं पटलं असतं ! ” एवढेच उद्गार काढून डोळ्यांत येणारीं आसवें आवरायचा प्रयत्न करीत तिनें एकदम तिथून पाय काढला.

वंदना म्हणाली, “ हें काय केलंत मुखर्जीमहाशय ? ”

“ माझा निरुपाय झाला वंदना. ”

“ आईशीं ताटातूट ! मला तर कल्पनासुद्धां करवत नाहीं. ”

“ खरंय तें ! ” विप्रदास म्हणाला, “ पण नवे प्रश्न जेव्हां उपस्थित होतात. तेव्हां समाधानासाठीं नवा मार्ग शोधावा लागतो. चुकवून जायला जागा नाहीं रहात. तुझी ताई माझ्याबरोबर जाणारच—नाहीं म्हणणं शक्यच नाहीं. पण तूं ? चारदोन दिवस रहावं म्हणतेस ?

“ किती दिवस रहावं लागेल तें कांहीं सांगतां येत नाहीं. ” वंदना म्हणाली, “ कितीही नवे प्रश्न उपस्थित झाले तरी जुन्याच मार्गानं त्याचं उत्तर कसं मिळेल तें पहाणार आहें मी. पहिल्या दिवशीं जो मार्ग माझ्या नजरेसमोर आला, त्याच्याच रोखानं एक दिवशीं अचानक मी इथं येऊन पोहोंचलें. माझ्या मनानं जें एकदां घेतलं आहे तें कायमचं बदलणं अशक्य. ती तुलनाच होणं शक्य नाही. ”

विप्रदासनें उत्तर दिलें नाहीं. त्यांच्या ओंठाच्या कोंपऱ्याला उदासवाणें हसूं सहज झळकून गेलेलें दिसलें. त्या हसण्यांत जशी हृदयाची वेदना होती तशीच निराशाही होती. तो म्हणाला, “ मी आतां बाहेर जातों वंदना. मग भेटेन सावकाश. ”

वंदनेचे डोळे आसवांनीं भरून आले होते. ती म्हणाली, “ भेट होईल. त्यावेळीं दुरूनच आपल्याला प्रणाम करीन. कठोर आहे आपला स्वभाव—तितकंच कठोर आहे मन ! नाहीं एवढासा स्नेह, कीं नाहीं क्षमेची वृत्ति ! तेव्हां कदाचित् बोलायची संधी मिळणार नाहीं म्हणून आतांच बोलून ठेवतें मुखर्जीमहाशय—घर संसार, हसणं रडणं, मानअभिमान हीं ज्यांच्या सहवासांत व्हायचीं असतील, त्यांच्याशीं वागतांना या जन्मांत तरी मला आपलं हें मनोबल मिळावं ! प्रकाशाच्या अभावीं रस्ता चुकूं नये माझा !—” क्षणभर थांबून ती म्हणाली, “ आतां दूर जाणार तुम्हीं. जेव्हां जेव्हां मला आपली आठवण

होईल तेव्हां तेव्हां मनापासून एकाच मंत्राचा जप करीन मी—ते निर्मळ आहेत—निष्पाप आहेत—महात्मे आहेत ! त्यांच्या मनाच्या फत्तरावर एवढासुद्धां डाग पडत नहीं. जगांत ते एकटेच. कुणाचेच आपले नव्हेत—त्यांना आपला म्हणायचं धाष्टर्य कुणीच करूं नये !—" असें म्हणून डोळ्यांना पदर लावीत ती तिथून निघून गेली.

त्या दिवशींचा सारा कारभार आटोपला. केवढी तरी रात्र झाली. नित्याच्या आंखल्या नियंमाप्रमाणें सारे व्यवहार चालू असल्यामुळें कुठेंच कांहीं खूट आली नाहीं. सांखळीवजा चालणाऱ्या रोजच्या कारभारांतला सर्वांत मोठा दुव्वा आज तुटून पडला आहे हें बाहेर कुणाला कळलेंसुद्धां नाहीं.

उजाडायला आतां फारसा अवधी नव्हता. घरचीं थकलेलीं सारीं माणसें मुकाट झोंपी गेलीं होतीं. जिथें जागा मिळेल तिथें जो तो झोंपी गेला होता. अत्यंत जबाबदारीचें कसलें तरी काम संपवून वंदना थकल्या पायांनीं आपल्या खोलीकडे जायला निघाली होती. तितक्यांत पलीकडून द्विजदासच्या खोलींत दिवा तेवत असल्याचें तिला दिसलें. यावेळीं जावें कीं नाहीं म्हणून तिचें मन मागें पुढें होत होतें. कुणी पाहिलें तर काय म्हणतील, शंभर तोंडांनीं निंदा फैलावेल, असें वाटलें तरीही तिच्यानें रहावेना. साऱ्या दिवसांत ज्या उद्वेगामुळें तिच्या मनांत भयंकर खळबळ माजली होती त्या उद्वेगाच्या जोरावरच तिचीं पावलें त्या बाजूकडे वळलीं. लोटलेल्या दारासमोर उभी राहून तिनें हांक मारली, " अजून जागे आहांत का द्विजूबाबू ? "

" आहें. " आंतून उत्तर आलें, " पण यावेळीं आपण कुठं इकडे ? "

" येऊं का ? "

" खुशाल. "

दार लोटून वंदना आंत गेली तेव्हां समोर कागदपत्राच्या राशी घेऊन द्विजदास बिछान्यावर बसलेला तिला दिसला.

" आजचा हिशेब वाटतं ? " तिनें विचारलें, " पण हिशेब कांहीं कुठं पळत नाहीं द्विजूबाबू. एवढी रात्र जागत राहिलं तर प्रकृति बिघडेल ना ? "

" बिघडली असती तर बरं झालं असतं. " द्विजदास म्हणाला, " मग हें डोळ्यांना तरी दिसलं नसतं. "

"खर्चाचा आंकडा बराच वाढलाय वाटतं ? दादांना कैफियत देणं फार कठीण जाईल वाटतं ?"

सारे कागदपत्र एका बाजूला लोटून द्विजदास सरळ बसला आणि म्हणाला, "चक्रवत् परिवर्तन्ते दुःखानि च सुखानि च—सद्गुरूच्या कृपेनं आतां ती परिस्थिती राहिली नाहीं वंदनादेवी ! उलट दादांनींच कैफियत द्यायला हवी आतां. आतां उलट मीच मागेन त्यांची कैफीयत. म्हणेन, लाव—जलदी लाव हिसाब—जलदी रुपया ! कुठं काय भानगड केली आहे सांगा."

"आहे काय हें ?" वंदना थक्क होऊन उद्गारली.

दोन्ही हाताच्या मुठी वळून हात वर उगारून द्विजदास म्हणाला, "फार भयंकर प्रसंग आहे. आई दयामयी मजवर दया करो—भगिनीपती शशधर माझ्या सहाय्याला धांवो !—सावध ! विप्रदास, सावध ! आतां या खेपेला धनासकट न् प्राणासकट मी तुझा वध करणार ! आतां याउपर माझ्या हातून सुटायची आशा नको तुला."

वंदनेचें मन काळजीनें पोळलें होतें तरीही तिला हंसल्यावांचून राहावेना. ती म्हणाली, "प्रत्येक वेळीं ही थट्टामस्करी ! एक घटकाभर तरी 'सीरीअस' होणं माहीतच नाहीं का तुम्हाला द्विजूबाबू ?"

"माहीत नाहीं ?" द्विजदास उद्गारला, "तर मग आण शशधरला, आण त्या—नाहीं, तीं जाऊं देत ! पहाशील—थट्टा मस्करी सारी निमिषार्धांत होरपळून जाईल. सारं मुखमंडल गांभीर्यानं प्रदीप्त होऊन उठले. परीक्षा तर पहा !"

एक खुर्ची ओढून घेऊन वंदना बसली आणि म्हणाली, "तर मग आपल्याला कळलं तर सारं ?"

"सारं नाहीं—थोडथोडं ! सारं कांहीं माहीत आहे दादाला—पण तें गहन अरण्य !—आणखी माहीत आहे शशधरला ! तो सांगेल खरा—पण सांगेल तें सारं खोटं बनवून सांगेल."

वंदना काकुळतीला येऊन म्हणाली, "जेवढं कांहीं माहीत आहे तेवढं तरी मला सांगाल का द्विजूबाबू ? खरोखरच मी अगदीं घाबरून गेलें आहें."

"घाबरण्यांत कांहीं अर्थ नाहीं." द्विजदास म्हणाला, "दादाचा संकल्प आतां बदलणार नाहीं. आतां ते आमच्या हातून गेले."

दिव्याच्या प्रकाशांत वंदनेला दिसून आलें, कीं त्याच्या दोन्हीं डोळ्यांत

सळसळून आसवें येत होतीं. मान वळवून त्यानें ती कशींबशीं पुसून घेतलीं आणि तो पुनः सरळ होऊन बसला.

वंदना गहिंवरून म्हणाली, "इतक्या सहजासहजीं का ही ताटातूट होणार द्विजूआबू ? खरोखरच का कांहीं करतां यायचं नाहीं ? "

"नाहीं !" द्विजदास निश्चितपणें म्हणाला, "जेव्हां हें असं कांहीं तरी होतं, तेव्हां तें इतक्या झटक्यासरशीं आणि इतकं वेघडक होतं, कीं तें अडवणं मुळीं शक्यच नसतं. रडणारा तो रडतो—पण तिथंच त्याची अखेर !" क्षणभर उगीच राहून तो म्हणाला, "आपल्याला कारण कळायला हवं होतं नव्हे ?—तपशीलवार कांहीं माहीत नाहीं मला—पण जेवढं माहीत आहे तें आपल्याला सांगेन. कदाचित् आपली मदतसुद्धां लागेल मला !—कुठंही असलांत तरी केवळ आपल्याकडेच ती मदत मागावी लागेल मला. "

"केवळ माझ्याकडेच कां ? "

"याचनेसाठीं हातच पसरायचा तर तो मोठ्यांपुढं पसरावा, असं शास्त्रानं सांगितलंय. "

"पण मोठं म्हणायला दुसरं नाहींच का कुणी ? "

"असेल कदाचित्. पण मला त्याचा पत्ता नाहीं. आतां दादाची गोष्ट कार्डात नाहीं मी—पण आजवर संवय आहे ती वहिनीच्यापुढं हात पसरायची—तो दरवाजासुद्धां आतां बंद झाला. आपण तिच्या भगिनी—त्या नात्यानं हक्क लावतोंय हा. "

"आणि आई ? "

द्विजदास म्हणाला, "रथ जेव्हां भरधांव चालत असेल तेव्हां त्याचं सारथ्य करण्यांत आई वाकबगार आहे—पण चाकं जिथं चिखलांत रुततात तिथं आईचं कांहीं चालत नाहीं. खालीं उतरून चाक मारणं शक्य नाहीं तिला. म्हणूनच अशा प्रसंगांत येणार आहें आपल्याजवळ—घालाल ना भिक्षा ?—"

"कसली भिक्षा तें कळल्याशिवाय काय सांगूं द्विजूआबू ? "

"तें मला तरी काय माहीत वंदना ? उगीच कांहीं याचना करायला येणार नाहीं मी ! ज्यावेळीं कुठंच कांहीं मिळायची आशा नाहींशी होईल त्याचवेळीं येईन ! "

कितीतरी वेळ वंदना मान खालीं घालून स्वस्थ राहिली होती. आतां वर पाहून ती म्हणाली, "मी विचारलं तें सांगायचं नाहीं वाटतं ? "

" सारंच कांहीं माहीत नाहीं मला. " द्विजदास म्हणाला, " जें माहीत आहे तें सुद्धां बिनचूक नसेल—पण एक मात्र मला निश्चित कळून चुकलंय, कीं दादा आज भिकारी झाले आहेत. सारं कांहीं गेलं आहे. "

वंदना एकदम दचकली. आणि म्हणाली, " मुखर्जीमहाशय भिकारी ? असं कसं झालं द्विजूबाबू ? "

" त्यांत कांहीं आश्चय नाहीं. द्विजदास म्हणाला, " त्याच्या मुळाशीं आहे तो शशधर. शहा चौधरी आणि कंपनी ज्या दिवशीं एकाएकीं दिवाळखोर ठरली त्याच दिवशीं दादाही सर्वस्वी बुडाले. त्याच खड्ड्यांत गेलं दादाचं सर्वस्व. बाहेरून दिसतं आहे तें असं आहे पण त्यांतला अंतस्थ प्रकार आहे तो अगदीं वेगळाच. "

वंदना कळवळून म्हणाली, " तो प्रकार राहूं दे द्विजूबाबू. काय झालं तेवढं सांगा. खरंच का सर्वस्व गेलं ? "

" हो —खरंच. त्यांत मला तरी शंका नाहीं. "

" पण ताई ? वासू ? त्यांचं असं म्हणायलासुद्धां कांहीं राहिलं नाहीं का ? "

' नाहीं. आहे काय तें केवळ वहिनीचं स्त्रीधन—तिच्या बापानं तिच्या नांवावर ठेवलेलं—तेंच काय थोडंबहुत आहे तें ! "

" पण मुखर्जीमहाशय त्याला शिवायचेसुद्धां नाहींत द्विजूबाबू. "

" नाहीं. त्यापेक्षां उपासावर दादांची श्रद्धा जास्त आहे—अर्थात चालेल तितके दिवस ! "

दोघेंही कांहीं वेळ उगीच राहिलीं. थोड्या वेळानें वंदनेनें विचारलें, " आणि आपण ? आपलं काय झालं ? "

द्विजदास म्हणाला, " अगदीं निर्धोर आणि निश्चिन्त आहें मी !—दादा स्वतः बुडाले, पण मला तरता ठेवलाय त्यांनीं. एक पाण्याचा थेंब सुद्धां लागूं दिला नाहीं माझ्या अंगाला. तुम्ही म्हणाल, ही अशक्य गोष्ट शक्य कशी झाली ? शक्य झाली आईच्या सद्बुद्धीनं —दादांच्या महात्म्यानं—अन् माझ्या स्वतःच्या शुभग्रहांच्या जोरानं ! —आतां ही कथा सांगतों ऐक. हा शशधर होता दादाचा बाळमित्र-शाळासोबती. दोघांचीही लहानपणापासून अगदीं गट्टी होती. मोठेपणीं दादानं कल्याणीचं लग्न लावून दिलं त्याच्याशीं. दादाच्या आयुष्यांतलं हें मोठंच प्रचंड काम झालेलं. त्यावेळीं असं कळलं होतं, कीं शशधरच्या बापाची जमीदारी फार मोठी होती. पैसाही भरपूर होता अन् कारभारही अफाट होता.

पावना जिल्ह्यांत एवढी मोठी श्रीमंत व्यक्ति दुसरी कुणीच नव्हती. चार एक वर्षं गेलीं—एके दिवशीं शशधर एकाएकीं आला आणि म्हणाला, ' जमीदारी, ऐश्वर्य, सारा कारभार कोसळायला आलाय—राखलं पाहिजे बुणीतरी. ' आई म्हणाली, ' राखलं पाहीजे खरं-पण माझा द्विजू अज्ञान, त्याच्या पैशाला हात लावणं शक्य नाहीं बाबा ! ' तो म्हणाला, ' वेळ पुनः येत नाहीं आई. सहज फेडून टाकतां येईल. ' आई म्हणाली, ' सारं कांहीं फिटेल म्हणून मीही म्हणतें-पण ही इस्टेट आहे अज्ञानाची—कर्त्याचा निषेध आहे त्याला ! ' रडत रडत कल्याणी आली आणि दादाच्या पाया पडली. ती म्हणाली, ' तूं माझं लग्न करून दिलंस दादा—अन् आतां पोरंबाळं घेऊन मी दारोदार भिक्षा मागितलेली पहावेल का तुला ? आईला पटेल तें—पण तूं ? ' धर्माची, विवेकाची, त्याच्या ठार्यांची जी वैराग्याची भावना होती, ती कोणत्याही इतर भावनेपेक्षा अत्यंत प्रबल होती. कल्याणीनं त्याच भावनेवर आघात केला. अभय देऊन दादा म्हणाले, ' तूं घरीं जा पोरी, माझ्याकडून होईल तें मी करीन. ' त्या अभयमंत्राचा जप करीत करीत कल्याणी आपल्या घरीं गेली. त्या पुढला इतिहास फारच थोडा आहे वंदना !— पण बाहेर पहा. उजाडलेलं दिसतंय ? " असें म्हणून त्यानें उघड्या खिडकीकडे तिची नजर वेधली.

उठून उभें राहून वंदनेनें विचारलें, " पण हे कागदपत्र आपलेच का ? "

" हो. " द्विजदास म्हणाला, " निर्धोर रहायचं आहे तें यांच्याच आधारावर. येतांना दादानीं बरोबर आणले होते.—पण मी असं विचारतों, आपणसुद्धां आजच आम्हाला टाकून जाणार का ? "

" तें कांहीं निश्चित नाहीं द्विजूबाबू. पण आतां वेळ नाहीं—मी चाललें. पुन्हां केव्हां तरी भेटूं. " असें म्हणून ती संथपणें बाहेर निघून गेली.

२४

आपल्या बहिणीला बळेंबळेंच एका खुर्चीवर बसवून वंदना तिच्या पायाला आळता चढवीत होती. हा मंगलाचार कशा रीतीनें करायचा तें वंदनेला शिकवून अन्नदा आड राहिली होती. सारखीं आसवें गाळतांना अन्नदेच्या डोळ्यांचीं पातीं फुलून गेलीं होतीं. डोळे तांबडे लाल झाले होते. वंदनेनें

विचारलें तेव्हां ती थोडक्यांतच म्हणाली, "सूनबाईसमोर यायला आतां मला तोंड नाहीं."

"कां तोंड नाहीं अनुताई ? तुला कसली लाज ?"

"लाज एवढीच, कीं हें असं व्हायच्यापूर्वी मी कां मेलें नाहीं ? एकट्या द्विजूलाच कांहीं मी वाढवला नाहीं वंदनाताई, विपिनही माझ्याच कुशीला वाढला. विपिनची आई वारली त्यावेळीं त्यावेळीं त्या दोन महिन्याच्या बछड्याला कुणाच्या हातीं सोपवला होता ? माझ्याच ना ? त्यावेळीं कुठं होती दयामयी ? त्यावेळीं कुठं होती तिची मुलगी आणि तिचा जांवई ?" बोलतां बोलतां तोंडाला पदर लावून एकदम ती घाईघाईनें निघून गेली.

आपल्या मांडीवर ताईचे पाय घेऊन वंदना जमिनीवर बसली होती. आळता चढवायचें काम जसें कांहीं संपतां संपत नव्हतें.

टप्कन् एक गरम अश्रुबिंदु सतीच्या पायावर पडला. वांकून पाहिलें तरी तिला वंदनेचा चेहरा दिसला नाहीं. हात पुढें करून तिचे डोळे पुसीत ती म्हणाली, "तुला रडायला काय झालं वंदना ?"

तशीच मान खालीं घालून गहिंवरल्या आवाजानें वंदना म्हणाली, "सारींच तर रडताहेत ताई, एकटी मीच नव्हें कांहीं."

"सारींच रडताहेत म्हणून तूं देखील का रडायला हवं ? एवढी शिकली सवरलीस त्याचा हाच का परिणाम ?—" सतीनें आपल्या हातानें तिचें तोंड मोठ्या वात्सल्यानें वर उचलून पाहून म्हटलें, "तर्कवागीशाबरोबर वाद करण्यांत अर्थ नाहीं. मी तसं कांहीं म्हणत नाहीं ग पोरी. त्यांना वाटतंय, कीं माझं सर्वस्व गेलं म्हणून सारीं रडताहेत. पण खरोखर तसं कांहीं झालं नाहीं. इकडे माझे पती आहेत — इकडे माझा मुलगा आहे—संसारांत कसलीच खूट आलेली नाहीं मला !— उगीच माझ्यासाठीं टिपं गाळूं नकोस पोरी. कांहींच वाईट झालं नाहीं माझं !"

"तुझं कांहींच वाईट न होवो ताई !" वंदना म्हणाली,—"पण तुझं दुःख म्हणजेच सारं कांहीं नव्हे. तुझं काय गेलं हें तुलाच माहीत—पण रडून रडून ज्यांचे डोळे आंधळे व्हायला आले आहेत त्यांच्या नुकसानीची भरपाई कशी व्हायची सांग ना ?" थोडा वेळ थांबून ती म्हणाली, "मुखर्जीमहाशय पुरुष माणूस. त्यांनीं कांहींही म्हटलं तरी शोभतं. पण असं

घर सोडून निघायच्या वेळीं तूं मात्र कोरड्या डोळ्यांनीं निरोप घेऊं नकोस ताई. तें फार लागेल त्यांच्या मनाला."

"कुणाच्या मनाला लागेल वंदना ?"

"कुणाच्या ? माहीत नाहीं का कुणाच्या तें ? नऊ वर्षांची असतांना तूं या परक्या घरीं आलीस. वर्षामागून वर्षं जात असतांना तुला ज्यांनीं आपलीशी करून घेतलं, त्यांना या एका धक्क्यासरशीं आज विसरून गेलीस ताई ! तुझी सासू, तुझा दीर, तुझ्या संसारांतल्या दासदासी, आश्रित, नोकर चाकर, देवदेवळं, गोशाळा, अतिथीशाळा, गुरु पुरोहित,—या सर्वांची उणीव काय नुसती नवरा आणि मुलगा यांनी भरून येणार आहे ? आणखी कुणी नाहींतच का दुसरीं ? एवढीं दोनच ?—"

वंदना तशीच बोलत होती, "हें कुणाच्या तोंडी शोभतं माहीत आहे ताई ? ज्या समाजांत मी वाढलें, लहानाची मोठी झालें, त्यांनीं असं म्हटलं तर शोभेल. तुला वाटतंय, पण पतिभक्ति म्हणजेच का सारं ? यापेक्षां स्त्रीजातीच्या आयुष्यांत दुसरं नाहींच का कांहीं ? चुकते आहेस तूं. कलकत्त्याला चल माझ्या मावशीच्या घरीं. तिथं ही वृत्ती आतां जुनीपुराणी होऊन गेलीय. त्यांची मजल आतां या पलीकडे जातही नाहीं अन् ते पहातही नाहींत. तसंच —" बोलतां बोलतां ती मधेंच थांबली.

तिला वाटलें, मागें कुणी तरी उभें आहे. वळून पाहते तों द्विजदास. मुकाट्यानें तो केव्हां आला त्याची त्या दोघींनाही चाहूल लागली नव्हती. शरमिंदी होऊन वंदना कांहीं तरी बोलायचा प्रयत्न करीत होती पण तिला थांबवून द्विजदास म्हणाला, "मिऊं नकोस—तुझ्या मावशीला मी ओळखत नाहीं अन् तिच्या गोतावळ्यांतल्या कुणालाही ओळखत नाहीं, हें तुझं बोलणं कांहीं त्यांच्यापर्यंत जाऊन पोंचायचं नाहीं. पडत्या काळाची विवंचना एकजुटीनं कधीं होत नाहीं. सकाळपासून याच गोष्टीचा विचार करतोंय मी. मावशीच्या गोतावळ्यांतून ओढून काढून सहज दादाच्या गोतावळ्यांत तुझी भरती करतां येईल आणि दयामयीच्या गोतावळ्यांतून मैत्रेयीला ओढून काढून तुझ्या मावशीच्या गोतावळ्यांत अगदीं सहज घुसवतां येईल. अगदीं पैज लावून सांगतों कीं यांत एवढीसुद्धां अडचण यायची नाहीं. वा रे माणसाचं मन ! वा रे माणसाचा स्वभाव !"

"याचा अर्थ काय भावजी—? "सति आश्चर्यचकित होऊन म्हणाली.

आणखी आश्चर्य प्रकट करून द्विजदास म्हणाला, "तूंही अर्थ विचारतेस ? द्विजूचं काम काय—द्विजूच्या म्हणण्याचा अर्थ काय—हें तुलाच कळत आलंय वहिनी. नाहीं तर दयामयीविप्रदासचा दरबार वगळून प्रत्येक अर्ज करायला तुझ्याकडे का यावं लागलं असतं त्याला ? 'अर्थ काय' याचा तपशील सांगावा लागत नव्हता म्हणूनच ना ? आज जायच्या दिवशीं तरी असं कांहीं बोलूं नकोस वहिनी. खऱ्या खोट्याची—योग्यायोग्याची केसफाडी चर्चा नको आहे आज !" असें म्हणून तो समोर आला आणि तिच्या पायावर डोकें ठेवून त्यानें प्रणाम केला.

तो असें कधींच करीत नसे. पायाच्या आळत्याचा ओला रंग त्याच्या मस्तकाला लागला आहे असें पाहून सति घाईघाईनें तो पुसायला निघाली—त्यावेळीं नकारार्थी मान हालवीत तो मागें सरला आणि म्हणाला, "हा डाग एक दिवस आपोआप पुसून जाईल वहिनी. राहूं दे की !"

त्या उद्गारांत फारसें कांहीं नव्हतें, द्विजू हंसूनच बोलला होता, पण ते उद्गार ऐकून वंदनेचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले. ते दिसूं नयेत म्हणून तिनें मान खालीं घातली ती कांहीं वर केली नाहीं.

"मी आलों होतों घाई करायला. जायची वेळ होत आली. दादांना अगदीं घाईं झालीय. सामानसुमान पाठवून दिलंय. कपडे करून वासूला गाडींत बसवलंय. प्रस्थानाची तयारी कुणी केलीय कोण जाणे ! पण ती सुद्धां हाताजवळच मिळाली. वाटलं होतं, कीं अनुताईनं कुठं तरी तळ्याविहिरींत जीव दिला, पण अजून कुठं तरी ती हयात आहे वाटतं ! नाहीं तर दुसरं कोण करणार होतं ही प्रस्थानाची तयारी ? आतां ती शोधून सांपडणार नाहीं, मग शोधायला जाऊं कशाला ? तिकडे दयामयीच्या महाला कड्याकुलपं लागलीं आहेत. संकटांतून बचावयाचा जो मार्ग तिनं अवलंबन केला आहे त्यांत आतां करण्याजोगं कांहींच नाहीं. तरी पण श्रीमति मैत्रेयीच्या कानीं ही गोष्ट घातली तर यथाकालीं ती आईच्या कानींही पोंचेल. पण मी म्हणतों, जरूर काय त्याची ? आतां जरा घाई कर अन् जाऊन गाडींत बस पाहूं वहिनी. एकदां तुम्हांला नेऊन आगगाडींत चढवून दिलं कीं सुटलों. मग मला माझ्या कामाकडे सुखानं लक्ष पुरवतां येईल."

अगदीं केविलवाणें हंसत सती म्हणाली, "मला घालवून द्यायची भाऊजींना भारीच घाई झालीय !"

" माझीं कामं अडून राहिलीं आहेत ना ? "

" कसलीं हीं कामं ? "

यापूर्वी कधीं चौकशी करीत नव्हतीस ती ! जेव्हां जें कांहीं मागावं तें तूं चौकशी केल्याविना देत आली होतीस आजवर. आतां चौकशी करणं शोभत नाहीं तुला. "

सती आणि वंदना दोघीही कांहीं वेळ मुकाट्यानें त्याच्याकडे पहात राहिल्या होत्या.

" आतां तुम्हीं जा भाऊजी. " सती म्हणाली, " आतां वेळ लागायचा नाहीं मला—" वंदनेला उद्देशून ती म्हणाली, " तूंही आतां उगीच इथं वेळ काढूं नकोस. शक्य तितकी लवकर जा मुंबईला. आतां कलकत्त्याला जायला नको तुला. काका तिकडे एकटे पडले आहेत हें आधीं ध्यानीं घे. "

वंदनेनेंही द्विजूप्रमाणेंच पायावर डोकें ठेवून प्रणाम केला आणि तिची पाय-धूळ माथ्याला लावून ती म्हणाली, " नाहीं ताई, आतां तें मावशीचं घरचं नको. तिकडे पाठ करूनच निघालें आहें हें विसरायची नाहीं मी आतां. " असें म्हणून पदरानें तिनें आपले डोळे पुसून घेतले आणि म्हणलें, "—बहुतेक उद्यांच जाईन मुंबईला. पण जायच्यापूर्वी पुनः तुझी भेट व्हायची खात्री एकदां देऊन जा. "

मनांतल्या मनांत सतीनें तिला कसला आशीर्वाद दिला तें तिचें तिलाच माहीत. तिच्या हनवटीला हात लावून तिचा मुका घेऊन ती हंसतमुखानें म्हणाली, " तें तर तुझ्याच हातीं आहे वंदना. लग्नाची पत्रिका नक्की पाठवायला सांग काकांना. जिथं असेन तिथून येऊन हजर होईन — " ती थोडीशी थांबली, क्षणभर तिनें आपल्या मनाशीं विचार करून पाहिलें असावें—बोलावें कीं न बोलावें याचा तिला पेंच पडला असावा — तरीही ती म्हणाली, " भारी इच्छा होती माझी कीं तूं या घरीं पडावीस. भाऊजींच्या हातीं तुला सोंपवायची आणि तुझ्या हातीं साऱ्या संसाराचा अन् वासूचा भार देऊन सासूबाईंबरोबर कैलास पर्वताच्या यात्रेला जायचं ! न परतलें तरी कांहीं हरकत नव्हती. पण माणूस म्हणतो एक आणि होतं भलतंच !—" असें म्हणून ती कांहीं वेळ उगीच राहिली. तशीच आणखी कांहीं वेळ थांबून ती म्हणाली, " या घरीं मला जें लाभलं तें, मला वाटतं, जगांत कुणाला लाभलं नसेल. सर्वांपेक्षां मोठ्यांतला मोठा लाभ झाला होता सासूबाईंच्या लोभाचा. पण सर्वांपेक्षां मोठी तुटलीक

आली ती त्यांच्याशींच. जायच्या वेळीं प्रणामसुद्धां घडला नाहीं—दार बंद—उंबरठ्याची माती उचलून घेऊन म्हटलं, 'या लाकडाला तुमच्या पायाची पायधूळ लागली आहे, हीच माझी - ' तिचें वाक्य पुरें झालें नाहीं. गहिंवरल्या कंठाचा बांध एकदम फुटला. दोन्ही डोळ्यांतून आसवांच्या धारा सारख्या वाहूं लागल्या. त्या आवरायला तिला एक दोन मिनिटें लागलीं. पदरानें डोळे पुसून ती म्हणाली, " – आणि शोधून सांपडली नाहीं आमची अनुताई. सासूबाईपेक्षांही ती मोठी आहे बरं वंदना. मीं गेलें निघून कीं तूं सांग हं तिला, कीं मी रागारागानं गेलें आहें—" पुनः तिचे दोन्ही डोळे आसवांनीं दरदरून आले – पुनः ते पदरानें पुसून घेऊन ती म्हणाली, " एक मांजर पाळलं होतं, त्याचं नांव निमू. या उत्सवाच्या गडबडींत तें कुठं गेलं कोण जाणे. सकाळपासून सारखी त्याची आठवण येतेय. आतां सुद्धां तीच आठवण आलीय. निमू कुठं गेलीय—कुठं तोंड लपवलंय त्याचा कांहीं पत्ता लागला नाहीं. अनुताईला सांग बरं वंदना ! "

आतांच ती म्हणाली होती, एकीकडे आहे नवरा आणि दुसरीकडे आहे मुलगा—संसारांत आतां कसलीच उणीव नाहीं मला ! किती खोटे होते ते उद्गार !

" करतेयस काय वहिनी ? " बाहेरून द्विजदासचा पुनः तगादा आला.

" आलें रे बाबा आलें ! " असें म्हणून सति घाईघाईनें चालती झाली.

स्टेशनवरून द्विजदास एकटाच परत आला त्यावेळीं काळोख पडला होता. खोल्याखोल्यांतून तसेच दिवे लागले होते. तसेच सारे लोक आपल्या आपल्या कामांत गुंतलेले होते. या बड्या कुटुंबांत कुठें कांहीं भानगड झाली आहे याचा कुणाला पत्ताच लागला नव्हता. बाहेर वरच्या दिवाणखान्यांत विप्रदासच्या खोलींत मात्र काळोख होता. खिडक्या दरवाजे बंद होते. विप्रदास वारंवार कलकत्त्याला जाऊन राहात असल्यामुळें वारंवार असें होत असे. त्यांत कुणाला कांहीं विशेष वाटण्याजोगें नव्हतें. जिन्याच्या डाव्या बाजूच्या खोलींत अशोक होता. बाहेरच्या खिडकींतून पाहिलें तर इझीचेअरवर पाय पसरून पडून तो लक्ष लावून पुस्तक वाचीत असावा असें दिसून आलें असतें. कॉलेजच्या हजेरींत खूट पाडून अक्षयबाबू अजूनही राहिले होते. त्यांची

खोली शेवटच्या टोंकाला होती. ते खोलींत होते कीं हवा खायला बाहेर गेले होते तें कांहीं कळलें नाहीं.—

मोटारींतून आंगणांत उतरल्याबरोबर द्विजदासची नजर तिसऱ्या मजल्यावरच्या लायब्ररीच्या खोलीकडे वळली. संध्याकाळीं बहुधा या खोलींत काळोख असे—पण आज उघड्या खिडकींतून तिथें दिव्याचा प्रकाश असल्याचें दिसून आलें. त्याला वाटलें, वंदनाच असणार तिथें. पुस्तक वाचायला नव्हे—डोळे पुशीत बसायला माणसांच्या घोळक्यांतून दूर जाण्यासाठीं तिनें या एकांत जागेचा आसरा घेतला असावा. कशीबशी आजची रात्र काढून ती उद्यां निघून जाईल—दूर कुठल्या कुटें मुंबईला जाईल! त्या मुंबईतच ती लहानाची मोठी झाली होती—तिथें आहे तिचा बाप, नात्यागोत्याचे लोक—तिचे किती तरी मित्र आणि मैत्रिणी किती दिवसांचे लागेबांधे असलेले, केव्हां तरी—कोणत्या तरी कारणपरत्वें या गांवीं ती परत येईल असा संभव नाहीं. न का येईना!—पण सहसा या घरची आठवण विसरणें तिला शक्य झालें नसतें. विचित्र आहे ही दुनिया! एका निमिषांत किती अद्भुत आणि अभावित गोष्टी घडून येतात इथें! ती आल्या दिवसापासून आजपर्यंतच्या गोष्टी एकामागून एक द्विजूला आठवल्या. ती एकाएकीं आली—तशीच एकाएकीं रागारागानें निघून गेली. बोलीभाषण मधल्या काळांत झालें तें नुसतें घटकाभराचें. त्या दिवशीं वंदना हंसत हंसत म्हणाली होती, 'नुसती तोंडओळख नव्हे द्विजूबाबू—दीराचे गुणदोष ताई इतक्या कळकळीनं जी मला लिहून पाठवीत होती ती कांहीं उगीच नव्हे. सारं कांहीं मला माहीत आहे. आपल्या बाबतींत मला माहीत नाहीं असं कांहीं नाहीं. जे जे गोंधळ घातले आहेत तुम्ही या घरांत—घरच्या माणसांना जो जो त्रास दिला आहे तुम्हीं, तो सारा मला माहीत आहे.' द्विजदासनें विचारलें होतें, 'आमची कुणाची कसलीच ओळख नव्हती, मग आपल्याकडे माझी बदनामी करण्यांत कसला फायदा होता?' वंदनेनें तसेंच हंसून उत्तर दिलें होतें, 'मला वाटतं मुळांतच ताईचा राग होता तुमच्यावर—त्याचाच हा सूड उगवोत होती ती!'

दोघांनींही ती गोष्ट हंसण्यावारी नेऊन एक प्रकारें विषयांतर केलें होतें. पण त्या दिवशीं त्या दोघांच्याही हें लक्षांत आलें नव्हतें, कीं वंदनेचें लक्ष द्विजूकडे ओढून घेण्याची तिची ती एक युक्ति होती. कधीं ना कधीं ही बहीण

आपल्याकडे आली—कधीं ना कधीं आपल्या या उनाड दीराला तिच्या हातीं सोंपवतां आलें तर कार्यभाग होईल, अशी तिची अपेक्षा असावी. पण शेवटीं तें घडून आलें नाहीं. तिची ती चोरटी इच्छा तशीच सांदी कोंपऱ्यांत राहून गेली. आजपर्यंत सुद्धां तशीं पत्रें लिहिण्याचा उद्देश त्या दोघांच्या ध्यानीं आला नाहीं.

द्विजदास सरळ जिन्यानें चढून वर गेला. पडदा दूर करून त्यानें पाहिलें तों वंदना हातीं उघडें पुस्तक घेऊन खिडकीबाहेर शून्य दृष्टीनें पहात बसलेली त्याच्या नजरेस आली. एक पान तरी तिनें वाचलें होतें कीं काय याची शंका होती.—तसें वाटत होतें तरीही कांहीं तरी सुरवात करण्याच्या उद्देशानें त्यानें विचारलें, " कसलं पुस्तक वाचतांहां तें ? "

वंदनेनें पुस्तक बंद करून टेबलावर ठेवलें आणि उठून उभी राहून ती म्हणाली, " घरीं यायला आपल्याला एवढा वेळसा झाला ? कलकत्त्याची गाडी तर केव्हांच गेली. "

" वेळ झाला खरा, " द्विजदास म्हणाला, " पण घरीं तर आलों ! आलों नसतोंसुद्धां ! "

" अगदीं सहज ! " वंदना म्हणाली.

एक क्षणभर थांबून द्विजदास म्हणाला, " पहिल्यानं अगदीं हेंच आलं होतं माझ्या मनांत. गाडी सुटली, खिडकीच्या बाहेर डोकावून वासू हात हालवूं लागला. त्याचा तो छोटा हात हळुहळू वाकणाआड दिसत नाहींसा झाला—त्याचवेळीं, कीं गेलों असतों यांच्याबरोबरच—"

वंदना म्हणाली, " वासूचा फार लळा आहे तुम्हांला—नाहीं ? "

एक क्षण विचार करून द्विजदास म्हणाला, " असं पहा, काय उत्तर देऊं याचं ? या असल्या गोष्टींची मला कांहीं जाणीव नाहीं. स्वभावतःच मी इतका रुक्ष—इतका निरस आहें, कीं दोन घटकांच्या आंत सारं कांहीं उबून सुकून जाऊन वाळुसारखं सळसळूं लागतं. प्लॅटफॉर्मवर उभा होतों तेव्हां डोळे थोडेसे ओलावले. पण तेव्हांच्या तेव्हांच ते सुकून गेले—एक टिपूससुद्धां राहिलं नाहीं कुठं. "

वंदना म्हणाली, " देवाची कृपाच म्हणायची एक प्रकारची. "

" कुणी सांगावं ? " द्विजदास बोलूं लागला, " तसंही असेल ! आणखी असं पहा, या वासूच्या पायींच आई कालपासून दाराला खीळ घालून बसली आहे. दादासाठीं नव्हे कीं आपल्या सुनबाईसाठींही नव्हे. आईचा समज आहे, कीं

वासूला लहानाचा मोठा केला तो आपण—पण हिशेब करून पाहिलं तर असं दिसून येईल, कीं तिचं अर्धं आयुष्य गेलंय तीर्थयात्रेंत. त्यावेळीं कुणाकडे रहात होता तो ? माझ्याकडे ! टायफॉईड झाला त्यावेळीं साठ दिवस जागत होतं कोण ? मी ! आज जायच्या वेळीं त्याची तयारी केली कुणी ? मी ! त्याचे सारे कपडे असत माझ्या कपाटांत—पाटी-पुस्तकं असत माझ्या टेबलावर—निजायची जागा होती माझ्या पलंगावर—बळेंबळेंच आई त्याला घेऊन जाई पण भर रात्रीं जाग येतांच तो पळून येई माझ्याकडे ! "

डोळ्याचे पातेंसुद्धां न हालतां वंदना त्याच्याकडे पहात होती. ती म्हणाली, " तेव्हांच डोळ्यांतलं आसूं वाळायला एक घटकासुद्धां लागली नाहीं ती ? "

" खरं आहे. " द्विजदास म्हणाला, " माझा स्वभावच हा असा आहे. माझ्याकडे तो असे खरा, पण मला पक्कं माहीत होतं, कीं तो आज उद्यां जाणार आपल्या आईबापांच्याच हातीं. आपण म्हणाल, जगांत तें तसंच चाललंय, त्याची कदर कशाला ? पण असंच चाललं आहे हेंच मोठं कठीण आहे. उलटी रीत हीच आहे हें जगाला मी समजावून द्यायचं कसं ? "

जगाला हें समजावून द्यायची जरुरी तरी काय असें वंदनेला वाटलें, तरीही तिनें तें बोलून दाखवलें नाहीं. दुसरें असें, कीं आईबापांच्या विरुद्ध एवढी मोठी तक्रार खरी कशी मानायची ?—विशेषतः विप्रदासच्या विरुद्ध—हाच तिला मोठा प्रश्न पडला. म्हणूनच कसलाच वाद न घालतां ती उगीच राहिली.

पण त्याच वेळीं आपलें भाषण स्पष्ट करून टाकावं म्हणून द्विजदास स्वतःच म्हणाला, " समाधानाला एकच जागा, कीं वहिनी तिथं आहे. नुसता दादाच्या हातीं असता तर मला तिळभरसुद्धां समाधान वाटलं नसतं. "

वंदना म्हणाली, " आपण आहांत निर्विकार ! वासूच्या बऱ्यावाईटाची उचापत करीत ही माथेफोड कशाला ? जें काय व्हायचं असेल तें होईल. "

ते उद्गार द्विजदासाच्या अंतःकरणाला चांगलेच छेडून गेले असावे असें त्याच्या मुद्रेवरून दिसलें—पण तो कांहीं बोलला नाहीं.

वंदना म्हणाली, " दादावर आपला फार विश्वास आहे, फार श्रद्धा आहे, असं आपणच एके दिवशीं मला ऐकवलं होतं. डोळ्यांतल्या आसवांप्रमाणें तीसुद्धां अशीच का सुकून गेली ? कीं स्वतःच्या चुकीमुळं जो माणूस आपला सर्वनाश करून घेतो त्याच्यावर विश्वास ठेवणं बरं नव्हे, असं का मला शेवटीं सांगणार आहां आपण ? "

द्विजदासला जितकें आश्चय वाटलें तितकेंच तें भाषण त्याच्या मनाला लागून गेलें. कांहीं वेळपर्यंत त्याच भावनेनें तो तिच्याकडे नुसता पहात राहिला. त्यानंतर दोन्ही हात जोडून नमस्कार केल्यासारखे मस्तकाकडे नेऊन तो संथपणें म्हणाला, " नाहीं मी तसं कांहीं म्हणत नाहीं. मी म्हणत होतों एवढंच, कीं तहान लागली म्हणजे माणसानें जाऊन समुद्राकडे हात पसरूं नयेत. पण दादाच्या बाबतींत जास्त चर्चा करण्यांत अर्थ नाहीं —बाहेरच्या माणसांना तें कळायचं नाहीं "

ते उद्गार वंदनेच्या हृदयाला बाणाप्रमाणें लागले. पण उलटून उत्तर द्यायला कांहींच न सुचल्यामुळें ती तशीच स्तब्ध राहिली.

द्विजदासनें विषयांतर करायला सुरवात केली. त्यानें विचारलें, " उद्यांच जाणार का आपण मुंबईला ? "

" हो. " वंदना म्हणाली

" अशोकबाबूच्च का आपल्याला घेऊन जाणार ? "

" हो. तेच. "

द्विजदास म्हणाला, " बॉम्बे मेल इथून मोठ्या रात्रीं निघते उद्यां आपणाला मी स्टेशनवर पोचवून येईन. पण दिवसा मला वेळ नाहीं —थोडंसं काम आहे. "

" बाबांना एक तार करून टाका. "

" ठीक आहे. "

एकदोन मिनिटें तो मुकाट राहिला. नंतर मागेंपुढें करीत म्हणाला, एक प्रश्न विचारावा आपल्याला, असं पुनः पुनः मनांत येत होतं पण कोणत्या ना कोणत्या कारणानं तरी विचारायचा तसाच राहून गेला. उद्यां तुम्ही निघून जाल—मग संधि येणार नाहीं – राग धरणार नसाल तर विचारतों. "

" विचारा. "

विचारायला वेळ लागूं लागला.

" खरंच, मला राग येणार नाहीं. आपण मोकळ्या मनानं विचारा. "

द्विजदास म्हणाला, " कलकत्त्याच्या घरीं असतांना आई एक दिवस वहिनीला घेऊन रागारागानं एकाएकीं निघून आली तें आठवतं का आपल्याला ? "

" आठवतं. "

" त्याचं कारण कळलं नाहीं म्हणून आपल्याला आश्चर्य वाटलं होतं, मनाला फार लागून राहिलं होतं, म्हणून आपण माझ्या खोलींत येऊन त्या दिवशीं बोललां होतां – तें आठवतं का आपल्याला ? "

" आठवतं. पण आतां आठवलं कीं लाज वाटते. "

" त्या बोलण्यांत कांहीं अर्थ नव्हता ? "

" नव्हता. "

द्विजदास क्षणभर स्तब्ध राहून म्हणाला, " मलाही तसंच वाटतं — त्यांत कांहीं अर्थ नव्हता. "

पुनः थोड्या वेळानें तो म्हणाला, " आपल्या मावशीची इच्छा कीं अशोकबरोबर आपला विवाह व्हावा, असं वहिनी म्हणत होती. निश्चित झालंय का तें ? "

" त्या आमच्या कौटुंबिक गोष्टी आहेत, " वंदना म्हणाली, " बाहेरच्या माणसाबरोबर त्याची चर्चा कशाला ? "

" नुसती चर्चा नव्हे— " द्विजदास म्हणाला, " मी आपली खबर विचारतोंय. "

वंदना चिडून म्हणाली, " हा असला प्रश्न मला विचारण्याइतका आपला न् आमचा कांहीं जिव्हाळ्याचा संबंध नाहीं. आपण सुशिक्षित आहां द्विजबाबू ! उगीच असल्या चौकशा करणं आपल्याला शोभत नाहीं. "

तें ऐकून द्विजदास खरोखरच शरमला. खरोखरच त्याचा चेहरा उतरला. तो म्हणाला, " माझी चूक झाली वंदना. मी कांहीं तसा चौकस माणूस नाहीं. दुसऱ्याच्या नसत्या उठाठेवी करायची मला संवय नाहीं. कारण कांहींही असो, पण मला वाटलं होतं, कुणाला सुद्धां जें विचारतां येत नाहीं तें तुम्हांला विचारावं ! ज्या प्रसंगांत कुणाला हांक मारतां येत नाहीं, तिथं आपल्याला हांक मारावी— आपण— "

" मग आपण असं कसं म्हटलं ? — " तो बोलत असतांना मधेंच वंदना हंसून म्हणाली, " कीं परक्या माणसाकडे दादांबद्दल चर्चा करणं शक्य नाहीं म्हणून ! मी तर परकी केवळ बाहेरची माणूस. "

द्विजदास म्हणाला. " मग तुम्हीं तरी तसं कसं बोललां ? दादावरची माझी श्रद्धा उडाल्याचा दोष मला कसा दिलात ? माझी काय दशा झाली आहे हें

माहित नाहीं का ?—" त्याच्या डोळ्याच्या कोंपऱ्याला टपूकन् दोन आसवें आल्याचें त्या दिव्याच्या प्रकाशांत तिच्या नजरेला आलें.

तितक्यांत मैत्रेयी आंत आली. ती म्हणाली, " आपण केव्हां आलांत द्विजू-बाबू ? आम्हांला कुणालाच कसं कळलं नाहीं ? "

मागें वळून पाहून द्विजदासनें म्हटलें, " कळायची जरूरी भारीच वाटली होती कुणाला ? "

" हें काय बोलणं झालं ? " मैत्रेयी म्हणाली, " काल आपण जेवलां नाहीं—कुणाला ठाऊक नसलं तरी मला ठाऊक आहे. चला आईच्या खोलींत. "

" पण तो दरवाजा बंद झालाय ना ? "

" बंद झाला होता, " मैत्रेयी म्हणाली, " पण मी धरणं धरलं, आदळ आपट करून त्यांना दार उघडायला लावलं, स्नान करायला लावलं, पूजेला बसवलं, बळेंबळेंच चारदोन फळंमुळं खायला लावलं तेव्हां सोडलं. द्विजू जेवल्याशिवाय कांहीं खायचं नाहीं असं म्हणत होत्या त्या. मी म्हटलं, तें कांहीं चालायचं नाहीं. या बाबतींत मी मुळीसुद्धां ऐकायची नाहीं. अन् तेव्हांपासून आम्ही सारींजणं आपली वाट पहात बसलों होतों. चला, आपलं ताट मी आईच्या खोलींत ठेवलंय. "

द्विजदास थक्क होऊन गेला. एवढें लांबलचक भाषण तिनें यापूर्वी त्याला ऐकवलें नव्हतें. तो म्हणाला, " चलावं. "

वंदनेला उद्देशून मैत्रेयी म्हणाली, " आपणही या. आई आपल्याला बोलावताहेत. " असें म्हणून द्विजदासला एकप्रकारें गिरफ्तार करून घेऊन ती निघून गेली. त्याच्या मागोमाग गेली वंदना.

स्वतःच्या खोलींत दयामयी निजून राहिली होती आपल्या बिछान्यावर तिथल्या अंधुक उजेडांत तिच्या चेहऱ्यावरची दुःखाची छाया जास्तच केविलवाणी दिसून येत होती. दोन्ही डोळे सुजून तांबडेलाल झाले होते. नुकतीच आंघोळ केल्यामुळें मोकळे सोडलेले ओले केस चोहींकडे विखुरले होते. उशाजवळ बसून कल्याणी तिच्या अंगावरून हात फिरवीत होती. दुसऱ्या बाजूला एका खुर्चीवर शशधर बसला होता आणि थोड्याशा अंतरावर एका खुर्चीवर बसले होते अक्षयबाबू.

द्विजदास आंत येतांच दयामयीनें पाठ फिरवली. त्याच क्षणाला तोंड दाबून

एकदम रडूं कोसळल्याचा आवाज ऐकूं आला आणि त्याबरोबरच तिचा सारा देह थरथरूं लागला. वंदना मुकाट्यानें जाऊन तिच्या पायापाशीं बसली. एवढा शोकजनक देखावा यापूर्वी तिनें कधींच पाहिला नव्हता

कितीतरी वेळ सारींजणें मुकाट्यानें बसलीं होतीं.

पहिल्यानें त्या स्तब्धतेचा भंग केला शशधरनें. तो म्हणाला, "कालपासून ऐकतोंय, कीं तूं जेवला नाहींस. कसेबसे दोन घास खाऊन घे ना."

द्विजदास म्हणाला, "हो."

जवळच ताटपाट मांडून मैत्रेयी वाढायची तयारी करीत होती तिकडे पाहून शशधर पुनः म्हणाला, "तुला यायला एवढा वेळ कां झाला ? साडेआठच्या गाडीनं गेलीं ना तीं ?"

"हो."

हंसण्याचा खोटाच आव आणून शशधर म्हणाला, "शिवाय तें कलकत्त्याचं घर म्हणतात तुझंच आहे ?"

द्विजदास म्हणाला, "माझ्या घरीं जायला दादाला बंदी आहे असं कुणी म्हटलं ?"

"तसं नाहीं म्हणत मी —" शशधर म्हणाला, "जातांना त्यांनींच असा कांहीं तरी आव आणला होता ना ? हें घर सोडून जायची तरी काय जरूरी होती ? जरा मिटवामिटव करून घेतां आली असती त्यांना."

द्विजदास म्हणाला, "मिटवामिटव करतां येणं जर शक्य होतं, तर आपणच कां केली नाहीं ती ?"

"मी करूं मिटवामिटव ?" शशधर अत्यंत आश्चर्य प्रदर्शित करीत म्हणाला, "या म्हणण्यांत कांहीं अर्थ का आहे ? माझा अपमान केला त्यानं अन् मिटवामिटव करायची मी ? छान युक्ति ! ' असें म्हणून तो उकळ्यांवर उकळ्या आणीत हसू लागला.

त्याचें हंसणें थांबल्यावर द्विजदास म्हणाला, "छान युक्ति नव्हे शशधरबाबू ! —'डोंगराआड लपायचं' असं कायसं पोरीबाळी म्हणतात ना ? दादा म्हणजे तो डोंगर अन् आपण होतां त्या डोंगराआड. आतां समोरासमोर आलों आहों आपण—तुम्ही अन् मी ! मानापमानाचा हिसा अजून संपला नाहीं म्हणावं. सुरू झालाय नुक्ता."

"म्हणजे काय ?"

"म्हणजे हें—मी आपला बाळमित्र विप्रदास नव्हे—मी आहें द्विजदास."

शशधरच्या चेहऱ्यावरचें हंसूं हळुहळू मावळत गेलें. अत्यंत चिडून त्यानें विचारलें, "या भाषणाचा अर्थ जरा स्पष्ट करून सांगशील का ?"

दादाचा बाळमित्र म्हणून शशधर त्याला 'तूं' म्हणत होता—द्विजदास मात्र त्याला 'आपण' म्हणून संबोधित होता. तो म्हणाला, "आपलं म्हणणं कबूल आहे मला—याचा अर्थ आज स्पष्ट झालेलाच बरा. सत्याच्या रक्षणासाठीं सर्वस्वान्त व्हायची ज्यांची तयारी असते, त्यांतलेच एक आहेत आमचे दादा. आश्रितांच्या कल्याणासाठीं अंगींच्या मांसाचा तुकडा सुद्धां ते तोडून देतील. त्यांचं ध्येय एवढं विलक्षण आहे, कीं अशक्य हा शब्द त्यांच्या कोशांत नाहीं. एकप्रकारचीं पागल माणसं असतात हीं ! म्हणूनच त्यांची अशी दुर्दशा होते ! पण मी अगदीं सामान्य माणूस आहें. आपल्यांत न् माझ्यांत फारसा फरक नाहीं. आपल्यासारखाच मी चिडखोर आहें—मत्सरी आहें—द्वेषी आहें—सूड घ्यायची सैतानी वृत्ति माझ्याठायीं आहे. तेव्हां दादांना आपण फसवलं असेल तर मी आपल्यालादेखील तोंडघशी पाडीन. त्यांची खोटी सही आपण केली असेल तर बेधडक आपल्याला तुरुंगांत पाठवीन—निदान तसं करायचा जीव टाकून प्रयत्न करीन—मग तसं करतांना दोघांच्याही हातांत भिकेची झोळी आली तरी बेहत्तर. या तंट्यापायीं शेवटीं असंच होतं, असं शहाणीं माणसं म्हणतात—आतां एकदां होऊंद्याच तें !—"

शशधर मोठमोठ्यानें ओरडत म्हणाला, "ऐकलंत आई, ऐकलंत ? आपल्या द्विजूचं भाषण ऐकलंत ? तोंडाला येईल तें बोलूं नको म्हणून सांगा त्याला."

द्विजदास म्हणाला, "आईकडे तक्रार करण्यांत कांहीं अर्थ नाहीं शशधर. तिला माहीत आहे, कीं मी विपिन नव्हे. मातृवाक्य म्हणजे द्विजूच्या लेखीं वेदवाक्य नाहीं ! स्पर्धेचा अभिनय करतांना द्विजू तालावर नाचत नाहीं तें माहीत आहे आईला."

कुणाच्याच तोंडून शब्द बाहेर निघत नव्हता. दोघांचें असें हें भांडण जुंपेल याची कल्पना कुणालाच आली नव्हती. सारेच जसे आश्चर्यचकित झाले होते तसेच भीतीनें गांगरून गेले होते. ही थट्टा नव्हे, तंबी नव्हे, हा कठोर संकल्प आहे हें शशधरला कळून चुकलें होतें. उत्तर देतांना त्याच्या आवाजांत

पूर्वीची मग्रुरी राहिली नव्हती, तरीही उसनें अवसान आणून तो म्हणाला, "बस्स झालं ! यापुढं मी आतां इथं पाणीसुद्धां तोंडांत घेणार नाहीं."

"यावेळपर्यंत कसं घेतलं यांचंच मला आश्चर्य वाटतंय शशधरबाबू ?" द्विजदास म्हणाला.

रडतरडत कल्याणी म्हणाली, ' हें काय द्विजूदादा, शेवटीं तूंच का माझा जीव घेणार ? एका कुसव्याचीं भावंडं आपण—तूंच का आमचा सत्यानाश करणार ?"

द्विजदास म्हणाला, "पुनः पुनः रडून डोळ्यांतून पाणी काढलं कीं सत्यानाशाची पाळी चुकेल असं का तुला वाटतं ? जगांत कांहीं न्यायच का नाहीं ? वारंवार तुम्हाच लोकांचीच काय जीत व्हायची ! आतां दादा इथं नाहींत. तरी पण अन्नाला मोताद झालीस, कीं माझ्याकडे ये. तेव्हां तुझं हें रडणं मी हिशेबांत घेईन. या वेळीं नाहीं."

हा वेळ पर्यंत दयामयी मुकाट्यानें सारें कांहीं ऐकून घेत होती ती एकदम उसळून उठून ओरडून म्हणाली, "तूं इथून निघ पाहूं द्विजू. अशी ही शिवीगाळ करायला तुला विपिनच का शिकवून गेला ?"

"कोण शिकवून गेला म्हणालीस ! विपिन ?"

"हो. तोच ! अगदीं तोच ?"

क्षणभर द्विजदासचे ओंठ थरथरले. दांतओठ खाऊन तो म्हणाला, "मी जातों आई. जेवढा कमीपणा हा वेळपर्यंत तूं पदरांत घेतलास तेवढा पुरे झाला. आणखी जास्त ढासळूं नकोस ?" असें म्हणून तो एकदम बाहेर निघून गेला.

द्विजदास आपल्या खोलींत येऊन मुकाट्यानें बसला होता. घटकाभऱ्यानें मैत्रेयी आंत आली. तिच्या हातीं जेवणाचें ताट होतें. ती म्हणाली. "आतांच तयार करून आणलंय हें सारं. जेवायला या इथंच ताटपाट मांडतें."

"कुणी सांगितलं हें काम आपल्याला ?"

"कुणी नाहीं. कालपासून आपण उपाशी आहां तें का मला माहीत नाहीं ?"

"एवढ्या साऱ्या माणसांतून आपल्यालाच कां हें एवढं जाणवलं ?"

खालीं मान घालून मैत्रेयी मुकाट्यानें उभी राहिली. उत्तर येत नाहीं असें पाहून द्विजदास म्हणाला, "ठीक आहे. ठेवून जा तें तिथं. सध्यां भूक नाहीं—वाटलं तर जेवीन मग."

खोलीच्या एका कोंपऱ्यांत ताटपाट मांडून जेवण वाढून तें झांकून ठेवून मैत्रेयी निघून गेली. जातांना तिनें आग्रह केला नाहीं, कीं जेवण थंड होऊन गेलें तर बिघडेल असेंही म्हटलें नाहीं.

त्यावेळीं रात्रीचे बारा वाजले असावे.

द्विजदास खुर्चीवरून उठला. थोडेंबहुत खाऊन नंतर झोंपी जावें असा विचार करून हातपाय धुण्यासाठीं बाहेर आला. पहातो तों दाराजवळ कुणीतरी बसून आहे. तिथल्या मिणमिणत्या प्रकाशांत चांगलेंसें दिसलें नाहीं म्हणून त्यानें विचारलें, " कोण ? "

" मी मैत्रेयी. "

द्विजदासला अत्यंत आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " एवढ्या रात्रपयत आपण इथं कां ? "

" जेवायला बसलांत अन् आपल्याला कांहीं जरुरी लागली तर — म्हणून बसलेंय इथं. "

" छे. छे. हें बरं नाहीं. आधीं जरुरीच नव्हती कसली — त्यांतून घरांत दुसरं कुणी नव्हतं का ? "

मैत्रेयी हळूच म्हणाली, " आज इतक्या दिवसांचा त्रास — सारी मंडळी थकून झोंपी गेलीय. एकसुद्धां कुणी जागं नाहीं. "

द्विजदास म्हणाला, " आपणसुद्धां कांहीं कमी त्रास घेतला नाहीं मग कां झोंपला नाहीं ? "

मैत्रेयीनें उत्तर दिलें नाहीं. ती उगीच राहिली.

द्विजदासचा करडा आवाज आतां बराचसा नरम आला. तो म्हणाला, " असं - बसून रहाणं बरं नाहीं दिसत. आपण आंत येऊन बसा. जेवायला बसलों कीं नजर ठेवा ! " असें म्हणून तो हातपाय धुण्यासाठीं बाथरूममधें गेला.

यापूर्वी द्विजदास मैत्रेयीशीं क्वचितच बोलला होता. त्याला तशी जरूरी भासली नव्हती, कीं इच्छाही वाटली नव्हती बोलायची आतां बोलणें कशा रीतीनें चालू ठेवावें याचा विचार करीत करीत तो खोलींत परत आला आणि पहातो तो तिथें जेवायचें ताट नाहीं कीं मैत्रेयीही नाहीं. इतक्यांत काय झालें म्हणून तो अंदाज करीत होता तोंच ती पुनः येऊन हजर झाली आणि म्हणाली, " झांकण उघडून पाहिलं तो सारे जिन्नस सुकून कोरडे झाले होते. म्हणून पुनः आणायला गेलें होतें. आतां बसा. "

द्विजदास म्हणाला, " वाफ आलेली दिसतेय. एवढ्या रात्रीं हें सारं आणलं कुठून ? "

मैत्रेयी म्हणाली, " आधींच तयारी करून ठेवली होती. भूक नाहीं म्हणून आपण म्हटलं—जेवायला वेळ आहे असं म्हटलं, त्याचवेळीं वाटलं, कीं हें असंच ठेवलं तर जेवण कांहीं व्हायचं नाहीं. "

द्विजदास जेवायला बसला. केल्या जिनसांची तारीफ केली त्यावेळीं त्याला कळून आलं, कीं त्यांतले बहुतेक मैत्रेयीनें रांधले होते. ते जिन्नस तिनें पुनः पुनः आग्रह करकरून द्विजदासला वाढले. या विद्येंत ती निष्णात होती.

द्विजदास हंसून म्हणाला, " यावेळीं जास्त खाल्लं तर प्रकृति बिघडेल. "

" नाहीं. नाहीं. कांहीं नाहीं बिघडायची. कालपासून उपास घडलाय – याला का जास्त खाणं म्हणायचं ? "

" मी एकटाच काय उपाशी नव्हतों या घरांत. मला वाटतं बरेच होते उपाशी. "

" बरेच असले तर मला काय होय ! " मैत्रेयी म्हणाली, " आईना दोन घांस कसे खायला लावायचे तेवढंच मी पहात होतें. मी नसतें तर किती दिवस दार बंद करून त्या उपास करीत राहिल्या असत्या त्याची कल्पना केली तरी मला भीति काटते. पण मला ' आपण ' म्हणूं नका. ऐकलं कीं मला मोठी लाज वाटते किती झालं तरी मी लहान ना ? "

" बरं आहे. " द्विजदास म्हणाला, " आतां तुला आपण नाहीं म्हणत !— अन्नदाताईची खबर घेतली होतीस का ? "

" तिचं आणखी काय ? " मैत्रेयी म्हणाली, " ती देखील उपाशी आहे कीं काय ? '

हा वेळपर्यंत मैत्रेयीचें भाषण ऐकून त्याला समाधान वाटत होतें. या दुःखाच्या वातावरणांत. प्रसन्नतेची झुळुक मधून मधून त्याच्या मनाला आदळून जात होती. पण त्या शेवटच्या भाषणानें मात्र एका क्षणांत त्याचें मन फिरलें. तो म्हणाला, " अनुताईच्या बाबतींत अशा भाषेंत बोलायचं नाहीं. ती एक मोलकरीण आहे असं तुला सांगितलं असेल कुणी – पण या साऱ्या घरांत माझ्या दृष्टीनं तिच्याएवढं मोठं वडील माणूस दुसरं कुणी नाहीं. तिच्या अंगावर वाढलोंय मी. "

" तें मला माहीत आहे. " मैत्रेयी म्हणाली.

" कितीतरी घरांतून अशा जुन्या दाईनीं घरचीं मुलं वाढवलीं आहेत. त्यांत एवढं विशेष तें काय आहे ? बरं, बरं ! आपलं जेवण झालं कीं मग तिची खबर घेतें. "

कांहीं उत्तर न देतां बराच वेळ द्विजदास तिच्याकडे पहात राहिला होता. एकदम त्याच्या मनांत आलं, ' खरंच तर ! कितीतरी कुटुंबांत हें असं चाललंय. अंतस्थ प्रकार काय आहे हें ज्याला माहित नाहीं त्याला वरवर दिसणाऱ्या प्रकारावरून आश्चर्य वाटलं तर त्यांत काय नवल ! ' मनांत आलेला कठोर विचार थंडावला आणि तो म्हणाला, " उपाशी असली तरी एवढ्या रात्रीं अनुताई कांहीं खाणार नाहीं. तिच्यासाठीं यावेळीं कांहीं काळजी करायला नको. "

अशींच मुकाट्यानें पुनः कांहीं मिनिटें गेलीं. त्यानंतर द्विजदासनें विचारलें, " मैत्रेयी, दुसऱ्याची सेवा करायला तूं शिकलीस कुणाकडे ? तुझ्या आईकडे का ? "

" नाहीं. " मैत्रेयी म्हणाला, " माझ्या आक्काकडे. पतिसेवेच्या बाबतींत तिला दुसरी तोड नाहीं. "

" पति म्हणजे परका का ? " द्विजदास हंसून म्हणाला, " मी परक्यांची— दुसऱ्याची सेवा करण्याच्या बाबतींत विचारलं होतं. "

" अंः ! परका म्हणे ! " असें म्हणून मैत्रेयी लाजून हंसली. तिनें मान खालीं घातली.

" ठीक आहे. " द्विजदास म्हणाला, "आतां सांग तुझ्या अक्काचा इतिहास."

" अक्का आतां हयात नाहीं. " मैत्रेयी म्हणाली, " तीन वर्षं झालीं, एक मुलगा आणि एक मुलगी मागं ठेवून ती इहलोक सोडून गेली. चौधरीबाबूंनीं एक वर्षसुद्धां वाट पाहिली नाहीं — पुन्हां लग्न केलं.—हें बरं का ? "

" पुरुषाची जात ! " द्विजदास म्हणाला, " ते असंच करायचे. त्यांत बरं काय नि वाईट काय ? "

" आपणसुद्धां असंच कराल ? "

" आधीं एक लग्न तर होऊं दे. मग दुसऱ्याच्या बऱ्यावाईटाचा विचार करूं. "

" असं म्हणून कांहीं चालायचं नाहीं. " मैत्रेयी म्हणाली, " आजवर आपली वहिनी होती. आतां तीही नाहीं इथं. आईकडे कोण पाहील ? "

" कोण पाहील कोण जाणे ! " द्विजदास म्हणाला, " तिची मुलगी आहे, जांवई आहे, आणखीही कुणी पुढं येतील तिची काळजी घ्यायला. या जगांत

कितीतरी अशक्य गोष्टी शक्य झालेल्या दिसतात ना ? तें कुणाला कांहीं सांगतां यायचं नाहीं. सध्यां माझी गोष्ट राहूं दे, तुझा इतिहास सांग ना आधीं. ”

“ माझा कसला आलाय इतिहास ? कांहींच नाहीं. ”

“ काहींच नाहीं ? अगदीं मुळींच कांहीं नाहीं ? ”

मैत्रेयी पहिल्यानें जरा कांचरत होती. पण नंतर उगीच थोडेंसें हंसून म्हणाली, “ हं – मी समजलें. चौधरीबाबूची हकीकत आपल्याला कुणी सांगितली वाटतं. छे छे – अगदींच निर्लज्ज माणूस. अक्का वारल्याबरोबर मला मागणी घातली त्यानं. ”

“ मग काय झालं ? ”

“ चौधरीबाबू पैसेवाला माणूस. ” मैत्रेयी म्हणाली, “ आई अन् बाबा दोघांनींही कबूली दिली. बाकी कांहीं नसलं तरी लीलेचीं मुलं तरी सुखाला लागतील ! जसं कांहीं लीलेचीं मुलं पोसण्याखेरीज आयुष्यांत दुसरं कांहीं ध्येयच नाहीं मला ! मी अगदीं स्वच्छ सांगितलं, कीं पुनः ही गोष्ट काढाल तर गळफांस लावून जीव देईन. ”

“ कां ? त्यांत असं काय मोठं संकट होतं ? ”

“ संकट नव्हे का ? यापेक्षां दुसरी कुठली वाईट गोष्ट आहे का या जगांत ? ”

“ हें तुझं म्हणणं बरोबर नाहीं. ” द्विजदास म्हणाला, “ या जगांत सगळ्याच क्षेत्रांत कांहीं बिघाड होत नाहीं मैत्रेयी. माझ्या दादाला लहानाचा मोठा केला तो माझ्या आईनंच ना ? ”

“ पण आतां शेवटीं त्याचा काय परिणाम झाला ? ” मैत्रेयी म्हणाली, “ आजच्यासारखी भयंकर आपत्ती या घरावर कधीं आली होती का ? ”

द्विजदास स्तब्ध होऊन राहिला. तिचें म्हणणें खोटें नव्हतें—पण तें खरें तरी कुठें होतें ?

एकदोन मिनिटें तो ताठरल्यासारखा स्वस्थ बसला होता. एकदम जाग आल्यासारखें करून तो म्हणाला, “ तुझ्या म्हणण्याला माझा विरोध नाहीं. या घरावर मोठी आपत्ती आली खरी. तरीपण हेंही खरं, कीं सामान्य मुलीच्या तोंडून निघणाऱ्या क्षुल्लक संसारी दृष्टीनं बोलण्यापेक्षां तू अधिक कांहीं बोलली नाहींस ! ” असें म्हणून तो उठून उभा राहिला. त्याचें जेवण झालें होतें.

दुसऱ्या दिवशीं दुपारभर तो घरीं नव्हता. कुठें गेला होता तें त्यांचें त्यालाच

माहित. संध्याकाळीं काळोख पडल्यावर तो मुकाट्यनें घरीं आला. सरळ जाऊन उभा राहिला तों वंदनेच्या दारासमोर. तिला हाक मारून तो म्हणाला, "येऊं का!"

'कोण? द्विजूबाबू! या ना."

द्विजदास आंत आला त्यावेळीं त्याला दिसून आलें, कीं वंदनेची जाण्याची तयारी झाली होती सामानसुमानाची बांधाबांध होऊन गेली होती. तो म्हणाला, "खरोखरच निघालां म्हणायचं? आणखी एक दिवस सुद्धां रहावलं नाहीं का?"

त्याच्या डोळ्याला डोळा देऊन उत्तर देणें तिला शक्य झालें नाहीं. तरीही ती म्हणाली, "गेलं तर पाहिजेच. एक दिवस जास्त रहाण्यांत कसला फायदा?"

"फायद्याची गोष्ट बोलत नव्हतों मी." द्विजदास म्हणाला, "म्हटलं, सारेच गेले,—एवढ्या या मोठ्या घरांत आपलं म्हणायला कुणीच राहिलं नाहीं."

वंदना म्हणाली, "जुनीं जातात, नवीं येतात—जगांत हें असंच चाललंय द्विजूबाबू. याच आशेवर नजर ठेवून धीर धरून रहावं लागतं. असा धीर खचून जाणं बरं नव्हे."

द्विजदासनें उत्तर दिलें नाहीं. तो उगीच राहिला.

"आतां फार वेळ राहिला नाहीं." वंदना म्हणाली, "जरूरीच्या दोन गोष्टी बोलून घेतें. शशधरबाबू कल्याणीला घेऊन निघून गेले तें कळलं ना?"

"नाहीं. तसं कळलं नाहीं. पण माझा अंदाज होताच."

"जायच्यापूर्वी त्यांच्या तोंडीं एक थेंब पाणीसुद्धां घालतां आलं नाहीं. दोघंही आलीं, आईला प्रणाम केला अन् म्हणालीं, 'आम्ही चाललों.' आई म्हणाल्या, 'या.' अन् लगेच तोंड वळवून बाजूला झाल्या."—असें म्हणून वंदना उगीच राहिली. गेल्या रात्रीं आईच्या समोर जी बाचाबाची झाली होती त्यामुळें तीं निघून गेलीं या गोष्टींचा तिनें उल्लेखसुद्धां केला नाहीं.

कांहीं वेळ उगीच राहून तिनें पुनः बोलायला सुरवात केली, "आई अगदींच खचून गेल्यायत पाहिल्याबरोबर दया येते त्यांची. कुणासमोर तोंड दाखवायला-सुद्धां त्यांना शरम वाटतेय. मैत्रेयी केवढी काळजी घेतेय त्यांची. पोटच्या मुलीला सुद्धां साधलं नसतं तें. उद्यां आई बऱ्या होऊन उठल्या तर त्याचं सारं श्रेय तिच्या सेवेला आहे. मोठी छान आहे मुलगी. कांहीं दिवस तिला घ्या इथं, एवढंच सांगायचं होतं मला."

" ठीक आहे. "

" द्विजूबाबू, जायच्यापूर्वी आणखी एक मागण आहे तुमच्याजवळ. "

" कोणतं ? "

" आपण आतां एकदां लग्न करून घ्या. "

" कां ? "

वंदना म्हणाली, " नाहीं तर या एवढ्या मोठ्या कुटुंबाची वाताहात होईल. आपल्या व्यवहारांत आपलं मोठं नुकसान झालंय तें मला माहित आहे. पण राहिलंय तें कांहीं थोडं थोडकं नाहीं. किती दानधर्म, किती सत्कार्यें व्हायचीं आहेत. किती आश्रित,—नोकरचाकर— दीनदुबळे आपल्या तोंडाकडे पहाताहेत ! अन् हें सारं आजच्या पुरतंच कांहीं नव्हे—अगदीं केव्हांपासून आपल्या कुटुंबांत हें असंच चालत आलंय. कधींच त्याला खंड पडला नाहीं—तें काय आतां बंद होऊं द्यायचं ? दादांच्या चुकीनं जें गेलं तें वाजवीपेक्षां जास्त होतं. तें जरूरीच्या पलीकडचं होतं. जाऊं दे तें. जें कांहीं राहिलंय तें सुखासमाधानानं यथेष्ट मानून घ्या. हें जें राहिलं आहे तें अक्षय राहूं दे—अफाट वाढूं दे. रोजच्या गरजेंत देवाच्या कृपेनं उणीव राहूं नये—तुमचा निरोप घ्यायच्यापूर्वी त्याच्याजवळ माझं एवढंच मागणं आहे. "

द्विजदासच्या डोळ्यांतून आसवें पाझरत होतीं.

वंदना बोलत होती, "—आपल्या बाबांचा दादावर मोठा विश्वास होता म्हणून हा सारा भरिभार त्यांनीं त्यांच्यावर टाकला होता—पण तो फुकट गेला. बापाच्या दृष्टीनं ते दोषी ठरले. पण या चुकीमुळं दैन्य आलं, वाडवडिलांच्या पुण्यकर्मांत खूट पडली तर मुखर्जीमहाशयांना एवढंसुद्धां बरं वाटायचं नाहीं. या एवढ्या असमाधानाच्या संकटापासून तुम्हीं बचावलं पाहिजे त्यांना. '

डोळ्यांत येत असलेलीं आंसवें आवरीत द्विजदास म्हणाला, " दादांच्या बाबतींत कुणीच असा समज करून घेऊं नये वंदना. हें काय भलतंच ! "

दिव्याच्या सावलीच्या आड वंदनेचा चेहरा आला होता म्हणून बरें !

तो म्हणाला, " दादाच्यासाठीं वाटेल ती आपत्ती—वाटेल तो बोजा मी सहन करीन—पण त्यांचा कामाचा बोजा कसा झेपेल मला ? तिथंच धीर खचलाय माझा. तेंच पहायला आज बाहेर गेलों होतों. त्यांची शाळा, वेदशाळा—पाठशाळा, मुसलमान मुलांची मख्तब—आणखी अशाच कांहीं दोनचार—किती तरी आहेत. रयतेला पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून

काल्वा काढायला सुरवात केली आहे त्यांचं काम बरेच दिवस चालेल. ते पैसे पुरवले पाहिजेत. कागदपत्रांत एक भली मोठी यादी मिळालीय—नुसते दानांचेच आकडे. तीं माणसं मागायला आलीं तर सांगायचं काय याचीच पंचाईत पडली आहे मला. ”

“ मिळेल म्हणून सांगितलं पाहिजे त्यांना. ” वंदना म्हणाली, “ तें देणं दिलंच पाहिजे. पण मी असं विचारतें, आजवर त्यांनीं कुणालाच कांहीं सांगितलं नव्हतं का ? ”

“ नाहीं. ”

“ त्याचं कारण ? ”

“ गुप्तदान करण्याच्या उद्देशानं नव्हे—” द्विजदास म्हणाला, “ पण सांगायचं कुणाला ? या जगांत त्यांना मित्र असा कुणी नव्हताच. संकट आलं तरी सहन करणारा एकटाच. आनंद झाला तरी त्याचा उपभोग घेणारा एकटाच. कुणाला सांगायचं असलं तर तें एकाच दोस्ताला—” असें म्हणून त्यानें परमेश्वराला उद्देशून वर हात केला आणि म्हटलें, “—मग ही सारी हकिकत नात्यागोत्याच्या माणसांना कळायची कशी ? जें काय होतं तें माहित होतं असं त्यांना स्वतःला—किंवा त्याच्या अंतरात्म्याला. ”

वंदनेचा चौकसपणा जागा झाला. तिनें विचारलें, “ वरं द्विजूबाबू, मुखर्जीमहाशयांचं कधीं कुणावर प्रेमच नव्हतं, असं का वाटतं आपल्याला ? कुठल्याही माणसावर ? ”

“ नाहीं. ” द्विजदास म्हणाला, “ तो त्यांचा स्वभावच नव्हता. माणसानं गजबजलेल्या या जगांत एवढा निःसंग आणि एकलकोंडा माणूस दुसरा मिळायचा नाहीं ! ”

बराच वेळपर्यंत दोघेंही मुकाट्यानें स्वस्थ बसलीं होतीं.

मनावर आलेला कसला तरी अवजड भार झाडून टाकून देऊन वंदना म्हणाली, “ त्यांतलं एकसुद्धां टाकतां यायचं नाहीं आपल्याला. ”

“ पण मी कांहीं दादा नाहीं. एकट्यानंच एवढे ओझे कसे उचलूं वंदना ? ”

“ एकट्यानं कां—दोघांनींही घ्या तो भार. म्हणूनच म्हणतें कीं लग्न करा. ”

“ पण प्रेमाशिवाय मी लग्न करूं कसं ? ”

आश्चर्यानें त्याच्या चेहऱ्याकडे पहात वंदना म्हणाली, " हें काय म्हणतां द्विजूबाबू ? आमच्या समाजांतल्या आमच्यासारख्या माणसांनीं असं म्हणायचं. आपल्या कुटुंबांत कधीं कुणी प्रेमासाठीं लग्न केलं होतं तें आतां आपलं व्हायचंय ? हें वेड सोडून द्या. "

" हा विधी आमच्या घरचा नव्हे खरा, " द्विजदास म्हणाला, " पण जुनेच आचार चिरकाल पाळायचा हट्ट कां ? त्यांतच सूख आहे हा विश्वास आतां मला राहिला नाहीं. "

" विश्वासाच्या विरुद्ध तर्कवितर्क करणं कठीण. " वंदना म्हणाली, " सुखाची जामिनगत कशी देऊं ? तें ज्याच्या हातीं आहे त्याचा अजून कांहीं मला पत्ता नाहीं. त्याची विचारपद्धति आहे अद्‌भुत ! त्याच्या मुळाशीं जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. लग्नाच्यापूर्वी डोळ्याच्या आणि मनाच्या रंजनाचे—तसेच पूर्वरागाचे पुष्कळ खेळ पाहिलेयत- मी. त्याचबरोबर एक दिवशीं तो अनुराग कुठल्या खड्ड्यांत कसा गेला, तेही फार्स-पुष्कळ पाहिले आहेत मी. मी म्हणतें, त्या भानगडींत पडण्यांत कांहीं अर्थ नाहीं द्विजूबाबू. सोन्याचा मायामृग ज्या जंगलांत हिंडतो आहे तिथं तो खुशाल हिंडूं द्या. मुद्दाम या घरांत त्याला बोलावून आणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. "

गालांतल्या गालांत हंसून द्विजदास म्हणाला, " याचा अर्थ एवढाच, कीं सुधीरबाबूंनीं आपलं मन अगदीं बिघडवून टाकलंय. "

वंदनासुद्धां हंसून म्हणाली, " हो ! अन् त्यांतून जें कांहीं थोडंबहुत शाबूत राहिलं होतं तें बिघडवलं आपण—अन् त्यानंतर आला हा अशोक. आतां माझ्या या फुटक्या नशिबानं तो तरी टिकला कीं मिळवली ! '

" तो तरी कोण ? अशोक ? त्याची कशाला भीति वाटते आपल्याला ? "

" भीति एवढीच—हल्ली त्यानं सुद्धां एकाएकीं प्रेम करायला सुरवात केलीय. "

" प्रेमाच्या नांवानं कोणी बोलतांच नये, असाच आपला संकल्प झालाय वाटतं ? "

" हो—ती प्रतिज्ञा आहे माझी. कधीं लग्न करायचं असलं तर खूपशा सुखाच्या आशेनं—तितकीच मोठी विटंबना पदरीं न येतां तें व्हावं—असं वाटतंय मला. म्हणूनच काल अशोकबाबूला सांगितलं—यापुढं प्रेमाचं नांव काढलं तर मी पळून जाईन. "

"मग काय म्हटलं त्यांनीं ?"

"बोलला नाहीं कांहींच—हे एव्हढाले डोळे करून टकमक पहात राहिला नुसता. फार वाईट वाटलं मला तें पाहिलं तेव्हां."

"वाईट वाटलं का ? मग अजूनही आशेला जागा आहे. पण ही सारी मावशीच्या घरची रीत पाहिल्याची प्रतिक्रिया आहे, एवढंच. नुसती ताकालिक आहे."

"तसंही असेल," वंदना म्हणाली, "अशक्य नाहीं. पण शिकलें मात्र पुष्कळ. भाग्य माझं कीं मी कलकत्त्याला आलें. नाहींतर कितीतरी गोष्टी कळून आल्या नसत्या मला."

द्विजदास कांहीं वेळ उगीच राहिला होता. नंतर म्हणाला, "आतां फार वेळ नाहीं. आतां शेवटला काय तो उपदेश एकदां देऊन टाका, काय केलं पाहिजे मी ?"

थट्टेचें अवसान आणून पुनः पुनः माना वेळावीत वंदना म्हणाली, "उपदेश हवाय का ? खरोखरच हवाय का ?"

"हो खरोखरच हवा आहे." द्विजदास म्हणाला, "मी दादा नव्हे. मला कुणी तरी मित्र पाहिजे—सावरणारा पाहिजे—उपदेश देणारा पाहिजे. तुम्ही लग्न करायला सांगितलंत मला—ठीक आहे—तेंच करतों आतां पण प्रेम राहो बाजूला, नुसती मैत्रीसुद्धां जर लाभली नाहीं तर तुम्ही माझ्या माथीं मारलेला हा बोजा मी उचलायचा कसा ?"

द्विजदासच्या या भाषणांत थट्टेचा लवलेशसुद्धां नव्हता. त्याच्या शब्दांच्या गांभीर्याचा वंदनेच्या मनावर परिणाम झाला. ती अस्वस्थ होऊन म्हणाली, "म्यायला नको द्विजूबाबू, मित्र येईल—खात्रीनं येईल—तशीच तळमळीनं जरूरी भासेल त्यावेळीं देव त्याला तुमच्या दाराशीं आणून उभा करील, हें पक्कं समजून ठेवा."

यावर द्विजू कांहीं बोलणार होता पण तें तेवढेंच राहिलें. बाहेरून मैत्रेयीची हांक ऐकूं आली, "—द्विजूबाबू आहेत का तिथं ? आई आतांच्या आतां बोलावताहेत."

द्विजू उठून उभा राहिला आणि म्हणाला, "गाडी आहे बाराला—साडेअकराला निघालं पाहिजे इथून. वेळींच येईन हांक मारायला. तेवढं विसरूं नका." असें म्हणून तो घाईघाईनें बाहेर निघून गेला.

२५

वंदना मुंबईला सुखरूप पोंचली. पोंचल्याचें जें पत्र आलें होतें त्याच्या उत्तरादाखल बऱ्याच दिवसांनीं द्विजदासकडून तिला पत्र आलें. कामाचा बोजा फार असल्यामुळें लगेच उत्तर दिलें गेलें नाहीं. 'वंदना असतांना जसें कांहीं चालत होतें तसेंच चाललें आहे, सांगण्याजोगें विशेष कांहीं नाहीं, मैत्रेयीचा बाप कलकत्त्याला निघून गेला, पण मैत्रेयी अजूनही तिथेंच आहे, आईच्या सेवेंत अगदीं अचुक तत्पर राहिलेली आहे, संसाराचा भार तिच्यावरच पडला आहे ती तो चांगला चालवते आहे, घरचीं सारीं माणसें तिच्यावर खूष आहेत. स्वतः द्विजदासलाही तिच्या बाबतींत तक्रार करायला अजून कांहीं कारण सांपडलें नाहीं,' असें लिहिलें होतें. वंदना आणि तिचा बाप यांच्याबद्दल पत्राच्या शेवटीं, शभेच्छा प्रदर्शित करून यथाविधि नमस्कार आशीर्वादाचा उल्लेख करून पत्र संपवण्यांत आलें होतें.

यानंतर आणखी तीन महिने गेले. उभयपक्षीं कुणालाच कुणाकडून पत्र आलें नाहीं कीं गेलें नाहीं. विप्रदास, तिची ताई आणि वासूची खबर कळण्याच्या बाबतींत वंदनेचें मन मधून मधून अत्यंत अस्वस्थ होत असे, पण ती खबर कळायला कांहीं मार्ग नव्हता. त्यांनीं आपणहून आजवर बोटभर चिठ्ठीसुद्धां पाठवली नव्हती. कुठें आहेत, काय करताहेत याचा देखील मुळींच पत्ता नव्हता. ही सर्व हकिकत कळवण्यासाठीं द्विजदासला विनंति करून पत्र लिहावें असें हजार वेळ तिच्या मनांत आलें, पण तें प्रत्यक्ष अंमलांत आलें नाहीं.

बलरामपूरला असतांना ज्या ज्या गोष्टी घडल्या त्यांच्या आठवणींची तीक्ष्णता आणि वेदनेची तीव्रता दिवसें दिवस कमी कमी होत चालली होती. मात्र तिथून आल्यापासून ती दिवसेंदिवस दाटळत चालली होती. रोजरोज तळमळणारें मन जसजसें शांत होऊं लागलें, तसतसें तिला पटूं लागलें, कीं हा संबंध कांहीं खराखुरा नव्हे. चार माणसें एका जागीं आलीं, त्यांची सुखदुःखें जाणवलीं, अत्यंत निकट सहवासांत एकमेकांच्या सुखदुःखांचे मनावर परिणाम झाले आणि त्यामुळें जो आपलेपणाचा बराचसा संस्कार मनावर झाला त्याचें आयुष्य क्षणिक होतें. आचारनिष्ठ आणि पुराणमतवादी मुखर्जी कुटुंबांत आपला समावेश होऊं शकत नाहीं – तें कुटुंब आपलें नव्हे – ही गोष्ट

पटायला आतां तिला कठिण गेलें नाहीं. शिक्षण, संस्कार आणि सामाजिक आचारविचारांचें जें व्यवधान उभयपक्षांमधें उभें होतें, तें जितकें खरें होतें तितकेंच कठिण होतें, असें आतां तिला वाटूं लागलें होतें.

मावशी पंजाबला आपल्या नवऱ्याकडे गेली होती याच वेळीं मुंबईला येऊन हजर झाली. तिची प्रकृति बरी नव्हती. पंजाबपेक्षा मुंबईचें हवापाणी चांगलें, हा सल्ला तिला कुठल्या डॉक्टरनें दिला, तो तिचा तिलाच माहित. एवढें खरें, कीं ती आली होती प्रकृतीच्या स्वास्थासाठीं.

मुंबईला यायच्या पूर्वी वंदना आपल्याला येऊन भेटली नाहीं ही गोष्ट तिच्या मनाला लागून राहिली होती. भाचीच्या वृत्तीचा तिला चांगलाच परिचय होता. म्हणून भगिनी पति रे-साहेब यांच्या दरबारीं उघड उघड फिर्याद मांडायचें साहस तिला होत नव्हतें. जेवायच्या बैठकीची संधि साधून तिनें या विषयला तोंड फोडलें. ती म्हणाली, "मि. रे, कदाचित् हें आपल्या लक्षांत आलं नसेल—पण मी पुष्कळ ठिकाणीं बघितलंय, कीं आईबापांचा एकच मुलगा किंवा एकच मुलगी असली, तर तीं अशीं कांहीं अनावर होऊन उठतात, कीं त्यांना काबूंत ठेवणं कठिण होऊन बसतं—"

साहेबांनी तत्काळ तें कबूल केलें. या विधानाचें प्रत्यक्ष उदाहरण अगदीं आपल्या हाताशींच आहे असें त्यांना वाटलें. अगदीं मजेमजेनें त्याचा उल्लेख करून ते म्हणाले, " जसें, आमची ही म्हातारी—एकदां 'नाहीं' म्हटलं कीं तिच्याकडून होकार काढून घ्यायची कुणाची ताकत लागलीय ? तिच्या लहानपणापासून मी पहात आलोंय—"

वंदना म्हणाली, " म्हणूनच अनावर मुली तुम्हाला आवडत नाहींत वाटतं बाबा ? "

" कोण म्हणेल तुला अनावर मुलगी म्हणून ? " साहेब जोराजोरानें विरोध करून म्हणाले, " मुळींच नाहीं—केव्हांही नाहीं. कुणाची सुद्धां शहामत नाहीं तसं म्हणायची. "

वंदना हंसत सुटली,—" पण आतांच तुम्हीं म्हटलं बाबा ! "

" मी ? केव्हांच नाहीं ! "

आतां मावशीसुद्धां हंसत सुटली.

" बरं बाबा, " वंदनेनें विचारलें " माझी आईसुद्धां तुमच्यासारखीच माझ्यावर नाराज होती ? "

" तुझी आई ! " साहेब म्हणाले, " याच बाबतींत तर रोज तिचा माझा तंटा होत असे. लहानपणीं तूं एकदां माझं घड्याळ फेकलं होतंस. तुझ्या आईनं रागारागानं तुझे कान पिळले. तूं रडत रडत आलीस माझ्यापाशीं. मी तुला उचलून घेतलं आणि उराशीं कवटाळलं. त्या दिवशीं साऱ्या दिवसांत मी तुझ्या आईशीं भाषण केलं नाहीं ! — "

बोलतां बोलतां जुन्या आठवणीमुळें भावनेची जाणीव त्यांच्या हृदयांत उसळली आणि मुलीला जवळ ओढून घेऊन ते तिच्या मस्तकावरून हळूहळू हात फिरवूं लागले.

वंदना म्हणाली, " मग लहानपणच्या सारखी आतां माझ्यावर कां तुमची माया नाहीं बाबा ? "

मावशीला डिंवचून साहेब म्हणाले, " ऐकलंत मिसेस घोषाळ, ऐकलेत हे या म्हातारीचे बोल ? "

वंदना म्हणाली, " तर मग जेव्हां तेव्हां कां म्हणतां, कीं हिचं लग्न करून टाकून एकदां या जंजाळांतून मोकळा होईन म्हणून ? तुमच्या डोळ्यांत सलतें का मी कुसळासारखी ? "

" ऐकलंत मिसेस घोषाळ ?—ऐकलंत हें या पोरीचं भाषण ! "

मावशी म्हणली, " तें बरोबर आहे वंदना. मुलगी वाढली म्हणजे आई-बापांना कशी काळजी लागते याची कल्पना तुला स्वतःला मुलगी झाल्यावांचून यायची नाहीं. "

" मला नकोच आहे कळायला मावशी ! "

" पण बापाचं कांहीं कर्तव्य म्हणून आहे ना ! आईबाप कांहीं चिरंजीव नसतात. आपल्या मुलांच्या भवितव्याची काळजी त्यांनीं घेतली नाहीं तर तो दोष होईल त्यांचा. तुझ्या बाबांना एव्हढी काळजी कां वाटते, तें जे स्वतः आईबाप आहेत त्यांनाच कळेल. तुझी बहीण प्रकृति तिचीच गोष्ट घे. तिचं लग्न होईपर्यंत मला अन्नपाणी गोड लागत नव्हतं. झोप येत नव्हती. किती रात्री मी जागून काढल्या आहेत त्याची कल्पना एक तुझ्या बाबांनाच येईल. आज तुझी आई हयात असती तर तिची दशा माझ्यासारखींच झाली असती. "

होकारर्थी सारखी मान हालवीत रे साहेब म्हणाले, " अगदीं खरं आहे मिसेस घोषाळ. "

आतां साहेबांना उद्देशून बोलायला मावशीनें सुरवात केली, " आज हिची

आई हयात असती तर तिनं हिच्या लग्नासाठीं सारखीं दुमणीं लावलीं असतीं. मी तरी काय कमी उठाठेव केलीय हिच्यासाठीं ? केव्हां केव्हां आपली आपल्यालाच लाज वाटते – ”

“ तो दोष नाहीं आपला, ” साहेब होकार देत म्हणाले, “ सर्वत्र अगदीं असंच होत असतं. ”

मावशी बोलत होती, “ — तेंच तर म्हणतें ना ! नुसतं वाटत असतं, कीं आपले आयुष्यांतले दिवस कमी होताहेत—माणसाच्या आयुष्याचा तर भरंवसा नाहीं—जिवांत जीव आहे तोंपर्यंत कांहींतरी करून एकदां आपल्या नजरेसमोर मुलगी मार्गाला लागली कीं झालं. तोंपर्यंत माणसाचा जीव भीतीनं सुकून जात असतो. ”

वंदनेला आतां तें सहन होईना. बापाचा चेहरादेखील सुकून जात आहे असें तिला वाटलें. त्यांचें जेवणही थांबलें होतें. ती म्हणाली, “ उगीच आमच्या मावशाला तिकडे घाबरवून सोडलंस मावशी, अन् आतां इकडे बाबांनाही भीति घालते आहेस. काय असं झालंय तें तरी सांग. अजून खूप खूप आयुष्य आहे बाबांना. मुलीचं कल्याण करायला भरपूर अवकाश आहे अजून त्यांना. उगीच खोटी भीति घालूं नकोस बाबांना. ”

मावशी म्हणजे हटणारी व्यक्ति नव्हती. विशेषतः रे साहेबांनीं तिचीच बाजू उचलून धरली. ते म्हणाले, “ तुझी मावशी म्हणते तेंच बरोबर आहे वंदना. खरोखरच माझी प्रकृति तितकीशी चांगली नाहीं. या देहावर फारसा विश्वास ठेवून चालायचं नाहीं. नात्याचं माणूस—वेळींच सावध करायचं नाहीं त्यांनीं, तर करायचं कुणी ? ” असें म्हणून त्यांनीं दोघींकडेही नजर फेंकली.

मावशीनें हळूच वंदनेकडे पाहिलें—वंदनेचा चेहरा उतरला होता. ओशाळल्यागत बोलल्याचा आव आणून ती म्हणाली, “ असं कांहीं बोलूं नये मिस्टर रे. मी म्हणतें, आपल्याला शंभर वर्षांचं आयुष्य लाभो.—मी नुसतं एवढंच म्हणत होतें—”

साहेब मधेंच म्हणाले, “ नाहीं. आपण म्हटलं तेंच बरोबर होतें. खरोखरच माझी प्रकृति बरोबर नाहीं. वेळींच सावध झालों नाहीं, कर्तव्याला चुकलों, तर तो दोष होईल माझा. ”

सळसळणारा राग आवरीत वंदना म्हणाली, “ आज बाबांच्या पोटांत अन्न जाणार नाहींसं दिसतं मावशी ”

" आतां ही चर्चा राहूं दे मिस्टर रे. " मावशी म्हणाली, " आपलं जेवण यथास्थित झालं नाहीं तर मला मोठं दुःख होईल. "

साहेबांची जेवणावरची वासना उडून गेली होती तरीही सुरीनें मांसाचा एक तुकडा कापून त्यांनीं तो तोंडांत टाकला. त्यानंतर कांहीं वेळपर्यंत जेवण तसेंच मुकाट्यानें चालू होतें.

साहेबांनीं प्रश्न केला, " जांवयाची प्रॅक्टीस कशी काय चाललीय मिसेस घोषाळ ? "

" नुकती कुठं सुरवात झाली आहे. " मावशीनें उत्तर दिलें, " तशी बरी आहे म्हणतात. "

आणखी कांहींवेळ मुकाट्यानें जेवण चालू झालें—तोंडांतला घास गिळून मावशी म्हणाली, " प्रॅक्टीस कशीही असो मिस्टर रे, मी त्या बाबतीला फारसं महत्त्व देत नाहीं. आधीं माणसाचं चारित्र्य पाहिलं पाहिजे. इतर गोष्टींपेक्षां त्याचंच महत्त्व आहे. तें निर्मळ नसलं तर कुठलीही मुलगी केव्हांही सुखी व्हायची नाहीं. "

" यांत काय संशय आहे ! "

मावशी बोलत होती, "—माझ्या बापाच्या घरचं जें शिक्षण मला मिळालंय तेंच जिथं तिथं आडवं येतं. त्यांचं उदाहरण सारखं माझ्या डोळ्यांसमोर आहे. त्यापेक्षां कुठं तिळभर कमी दिसलं तर तें सहन होत नाहीं मला. त्या ज्या नैतिक वातावरणांत मी लहानाची मोठी झालें त्याची खूण पटेल तुम्हाला आमच्या अशोकला पाहिला तर. माझे बाबा, आमचा दादा, हे दोघे होते ना—अशोक अगदीं सहीसही त्यांच्यासारखा झालाय. तसाच सरळ. तसाच उदार. तसाच चरित्रवान ! "

रे साहेबांना तें पूर्णपणें पटलें. ते म्हणाले, " मलासुद्धां अगदीं असंच वाटतं मिसेस घोषाळ. मुलगा मोठा सद्गुणी आहे. इथं सहासात दिवस होता. त्याची चालचलणूक पाहून मी अगदीं खूष झालों !—" असें म्हणून साक्षीसाठीं त्यांनीं आपल्या मुलीला विचारलें, " काय म्हणतेस म्हातारे ? अशोक आपल्याला आवडला कीं नाहीं ? तो इथनं गेला तेव्हां मला कसं उघडं उघडं वाटूं लागलं. "

" हो बाबा, " वंदना त्याला जोड देत म्हणाली, " मोठा विलक्षण माणूस. जसा विनयी तसाच सभ्य. मी जें म्हणेन त्याला कधीं नकार दिला

नाहीं त्यांनीं. त्यांनीं मला जर मुंबईला आणून पोंचवलं नसतं तर मोठ्या पेंचांत पडलें असतें मी ! ”

“ आणखी एक बाब —” मावशी म्हणाली, “ तुझ्या ध्यानांत आलंच असेल वंदना, त्याच्या ठायीं स्नॉबरी नाहीं. आजकालच्या दीनदुःखी जीवांच्या हिशेबीं पाहून जर बोलायचं म्हटलं, तर आमच्यांतल्या बऱ्याचशा माणसांत हा दोष दिसून येतो.—”

वंदना हंसून म्हणाली, “ तुमच्या घरीं तर मला कुणी स्नॉब कधीं दिसला नाहीं मावशी. ”

“ दिसले असतील ग पोरी ! ” मावशी हंसून म्हणाली, “ मोठी चाणाक्ष आहेस तूं. तुला काय फसवतात ! ”

तें ऐकून रे साहेबसुद्धां हंसले. एकंदरींत त्यांना तिचें तें भाषण फार आवडलें. ते म्हणाले, “ अशी बुद्धिमत्ता क्वचितच दिसून येते मिसेस घोषाळ. बापानं स्तुती केली म्हणजे ती अभिमानाची बाब वाटेल—पण खरं बोलायला कांहीं भीति नाहीं कुणाची. ”

“ आतां हें पुरे झालं मावशी, ” वंदना म्हणाली, “ नाहीं तर यापुढं बाबांना आवरणं कठिण जाईल. एकुलत्या एक मुलीच्या बाबतींतले दोष तुम्हांला दिसलेयत. पण एकुलत्या एक मुलीच्या बापासारखा दांभिक माणूस क्वचितच सांपडेल या जगांत, हें मात्र तुम्हाला दिसलं नाहीं. ”

मावशी म्हणाली, “ त्या बाबतींत मी देखील तितकीच अंशभागी आहें वंदना. त्यासाठीं शिक्षा द्यायची असलीतर मलाही द्यावी लागेल. ”

स्वतःवर पुरेपूर खूष झाल्याच्या समाधानाचें लक्षण बाबांच्या चेहऱ्यावर दिसत होतें. ते म्हणाले, “ मी दांभिक आहें कीं नाहीं कोण जाणे पण कन्यारत्नाच्या बाबतींत माझ्यासारखा भाग्यवान दुसरा कुणीच नाहीं अशी मुलगी लाभायचं भाग्य लाभलेले बाप क्वचित. ”

वंदना म्हणाली, “ हें काय बाबा, आज तुम्हीं एकसुद्धां संदेश खाल्ला नाहीं. बरे झाले नाहींत वाटतं ? ”

प्लेटवरचा अर्धा संदेश कापून घेऊन तो तोंडांत टाकीत साहेब म्हणाले, “ सारं जेवण या म्हातारीनंच बनवलंय बरं का ! या खेपेला कलकत्त्याहून आल्यापासून सारं खाणंच बदलून टाकलंय. दालना, सूक्त, मांशाची आमटी, दहींसंदेश, आणखी असंच कितीतरी. कुणाचं ऐकून आलीय कोण जाणे,

पण सहसा घरीं मांस आणूं देत नाहीं. म्हणते बाबांची प्रकृति बिघडेल त्यामुळं. खरंच मिसेस घोषाळ, हें सारं बंगाली खाणं सुरू झालं तेव्हां मला वाटूं लागलं, कीं म्हातारपणीं हेंच खाणं चांगलं. चांगलं रुचीनं खाऊं लागलोंय मी. चांगली भूक लागते. ”

“ मावशीला संवय नाहीं. ” वंदना म्हणाली, “ तिला तें रुचायचं नाहीं. ”

हा मुका चिमटा मावशीला जाणवला.

“ नाहीं, ” ती म्हणाली, “ छे छे ! रुचायचं नाहीं कां ? मला फार आवडलं हें. नुसता हवापाण्याचाच बदल नव्हे, खाण्याचाही बदल हवा होता यावेळीं. मला वाटतं, तेव्हांच माझी प्रकृति इतक्या लवकर सुधारूं लागलीय ती ! ”

“ बरं झालंय नाहीं मावशी ? ”

“ अर्थात् झालंय ! संशयच नाहीं त्यांत. ”

“ तर मग आणखी कांहीं दिवस रहा. आणखी बरं वाटेल. ”

“ तें खरं. पण फार दिवस रहायची सवड नाहीं वंदना. या महिन्याच्या अखेरीला चेन्जसाठीं आपण पंजाबला येणार, असं अशोकनं लिहिलंय. त्यापूर्वीं जाऊन पोंहचलं पाहिजे मला. ”

भोजनपर्व समाप्त झालें. साहेब आतां उठून जाणार आहेत असें पाहून मावशी अत्यंत अस्वस्थ झाली. मनांत असलेला प्रस्ताव करायला अशा प्रकारचें अनुकूल वातावरण उत्पन्न झालें असतां केवळ शिष्टाचार म्हणून तें हातचें घालवलें तर फिरून ती संधि येणार नाहीं, असें तिला वाटलें. आलेला संकोच ओलांडून ती म्हणाली, “ मिस्टर रे, एक सांगायचं होतं. पण वेळ नसेल तर—”

“ नाहीं नाहीं—वेळ आहे तर काय ! ” साहेब उठत असतां लगेच खालीं बसून म्हणाले, “ बोला ना काय बोलायचं तें. ”

मावशी म्हणाली, “ वंदनेची सुद्धां नाकबुली नाहीं असं मला कळलंय. अशोक कांहीं श्रीमंत नाहीं—पण सुशिक्षण आणि सच्चरित्र यांच्या जोरावर स्ट्रगल करतां करतां एक दिवस तो वरचा दर्जा मिळवील अशी मला पूर्ण खात्री आहे. आपल्या मुलीला तो अयोग्य आहे असं जर आपल्याला वाटत नसेल—”

साहेब आश्चर्यचकित होऊन म्हणाले, “ पण हें कसं जुळेल मिसेस् घोषाळ ! शोक आपला भाचा—नात्यानं तो वंदनेचा आतेभाऊ. ”

" नुसता नांवापुरता ! " मावशी म्हणाली, " नाहींतर नात्याचा धागादोरा तसा फार लांबच आहे. माझी चुलती आणि वंदनेच्या आईची चुलती या दोघी होत्या बहिणी. त्या नात्यानं वंदनेची मी मावशी.—हें लग्न जुळायला कांहीं हरकत नाहीं मिस्टर रे. "

साहेब कांहीं वेळ उगीच राहिले. मनांतल्या मनांत ते नातें जुळवून पहात असावे. त्यानंतर ते म्हणाले, " अशोकचा जेवढा कांहीं परिचय झाला आहे अन् वंदनेच्या तोंडून जेवढं कांहीं ऐकलं आहे, त्यावरून तो अयोग्य आहे असं मला वाटत नाहीं मुलीचं लग्न केव्हांतरी केलंच पाहिजे. पण तिचं स्वतःच मन तर कळलं पाहिजे ना ? "

" लाजूं नकोस मुली. " मावशी अत्यंत प्रेमळपणानें म्हणाली, " तुला काय वाटतं तें आतां तुझ्या बाबांना सांगून टाक. "

एक क्षणभरच - वंदनेचा चेहरा गोरामोरा झाला. पण लगेच तो स्पष्ट भाषेंत म्हणाली, " माझी इच्छा यापुढं मी सोडून दिलीय मावशी. आतां तो अंदाज घ्यायला नको आहे. "

" म्हणजे काय ? " साहेब घाबरून म्हणाले.

वंदना म्हणाली, " म्हणजे काय, तें मला तुम्हां लोकांना समजावून देतां यायचं नाहीं बाबा. पण मी असं म्हणतें म्हणजे माझा विरोध आहे, असा मात्र समज करून घेऊं नका—" थोडा वेळ थांबून ती म्हणाली, " सतीचं — माझ्या ताईचं लग्न झालं होतं. तिच्या नवव्या वर्षीं. आईबापांनीं ज्याच्या हातीं तिला सोंपवलं त्याचाच ताईनं स्वीकार केला. स्वतःची बुद्धि खर्चीं घातली नाहीं तिनं. तरीपण तिच्या सुदैवानं तिला जो नवरा मिळाला तसा मिळणं महा दुर्लभ. मी त्या दैवावरच विश्वास ठेवणार आहें बाबा. विप्रदासबाबू म्हणजे एक साधु पुरुष आहेत. यायच्या पूर्वी मला आशीर्वाद देतांना त्यांनीं म्हटलं होतं—' जिथं माझं कल्याण होईल असंच स्थळ ईश्वर मला मिळवून देईल '—त्यांचा आशीर्वाद खोटा व्हायचा नाहीं.—तुम्हीं मला आज्ञा करा, मी ती पालन करीन. एवढीसुद्धां शंका घेणार नाहीं, कीं भीति बाळगणार नाहीं. "

साहेब आश्चर्यानें थक्क झाले. तिच्याकडे नुसते पहात राहिले. त्यांच्या तोंडून एक शब्दसुद्धां बाहेर निघेना.

मावशी म्हणाली, " लग्नाच्या वेळीं तुझी ताई होती एवढीशी पोर. तेव्हां तिच्या मनामनाचा प्रश्नच निघाला नाहीं. पण तूं कांहीं तशी नाहींस. मोठी झाली आहेस.

स्वतःच्या बऱ्यावाईटाची जबाबदारी तुझी तुझ्यावर आहे—अशा प्रकारें डोळे झांकून दैवाचा खेळ खेळणं तुला शोभत नाहीं वंदना. ”

“ शोभतं कीं नाहीं तें मला माहीत नाहीं मावशी. पण दैवानं जें कांहीं पदरीं येईल तें मोठ्या आनंदानं पत्करायची माझी तयारी आहे. ”

“ असं कांहीं तरी उदासवाणं बोलूं लागलीस तर तुझ्या बाबांना तरी आपलं मत कसं निश्चित करतां येईल ? ”

“ सतीताईच्या बाबतींत त्यांच्या दांदांनीं केलं होतं तसं ! पूर्वीच्या काळीं त्यांच्या वाडवडिलांनीं आपल्या मुलालेकींचे विवाह करतांना जसं केलं होतं त्याचप्रमाणें. बाबांनींसुद्धां तसंच आपलं मत निश्चित करावं. ”

“ तूं स्वतः कांहीं पहाणार नाहींस ? कांहीं विचार करणार नाहींस ? ”

“ हें पहाणं अन् विचार करणं पुष्कळ पाहिलंय मावशी ! आतां तें पुरे. आतां माझा भरिभार आहे बाबांच्या आशीर्वादावर—अन् माझ्या त्या दैवावर—ज्या दैवांचा थांग आजवर कुणाला लागला नाहीं त्या माझ्या दैवावर ! ”

हताश होऊन मावशी थोडीशी चिरडीला येऊन म्हणाली, “ आम्हींसुद्धां दैव मानतों—पण तुझा समाज, तुझं शिक्षण—आजवरचं शिक्षण, संस्कार, सारे उधळून टाकून मुखर्जीच्या घरच्या आचाराविचाराचा एवढा पगडा तुझ्यावर कां बसला तेंच मला कळत नाहीं. तुझं हें भाषण ऐकलं, कीं तूं आमच्याच समाजांतली कीं काय याचा प्रश्न पडतो मला. जशी कांहीं एकदम आम्हांला परकी होऊन गेलीयस असं वाटतं. ’

“ नाहीं मावशी ” वंदना म्हणाली, “ मी परकी झालेली नाहीं. त्यांच्या आपुलकीच्या पायीं मला कुणाशींच परकेपणा धरावा लागत नाहीं हें अगदीं पक्कं समजा. माझ्या बाबतींत कसलाच संकोच धरूं नका तुम्हीं मनांत. ”

मावशीनें विचारलें, “ तर मग अशोकला एक तार पाठवूं का ये म्हणून ? ”

“ पाठवा. माझी मुळींच हरकत नाहीं. ” असें म्हणून वंदना उठून बाहेर निघून गेली.

“ तर मग मिस्टर रे, आपल्याच नांवें तार पाठवतें ! ” असें म्हणून मावशीनें डोळे वर करून त्यांच्याकडे पाहिलें त्यावेळीं तिला दिसून आलें, कीं साहेबांचे दोन्ही डोळे एकाएकीं आसवांनीं भरून आले होते. असें कां झालें याचा अंदाज तिला येईना आणि साहेब जेव्हां संथपणें म्हणाले, “ आज

तार राहुंदे मिसेस घोषाळ !" तेव्हां त्यांचा अस्सल उद्देश न कळल्यामुळें ती म्हणाली, "कां राहुंदे मिस्टर रे ? वंदनेची संमती मिळाली आहे ना ?"

"नाहीं नाहीं ! आज राहूं दे !" असें म्हणून ते उगीच बसले.

त्यांचे ते उद्गार आणि डोळ्यांत आलेलीं आसवें पाहून मावशी मनांतल्या मनांत अत्यंत क्रुद्ध झाली होती. एका प्रौढ आणि उच्च दर्जाच्या माणसानें अशा प्रकारें सेंटीमेन्टॅलिटी दाखवणें तिच्या वृत्तीला असह्य होतें. तरीही जास्त आग्रह करायचें धैर्य तिला झालें नाहीं.

एकदोन मिनिटें थांबून साहेब म्हणाले, "मी आजवर बापाच्या नजरेनं पहात होतों—तिला आई नाहीं हें आपण ध्यानीं घेतलं पाहिजे मिसेस घोषाळ. थोडं थांबलं पाहिजे."

'ही आणखी एक स्टुपिड सेंटीमेन्टॅलिटी !' मावशी मनांतल्या मनांत उद्गारली. साहेबांना अंदाज झाला कीं नाहीं कोण जाणे, पण थोडेंसें केंविलवाणें हंसत, उसनें अवसान आणून ते म्हणाले, "तिचा उद्देश काय आहे तेंच चांगलंसं कळत नाहीं. आपल्याला मुष्कील झालीय ती तीच. केवळ आजच नव्हे, बंगालमधून आल्यापासून तिला काय झालंय तेंच कळत नाहीं मला. तिनं संमती दिली खरी पण ती नव्हेच तें ! हा काय नवा रिलिजन तिनं पत्करलाय तेंच कळत नाहीं मला."

"नवा रिलिजन ? म्हणजे ?"

"म्हणजे काय तेंच कळत नाहीं मला ! दिसतंय तें एवढंच, कीं बंगालमधून आल्यापासून तिनं कांहींतरी गठडी बांधून आणलीय बरोबर ! रात्रंदिवस तीच घोळवतेय सारखी. तिचं खाणं गेलंय बदलून—भाषण गेलंय बदलून—चाल-चलणूक सुद्धां पूर्वीसारखी राहिली नाहींसं वाटतंय. सकाळींच उठून स्नान करून ती माझी पदधूली मस्तकीं धारण करते म्हटलं म्हातारे, 'या पूर्वी असं कांहीं करीत नव्हतीस !' तेव्हां म्हणते, 'तेव्हां माहीत नव्हतं बाबा. आतां यापुढं तुमची पायधूळ मस्तकीं घेऊन रोजच्या कामाची सुरवात करतें.' सारखी माझ्या-वर नजर ठेवून रोजचीं कामं उरकीत राहिलीय ती—अगदीं चांगलं कळून येतंय मला !—" बोलतां बोलतां त्यांचे डोळे पुनः पाण्यानें भरून आले.

मनांतल्या मनांत मावशी फार चिडली होती, ती म्हणाली, "हे सारे नवे चाळे ती शिकून आलीय त्या मुखर्जीच्या घर तून. तीं माणसं कशीं कर्मठ आहेत

तें माहीत आहे ना ? पण तो कांहीं रिलिजन नव्हे—त्याला म्हणतात कुसंस्कार. आतां ही पूजाबिजा सुद्धां करते कीं काय ?"

"तें कांहीं माहीत नाहीं." साहेब म्हणाले, "कदाचित करीतही नसेल. मला सुद्धां वाटतं, कीं हा कुसंस्कार म्हणून ! निषेध करावा असंही वाटतं. पण म्हातारी पूर्वीच्यासारखी आतां वाद घालत नाहीं. नुसती मुकाट्यानं पहात रहाते. अन् मग मला कांहीं बोलतां येत नाहीं. आपोआप तोंड बंद होतं माझं."

"हा आपला दुबळेपणा आहे." मावशी म्हणाली, "आपण हें पुरेपूर ध्यानांत ठेवा, कीं हा रिलिजन नव्हे. ही नुसती सुपरस्टिशन आहे. हे असले लाड चालवणं चुकीचं आहे ! दोष आहे ! गुन्हा आहे !"

साहेबांचें मन द्विधा झालें. ते काचरत काचरत म्हणाले, "हो तसंच आहे मला वाटतं. रिलिजन म्हणून म्हटलं खरं, पण मी स्वतःसुद्धां कधीं चर्चा केली नाहीं त्याबद्दल. काय त्याचा नेचर आहे तेंही मला माहीत नाहीं. पण विचार करायला गेलों कीं मी अगदीं थक्क होऊन जातों. अशी एकदम पार बदलून गेली कशी ही मुलगी ! तें हंसणं नाहीं, खेळणं नाहीं, अल्लडपणा नाहीं, पावसाळ्यांतल्या उमललेल्या फुलाच्या पाकळ्यांसारखी नुसती पाण्यानं ओलावलेली. केव्हां केव्हां मी तिला विचारतों, 'म्हातारे, माझ्याकडे लपवूं नकोस. तुझी प्रकृति तर बिघडली नाहीं ना ?' तेव्हां नुसती हंसते आणि मान हलवून म्हणते, 'नाहीं बाबा, मी अगदीं चांगली आहें. कांहींसुद्धां झालं नाहीं मला !' हंसत, मुखानं घरचं सारं काम करीत असते—पण माझं काळीज ढांसळत चाललंय मिसेस घोषाळ. ही एकुलती मुलगी—आई नसलेली. स्वतःच्या हातीं लहानाची मोठी केलेली. पूर्वी होती तशी पुनः होण्यासाठीं सर्वस्व दिलं तर होईल का ती पुनः पूर्वीच्यासारखी ?"

"खात्रीनं होईल." मावशी जोराजोरानें म्हणाली, "मी सांगतें—खात्रीनं होईल. हा केवळ तात्कालिक परिणाम आहे. धर्माच्या कैफाचा अंमल चढतो केव्हां केव्हां पण तो कांहीं कायमचा नव्हे. केवळ त्या लोकांच्या संपर्कानं झालेला हा क्षणिक बदल आहे. एकदां लग्न करून टाका, कीं दोन दिवसांत सारं कांहीं धुऊन पुसून जाईल. पहिल्यापासून माणसाला जें शिक्षण मिळालेलं असतं मिस्टर रे, तेंच खरं. दोन दिवसांचं ढोंग दोनच दिकसांत उडून जातं."

साहेबांना थोडासा भरंवसा आला खरा पण शंका दूर झाली नाहीं. ते म्हणाले, "कुठून कसली ही प्रेरणा तिला मिळालीय कोण जाणे. पण अस्सल

व्यक्तीकडून झालेला परिणाम नाहींसा होत नाहीं असं म्हणतात. जन्मादारभ्य असलेल्या माणसाच्या संवया एका क्षणांत बदलून जातात. तो कैफ माणसाच्या रक्ताच्या कणाकणांतून भिनून जातो. साऱ्या आयुष्यांत तो डाग धुऊन जात नाहीं, त्याचीच भीति मला वाटतेय मिसेस घोषाळ ! ”

उत्तरादाखल मावशी नुसती तुच्छतेनें हंसली आणि म्हणाली, “ भ्रम आहे. मी पुष्कळ पाहिलंय मिस्टर रे. दोन दिवस गेले कीं मागमूससुद्धां रहात नाहीं. पुनः अगदीं जसेच्या तसे ! पण हें असलं वाढवूं देणं मात्र बरं नव्हे—आजच अशोकला एक तार करतें. एकदां येऊं दे तो. ”

“ आजच करतां तार ? ”

“ हो आजच. अन् आपल्याच नांवें. ”

साहेबांनीं कशीबशी संमती दिली आणि म्हटलें, “ तुम्हाला जें बरं वाटतं तें करा. तसा अशोक मोठा छान मुलगा आहे—चरित्रवान् आहे—सज्जन आहे—नाहीं तर त्याला बरोबर घेऊन यायला वंदना कधींच कबूल झाली नसती. ”

हीच गोष्ट घेऊन ओढून ताणून वाढवून बोलायची मावशी तयारी करीत होती, तोंच वंदना आंत आली आणि म्हणाली, “ बाबा आज हाजीसाहेबांच्या मुलींनीं आम्हांला चहाला बोलावलंय. तिसऱ्या प्रहरीं जायचंय. ऑफिसांतून परत येतांना मला घेऊन जा. ”

मावशीनें विचारलें, “ त्यांच्या घरचं तूं कांहीं खात नाहींस का वंदना ! ”

“ नाहीं मावशी. ”

“ कां ? ”

“ मला आवडत नाहीं ! — तुम्ही विसरणार नाहीं ना बाबा ? ”

“ नाहीं पोरी, तुला घेऊन जायला विसरेन असं कधीं झालंय ? ” असें म्हणून साहेब थोडेसे हंसले आणि म्हणाले, “ अशोक येणार आहे—त्याला तार करूं का ? ”

“ करा ना तार बाबा. ”

“ मी त्याला बळेबळेंच आणतें आहें. ” मावशी म्हणाली, “ पहा हं, त्याचा अपमान होतां कामा नये. ”

“ मुळींच भिऊं नकोस मावशी. कुणाचासुद्धां अपमान करणार नाहीं आम्हीं. स्वतः अशोकबाबूंनाच खात्री आहे ती. ”

मुलीचें भाषण ऐकून साहेब खूष झाले आणि म्हणाले, " आफिसांत जातांनाच आज त्याला एक तार करतों म्हातारे. आज शुक्रवार. तशीच कांहीं अडचण नसली तर सोमवारीं तो इथं येऊन पोहोंचेल. "

दरवान टपाल घेऊन आला. निरनिराळ्या गांवचीं निरनिराळीं वर्तमान-पत्रें आलीं होतीं. चिठ्ठी पत्रेंही कांहीं कमी नव्हतीं. कांहीं दिवसांपासून टपालाच्या बाबतींत वंदना उदासीन झाली होती. रोज वाट पहाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें तिला वाटूं लागलें होतें. मुद्दाम होऊन तिला पत्र पाठवणारें असें कुणीच नव्हतें. ती जायला निघत होती तोंच साहेबांनीं हाक मारून म्हटलें, " हीं घे तुझीं दोन पत्रं. आपलंही एक आहे मिसेस घोषाळ. "

स्वतःच्यापेक्षां दुसऱ्याच्याच पत्रांची मावशीला जास्त उठाठेव होती. वांकून पाहून तिनें म्हटलें, " एकतर दिसतंय अशोकचं. दुसरं कुणाचं ? "

या अकारण प्रश्नाचें उत्तर वंदनेनें दिलें नाहीं. दोन्ही पत्रें घेऊन ती आपल्या खोलींत गेली. साहेब गालांतल्या गालांत हंसून म्हणाले, " अशोकबरोबर पत्रापत्री सुरू झालीय वाटतं ! आतां तार केली कीं तो खास येईल. खरोखरच मुलगा मोठा छान आहे. तेवढाच विश्वास असल्याशिवाय वंदना कधींच कुणाला पत्र ल्याहायची नाहीं. "

उत्तरादाखल मावशी मोठ्या अभिमानानें उगीच थोडीशी हंसली. अर्थात तिलासुद्धां बराचसा अंदाज होता.

तिसऱ्या प्रहरीं ऑफिसांतून येतांना हाजीसाहेबांच्या बंगल्यावरून चक्कर मारून साहेब एकटेच परत आले. वंदना तिकडे गेली नव्हती. आले ते समोरच मावशी दिसली. एवढेंसें तोंड करून ती म्हणाली, " पत्र घेऊन वंदना जी आंत गेली ती अजून कांहीं बाहेर आली नाहीं. "

" जेवली नाहीं ? " साहेबांनीं घाबरून विचारलें.

" नाहीं. सकाळींच काय एकदोन फ्रुट्स खाल्लीं होतीं तेवढींच. "

घाईघाईनें साहेब मुलीच्या खोलीपाशीं गेले आणि दरवाजा ठोठावून म्हणाले, " म्हातारे ! "

वंदनेनें दार उघडलें. तिच्या चेहऱ्याकडे पहातांच साहेब एकदम स्तब्ध झाले,—" काय झालं ग ? "

" आज रात्रींच्या गाडींनं मी बलरापपूरला जाणार बाबा. " वंदना म्हाणाली.

" बलरामपूरला ? कां ? "

" द्विजदासबांबूंच पत्र आलंय. वाचून पहातां बाबा ? "

" तूंच वाच. मी ऐकतों. " असें म्हणून साहेबांनीं एक खुर्ची ओढली आणि बैठक मारली. त्यांना रेलून उभें राहून वंदनेनें जें पत्र वाचून दाखवलें तें असें:—

सप्रेम नमस्कार,

आपण गेलांत त्या दिवसाची आठवण झाली. दारांत गाडी उभी होती. मधून मधून खबर काळवीत जा, असं आपण म्हटलंत. मी म्हटलं होतं, ' मी गबाळ्या माणूस—पत्र लिहायची फारशी हौस नाहीं – चांगलंसं लिहितांही येत नाहीं – ही जबाबदारी कुणातरी दुसऱ्यावर टाका. ' तें माझें उत्तर ऐकून आपण नुसत्या माझ्याकडे पहात राहिलां. त्यानंतर गाडींत बसतांना पुनः कांहीं मला सांगितलं नाहीं. अशा वेळींसुद्धां चार बरे बोल बोलण्याहतकं सौजन्य ज्याच्या ठायीं नाहीं त्याला पुनः काय सांगायचं, असं कदाचित आपल्याला-वाटलं असेल.

मी तसा आहें खरा. नुसती खुशाली कळवण्यापेक्षां विशेष कांहीं असलं तरच लिहावं असं वाटत होतं. तसं कांहीं लिहिलं असतं तर पत्र न लिहिल्याच्या गुन्ह्यांतून मी मुक्त झालों असतों.

मला वाटत असे, माणसाच्या मागें दुःखच तेवढं अभावितपणें लागतं का ? अभावित सुख नाहींच का या जगांत ? दादाची इष्टदेवता नुसती डोळे झांकूनच का रहाणार ? डोळे उघडून कधीं पहाणारच नाहीं का ? जें अघटित घडून आलं तें तसंच का चिरस्थायी होणार ? तें विस्कटून टाकणारी शक्ति नाहींच का कुठं ?

दिसलं तें असं —नाहीं. अशी शक्ति कुठंच नाहीं. भगवान ढळला नाहीं कीं त्याचा भक्तही ढळला नाहीं. निवांत निष्कम्प दीपशिखेसारखा आजसुद्धां तसाच झगझगित पेटत राहिलाय. त्या ज्योतींतला एक कणसुद्धां कमी झालेला नाहीं.

हें कां असं म्हणतों तेंच सांगतों. तीन दिवस झाले, दादा पुनः घरीं आले आहेत. सकाळीं जेव्हां गाडींतून खालीं उतरले तेव्हां त्यांच्या मागोमाग उतरला वासू. अनवाणी पाय—गळ्यांत उत्तरीय. गाडी निघून गेली. दुसरं

कुणी उतरलं नाहीं. सकाळच्या उन्हांत गच्चीवर उभा होतों—डोळ्यांसमोर साऱ्या पृथ्वीवर अंधार झाल्यासारखा वाटला. अगदीं अमावास्येच्या रात्रीसारखा ! एकदोन मिनिटें गेलीं असावीं—त्यानंतर सारं कांहीं स्पष्ट दिसूं लागलं—सारं कांहीं उघड उघड कळून चुकलं. असं कांहीं होईल हें आधीं कळलं नव्हतं.

खालीं उतरून आलों. दादा म्हणाले, " तुझी वहिनी काल सकाळीं वारली द्विजू. हातीं पैसा नाहीं. तिच्या श्राद्धाची सामान्य कांहीं तयारी कर. आई कुठं आहे ? "

" ढाक्याला. तिच्या मुलीच्या घरीं ! "

" ढाक्याला होय ? " क्षणभर विचार करून ते म्हणाले, " कुणी सांगावं ! कदाचित तिला येतां येणार नाहीं. पण ही मातृदायाची हकीकत वासूनं तिला पत्रीं कळवावी. "

मी म्हटलं, " ती व्यवस्था करतों. "

वासू एकदम धांवत आला आणि माझ्या गळ्याभोंवती दोन्ही हात टाकून त्यानं आपलं तोंड माझ्या कुशींत खुपसलं -- अन् मग तो एकदम ओक्सा-बोक्शी रडूं लागला. त्या रडण्यांत शब्द नव्हते. अर्थात या पत्रांत तरी कोणत्या शब्दांनीं ते लिहूं ? गोळी लागून मेलेला जीव मरायच्यापूर्वीं शेवटचं बोलणं ज्या भाषेनं बोलून जातो, तशीच कांहींशी होती ती भाषा. त्याला उचलून घेऊन आलों माझ्या खोलींत. तसाच कुशींत तोंड खुपसून तो सारखा रडत होता. मनांत मी म्हटलं, ' अरे वासू, जास्त नुकसान झालं तें तुझं झालं नाहीं बरं. आज एका माणसाची जी हानी झाली आहे त्यापुढं तुझी नुकसानी कांहींच नव्हे ! तुझी समजूत घालणारीं माणसं मिळतील. पण त्याला नाहीं मिळायचीं. ' एकच आशा—कळलं तर तें वंदनेला.

असेच आणखी कांहीं क्षण गेले. शेवटीं डोळे पुसून घेतले आणि म्हटलं, " मिऊं नकोस रे. नसेना का आई, नसेना का बाप, मी तर आहें ? तिचं ऋण फिटणं शक्यच नाहीं कधीं—म्हणून काय तें नाकबूल करणार आहें ? सर्वांपेक्षां जें दुःख झालंय, सर्वांपेक्षां जें नुकसान झालंय, तें या तुझ्या काकाचं. "

कशाला उगीच शब्द खर्ची घालूं. शब्दांत काय आहे ? लहानपणीं बाबा म्हणत होते मला उनाड ! आई म्हणत होती चहाड ! किती वेळ तरी रागं भरत होते दादा,—जिकडून तिकडून अनादर, हेळसांड—त्यामुळं घर विषासारखं वाटत होतं. त्यावेळीं वहिनी जवळ येत होती आणि म्हणत होती,

" काय हवंय भाऊजी ! " मी रागारागानं म्हणत असें, " कांहीं नको वहिनी. मी आतां या घरांतून निघून जाणार. "

" केव्हां हो ! "

" आजच ! "

तें ऐकून ती हंसून म्हणे, " जायचा हुकूम नाहीं. कसे जातां पाहूं मी नको म्हणत असतांना ! "

अन् मग मी जात नसें. आणि आतां तो जायचा दिवस ज्यावेळीं खरोखरच आला त्यावेळीं निघून गेली ती. वाटलं, हुकूम नुसता माझ्यापुरताच का ! तिला हुकूम करायला कुणी नव्हतंच का या जगांत !

दादाला विचारलं, " कसं काय झालं हें ? ते म्हणाले, " कलकत्त्यांतच तिची प्रकृति बिघडली होती. फार मनाला लावून घेत होती वाटतं—म्हणून तिला घेऊन गेलों पश्चिमेला पण कुठंच कांहीं नीटसं जमलं नाहीं. शेवटीं हरिद्वारला तापानं पछाडलं तेव्हां घेऊन आलों काशीला. तिथंच ती वारली. "

बस्स !

मी विचारलं, " औषधपाणी मिळालं का दादा ? "

ते म्हणाले, " शक्य तेवढं मिळालं. "

पण हें शक्य तेवढं म्हणजे केवढं, हें एक दादाखेरीज कुणालाच माहीत नव्हतं.

कां मला अशी ही कठोर शिक्षा केलीत, मी असं काय केलं होतं, असं विचारावंसं वाटलं-पण त्यांच्या तोंडाकडे पाहिलं तेव्हां तो प्रश्न तोंडावाटे निघेना.

मी म्हटलं, " तिनं कुणाला कांहीं सांगितलंय का दादा ? "

ते म्हणाले, " हो. मरायच्यापूर्वी एक घटकाभर ती शुद्धीवर होती—त्यावेळीं मी विचारलं, ' आईला कांहीं सांगायचंय का सती ? '

ती म्हणाली, ' नाहीं. '

' मला ? '

' नाहीं. '

' द्विजूला ? '

' हो. त्याला माझा आशीर्वाद सांगा. म्हणावं, सारं कांहीं जिथल्या तिथं राहिलं ! '

तडक तिथून पळालों तो वहिनीच्या रिकाम्या खोलींत गेलों. फोटो काढून

घ्यायची तिला लाज वाटे. तिचा एक फोटो तिच्या कपाटाआड लपवून ठेवलेला होता. मीच काढला होता तो. समोर उभा राहून म्हटलं, ' धन्य आहेस तूं वहिनी. कळला मला तुझा हुकूम. एवढ्या लवकर निघून जाशील असं वाटलं नव्हतं पण जर कुठं असशील तर तुझं तुलाच कळून येईल, कीं मी तुझ्या शब्दाबाहेर गेलों नाहीं. तेवढंच सामर्थ्य मला दे. तुझ्या वियोगामुळं माझ्या डोळ्यांत आलेलं पाणी कुणाच्या दृष्टीला न पडावं एवढं सामर्थ्य दे मला ! '

आज एवढ्यावरच राहूं दे तिची ही कथा.

आतां माझ्याबद्दल.

जायच्यावेळीं तुम्हीं मला लग्न कर म्हणून म्हटलं एवढी जबाबदारी उचलायचं मला एकट्याला सामर्थ्य नाहीं — जोडीदार पाहिजे — असं म्हटलंत. ती जोडीदार म्हणजे मैत्रेयी असं कदाचित् असेल आपल्या मनांत. मी विरोध केला नाहीं. असा विचार केला, संसारांत जर पंधरा आणे बुडाले आहेत तर एक आण्यासाठीं उगीच वितंडवाद करूं नये. पण तेंही आतां राहिलं नाहीं. वहिनीच्या मृत्यूमुळं जी अडचण उत्पन्न झाली आहे, ती पार होण्याजोगी नाहीं. अडचण कसली ? मैत्रेयीला भार घेतां येईल — पण बोजा उचलतां यायचा नाहीं — एवढं मला कळून चुकलं !

अन् हें कळून चुकलंय तेंच मोठं कठीण झालंय. मी कांहीं नाकबूल करीत नाहीं. संकटाच्या काळांत तिनं पुष्कळ केलंय — त्याबद्दल मी तिचे उपकार मानतों. वेळ येईल त्यावेळीं या ऋणाची फेड करायला मी चुकायचा नाहीं.

काल भर मध्यान्ह रात्रीं वासू झोंपेंतून जागा होऊन रडत उठला. त्याला पुनः निजवावा म्हणून गेलों दादाच्या खोलींत. पाहिलं, — दादा तेव्हांपर्यंत जागे होते पुस्तक वाचीत.

' कसलं पुस्तक दादा ? ' दादांनीं पुस्तक बंद करून ठेवलं आणि हंसत हंसत विचारलं, ' कशाला आला होतास ? '

त्यांच्या तोंडाकडे पाहिलं तेव्हां जें बोलावंसं वाटलं होतं तें कांहीं तोंडाबाहेर आलं नाहीं. असं वाटलं, ' झोंपेच्या भरांत वासू रडत उठला त्याचं विप्रदासला काय होय ? ' तेव्हां दुसराच कांहीं विषय काढला — म्हटलं, ' श्राद्ध झाल्यावर आपण कुठं रहाणार आहां दादा ? कलकत्त्याला ? '

' नाहीं रे. जाईन तीर्थयात्रेला. '

' केव्हां याल परत ? '

दादा पुनः थोडंसं हंसून म्हणाले, ' फिरून नाहीं येणार. '

तटस्थ होऊन त्यांच्या तोंडाकडे पहात उभा राहिलों. या संकल्पांत बदल व्हायचा नाहीं याची शंकाच नव्हती मला. दादांनीं संसारावर पाणी सोडलं. कुणाजवळ हात पसरायचे ? कुणाजवळ रडायचं ? कुणापाशीं काकुळतीला यायचं ? या निष्ठूर सन्याशापाशीं ? यापेक्षां मोठा अपमान आहे कुठला ?

" आणि वासू ? "

दादा म्हणाले, " हिमालयांत एक आश्रम आढळून आलाय मला. तिथं लहान मुलांची सोय आहे. शिक्षण वगैरे सारं तेच देतात—"

त्यांच्या हातीं देऊन टाकणार त्याला ? अन् लहानाचा मोठा केला मी !

तें ऐकल्यासरशीं दोन्ही हातांनीं कान दाबीत बाहेर पळालों त्या खोलींतून. त्यांनीं काय उत्तर दिलं तें ऐकलं नाहीं.

वासूच्या शेजारीं बसून सारी रात्र विचार करीत होतों. हें प्रकरण कोणत्या थराला जाणार याचाच अंदाज होईना. आठवण आली आपली. आपण सांगून गेलां होतां, " मित्राची जेव्हां खरोखरच जरूर लागेल त्यावेळीं ईश्वर त्याला पाठवून देईल आपल्या दाराशीं. " या गोष्टीवर विश्वास ठेवायला सांगितलं होतं मला तुम्ही. कोण तो मित्र ? कधीं येणार आहे तो कोण जाणे. तरीही विश्वास बाळगून राहिलों आहें—माझ्या या भयंकर संकटाच्या वेळीं एक दिवशीं तो येईलच येईल.

द्विजदास

पत्र वाचून संपलें त्यावेळीं साहेबांच्या डोळ्यांतून सारख्या आसवांच्या धारा लागल्या होत्या. रुमालानें डोळे पुसून ते म्हणाले, " आजच जा पोरी. मी नको म्हणणार नाहीं. बरोबर दरवान घे—आणि तुझा म्हातारा हिमूही घे. "

वंदनेनें खालीं वांकून त्यांना प्रणाम केला नि म्हटलं, " जायच्या तयारीला लागतें बाबा. आतां जातें ! "

२६

मॅनेजर विराज दत्त मोटार घेऊन स्टेशनवर हजर होते. आगगाडी येतांच वंदनेला उतरून घेऊन त्यांनीं मोठ्या सन्मानानें आणून गाडींत बसवलें.

वंदनेनें विचारलें, " आजतरी आई घरीं येऊन पोंचल्या का, दत्त महाशय ?"

" नाहीं ताईसाहेब. "

" मैत्रेयी ? "

" नाहीं. तिला आणायलाही कुणी गेलेलं नाहीं. "

" वासू खुशाल आहे ? "

" खुशाल आहे. "

" मुखर्जीमहाशय ? द्विजूबाबू ? "

" बडेबाबू खुशाल आहेत पण छोटेबाबूंची तब्येत तेवढीशी बरी दिसत नाहीं. "

वंदनेनें विचारलें, " तापबीप तर येत नाहीं ना ? "

दत्त म्हणाले, " तें कांहीं नीटसं माहीत नाहीं. तशीं रोजचीं सारीं कामं चालूं आहेत त्यांचीं. "

कांहीं वेळ थांबून वंदना म्हणाली, " दत्तमहाशय, मला वाटतं या प्रसंगाच्या वेळीं आई कदाचित् यायच्या नाहींत. पण प्रसंग कसाही असला तरी श्राद्धाची तयारी तर केली पाहिजे ? कांहीं झाली आहे का सुरवात ? "

" झाली आहे म्हणजे ! मोठ्या धन्यांच्या श्राद्धाच्या वेळीं जशी तयारी झाली होती तशीच होते आहे आतांसुद्धां. "

त्याच्या उत्तराचा अर्थ नीटसा न कळल्यामुळें वंदनेनें पुनः प्रश्न केला, " कुणाच्यासारखी म्हटलीत ? मुखर्जीमहाशयांच्या पितृश्राद्धासारखी ? तेवढी मोठी तयारी चालली आहे ? "

" हो. जवळ जवळ तेवढीच. " दत्त म्हणाले, " आतां पहालच तुम्ही. बडेबाबूनीं बोलावून विचारलं, ' द्विजू, असा वेडेपणा करूं नकोस. प्रत्येक गोष्टीला कांहीं तरी सीमा आहे. ' छोटे बाबू म्हणाले, ' सीमा आहे खरी पण सीमेची मर्यादा सर्वांच्या नजरेनं सारखीच नसते दादा. ' बडेबाबू हंसून म्हणाले, ' पण तूं सर्वांच्याच जुन्या सीमा ओलांडून चाललायस द्विजू ! ' छोटेबाबू म्हणाले, ' तर मग एवढी खेप मला क्षमा करा, एवढीच विनंति आहे आपल्यापाशीं. मर्यादा मी ओलांडतोय, नाहीं असं नाहीं—पण वहिनीच्या बाबतींत या मर्यादेचं उल्लंघन करणं मला शक्य नाहीं. ' यानंतर दोघेही कांहीं बोलले नाहींत. आतां तुम्ही आलां आहांत, तेव्हां कांहीं करतां आलं तर पहा. एकंदर खर्च वीसपंचवीस हजारांखालीं व्हायचा नाहीं असं दिसतं. "

" खर्च काय सारा छोट्याबाबूंचाच ? "

" हो. तेंच तर ! "

वंदनेनें विचारलें, " त्यांच्या मानानं हा खर्च फार होतोय का दत्तमहाशय ? "

विराजदत्त म्हणाले, " फार नसला, तरी हल्लीं इस्टेटीची जी परिस्थिति आहे तिच्या दृष्टीनं तो थोडासा अधिकच आहे खरा. आतां जरा हात राखून कारभार करणं आवश्यक आहे. केव्हां कसलं नवं संकट येईल तें सांगतां का येतंय ? "

" आणखी कसलं नवं संकट ? "

क्षणभर विचार करून दत्तबाबू म्हणाले, " जांवईबाबूंबरोबर कोर्टांत झगडा सुरू झाला आहे तें कळलं नाहीं का आपल्याला ? या सगळ्या प्रकरणाचा परिणाम काय होणार तो दिसतोच आहे—पण तें विकोपाला कसं जाईल तें मात्र कुणाला सांगतां यायचं नाहीं. "

" मग कुणी आवरलं नाहीं का ? "

" आवरणं ? ते बडेबाबू आहेत का ताईसाहेब ? आवरणं शक्य आहे का त्यांना ? त्यांना आवरणारी व्यक्ती एकच—पण ती आतां स्वर्गवासी आहे—" असें म्हणून विराज दत्तांनीं एक मोठा सुस्कारा सोडला.

यानंतर वंदनेनें कांहीं विचारलें नाहीं. घर जसजसें जवळ येत चाललें तसतसें तिला दिसून आलें, कीं मैदानांत इमारती लाकडांचे थर रचून ठेवलेले होते. दयामयीच्या उद्यापनाच्या वेळीं जीं कामचलाऊ घरें उभारलीं होतीं त्यांचीही दुरुस्ती सुरू होती. बाहेर आंगणांत भला मोठा मंडप उभारण्याचें काम सुरू होतें. वेगवेगळ्या कामासाठीं किती तरी माणसें खपत होतीं. दत्तमहाशयांनीं अतिशयोक्ति केली नाहीं असें वंदनेला वाटलें.

गाडींतून उतरल्याबरोबर ती सरळ माडीवर गेली. पहिल्यानें गेली ती द्विजदासच्या खोलींत. एका मोठ्या तक्क्याला टेकून तो बिछान्यांत आडवा झाला होता पडदा सरकल्याचा आवाज ऐकून तो डोळे उघडून उठून बसला आणि म्हणाला, " शेवटीं मित्र आपोआप चालत दारीं आला अं ! "

" हो, आला ! " वंदना म्हणाली, " पण असे बिछान्यावर कां ? "

द्विजदास म्हणाला, " डोळे झांकून तुझंच ध्यान करीत होतों. अन् म्हणत होतों, ' वंदना, माझ्या दुःखाला पारावार राहिला नाहीं. देहांत नाहीं ताकत,

मनावर नाहीं तावा, वल्हं हाणायची शक्ति गेलेली, मघेंच होडी बुडणारसं वाटतं - पैलतीरीं पोंचणं आतां कांहीं होत नाहीं ! ' "

" पोंचेल बरं. " वंदना म्हणाली, " आतां तुम्हांला रजा देऊन होडीचं सुकाणूं हातीं घेणार आहें मी. "

" आतां घेच. उगीच रागावून पळून जाऊं नकोस. "

जवळ येऊन वंदनेनें त्याला प्रणाम केला. त्याची पायधूळ मस्तकीं धारण करून ती उभी राहिली त्यावेळीं दोघांच्याही डोळ्यांतून आसवांचे पूर लोटले होते. अशा प्रकारें तिनें त्याला हा पहिल्यानेंच प्रणाम केला होता. ती म्हणाली, " तुमच्या डोळ्यांतून सुद्धां पाणी येतं तें माहीत नव्हतं मला. "

" मलाही माहित नव्हतं " द्विजदास म्हणाला, " आजवर, मला वाटतं, तो मार्गच बंद होता. मैत्रेयीला बोलावून आणून या संसाराचा भार तिच्यावर टाकायला सांगून तूं निघून गेलीस, तेव्हां तो मार्ग थोडासा खुला झाला. आड राहून डोळे पुसले आणि आपल्याशींच म्हटलं, एवढा मोठा धक्का सहजासहजीं देणं जिला परवडतं, तिच्यापुढं आतां हात पसरायचा नाहीं. पण ती माझी प्रतिज्ञा टिकली नाहीं. वहिनी स्वर्गवासी झाली, शशधरवर खटला भरला म्हणून आई निघून गेली आपल्या मुलीच्या घरीं, संसार त्यागाचा संकल्प दादांनीं केला,—एका मिनिटाच्या भूकंपानं सारं कांहीं धूळधाण होऊन गेलं – तें सुद्धां सहन केलं. पण या घरांतून बाहेर निघून वासू जेव्हां कुठल्यातरी दूरच्या आश्रमांत जाऊन राहाणार आहे असं कळलं तेव्हां मात्र माझा धीर खचला. एकदां असं वाटलं, असेल नसेल तें कल्याणीच्या मुलांच्या नांवानं करून देऊन आपणसुद्धां कुठं निघून जावं !—त्याच वेळीं आठवले तूं जायच्या वेळीं काढलेले उद्‌गार. त्यावेळीं आश्वासन दिलं होतंस मला. म्हटलं होतंस तसाच प्रसंग आला तर मित्र आपोआप दारीं चालत येईल. आतां यापेक्षां आणखी प्रसंग तो काय असायचा ? यापेक्षां केव्हां कधीं कुणाची जरूरी भासायची ? म्हणून तुला पत्र लिहिलं—पुनः पुनः मनांत शंका येत होती, जबरदस्तीनं सारं कांहीं टाकून दिलंय, म्हणून मित्र येईल धांवत. नाहीं तर दिलेलं वचन खोटं होईल—वहिनीनं दिलेला शेवटचा आशीर्वाद खोटा होईल—जो बोजा टाकून वहिनी गेली तो बोजा मी कसल्या आधारावर उचलायचा ? " बोलतां बोलतां त्याच्या डोळ्यांतून आसवांचे दोन थेंब टपकन् खालीं पडले.

वंदना म्हणाली, " सारीं माणसं तुम्हाला अनावर म्हणतात. एका वहिनी-खेरीज आजवर तुम्ही कुणाचंच ऐकलं नाहीं —".

" यालाच भीतेस का तूं ? ' द्विजदास म्हणाला, " आज वहिनी असती तर तिनं दिलं असतं याचं उत्तर —" असें म्हणून त्यानें आपल्या हातानें आपले डोळे पुसले.

कांहीं वेळ वंदना मुकाट्यानें त्याच्याकडे पहात बसून राहिली होती. अगदीं शांतपणें ती म्हणाली, " मला उत्तर मिळालं, आतां कसलीच शंका राहिली नाहीं. " असें म्हणून तिनें द्विजदासचा हात ओढून आपल्या हातांत घेतला आणि तशाच प्रकारें कांहीं वेळ बसून राहिल्यावर ती म्हणाली, " तुमच्याच्च आसपास भूकंप झाला आहे असं नव्हे. माझ्याही हृदयांत भयंकर भूकंप होऊन गेलाय. जें कोसळून पडायचं तें धुळीला मिळालंय. जें कोसळणार नाहीं— टळणार नाहीं—जें पूर्णपणें अढळ तें पुनः मिळालं मला आज. चला आतां दादांकडे. जायच्यावेळीं त्यांनीं मला आशीर्वाद दिला होता—म्हटलं होतं, ' वंदना, जो तुझा असेल तो माझ्या आशीर्वादानं एके दिवशीं सहज तुझाच होऊन जाईल ! ' साधूच्या वाक्यावर माझी श्रद्धा आहे. त्यांचा हा आशीर्वाद खरा होणार याची खात्री होती मला. कळलं नव्हतं एवढंच, कीं त्या आशीर्वादाची पूर्णता अशा या भयंकर प्रसंगाच्या वाटे व्हायची होती. चला आतां त्यांना नमस्कार करायला जाऊं. "

वंदना आली आहे ना द्विजू ' " असें म्हणत अन्नदा आंत आली.

" आलें बरं अनुताई, " असें म्हणून वंदनेनें मागें वळून पाहिलें. दुःखाने होरपळलेली तिच्या चेहऱ्यावरची छाया पाहून वंदना दचकली. ती तिच्याजवळ गेली आणि तिच्या खांद्यावर मान टाकून ओठांतल्या ओठांत म्हणाली, " अशी तुझी दशा होईल असं केव्हां वाटलंसुद्धां नव्हतं अनुताई ! "

किती तरी वेळ अन्नदा वंदनेच्या पाठीवरून हात फिरवीत होती. तशीच तिला कुरवाळीत ती मोठ्या प्रेमानें बोलूं लागली, "—आतां अशी एकांएकीं पळून जाऊं नको ताई. कांहीं दिवस इथं रहा. यापेक्षां जास्त काय सांगूं मी ? "

वंदना कांहीं बोलली नाहीं. तशीच खांद्यावर मान टाकल्या टाकल्या मानेनें होकार देत उगी राहिली. बराच वेळ ती तशीच राहिली होती. त्यानंतर तोंड वर करून पदरानें डोळे पुसून तिनें विचारलें, " वासू कुठं आहे अनुताई ? "

" त्याला स्नान घालायला नोकर तलावाकडे घेऊन गेले आहेत ? "

" त्याला जेवायला कोण घालतं ? "

" द्विजू, " अन्नदा म्हणाली, " दोघेही एकाच जागीं जेवतात ! एकाच जागीं झोंपतात ! " बोलतां बोलतां पुनः तिचे डोळे पाण्यानें भरून आले ते पुसून ती म्हणाली, " जी मेली ती काय नुसती वासूचीच आई नव्हे — त्याचीही ! "

पुनः डोळे पुसून ती म्हणाली, "— सारीं म्हणतात घरची सून अकालीं गेली तरण्या माणसाच्या श्राद्धाचं एवढं मोठं अवडंबर कशाला ? "

सारे नको नको म्हणत होते— मोठा पसारा पाहून अंगाला आग लागत होती त्यांच्या — म्हणून करीत होते एवढी वाटाघाट ! कुणा जन्मींची ती त्याची आई होती हें कुठं कळतंय यांना ? असं कुणी टोंचलं तर कुठल्या मुलाला सहन होईल तें ? "

वंदनेकडे बोट करून द्विजदास म्हणाला, " आतां कांहीं काळजी नाहीं अनुताई ! वंदना आली आहे. आतां सारा बोजा तिच्या माथीं मारून मी मुकाट्यानं दूर होईल. "

" परक्याची मुलगी एवढा बोजा कशी घेईल रे बाबा ? " अन्नदा म्हणाली.

" बोजा घेतात त्या परक्यांच्याच मुली अनुताई. मुद्दाम बोलावून आणलंय तिला अन् शिवाय वासू राहिला पाहिजे ना ? नाहींतर झक् मारते तुमच्या बलरामपूरच्या मुखर्जीची इस्टेट, झक मारतो त्यांच्या वाडवडिलांचा अभिमान— शशधरच्या मुलांना आणीन बोलावून आणि या संसाराला रामराम ठोकीन ! दादालाच तें साधतं असं वाटायला नको— द्विजूला देखील साधेल ! तसा संन्यास घेणार नाहीं खरा—मला पटत नाहीं तें—पण पैशाअडक्याच्या बोजाला लाथ मारून एकदम निघून जाईन. "

वंदनेचे दोन्ही हात धरून अन्नदा म्हणाली, " विपिनचं ऐकणार आहेस ना ताई ? वासूला ठेवून घेणार आहेस ना इथं ? "

" होय अनुताई. "

" आणि हा जो सत्यानाशी खटला सुरू झालाय जांवईबाबूबरोबर, तो येईल. ना तुला थांबवायला ? "

" होय अनुताई, तोही थांबेल ? क्षणभर स्तब्ध राहून ती म्हणाली,

" माझ्या शब्दाबाहेर यांनी केव्हांच जांयचं नाहीं या अटीवर या घराची घाकटी सून व्हायची कबुली देतेंय मी अनुताई. "

अन्नदेला तें तिचें भाषण चांगलेंसें उमजलें नाहीं. ती नुसती टक लावून तिच्याकडे पहात राहिली.

वंदना म्हणाली, " जें गेलं तें आतां गेलंच आहे. आतां आईला सुद्धां घरवून बसायचं का ? खटला नाहीं काढून घेतला तर कशी घरीं परत येणार ती ? "

उशीच्या खालचा चाव्यांचा जुडगा काढून द्विजदासनें तो वंदनेच्या अगावर फेकला आणि म्हटलें, " या घे. तुझ्या शब्दाबाहेर जाणार नाहीं असं आज तुला मी वचन देतों. "

चाव्यांच्या जुडगा उचलून वदनेनें आपल्या पदराच्या शेवाला बांधला.

आतां कुठें अन्नदेला या साऱ्या प्रकाराचा अर्थ कळून आला. वंदनेला हृदयाशीं कवटाळून धरून ती स्तब्ध होऊन राहिली. तिच्या दोन्ही डोळ्यांतून हीं एवढालीं मोठीं टिपें सारखीं पाझरूं लागलीं होतीं.

विप्रदासच्या खोलींत जाऊन वंदनेनें त्याला प्रणाम केला. ती म्हणाली, " आलें बडेदादा. "

हें नवें संबोधन विप्रदासच्या कानाला जाणवलें. पण त्याचा कांहींच उल्लेख न करतां त्यानें विचारलें, " तूं येणार म्हणून कळलं होतं, तुझ्या बाबांची तार आली होतीं, वाटेंत त्रास झाला नाहीं ना ? "

" नाहीं. "

" बरोबर कोण आलंय ? "

" आमचा दरवान अन् आमचा म्हातारा नोकर हिमू. "

" बाबा खुशाल आहेत ? "

" हो.

विप्रदास कांहीं वेळ उगीच राहिल्यानंतर म्हणाला, " द्विजूनं काय बेडेपण आरंभलाय तो पाहिलास ना ? "

" श्राद्धाबद्दलच म्हणतांहां का आपण ? " वंदना म्हणाली, " त्यांत वेडेपणा कसला ? एवढं तर झालंच पाहिजे. नाहींतर तिच्या योग्यतेला बाध येईल ना ? "

" पण हें सारं त्याला आवरणार कसं वंदना ? "

नाहीं. पण या मनाचं सांत्वन कसं करूं तें सांगा ना मला ! कसं अगदीं रडकुंडीला येतंय हें मन. ”

विप्रदास म्हणाला, “ दुःखाच्या खाईंत उडी घेण्यासाठीं तुझ्या या दादानं घर टाकलं नाहीं असं ज्या दिवशीं तुझ्या मनाला निःसंशय पटेल, त्याच दिवशीं मनाचं समाधान होईल वंदना. त्यापूर्वी नाहीं. ”

“ पण तें मला कसं कळायचं ? ”

“ माझ्यावर विश्वास ठेव. मी कधीं खोटं बोलायचा नाहीं हें तुला माहीत आहे ना मुली ? ”

वंदना कांहीं बोलली नाहीं. एकदोन मिनिटांनीं एक मोठा सुस्कारा सोडून ती म्हणाली, “ जशी आज्ञा. आजपासून मनाचा निर्धार करीत राहीन—बडेदादा खरं खरं बोलून गेलेयत—ते सत्यवादी आहेत—कांहीं तरी खोटंच सांगून फसवून जायचे नाहींत.—माणुसकीच्या श्रेयाचं मोठ्यांत मोठं सार्थक जिथं होतं अशा तीर्थक्षेत्राला निघून गेलेयत. ”

“ हो. ” विप्रदास म्हणाला, “ सर्वांपेक्षां अत्यंत सुंदर अशा मार्गावर बडेदादानं पाऊल टाकलं आहे असं समजायचं आपल्या मनापासून ! त्याला अडथळा करायचा नाहीं. त्याची चूक झाली म्हणायचं नाहीं. समजलास ? त्याच्यासाठीं दुःख करण्यासारखं मोठं पाप नाहीं ! ”

वंदनेच्या डोळ्यांतून पुनः आसवें वाहूं लागलीं. तीं घाईघाईनें पुसून ती म्हणाली, “ खरं आहे. खरं आहे. या जन्मांत पुनः कधीं भेट झाली नाहीं तरीसुद्धां म्हणेन, कीं त्यांची चूक नाहीं. त्यांच्यासाठीं दुःख करण्यासारखं दुसरं मोठं पाप नाहीं. ”

पडदा थोडासा दूर करून आंत डोकावून विराज दत्त म्हणाले, “ थोडं जरुरीचं काम आहे ताईसाहेब. जरा इकडे येऊन जाल का ? ”

“ आलें विराजबाबू. आतां जातें बडेदादा !—” असें म्हणून वंदना तिथून निघून गेली.

मोठ्या थाटामाटानें सतीचें श्राद्धकर्म समाप्त झालें. दीन दुबळे भिकारी साध्वीच्या नांवाचें जयगान करीत घरोघर निघून गेले. सारेच म्हणाले,—मुखर्जीघरचं कार्य म्हणजे हें असंच व्हायचं. इथं लहानमोठा भेद नाहीं.

सकाळींच स्नान करून वंदना विप्रदासच्या खोलींत त्याला प्रणाम करण्यासाठीं आली ती आश्चर्यचकीत होऊन तशीच थबकली. शेजारीं दयामयी बसली होती. पहाटेच्या गाडीनें ती केव्हां आली याचा अजून, कुणाला पत्ता लागला नव्हता.

तिच्याकडे पाहतांच वंदनेच्या काळजानें ठाव सोडला. सोन्यासारखा वर्ण काळवंडून गेला होता. माथ्यावरचे आंखूड केंस रूक्ष झाले होते—धुळीनें भरले होते. डोळे खोल गेले होते. कपाळावर रेषा दिसूं लागल्या होत्या. दुःखाची असली मूर्तिमती प्रतिमा वंदनेनें कधींच पाहिली नव्हती. सर्वांवर हुकमत चालवणारी ती ऐश्वर्यवती करड्या शिस्तीची विप्रदासची आई तिला आठवली. असे कितीसे दिवस गेले होते ? तिचें सारें मोठेपण आज तिच्याच पायदळीं तुडवलें गेलें होतें.

जवळ जाऊन तिला प्रणाम करून ती म्हणाली, " केव्हां आलां आई ? मला कळवलं नाहीं कुणी. "

तिच्या हनुवटीला हातें लावून तिचा मुका घेऊन दयामयी म्हणाली, " कशाला कळवायला हवं वंदना ? तेव्हां येत होती ती विप्रदासची आई— गांवच्या पोरांपासून थोरांपर्यंत तेव्हां सर्वांना कळत होतं.—विपिन, सारं कांहीं उरकलं ना आतां ? चल आतां. मायलेक आजच बाहेर निघूं. "

" आतां कांहीं भ्यायला नको आई. " विप्रदास हंसून म्हणाला. " माय-लेकाच्या जाण्याला आतां अडथळा व्हायचा नाहीं !—पण आज नाहीं—वंदनेचे बाबा येणार आहेत उद्यां. तुझ्या धाकट्या सुनेच्या हातीं संसाराचा कारभार सोपवून दिल्याशिवाय जायचं कसं ? "

बराच वेळ दयामयी मुकाट्यानें बसली होती. त्यानंतर ती म्हणाली, " बरं आहे विपिन. आतां इथं रहाणं कठीण जातंय मला. उगीच खोटं कशाला बोलूं ? पण आणखी किती दिवस रहायला हवं ? "

" फक्त सात दिवस आई. आज आठवे दिवशीं आपण मार्गाला लागूं. "

वंदना म्हणाली, " आतां आपल्या खोलींत चला ना आई. "

मानेनें नकार देत दयामयी उद्गारली, " तुझा एवढाच शब्द राखतां येत नाही मला मुली. आतां जे कांहीं चार दिवस रहायचं ते याच जागीं—अन् निघायच्या दिवशीं दोघंही याच खोलींतून बाहेर निघून जाऊं. आतां आंत जें कांहीं आहे तें सारं तुझंच आहे मुली ! "

वंदनेनें अधिक आग्रह केला नाहीं. पुनः एकवार प्रणाम करून ती खालच्या मानेनें बाहेर निघून गेली.

विप्रदासच्या पत्राप्रमाणें एक आठवड्याची रजा घेऊन रे साहेब बलरामपूरला आले आणि मुलीला द्विजूच्या हातीं देऊन पुनः मुंबईला निघून गेले.

या लग्नाच्या वेळीं नौबती वाजल्या नाहींत. वधुवरपक्षाकडच्या वऱ्हाड्यांचीं भांडणें झालीं नाहींत. करवल्यांचीं बोलणींसुद्धां कानगोष्टींनीं होत होतीं. शंख, शिंग वाजलें तेसुद्धां अगदीं जेवढ्याला तेवढेंच ! लग्नघर अगदींच मुकाट होतें.

द्विजदासाच्या उदास चेहऱ्याकडे पाहून वंदनेनें प्रश्न केला, " कसला विचार करतांहां मांगा ना ? "

" तुझ्याबद्दल विचार करतोंय. द्विजदास म्हणाला; " माझ्यापेक्षां तूं किती मोठी आहेस याचाच विचार करतोंय. "

" कां ? "

" नाहीं तर तूं लाभली नसतीस मला. केवढ्या मोठ्या अडचणी टाळून सत्यानाशापासून वचावलंस आम्हांला ! "

" तुम्ही आलां नसतां ? " वंदनेनें विचारलें.

" नाहीं. "

" खोटं आहे. " वंदना म्हणाली, " मी कसला विचार करीत होतें माहित आहे ! तुमच्या गळ्यांत माळ घालतांना एकच विचार येत होता माझ्या मनांत,—कुठल्या पुण्याच्या जोरावर तुमच्यासारखा पति लाभला मला ? लाभला वासू, लाभल्या सासूबाई, लाभले बडेदादा ! आणखी लाभ झाला तो या एवढ्या मोठाल्या पसाऱ्याच्या जबाबदारीचा. ज्या समाजांतली मी—त्या समाजांतल्या मुलीला काय लाभलं असतं माहीत आहे ? "

" नाहीं. " द्विजदास म्हणाला.

बोलतां बोलतां वंदना मधेंच थांबली आणि म्हणाली, " आज नकोच तें. स्वतःच्या भाग्याच्या शुभकाली उगीच कशाला दुसऱ्याच्या दैन्याचा उल्लेख करूं ? गुन्हा व्हायचा नाहीं का तो ? "

" मुळींच नाहीं. बोल ना तूं. "

मानेनें नकार देत वंदना म्हणाली, " झोंप द्या थोडी. मी जरा कपाळ चेंपतें. " तां

IRBK-0105627